म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. १६५५

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें
संग्रहालय/वाचनालय शाखा.

| | | |
|---|---|---|
| अनुक्रम नं. २२८ | विभाग | क्रमांक |

डि. वा. निबंध.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
संग्रहालय/वाचनालय शाखा.

| | | |
|---|---|---|
| अनुक्रम नं. २२८ | विभाग निबंध | क्रमांक २५ |

पुस्तकाचें नांव लोकांच्या महायुद्धाच्या ...
लेखक ... नरसिंह ...
सूचना—पुस्तक आठ दिवसांवर ठेवूं नका पुस्तकाची खराबी करूं नका.

REFBK-0006830

मनोहर ग्रंथमाला, प्रकाशन ४९ वें.

# तिसऱ्या महायुद्धाच्या छायेत

म.ग्रं.सं.ठाणे.

लेखक
यशवंत नरसिंह केळकर

REFBK-0006830

किंमत ५ रुपये

प्रकाशक
मनोहर महादेव केळकर
मनोहर ग्रंथमाला टिळकरोड,
पुणें २

★

पौष शके १८६९ ] प्रथमावृत्ति [ डिसेंबर १९४७

★

मुद्रक
गोपाळ बळवंत जोशी
आनंद मुद्रणालय
१९६।४६ सदाशिव, पुणें

# थोडें हृद्गत

प्रस्तुत ग्रंथांत गेल्या दीड दोन वर्षांत मी केसरींत परराष्ट्रीय राजकारणावर जे लेख लिहिले ते संकलित केले आहेत. हे लेख, महायुद्धोत्तर घटना घडत असतांनाच लिहिलेले असल्यामुळें त्यांना महायुद्धोत्तर घटनांचा 'ताजा चालू इतिहास' असेंहि म्हणावयास हरकत नाहीं.

१९४३ सालीं केसरीचे त्यावेळचे मुख्य संपादक श्री. तात्यासाहेब करंदीकर यांनीं 'महायुद्धाच्या भडकत्या ज्वाला' हें सदर मजकडे दिलें. उत्तर आफ्रिकेंत एलअलामीनची लढाई झाली व खालून वरून अमेरिकन्स व इंग्रज यांची जर्मनाविरुद्ध प्रतिचढाईची पहिली खरी मोहीम सुरू झाली तेथपासून महायुद्धाच्या परिसमाप्तीपर्यंत तें सदर सर्वस्वी मीच लिहीत होतों. फक्त एकाद दुसराच अंक माझ्या तात्पुरत्या आजाराच्या किंवा गैरहजेरीच्या कालांत माझ्या एकाद्या सहकाऱ्यानें लिहिला असेल इतकेंच. युद्धकाळांत वाचकांच्या दृष्टीनें केसरीचें तें सदर महत्वाचें होतें यांत शंका नाहीं व त्या सदराची लोकप्रियता अखेरपर्यंत टिकली येवढेंच नव्हे तर कांहीं बाबतींत वाढलीही असें म्हणण्यास मला संकोच वाटत नाहीं. माझ्या पद्धतीनें त्या सदरांत जीं वैशिष्ट्यें, मी प्रयत्नपूर्वक आणलीं तीं हीं. १ इतिहासकार वासुदेवशास्त्री खऱ्यांच्या कित्त्यानुसार सर्व आधार जमेस धरून त्यावरून अतिशय सुबोध व त्याचबरोबर वाङ्मयदृष्ट्या सुरेख असें नॅरेटिव्ह किंवा हकीकत पूर्वापर संबंध जोडून सुसंगत द्यावयाची. २ व आपणाकडे युद्धाची परिभाषा परिपूर्ण सिद्ध असतां ती निष्कारण मागे पडलीं सबब त्या जुन्या अस्सल मराठी परिभाषेचा पुन्हा प्रचार करावयाचा व युद्धवर्णनांच्या चालू हेंगाड्या बाटग्या भाषांतरित भाषापद्धतीला कटाप द्यावयाचा. मात्र हें सर्व चालू घडी न विसकटता हळू हळू न कळत वाचकांच्या गळीं उतरावयाचे. या दोन्हीं दृष्टींनीं हा प्रयत्न यशस्वी झाला असें मला कळलेल्या लोकमतावरून मी म्हणूं शकतों. मात्र याचें श्रेय श्री. तात्यासाहेब करंदीकरांनाच देणें योग्य आहे कारण त्यांनीं होऊनच हें महायुद्धाच्या ज्वाळांचें सदर मजवर टाकल्यामुळें मला

जबाबदारीनें युद्धवार्तांचा अभ्यास करावा लागला व या विषयाची मला गोडी लागली.

महायुद्ध संपेपर्यंत केसरींत युद्धविषयक जे अग्रलेख आले ते एकूणएक तात्यासाहेब करंदीकरांचेच होते. त्यांच्या व्यासंगाच्या विविध विषयांत युद्ध व युद्धशास्त्र हा एक पूर्वीपासूनचाच प्रमुख विषय आहे. 'जगांतील क्रांतिकारक लढाया' हा ३० । ३५ वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालेला त्यांचा ग्रंथच त्याची साक्ष देईल. अग्रलेखाच्या रूपानें महायुद्धावर लिहावयाचा प्रसंग महायुद्धाच्या अखेरीस एकदाच मजवर अचानकपणेंच आला व तोही तात्यासाहेबांच्या कृपेनेच. त्यांचे पत्रच पुढें देतो.

श्रीसमर्थ ८।५।४५

श्री. अण्णा केळकर यांस वि. वि. मी उद्यां सकाळच्या गाडीनें कलकत्त्यास जात आहे. या करितां पुढील दोन अंकांकरितां सूचना कळवीत आहे.

१ येत्या शुक्रवारच्या अंकांत युद्धाची हकीकत सविस्तर चार कॉलम द्यावी......युद्धाच्या परिस्थितीचा समारोप केल्याप्रमाणें लिहावी. युरोपांतल्या युद्धाची परिस्थिति, जर्मनी शरण कसा गेला, व शरणागतीनंतरची युरोपांतली परिस्थिति यांचें त्यांत समालोचन असावें. जपानकडल्या युद्धाची हकीकत मात्र नेहमीच्या पद्धतीनें नुसती माहितीवजा द्यावी.

२ पुढच्या मंगळवारचा म्हणजे १५ तारखेचा अंक 'खास अंक' म्हणून काढावयाचा. तो अंक १६ पानांचा होईल. त्यांत आठ पानांच्या पुरवणीत युद्धाची सर्व माहिती व नकाशे वगैरे द्यावयाचे. त्यांतला सर्व मजकूर इतर मंडळी लिहितील. मात्र युद्धाच्या सहा वर्षांच्या समारोपाचें आर्टिकल तुम्ही लिहावें. आर्टिकल चारपांच कॉलमपर्यंत असावें व त्यांत महायुद्धांत कोणत्या कोणत्या काळीं कशीं स्थित्यंतरें झालीं, त्यांत कोणाकडे दोष अथवा श्रेय जातें, त्या स्थित्यंतराचा परिणाम काय झाला,

जर्मनीच्या चुका कोणकोणत्या झाल्या व अखेरीस जर्मनी कसा थकत गेला याचें विवेचन असावें. मंगळवारच्या अंकाची तयारी तुम्हास आधीपासून करावी लागेल त्याकरितां मंगळवारच्या अंकांतील युद्धाच्या वार्ता लिहिण्याचें काम रा. × × × यांजकडे द्यावें. व तुम्ही आर्टिकल लिहावें. आर्टिकल आजपर्यंतच्या केसरीच्या धोरणाला धरून असावे, व वर्णनात्मक आणि युद्धदृष्ट्या विवेचनात्मक असावें

ज. स. करंदीकर

असो. यानंतर कांहीं दिवसांनीं श्रीयुत तात्यासाहेब करंदीकर केसरीच्या संपादकाच्या कामावरून निवृत्त झाले व त्यांचे जागी श्रीयुत दा. वि. गोखले यांची योजना झाली. गोखले यांनी स्वतःच्या योजनेप्रमाणें केसरीच्या मजकुराच्या स्वरूपांत ज्या सुधारणा किंवा फेरफार करावयाचे योजिले त्यांत महायुद्धाच्या ज्वाळांचें सदर बंद करण्याचें कलम होतें. परराष्ट्रीय घडामोडींची माहिती यापुढें वृत्तसंकलनाच्या पद्धतीनें न देतां लेखरूपानें चर्चात्मक पद्धतीनें असावी असें त्यांनी सुचविलें. म्हणून पुढें त्या पद्धतीनें लेख मी लिहिले तेच या पुस्तकांत ग्रथित झालेले लेख होत. या लेखांपैकीं जर्मन गुन्हेगारांच्या खटल्यासारखे कांहीं कांहीं लेख लोकांना फार आवडले होते. वर्तमानकाळ हा बनावाच्या परिस्थितींत असतो तो जुना होऊन स्थिर व दृढ झाल्यानंतरच त्याचे पैलु पाडणें सोपें असते संगांति ताजेपणीं तसें करणें कठीण जाते. तथापि ताजेपणीहि मिळतील तीं साधनें जमवून त्यांतून निवडून घडत असलेल्या घटनांच्या छोट्या छोट्या मूर्ति करून ठेवण्यानें प्रतिदिवशी पुढें जाणाऱ्यांना मागें वळून संदर्भ समजून घेण्यास सुलभ जाईल यांत शंका नाहीं.

१३।१२।४७ यशवंत नरसिंह केळकर

★

# अनुक्रमणिका


| विषय | पृष्ठ |
|---|---|
| १ युरोपांतील युद्धाचा समारोप | १ |
| २ पॅसिफिकमधील जपानी महायुद्धाचें सिंहावलोकन | १७ |
| ३ नेपाळ, पॅलेस्टाइन व इजिप्त | ३३ |
| ४ पॅरिसच्या तहपरिषदेतील मतभेद | ३८ |
| ५ चीन व कोरिया या देशांत वाढती तेढ | ४३ |
| ६ पॅलेस्टाइनमधील ज्यूंची धर्मयुद्धाची तयारी | ४८ |
| ७ रशियानें दार्यानेलिसचा प्रश्न निकरावर आणला | ५२ |
| ८ इराणांतच तिसऱ्या महायुद्धाची सुरुवात होणार ? | ५९ |
| ९ मध्यपूर्वेतील कुर्दी प्रश्नाची पार्श्वभूमि | ६४ |
| १० बोलणें फोल झालें | ६९ |
| ११ अॅंग्लो–इजिप्शिअन वाटाघाटी कां मोडल्या ? | ७५ |
| १२ लंडनची पॅलेस्टाईन परिषद व ज्यू–अरब बहिष्कार | ८२ |
| १३ रूसो–अमेरिकनांची आरमारी स्पर्धा | ८८ |
| १४ मोंगल कारभाराचें ओंगळ प्रदर्शन | ९५ |
| १५ ब्रिटिशांच्या इराणांतील कारवाया पुढें चालूच | १०१ |
| १६ इजिप्तच्या वाटाघाटी दुसऱ्यांदा मोडल्या | १०७ |
| १७ अमेरिकेच्या पाठिंब्यामुळें इजिप्त शेफारला | ११२ |
| १८ जेत्यांच्या कोर्टांत जितांचा न्याय | ११७ |
| १९ तुजसाठीं लढतां मरणें । हा आमचा छंद ॥ | १२३ |
| २० जर्मन खटल्यांतील शेवटचा अद्‌भुत प्रवेश | १२९ |
| २१ तूर्त इराणांत ब्रिटननें रशियावर मात केली | १३७ |
| २२ ज्यू क्रांतिकारकांचा धिंगाणा | १४३ |

| | | |
|---|---|---|
| २३ | पॅलेस्टाइन प्रकरणीं अमेरिकेनें ब्रिटनवर मात केली | १४८ |
| २४ | चिनी यादवींतील चढउतार | १५३ |
| २५ | नेपाळचें वाढतें महत्व | १५९ |
| २६ | नेपाळच्या इतिहासाचें विहंगमावलोकन लेखांक पहिला | १६४ |
| २६ | नेपाळच्या इतिहासाचें विहंगमावलोकन लेखांक दुसरा | १७८ |
| २७ | अँग्लो-अमेरिकनांची इराणांत रशियावर मात | १९२ |
| २८ | मध्यपूर्वेतील तेलाचा प्रश्न | १९७ |
| २९ | रूसो-अमेरिकन वादांत कोरियाची गळचेपी | २०१ |
| ३० | अमेरिकेचाहि मांचूरियावर डोळा कां ? | २०६ |
| ३१ | तिसऱ्या महायुद्धाचा भडका कशाने उडेल ? | २१२ |
| ३२ | 'स्वतंत्र' हिंदुस्थान व नेपाळ यांच्या नव्या भूमिका कोणत्या ? | २२१ |
| ३३ | चर्चिल यांची 'युरोपियन फेडरेशनची' चळवळ | २३४ |
| ३४ | 'पश्चिम युरोपियन राष्ट्रांचें फेडरेशन' | २३९ |
| ३५ | पूर्व युरोपियन गट स्थापण्यासाठीं रशियाची चढाई | २४४ |
| ३६ | पॅलेस्टाइनमधील ज्यू क्रांतिकारकांचें अत्याचार | २५० |
| ३७ | आफ्रिकेंतील फ्रेंच साम्राज्याला लागलेलें ग्रहण | २६० |
| ३८ | 'यूनो' अयशस्वी होणार ? | २६६ |
| ३९ | इराणांतील अझरबैजान पुन्हां पेटले ! | २७२ |
| ४० | राष्ट्रसंघाच्या 'हुजुरांती' तील कागदी घोडे | २७६ |

# आमचें प्रकाशन

| | |
|---|---|
| **फ्रेंच राज्यक्रांति** : न. चिं. केळकर | २॥ |
| **समग्र केळकर-वाङ्मय** : न. चिं. केळकर | ७५ |
| **राका** : सौ. संजीवनी मराठे | १। |
| **प्रतारणा** : प्रा. दांडेकर | २ |
| **संसारसोपान** : सौ. गि. केळकर | १। |
| **प्रदक्षिणा** ( वाङ्मय-समालोचन ) | २॥ |
| **संस्कृति-संगम** ( आ. दु. ) : द. के. के. | ६ |
| **चंपी आणि मोत्या** | १॥ |
| **वेदप्रकाश** : पाठकशास्त्री | १० |
| **जीवनविहार** : आचार्य कालेलकर | २ |
| **स्मरण-सांखळी** : डॉ. कमलाबाई देशपांडे | ६ |
| **हंसरा निर्माल्य व चिमण्या** : डॉ. कमलाबाई देशपांडे | ३ |
| **रानोमाळ** : रा. वि. फडतरे | २॥ |
| **साहित्यविहार** : प्रा. द. के. केळकर | ३ |
| **ससेमिरा** : त्र्यं. वि. सरदेशमुख | २॥ |
| **गांवरान गीता** : न. चिं. केळकर | २ |
| **काव्यालोचन** ( आ. २ री ) : प्रा. द. के. केळकर | ५ |
| **साहित्याचा ध्रुवतारा** : प्रा. रा. शं. वाळिंबे | ३ |
| **नरसिंह केळकर** : वि. उ. वैद्य | १॥ |
| **ज्ञानेश्वरी सर्वस्व** : न. चिं. केळकर | ५ |
| **ठेंगणें अस्मान** : श्रीधर देशपांडे | ४ |
| **मानस चित्रें** : गं. गो. गाडगीळ | २॥ |
| **उपायन** : मनोहर म. केळकर | २॥ |
| **संस्कृत काव्याचे पंचप्राण** : डॉ. के. ना. वाटवे | ६ |
| **काव्यविहार** : डॉ. माधवराव पटवर्धन | ४ |
| Location of Lanka : M. V. Kibe | 2 |
| **तिसऱ्या महायुद्धाच्या छायेत** : य. न. केळकर | ५ |
| **हिंदी हीच आमची राष्ट्रभाषा** : शं. दा. चितळे | ३ |

६८९०

# युरोपांतील महायुद्धाचा समारोप

**सूत्रधारि जो पुरुष तयाच्या गुणास जग भुलत ।**
**हातांत सगळे दोर पतंगापरि फौजा हलत ॥**

**—प्रभाकर शाहीर**

गेल्या ता. ८ रोजीं विजयदिनाची घोषणा करीत असतां समाधानाचा सुस्कारा टाकताना ब्रिटनचे प्रधानपंत, चर्चिल यांना जो आनंद झाला असेल, तसा आनंद त्यांना यावज्जन्मांत त्यापूर्वी झाला नसेल. कारण चर्चिल यांनी प्रधानपद स्वीकारलें तो काळ ब्रिटनला किती खडतर आला होता! युरोपच्या नकाशावरून ब्रिटनचें कायमचें उच्चाटनच जर्मनी करतो की काय, अशीच भीति उत्पन्न झाली होती; पण पांच वर्षांतच जगाची पार उलथापालथ होऊन आज अशी उलटी स्थिति झाली आहे की, त्या जर्मनीचें निसंतान होऊन त्याची नांवनिशाणीहि युरोपच्या नकाशावर उरलेली नाहीं.

हिटलर व मुसोलिनी या राहु-केतूंनी युरोपाला ग्रहण लावलें तें इतक्या झपाट्याने पसरत चाललें की, पाहतां पाहतां त्याची काळछाया सर्वत्र पसरून देशामागून देश गडप झाले, व "सूर्या मावळला बुडालें आभाळ" अशी स्थिति अवतरली. अवकाळींच काळरात्र आली अशा समजुतीने ग्रहणकाळांत मूढ पशुपक्षी घाबरून सैरावैरा पळूं लागतात व केविलवाणा आक्रोश करतात. युरोपांतील जनतेचीही तीच स्थिति झाली. सर्वत्र रणकंदन, विध्वंस, रक्तपात सुरू होऊन नाझी पाशांत सारा

युरोप गुरफटला. इंग्लंड हे युरोपांतच पण युरोपाबाहेर वसलें असल्यामुळे त्याचा त्याच सपाट्यांत ग्रास झाला नाही हें खरें. पण सारा युरोपच जर्मनीने आवळून टाकल्यामुळे ब्रिटनच्या नसनाड्या आखडून गेल्या व तें अगदी निष्प्रभ बनलें. शतकानुशतकें जतन करून वाढविलेली इंग्लंडची आंतरयुरोपीय प्रतिष्ठा पार रसातळास गेल्यासारखी झाली व एकाकी असहाय स्थितींत जर्मनी आपणावर आता निश्चित स्वारी करणार, ती झाल्यास तिचा प्रतिकार तरी कसा करावा, अशा दारुण विचारांत इंग्लंड गढून गेले. याच काळांत ब्रिटनची राज्यधुरा चर्चिल यांना स्वीकारावी लागली. पण तुफान वादळांत भोवंडें खाणाऱ्या असहाय गलबताच्या कप्तानाप्रमाणे कर्तव्यनिष्ठा, धैर्य, चिकाटी आणि अतुल नाविक कौशल्य यांच्या जोरावर सहकारी खलाशांस धीर देत त्यांनी ब्रिटनचें तारूं जगविलें, शाबूत राखलें, एवढेंच नव्हे, तर ज्या लाटांनीं तडाके देत त्याला पाताळांत दडपण्याचा प्रयत्न केला, त्यांच्याच छातीवर नाचवीत तें तारूं त्यांनी विजयाच्या बंदरांत आणून नांगरलें !

## चर्चिलची भविष्यवाणी

१० मे.१९४० रोजीं चर्चिल मुख्य प्रधान झाले. त्या आधी पांच वर्षे १९३५ सालीं त्यांनी 'Hitler and his Choice' नांवाचा एक उत्कृष्ट लेख लिहिला होता. तो पुढे 'Great Contemporaries' या त्यांच्या ग्रंथांत समाविष्ट झाला आहे. त्या वेळीं महायुद्धाची कल्पना उदित झाली नव्हती व खुद्द चर्चिल यांनाहि ब्रिटिश पार्लमेंटांत कांहीच वजन उरलेलें नव्हतें. त्यांना कोणी अनुयायी नव्हते व एकांडे शिलेदार म्हणून उपहासपूर्वकच त्यांच्या भाषणांकडे त्या वेळचें ब्रिटिश सरकार दुर्लक्ष करीत असे. पण तेव्हा त्यांनी लिहिलेला तो लेख आज वाचला म्हणजे त्यांच्या परिणत राजकीय प्रज्ञेचें व दूरदृष्टीचें कौतुक वाटतें. त्या वेळीं युद्धाचा असा अभिनिवेश कांहीच नसल्यामुळे चर्चिल यांनी हिटलरचें अलौकिकत्व, त्याची निस्सीम देशभक्ति व असामान्य नेतृत्वशक्ति इत्यादि गुणांचें मुक्तकंठानें स्तवन करून महापुरुषांच्या मालिकेंतील हिटलरचें स्थान निर्विकार बुद्धीने मान्य केलें होतें; पण त्याच

वेळीं त्याच हिटलरचा इंग्लंड-फ्रान्सशीं दुर्निवार विरोध येण्याचाहि कसा संभव आहे याचें जें दिग्दर्शन त्यांनी केलें ते भविष्यवाणीसारखेंच ठरलें. त्या चर्चिलनी इंग्लंडची धुरा या वेळीं धारण करावी व हिटलरचा त्यांच्याच हातांनीं निकाल व्हावा व इंग्लंडला पुनः अकुतोभय व्हावें हा योगायोग विशेषच लक्षांत भरतो.

वास्तविक जर्मनीने पोलंडविरुद्ध युद्ध पुकारल्यानंतर नांवाला जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारण्याचा देखावा इंग्लंडला करतां आला असता; तसा करून तें कालहरण करीत स्वस्थ बसतें तर इंग्लंडवर जर्मनीचा रोष झाला नसतां. पण तसें करण्यानें इंग्लंडची प्रतिष्ठा तर राहत नाहीच; शिवाय हिटलरचा शह साऱ्या युरोपवर पसरल्यानंतर इंग्लडच्या राजकीय, आर्थिक किंवा व्यापारिक हितसंबंधांना व साम्राज्यघटकांनाहि धोका उत्पन्न झाल्याखेरीज राहत नाही, हें जाणूनच हिटलरच्या सर्व वासवी शक्तींना आव्हान देऊन चर्चिल यांनी जर्मनीशीं अटीतटीचें झुंज-भांडण सुरू केलें. त्या वेळीं सैन्य, साहित्यसामान, विमाने यांचा पुरवठा इंग्लंड-जवळ फारच अपुरा होता. उलट पक्षीं साऱ्या युरोपांतील राष्ट्रांना पुरून उरेल अशी जबरदस्त फौज व हवाईदल आणि यंत्रसामुग्री हिटलर-जवळ सज्ज होती. येऊन जाऊन आरमारी दलाचा संच मात्र इंग्लंड-जवळ भरपूर व भक्कम होता. परंतु आपल्या पाणबुड्यांच्या जोरावर त्याचा धुव्वा उडविण्याची जर्मनीला खात्री वाटत होती. इंग्लंडला आसपास कोणीहि साहाय्यकर्ता उरला नव्हता. पायथ्याशीं इंग्लिश चॅनलमधील बेटेहि जर्मनांनी जिंकून घेतलीं होतीं. व उशाचें आयर्लंड पण तें साता जन्माचे वैर फेडण्यास बरी संधि आली अशा ईर्षेने दावेदाराप्रमाणे इंग्लं-डला कोलदांडा घालून बसलें. त्याने आपले नाविक व आरमारी तळ ब्रिटनला युद्धापुरतें देण्यास साफ नकार दिला !

## अमेरिकेची मनधरणी

येऊन–जाऊन अमेरिकेची मदत होण्याचा संभव. परंतु त्या वेळीं अमेरिका उदासीन होती. तिने केवळ व्यापारी वृत्ति स्वीका-रली होती. म्हणजे आपल्याजवळ जें युद्धोपयोगी साहित्यसामान

असेल तें त्याच्या मोबदला दुसरें कांही तरी घेऊन नफ्याने विकावें. १९३९ सालच्या आक्टोबरांत याच्च दृष्टीने कथील व रबर यांच्या बद-ल्यांत इंग्लंडला लाकूड पुरविण्याचा एक करार अमेरिकेने केला व पुढील सालीं चर्चिल यांचे कारकीर्दीच्या सुरवातीस अमेरिकन आरमारांतील जुनाट बुद्रक झालेल्या ५० विनाशिका अमेरिकेने इंग्लंडला विकल्या. पण त्यांच्या मोबदल्यांत पश्चिम अटलांटिकमधील ब्रिटिश तळांचा कबजा मिळाविला ! १९४१ सालीं प्रत्यक्ष पर्ल हार्बरवर जपानने धाड घालून अमेरिकेला युद्धांत ओढलें तेव्हापासून मात्र अमेरिका इंग्लंडशी समदुःखी झाली. परंतु तेथपर्यंत अमेरिकेकडून खऱ्या मदतीची अपेक्षा करण्यांत अर्थ नव्हता. अशा अवस्थेंत चर्चिल यांना किती कारस्थानें करावीं लागलीं असतील ? किती परिश्रम पडले असतील ? वारा पाहून त्याप्रमाणें कितीदां शिडें बदलावी लागलीं असतील ? याची कोणालाही कल्पना करतां येईल. पण ते सर्व यशस्वी रीतीने उरकून अखेर चर्चिलच परि-स्थितीवर स्वार झाले. “ मी तुम्हाला उगाच खोटी आशा दाखवणार नाही. जय मिळो न मिळो, ईश्वरावर भरंवसा ठेवून प्राप्त कर्तव्य घाम गाळीत करीत राहा. आपली होणारी हानी दिसली, तर मुकाट्याने अश्रु गाळा, पण हात थांबवूं नका, तरच कांही आशा आहे ” असे युद्धाच्या सुरवातीस निराशेचे उद्गार काढणारे चर्चिल पुढे तीनच वर्षांत पुनः १९४३ सालीं आपल्या उद्दाम ‘ पणांत ’ येऊन विश्वासपूर्वक सांगूं लागले कीं, “ मी जो इंग्लंडचा प्रधान झालों तो ब्रिटिश साम्राज्याचे तुकडे करून त्याचा लिलाव पुकारण्यासाठी नव्हे. म्हणजे इंग्लंड देश तर आम्ही निर्भय केलाच आहे पण आमच्या साम्राज्यघटकांनाहि आम्ही खास निर्भय करणार ” आणि अखेर अखेर तर जर्मनीच्या बिनशर्त शरणांगतीच्या अटीचा जोर त्यांनी इतक्या निकराने धरला की, कदाचित् तो सफल होणार नाही, अशा शंका ब्रिटिश पार्लमेंटांतहि बोलून दाख-विण्यांत आल्या. पण चार्चिल यांनी आपला शब्दन् शब्द खरा करून दाखविला. साऱ्या युरोपला भारी ठरलेले हिटलर आणि मुसोलिनी त्यांच्या सर्व सामंतचक्रांसह ठार झाले, कैद झाले किंवा गैब झाले व लाचार होऊन दोस्तांपुढे गुढघे टेकून जर्मनीला बिनशर्त शरण यावें लागलें.

युरोपांतील महायुद्ध हिटलरने सुरू केलें, म्हणून तो महायुद्धाचा नायक म्हटला तर प्रतिनायकाचा मान चर्चिलकडेच जातो आणि म्हणूनच 'युरोपचें युद्ध' केवळ इंग्लंडनें म्हणजे चर्चिलने जिंकलें या म्हणण्यांत अतिशयोक्ति नाही.

## जर्मनांच्या लष्करी धोरणाचें सूत्र

दोन आघाड्यावर लढण्याचा प्रसंग येऊं देऊं नये म्हणून जर्मनांनी फार दूरदर्शीपणाने खटपटी केल्या होत्या. किंबहुना त्यांच्या लष्करी धोरणांतील तें मुख्य सूत्रच होतें. 'Germany will never fight on two fronts' असे हिटलर जे आपल्या जाहीर वक्तव्यांत आत्मविश्वासाचे उद्गार काढी ते त्याचेच द्योतक होते. त्याच धोरणाला अनुसरून पोलंडचा ग्रास करण्याचे हिटलरने ठरविलें त्यावेळीं त्याने रशियाशीहि गुप्तपणें अनाक्रमणाचा व वाटणीचा तह करून टाकला. हिटलर हा वास्तविक बोल्शेविझमचा हाडवैरी. त्याविरुद्ध त्याचा जळजळीत प्रचार अखंड सुरूच होता. अशा स्थितींत या दोघा अहिनकुलांचें सख्य होऊं शकेल ही गोष्ट कल्पनातीत होती. परंतु राष्ट्राराष्ट्रांतील राजकारणें हीं कधींहि सुसंगतीच्या रस्त्याने प्रवास करीत नसतात. जें तें राष्ट्र अमुक अमुक घटनेमुळें माझा कांही फायदा होतो आहे कीं नाहीं असें पाहूनच वागत असतें. आणि म्हणूनच 'वारांगनेव नृपनीतिरनेकरूपा' म्हणत असतात. त्या नीतीला अनुसरून रशियाने जर्मनीशीं आंतून भाईचारा करण्यांत बिलकुल दिक्कत मानली नाही व जर्मन फौजा पोलंडचा ग्रास करीत पश्चिमेकडून वॉर्सापर्यंत जाऊन थडकतांच रशियानेहि पूर्वेकडूनं पाणलोटाप्रमाणे वाहात येऊन वॉर्साच्या पूर्वेकडील पोलंड देश गिळंकृत केला! पोलंडचें व रशियाचें हाडवैर पुरातनच होतें. पण यावेळीं रक्ताचा थेंबहि न सांडता किंवा एकहि गोळी न वाजवितां रशियाला निम्मा पोलंड विनायास पचनीं पाडता आला. रशियाशीं दोस्ती करून पूर्वेकडची बाजू निर्वेध करून घेतल्यावर मगच जर्मनीने पश्चिमेकडील राष्ट्रांना जमिनदोस्त केले. या वेळीं रूसोजर्मनांत युरोपची वांटणी करण्याचा आपसांत जणुं संकेतच ठरला होता. एक जण चढाई

करून आपल्या शेजारी राष्ट्रावर हात मारून त्याला गिळंकृत करूं लागला म्हणजे तो वेळपर्यंत दुसरा स्वस्थ बसे व पहिल्याचें खाणें पुरें होऊन त्याने ढेकर देतांच दुसरा आपल्या बकासुरी उद्योगास प्रवृत्त होई. रशियाने पोलंड जिंकतांच नुसत्या दमदाटीनेच एस्तोनिया, लटव्हिया व लिथुआनिया हीं छोटीं बाल्टिक राष्ट्रें आहारीं आणलीं. राहातां राहिलें फिनलंड. व तेंच त्या बाजूचें रशियाचें सर्वांत मोठें उद्दिष्ट. म्हणून ३० नोव्हेंबर १९३९ रोजीं रशियाने फिनलंडवर स्वारी केली, व तीन महिन्यांत त्याला जेरीस आणून रशियाने आपलें तोंड आर्क-टिक व अटलांटिक महासागरांना भिडविलें. रशियाचा हा फराळ सुरू होता येथपर्यंत जर्मनी स्वस्थ लागभाग पाहात बसून राहिला होता. मग त्यानेहि आपलें सर्वभक्षकसत्र सुरू केलें, व एप्रिल १९४० पासून जूनपर्यंत एका पाठोपाठ नॉर्वे, डेन्मार्क, हॉलंड, बेल्जम, लक्झेंबुर्ग व फ्रान्स हे देश जिंकले. या सर्व घडामोडींत आपणांस एकाच आघाडीवर लढणें पडावें अशी धूर्त तजवीज रशिया व जर्मनी या दोघांनीहि करून ठेवली होती.

## रूसो-जर्मन वैषम्य वाढलें

येथपर्यंत ठीक झालें. पण यापुढे जर्मनी व रशियाचें राजकारणी सख्य टिकण्यासारखें नव्हतें. दोघेहि कमालीचे बलिष्ठ, महत्त्वाकांक्षी आणि मनांतून पक्के हाडवैरी यामुळे त्या दोघांतील सख्य असेंच पुढे टिकणें ही गोष्ट एका म्यानांत दोन सुऱ्या राहण्यासारखें किंवा एका सिंहा-सनावर दोन राजे राहण्याइतकीच अशक्यप्राय. रूसो-जर्मनांचा अना-क्रमणाचा व सख्याचा जगाला चकित करून सोडणारा तह जाहीर झाला त्या वेळीं हिटलरने असा निर्वाळा दिला होता की, जरी आमचा तह झाला आहे, तरी आम्ही आपापलीं ध्येयें अलगच राखलीं आहेत. रशियांतील बोल्शेविझमच्या वाटेस आम्ही जाणार नाहीं व आमच्या जर्मनींतील नॅशनल सोशालिझमच्या वाटेस रशिया जाणार नाही, असें गुण्यागोविंदाचें नातें आमच्यांत ठरून गेलें असल्यामुळे आमच्या मैत्रींत विक्षेप येणें शक्य नाही. पण ही स्थिति टिकणें शक्यच नव्हतें. खाऊन

पिऊन पुष्ट झालेले हे सुंदोपसुंद मनांतून खरोखर एकमेकांचा अविश्वासच मानीत होते. आणि त्याचाच फायदा इंग्लंडने करून घेतला व जर्मनीला सतत दोनहि आघाड्यांवर लढावयास भाग पाडून त्याचा चेंदामेंदा केला.

तो प्रकार असा की, रशियाने बाल्टिक राष्ट्रें गिळंकृत केल्यावर जर्मनी बाल्कन राष्ट्रांकडे वळला. त्याने हंगेरी, बल्गेरिया व रुमानिया या प्रमुख राष्ट्रांना दबावाने आपल्या कह्यांत आणून त्यांच्याशीं स्वतःला पाहिजे तसे मैत्रीचे करार करून घेतले. नंतर इटालीकडून ग्रीस व युगोस्लाव्हियाची स्वारी करविली पण ती त्याला झेपली नाही; तेव्हा जर्मनीनेच ती उरकून आपला शह तेथे बसविला. सारांश, वर नार्वेपासून खाली ग्रीसपर्यंत देश जिंकून जर्मनी इतका जबरदस्त झाला की, यापुढे रशियाला त्याचें अतोनात वैषम्य वाटूं लागलें. इंग्लंडने याच सुमारास क्रिप्स यांना रशियांत वकील म्हणून पाठवून अंतस्थपणें रशियास आपणाकडे फितुर करून घेण्यांत पुरें यश मिळविलें होतें व रशियाच जर्मनीवर चढाई करण्याच्या पावित्र्यांत उभा राहत होता. त्याची वार्ता अर्थातच जर्मनांना लागली व यापुढे एकीकडून इंग्लंड व दुसरीकडून रशिया अशा दोन जबरदस्तांशीं एकदम दोन आघाड्यांवर लढण्याचें संकट अखेर आपणांवर येऊन कोसळणार, असें पाहून त्याने निर्वाणीचें अमोघ अस्त्र म्हणून हर हेस याला विमानाने इंग्लंडांत पाठविलें.

## हेस येताच पिंजऱ्यांत पडला

हर हेस हा हिटलरच्या खालोखाल जर्मन राष्ट्रांचा प्रमुख. आपण मेलों तर त्यालाच आपणामागून फ्यूरेरचे सर्वाधिकार मिळावे, असें जाहीर मृत्युपत्रहि हिटलरने करून ठेवलें होतें. तेव्हा अशा मातबर मोहऱ्याला एवढें धाडस अंगिकारून इंग्लंडांत पाठविण्याचा हिटलरचा हेतु इंग्लंडशीं जुळवून घ्यावें व रशियावर चालून जातांना पाठीमागे इंग्लंडची धाड अंगावर कोसळूं नये हें साधण्याचाच होता असें लोकमत होतें. पण चर्चिल यांचा कृतनिश्चय होऊन चुकला होता. त्यांनी दुसरें

तिसरें कांहीच केलें नाही, तर युद्धकैदी म्हणूनच हेसला पकडून कैदेंत घातलें. सारांश, येथे चर्चिल यांनी हिटलरवर मात केली व येथून पुढे प्रत्येक वेळीं जी गोष्ट म्हणजे दोन आघाड्यांवर लढणें ही हिटलर टाळत होता तीच त्याच्या बोकांडीं बसविली! उत्तर आफ्रिकेच्या लढ्यांत पूर्वेकडून ब्रिटिश तर पश्चिमेकडून अमेरिकन्स यांच्या कैचींत जर्मनांना लढावे लागले. खेरीज त्याच वेळीं तिकडे तिसरी रशियन आघाडी होतीच. पुढे पुढे तर तीन-तीन चार-चार ठिकाणीं एकाच वेळीं जर्मनीला लढण्यास भाग पाडलें व रानडुकराला शिकारी कुत्रीं सर्वांगांनी लोंबकळून त्याला पिसाळून टाकतात तशी गत झाली. अखेरीस तर नार्मंडींतून दोस्तांची युरोपवर स्वारी सुरू झाली त्या वेळीं पश्चिम फ्रान्स, द. फ्रान्स, द. इटाली व तिकडे अफाट रशियन आघाडी अशा चार दिशांनी जर्मनीची गळचेपी सुरू होती.

दोन आघाड्यांवर शत्रूला लढण्यास भाग पाडण्याचा डाव जर्मनांनीहि दोस्तांवर केला नाहीं असें नाही. त्यांनी जपानला उठवून तेंच साधलें; व सुरुवातीस तर त्याची कारवाई फारच सफल झाली; कारण, जपाननेंहि मोकाट सुटल्याप्रमाणे पॅसिफिक महासागरावर धुमाकूळ माजवून, ब्रह्मदेश, मलाया, फिलीपाईन, ईस्ट-इंडीज इत्यादि देश जिंकले; न्युगिनिवर कबजा बसविला व खंडप्राय असा ऑस्ट्रेलियाचा हत्तीहि गिळण्याची महत्त्वाकांक्षा धरली. हें जपानी संकट अमेरिकेच्या दृष्टीने इतकें महत्वाचे होतें कीं, अमेरिकन लोकांस युरोपांतील युद्धांत गुंतणें ही अगदी गैर-महत्वाची गोष्ट भासूं लागली. अमेरिकेला युरोपाशीं काय कर्तव्य आहे? अमेरिकेने आपली शक्ति व साहित्य तिकडे निष्कारण कशास खर्च करावें असे आवाज जाहीरपणें निघूं लागले.

## जर्मनीचा उलट पेंच

सारांश, जर्मनीने जो पेंच टाकला त्यांत कल्पनेबाहेर यश आलें व अमेरिका आपणास सोडून जाते कीं काय, अशी इंग्लंडांत धाकधूक वाटूं लागली. पण या वेळींहि चर्चिल यांचीच मुत्सद्देगिरी फळास आली. त्यांनी अमेरिकेची वारी करून रूझव्हेल्ट यांजकडून युरोपच्या युद्धावरील

अमेरिकेचें लक्ष बिलकूल कमी होणार नाही असें वचन घेतलें. रूझवेल्ट यांचें आश्वासन ब्रिटिश पार्लमेंटांत चर्चिल परत येऊन जाहीरपणें निवेदन करीपर्यंत इंग्लंडचा जीव भांड्यांत पडला नव्हता. चर्चिल यांनी रूझव्हेल्ट यांच्या मनावर कसें असेल तें असो, पण पक्कें बिंबवून दिलें कीं, पॅसिफिकचा लढा अमेरिकेला जिंकावयाचा असेल, तर आधी युरोपांतला लढा यशस्वी झाल्याखेरीज गत्यंतर नाही. अर्थात् मोबदला म्हणून चर्चिल यांनी अमेरिकेला असा हवाला देऊन ठेवला कीं, युरोपियन महायुद्धाच्या समाप्तीनंतर ब्रिटन उदासीन होणार नाही. अवशिष्ट सर्व साहित्यानिशीं शेवटचा रक्तबिंदु असेपर्यंत ब्रिटन पॅसिफिकच्या लढ्यासाठी अमेरिकेच्या खांद्याला खांदा लावून लढेल. अमेरिकेची खात्री पटविणें अर्थातच सोपें नव्हतें. म्हणून चर्चिल यांनी रूझव्हेल्ट यांना असेंहि निर्वाणीचें सांगितलें कीं, आमच्या तोंडी आश्वासनांवर–शपथांवर तुमचा विश्वास बसत नसेल तर तसा पक्का लेखी करारहि लिहून देण्यास इंग्लंड तयार आहे ! युरोपियन युद्धांत अमेरिकेला पक्की गुंतवून घेण्यांत व अमेरिकेचें अमर्याद सैन्य, रणसाहित्य व आरमार युरोपियन आघाडीवर आणून ओतून हिटलरला सतत दोन आघाड्यांवर अखंड लढण्यास भाग पाडण्यांत चर्चिल यांनी फारच बहादुरी दाखविली यांत शंका नाहीं.

लष्करी दृष्ट्या ब्रिटनने जर्मनीवर मात केली, पण त्याच्या पाठीमागे आधी मुत्सद्यांना मात करून दाखवावी लागली होती. रणांगावरील मोहरीं किंवा प्यादीं हलताना दिसत असतात, पण त्यांची स्थूल दिशा आधी मुत्सद्यानी बुद्धिबळाच्या पटावर आंखून दिलेली असते. अमेरिकेच्या प्रश्नानंतर स्पेन व तुर्कस्थान या दोन राष्ट्रांचा प्रश्न अत्यंत नाजूक असा होता. किंबहुना या दोन राष्ट्रांच्या युद्धप्रवेशावरच युरोपांतील युद्धाचें भवितव्य ठरण्याइतके महत्त्वाचे क्षण प्राप्त झाले होते. पण त्या वेळींहि ब्रिटिश मुत्सद्यांनीच जर्मन मुत्सद्यांवर मात केली. अँग्लो–अमेरिकनांची उत्तर आफ्रिकेची संयुक्त मोहीम सुरू झाली, तें युद्ध ऐनरंगास आले, तेव्हा स्पेन हा आता कोणत्या क्षणीं तटस्थता सोडून युद्धप्रवेश करतो अशीच प्रत्येकजण आतुरतेने वाट पाहात होता.

भूमध्यसमुद्राची एका बाजूने इटालियनांनी कोंडी करून टाकली होती. दुसऱ्या बाजूचें जिब्राल्टरकडील दुसरें टोक; तें तेवढें मोकळे होतें. त्या वेळीं स्पेनने मनांत आणलें असतें तर अवघी ८-१० मैलांची खाडी ओलांडून जाऊन त्याला उत्तर आफ्रिकेंत सैन्य उतरवतां आलें असतें व पूर्वेकडून व पश्चिमेकडून येणाऱ्या अँग्लो-अमेरिकन सैन्यांत मोठाच मेढा उभा करतां आला असता व जिब्राल्टरकडील भूमध्यसमुद्राचें तोंड लिंपून त्याची 'लेव्हलबॉटल' करून सोडतां आली असती!

## स्पेनने दगा केला

स्पेन हा जर्मनीचा जिवाचा दोस्त. इटलीप्रमाणे तो कोणत्या क्षणीं युद्धपदार्पण करतो एवढेंच पाहावयाचें अशी लोकांची ठाम समजूत. आणि स्पेनने जर्मनी इटालीचे कृतोपकार स्मरावे अशीच स्थिति होती. महायुद्धाआधी झालेल्या फ्रँकोच्या स्पॅनिश लढ्यांत जर्मन–इटालियनांनीच हरतऱ्हेची मदत स्पेनला केली. इटालीने व्हॉलंटी-अर्सच्या नांवाखालीं एक लक्ष तर जर्मनीने ६० हजार शिपाई फ्रँकोला पुरविले. चालू महायुद्धांतील सर्व प्रभावी प्राणघातक हत्यारें स्पेनला पुरविण्यांत आली, त्यामुळेच फ्रँकोला यश आलें. फ्रँको हा बोलशेविझमचा हिटलरच्या तोडीचाच द्वेष्टा. अगदी परवापर्यंत म्हणजे १९४५ च्या सुरुवातीपर्यंतहि त्याच्या जाहीर भाषणांत बोल्शेविझमची निंदाच उतूं जात होती. पण असेंहि असता स्पेनने जर्मनीच्या बाजूने युद्धपदार्पण केले नाही व उत्तर आफ्रिकेंतील जर्मन-इटलीचा नाश उघड्या डोळयाने पाहिला!! ही स्पेनच्या मनोवृत्तींतील क्रांति जर कोणी घडवून आणली असेल, तर ती चर्चिल यांनी पाठविलेल्या वकिलाने म्हणजे सर सॅम्युअेल होअर यानेच होय. कोणतेंहि राष्ट्र केव्हांहि दुसऱ्यावर उपकार करण्याकरिता म्हणून कांहीहि करीत नसते. स्वतःच्या राष्ट्राचा स्वार्थ किती प्रमाणांत साधतो किंवा अमुक एक गोष्ट केली असतां आपणास लाभ-हानि किती होईल याचा तालामाला पाहत पाहतच त्याचीं पावलें पडत असतात. म्हणून आधीच स्पॅनिश राज्यक्रांतीच्या युद्धांत थकून गेलेल्या अवस्थेंत असता पुनः युद्धाच्या डोंबाळयांत पडून इंग्लंड-अमेरिकेचें हाड-

वैर संपादून त्यांचे तडाखे खाण्यास तयार व्हावें कीं काय, हा विचार मनोमन फ्रँकोने केलाच असेल. परंतु सर्व पाश्चिम युरोपचा स्वामी बनलेला व तेथपर्यंत अजिंक्य ठरलेला हिटलर स्पेनच्या उशाशीं येऊन बसला होता व फ्रान्समधून वाटेल तें सैन्यसाहित्य देतो, तूं नुसते युद्ध जाहीर कर, असें दुर्निवार दडपण स्पेनवर आणीत होता व तीच वेळ स्पेनच्या पवित्र्यांत निश्चित बदल होण्याची होती. अशा वेळींच मुत्सद्दी लोकांच्या बुध्दिबळाची कसोटी लागते. म्हणूनच यावेळीं सॅम्युअल होअर यांनी फ्रँकोला तटस्थ राखण्यांत यश मिळवून जर्मन मुत्सद्द्यांवर मात केली. स्पेनचा प्रश्न किती नाजूक होता व त्याच्यावर भूमध्य समुद्रांतील लढ्याचें यशापयश कसें अवलंबून होतें याचा प्रत्यय पुढे भर पार्लमेंटांत फ्रँकोची पाठ थोपटून चर्चिल यांनी सर्वांस चकीत करून सोडलें त्यावेळीं आलाच आहे.

## तुर्कस्थानलाहि थोपवून धरलें

तुर्कस्थानबाबतहि इंग्लंडने जर्मन मुत्सद्द्यांवर मात केली. तुर्कस्थानचा प्रश्न तर एकवेळ इतका नाजूक झाला होता की, खुद्द चार्चिल यांना सारा मानापमान गिळून मुठींत नाक धरून आडाण्याची वारी करून तुर्कस्थानची मनधरणी करावी लागली. फ्रान्सचा जर्मनीकडून पाडाव झाल्यानंतर इंग्लंड असहाय्य एकाकी पडलें. रशिया व अमेरिका बडे दादा बनलेले व त्यांच्या जोरावरच इंग्लंडच्या अस्तित्वाची मुख्य मदार, म्हणून इंग्लंडने त्यांच्या दारीं खेटे घातले यांत तितकेसें आश्चर्य नाही. पण तुर्कस्थानच्या दारींहि इंग्लंडला अनुनय करण्यासाठी जाण्याचा वक्त गुदरला पण तोहि मोठ्या साध्यावर दृष्टि ठेवून इंग्लंडने संपादिला. दुसऱ्या बाजीरावीत एकाकी असाहाय अशा नाना फडणविसाने पुढील धोरणावर दृष्टी ठेवून दीनवृत्ति ठेवली, लाचारी स्वीकारल्यासारखें दाखविलें पण अखेर सुप्रसिध्द महाडचें कारस्थान रचून आपल्या अतुल मुत्सद्देगिरीने व कर्तृत्वाने शत्रूंचा सगळा डाव उधळून लावला व सर्वांना कैद करविलें. तशा सारखीच शहामत या महायुध्दांत रिबेंट्रॉप, पॉपेन इत्यादी जर्मन

मुत्सद्द्यांवर मात करून चार्चिल, हॅलिफॅक्स, सॅम्युअल होअर यांनी करून दाखविली यांत शंका नाही.

शत्रूच्या मुलुखांत फितूर पेरणें किंवा तेथे आगाऊच असलेल्या असंतुष्ट व नाराज लोकांना चिथावणी देऊन त्यांच्याकरवी राज्यक्रांति घडवून आणणें याहि गोष्टी मुत्सद्दी करीत असतात. इंग्लंडने या कामीं इटालीबाबत जी करामत करून दाखविली त्याला तोडच नाहीं असें म्हटलें तरी चालेल. जर्मनी आणि इटाली यांची इतकी अभेद्य एकी झालेली दिसत होती कीं, ती भंगणें हे वज्राला तडा पडण्याइतकेंच कठीण आहे अशी लोकसमजूत बनून गेली होती. परंतु मुसोलिनी जरी इटालींत मनमानेल तसा रगडून कारभार करतांना दिसला तरी खुद्द इटलीचा राजा व त्याचें जुनें उमराव मंडळ यांच्यांत इतकेसें सूत नाहीं, किंबहुना आंतून वैषम्य किंवा मत्सरच धुमसत आहे याचा पक्का कानोसा ब्रिटनने घेतला होता. जर्मनींत सारी जनता हिटलरशीं एकरूप बनून गेली होती, तेथे त्याला प्रतिस्पर्धि नव्हते. किंवा कोणी असलेच तरी त्यानें त्यांचा निकाल लावला होता. उलटपक्षीं इटालींत मुसोलिनीशीं देशांतील सर्व पक्षांचे तादात्म्य झालेलें नव्हतें. शिवाय इटाली-जर्मनीच्या दोस्तीचा प्रकार "जायंट अँड दि ड्वार्फ ' म्हणजे ' राक्षस आणि माणूस ' यांच्या मैत्रीइतकाच इटालीला फायदेशीर घडला. म्हणजे सर्व नुकसानी आणि शस्त्राचे घाव इटालीच्या पदरांत पडले आणि सर्व विजय किंवा बक्षिसें मात्र जर्मनांनीच बळकावली. इटालीने अल्बानिया, ग्रीस, युगोस्लाव्हियावर स्वाऱ्या केल्या परंतु शेवटीं तो सारा मुलुख जर्मनांच्याच हुकमतीखाली गेला. फार काय, खुद्द इटाली हा देशहि जर्मनीचें बाहुलें बनून जर्मन लष्करी सत्ताधाऱ्यांच्या नियंत्रणाप्रमाणे इटालीच्या हालचाली चालू झाल्या. इटालीस स्वतंत्र असें अस्तित्वच राहिलें नाही असे म्हणणारा मुसोलिनीविरोधी राजाचा व उमरावांचा पक्ष, प्रभावी ठरत चालला. या सर्व परिस्थितीवर ब्रिटनचें पुरेपूर लक्ष होते व त्याचा त्यांनी पुरा फायदा घेतला.

## भेदनीतीचा बेमालूम उपयोग

इटालींतील कामाकडे ब्रिटनची नेमणूक व अल्जेरिया, फ्रेंच मोरोक्को इकडील व्हिशी फ्रेंच वसाहतींची कामगिरी अमेरिकेने उचलली. या दोन्ही कामगिऱ्या इतक्या उत्तम वठल्या की सांगता सोय नाही. एल् अलेमीनच्या निर्णायक युद्धांत इटालियन लष्कराचे नऊ सेनापती व इटालियन लष्कराच्या ६ डिव्हिजन्स म्हणजे सुमारे एक लक्ष वीस हजार सैन्य माँटगॉमरीला विनासायास कैद करता आलें. कैद झालेल्या इटालियन सैनिकांनी 'आम्हाला जर्मनांचा जाच सोसत नाही म्हणूनच आम्ही जर्मनांना सोडून दोस्तांपुढें शस्त्र ठेवण्यास खुषी आहों' असेंहि सांगितल्याचें प्रतिवृत्त तेव्हा प्रसिद्ध झालें होतें. किंबहुना सोबतीच्या इटालियन लष्कराची फितुरी पक्की समजल्यामुळेंच रोमेल एकदम पुरा सावध झाला व पश्चिमेकडे तोंड करून ट्युनिशियाच्या रोखानें त्यानें पळ काढण्यास सुरुवात केली, त्या वेळीं अगोदर आपणांपुढें इटालियन लष्कराला घालूनच तो धावूं लागला ! एल्. अलमीनच्या लढाईंतले यश जितकें माँटगॉमरीच्या रणकौशल्याकडे जाईल तितकेंच शत्रुपक्षांत यशस्वीपणें बुद्धिभेद करण्याच्या ब्रिटिश मुत्सद्यांच्या कारवाईलाहि द्यावें लागेल.

जी गोष्ट ब्रिटिशांनी इकडे केली तीच गोष्ट वायव्य आफ्रिकन किनाऱ्यावर उतरतांना अमेरिकनांनी केली होती. मोरोक्को, अल्जीअर्स वगैरे मुलुख कबजांत आल्यानंतर अमेरिकन लष्करी खात्यातर्फेंच अधिकृत पणें त्या मुलखात किती आधीपासून फितूर पेरण्यांत आला होता, त्यासाठी एक खास मिशनच कसें नेमलें होतें व लागभागाचे दोरे अमेरिकनांनी कसें हातीं घेऊन ठेवले होते त्याचें तपशीलवार वर्णन प्रसिद्ध करण्यांत आलें होतें. सारांश, उत्तर आफ्रिकेवर इंग्रजांनी व अमेरिकनांनी दोघांनी दोहोंबाजूंनी एकदम चढाई करून जर्मनांना चेपींत चेपींत आणून अखेर चिमटी दाबून उडविलेल्या बिरडीच्या बी प्रमाणे त्यांना भूमध्य समुद्रांत फेकून दिले. त्या सर्व प्रकरणीं शौर्याइतकीच कारस्थानीपणांतहि दोस्तांनी जर्मनीवर मात करून दाखविली यांत शंका नाही.

उत्तर आफ्रिकेच्या लढयानंतर जर्मनी सावध झाला असला, तरी पुरा सावध झाला नव्हता आणि तो पुरा सावध होण्याच्या आंतच दोस्तांनी

राजकारण खेळवून अखेर इटालियन राजाकडून मुसोलिनीला कैद करविलें. या वेळचा डाव तर फारच मोठा होता. मुसोलिनीला कैद करणाऱ्या पक्षाकडून इटाली हा जर्मनीच्या बाजूने तसाच लढत राहणार असें जाहीर करण्यांत आलें व हिटलरलाहि तांतडीनें इटालींत बोलविलें होते. त्यावेळीं जर हिटलर इटालींत येता तर मुसोलिनीप्रमाणेच दग्याने पकडला जाता व आज मुसोलिनी व हिटलर मरतांच एकदम सर्व युद्ध कोलमडलें त्याप्रमाणे तेव्हाच तें कोलमडून गेलें असतें ! दोस्तांच्या दुर्दैवाने तें साधलें नाही व पुढें मुसोलिनीलाहि हिटलरनें अजब करामत करून नागांच्या पहाऱ्यांतुन वरच्यावर अमृतकुंभ उचलून नेणाऱ्या वैनतेयाप्रमाणे पळवून नेले या गोष्टी खऱ्या असल्या, तरी युरोपच्या किल्ल्याची दक्षिण वेस जो इटाली देश तो फोडून दोस्तांनीं जिंकून कबजांत घेतला व इटालींतून एक प्रचंड शह जर्मनीस निर्माण करून त्याचें लक्षावधि सैन्य तेथे गुंतून पाडलें. तें सर्व जर्मन सैन्य परवा पिकलेल्या फळाप्रमाणे दोस्तांच्या पदरांत कसें शरण येऊन पडलें तो तर सारा ताजाच प्रकार आहे.

## 'कुबेर तुझा भांडारी'

सारांश, मुत्सद्देगिरीच्या सर्व अंगोपांगांत जर्मनांवर दोस्तांची मात झाल्यामुळें मुख्यतः जर्मनी कोलमडला. तथापि जर्मनांच्या पराजयाचीं इतरहि कांही महत्त्वाचीं कारणें सांगतां येण्यासारखीं आहेत. त्यांपैकीं एक प्रमुख म्हणजे ब्रिटनला मिळालेली अमेरिकेची मदत. अमेरिका इतकी दूर होती कीं, जर्मनी-जपानचे हात तेथपर्यंत पोचणे अशक्य. विमानांचाहि पल्ला तेथपर्यंत पोचेना. यामुळे युरोपखंडांत रोजीं जितक्या लक्षावधि टन शस्त्रसंभाराचा चुराडा होई किंवा जितक्या टन वजनांचीं गलबतें समुद्रांत बुडविलीं जात तितक्या सर्व साहित्याची निर्मिति अमेरिकेंत पुनरपि नवी तयार होऊन राही. इंग्लंडकरिता असो, चीनकरिता असो, रशियाकरिता असो किंवा पॅसिफिकमधील अफाट लढ्यासाठी असो, अमेरिकेची मदत केव्हाच कोणाला अपुरी पडली नाही. रणगाडे, तोफा, विमानें, गलबतें, अन्नधान्य या सर्वांचा व खेरीज मनुष्यबळाचाहि

प्रचंड पुरवठा अमेरिकेने केला. अमेरिकेची ही रसद मारून काढण्यासाठी जर्मनांनी आपली हुकमी पाणबुड्यांची मोहीम सतत चालू ठेवली व त्यांनी दोस्तगलबतांचा नाशहि अतोनात केला. पण जर्मनांनी एक गलबत बुडविलें, तर त्याच्या जागीं चार नवीं गलबतें पाण्यांत लोटण्याची अमेरिकेची तयारी ! शिवाय पाणबुड्यांचा माग काढण्याच्या नव्या नव्या शास्त्रीय युक्त्याप्रयुक्त्या निघाल्या; यामुळे जर्मन पाणबुड्यांची मोहीम अखेर निष्फळच ठरली. अमेरिका युद्धांत पडण्याआधी विमान-दळाबाबत जर्मनी साऱ्या युरोपला भारी होता. एकामागून एक चमत्कार केल्याप्रमाणे जबरदस्त लढाया घेत युरोपांतील सारे देश त्याने पादाक्रांत केले. त्या कामीं जर्मन विमानदळाचाहि फार मोठा हिस्सा होता. क्रीट बेट जिंकतांना आणि नंतर तेथील ब्रिटिश आरमाराला पिटून लावतांना जर्मन विमानदलाने इतकी शहामत दाखविली कीं, सारे जग तोंडांत बोट घालून राहिलें व 'धिग् बलं सागरबलं । विहायसि बलं बलं !' असे म्हणण्याची पाळी आली. पण अमेरिकेच्या युद्ध-पदार्पणानंतर थोड्याच दिवसांत जर्मनीचे हे हवाई वर्चस्व अमेरिकेने हिसकावून घेतलें व जेथें प्रत्यक्ष सैन्य पाठविता येत नाही तेथे सैन्याच्या संख्येइतके प्रचंड विमान काफले पाठवून शत्रू-मुलखाचा विध्वंस करून सोडला. जर्मनांच्या प्रत्येक जातीच्या विमानांच्या तोडीस तोड अशीं विमाने निर्माण केलीं व सवाई उडते किल्ले निर्माण करून अमेरिकेने हवाई दलांतील परमोच्च बिंदू गांठला. सारांश, युरोपांतील विजयांत ब्रिटनच्या मुत्सद्देगिरीचा वा शौर्याचा जितका वाटा जातो तितकाच अमेरिकेच्या अमोल साहाय्याकडेहि जातो.

## जर्मनीच्या दोन घोडचुका

ब्रिटिशांच्या विजयाली कारणीभूत किंवा सहाय्यभूत झालेल्या गोष्टींत जर्मनीच्या लष्करीदृष्ट्या झालेल्या दोन घोडचुकांचा समावेश करणें इष्ट होईल. त्या चुका म्हणजे फ्रान्सच्या पराभवानंतर जर्मनीनें लगेच इंग्लंडवर स्वारी केली नाहीं व व्होल्गापार पूर्वेकडे रशियनांना लोटून देण्याचा अट्टाहास करून व खोट्या इभ्रतीला बळी पडून स्टालिनग्राड येथें दोन लक्ष जर्मनांची कत्तल करून घेतली व शत्रूची ईर्षा वाढविली या होत.

फ्रान्सच्या पाडावानंतर जर्मनीने ब्रिटनच्या स्वारीची पक्की तयारी केली होती व त्याची नांदी म्हणून वैमानिक हल्ल्यांनीं ब्रिटनला भाजून काढण्याचा प्रयत्नहि सुरू केला होता. त्यासाठींच जर्मन हवाईदलाचा अधिपति गोअरिंग याने आपली खास छावणीहि फ्रान्समध्यें आणली होती. जर्मनांनीं वैमानिक हल्ल्यांनी इंग्लंड भाजून काढलें. पण त्यांनी प्रत्यक्ष स्वारी मात्र केली नाही. जर त्याच वेळीं स्वारी झाली असती, तर ब्रिटनची इतिश्री होण्यास अवकाश लागला नसता असे पुढे एका प्रसंगीं खुद्द चर्चिल यांनीच जाहीरपणें पार्लमेंटांत सांगितलें होतें. मग काय कारणामुळे जर्मनीने ब्रिटनवर स्वारी केली नाही हें एक गूढच राहिलें आहे. पण कारणें कांहीहि असोत, ब्रिटनवरील ती स्वारी हुकली आणि ती चूक अखेर जर्मनीच्या नाशास कारण झाली.

स्टालिनग्राडच्या वेढ्याबाबतहि जर्मनीची अशी चूक झाली की, रशियाला पूर्वेकडे इतकें रेटीत जाण्यापेक्षा व स्टालिनग्राड येथें शक्तिसर्वस्व वेचण्यापेक्षा तेथून जर्मनी खाली दक्षिणेस जाता तर मध्यपूर्वेच्या लढ्याला जर्मनीला अनुकूल अशी स्थित्यंतरें घडवून आणता आली असतीं. जर्मनी रशियाला मागे रेटून रेटून नेणार तरी कोठपर्यंत? आशियांतील सारे सोव्हिएट साम्राज्य स्टालिनग्राडची कुमक करण्यास सिद्ध होतें व जर्मनीचा हट्ट पाहाताच रशियानेहि स्टालिनग्राडवर भयंकर हानी झाली तरी कुमक पाठविण्याचा सपाटा सुरू ठेवून अखेर १९ नोव्हेंबर १९४२ रोजीं स्टालिनग्राडच्या ईशान्य व आग्नेय बाजूनें प्रतिहल्ले चढवून डॉन व व्होल्गा या नद्यांच्या दुआबांत जर्मनांना कोंडून त्यांच्या १ लक्ष सैनिकांना कंठस्नान घातलें व ७२ हजार कैद केले. कसेंहि असो, लष्करी दृष्ट्या या चुका होत्या कीं नाही, याबाबत तज्ज्ञांत कदाचित मतभेद होईल, पण ब्रिटिशांनी मुत्सद्दीपणाने जर्मनीचा पराभव केला यावर दुमत होण्याला आता वावच नाही.

—केसरी अग्रलेख ता. १५ मे १९४५

★

# पॅसिफिकमधील जपानी महायुद्धाचें सिंहावलोकन

## १९३१ पासूनच युद्ध चालू आहे.

युरोपांतील महायुद्ध पेटल्यानंतर वर्षा दीड वर्षानें जपाननें जागतिक युद्धांत उडी घेतली असली तरी वास्तविक तो त्याआधीं १० वर्षांपासूनच प्रत्यक्ष लढत होता. म्हणून चालू जपानी युद्धाची पूर्वपीठिका १९३१ पर्यंत जाऊन भिडते. परवा रशियनांनीं मुकडेन जिंकून जपानी साम्राज्यावर अखेरचा पडदा पाडला त्याच मुकडेनपार्यीं पहिली गोळागोळी चिनी जपान्यांत सुरू झाली. पॅसिफिकमधील किंवा आशियांतील महायुद्धाची पहिली ठिणगी मुकडेन प्रकरणानेंच पडली. जपान्यांचे म्हणणें असें कीं, १९ सप्टेंबर १९३१ रोजीं मुकडेननजीक जपान्यांची चांगचुन एक्सप्रेस गाडी चिन्यांनीं उलथून पाडण्याचा प्रयत्न केला त्यामुळेच चिनी–जपानी युद्ध पेटलें. जपानने आक्रमणाची अगोदर सर्व जय्यत तयारी करून ठेवलेलीच होती आणि युद्ध पुकारतांच मांचुरिया आणि कोरियामधून जपानी सैन्य लगोलग बाहेर पडलें; व थोड्याच अवधींत सर्व मान्चुरिया त्यांनीं ग्रासला. मान्चुरिया हा चिनी रिपब्लिकचा ईशान्येकडील भाग. तिकडील तीन्ही प्रांत जपान्यांनी खाल्ले. जपानच्या या मूठमर्दाईचा ज्यांनीं त्या वेळीं निषेध केला त्यांत अमेरिकेची गणना होते. अमेरिकेनें मांचुरियांतील जपानच्या अधिराज्याला केव्हांहि मान्यता दिलेली नाहीं. सुमारे पांच महिन्यांच्या अवधींत जपान्यांनी मांचुरियाचा पक्का कब्जा घेतला. सर्व चिनी अधिकारी परागंदा झाले होते; तथापि कांहीं चिन्यांना जपान्यांनीं वश करून घेतले व

आपले सल्लागार नेमून नवी राजवट चिन्यांच्या नांवाखालीं सुरू केली. ही चिनी राजवट म्हणजे ' पूयी ' ची. हा पूयी शेवटचा जो मांचु-बादशहा होता त्याचा वंशज. हा १९२५ सालीं जपान्यांच्या आश्रयास टिन्स्टिन येथें पळून जाऊन राहिला होता. त्याला रीजंट करून ही नवी राजवट जपान्यांनीं चालू केली व संस्थानाला मांचुकुओ असें जपानी नामाभिधान दिलें. मांचुकओ याचा अर्थ मांचूंचें संस्थान. या मांचुको संस्थानाशीं जपानने नंतर एक मैत्रीचा तहही केला. अर्थात् त्या तहा-अन्वये मांचुकोमध्यें जपानी सैन्य ठेवण्याचा हक्कहि मान्य करून घेतलेला होता. मांचुकोची मुख्यतः वस्ती चिन्यांचीच. या दृष्टीनें हें नवें स्वतंत्र चिनी संस्थानच; परंतु सर्वस्वी जपान्यांच्या हातांतलें. जपानतर्फे जे सल्लागार या मांचुको दरबारला नेमून देण्यांत आलेले होते ते जपानी वकिलाच्या हुकमतीखालीं चालवयाचे ठरलेले आणि तो जपानी वकीलच मांचुकोतील जपानी सैनिकांचा सरसेनापति !

मांचुकोच्या स्थापनेनंतर एक वर्षांतच जपान्यांनी चीनचा जेहोल नांवाचा आणखी एक प्रांत घशाखाली घातला. व सुप्रसिद्ध चिनी तटांतून मांचुकोत येणाऱ्या सर्व माऱ्याच्या जागा काबीज केल्या. या सुमारास या मांन्चुको संस्थानचें क्षेत्रफळ ५०३१४३ चौरस मैल, लोकसंख्या ३४२११००० होती; म्हणजे खुद्द जपान देशापेक्षां हें संस्थान तिपटीहून मोठें होतें. १९३४ सालीं पूयी याला बादशहा कांगटेह असा किताब देऊन जपान्यांनी राज्याभिषेक केला व चांगचून म्हणजेच हाईनाकिंग ही राजधानी ठरविली.

## लीग ऑफ नेशन्सला धाब्यावर बसविलें

मुकडेन प्रकरण पेटलें तेव्हाच चीननें लीग ऑफ नेशन्सकडे दाद मागितली होती व लीगनेहि वस्तुस्थिति पाहाण्याकरितां अर्ल ऑफ लिटन या ब्रिटिश मुत्सद्याच्या नेतृत्वाखालीं एक मिशन नेमून चौकशीस पाठविलें. त्याने जपान, चीन आणि मांचुरियांत सहा महिनेपर्यंत राहून साक्षीपुरावा गोळा केला, पण शेवटीं जो निर्णयात्मक रिपोर्ट प्रसिद्ध केला, त्यांत एकंदरींत चिन्यांच्या बाजूनें मत दिलें असलें तरी खोडी

काढण्याला जपान्यांना पुरेसें कारण होतें असेंहि नमूद केलें. पुढें त्या रिपोर्टाच्या आधारें लीगनें मांचुरियाचें स्वतंत्रच स्वायत्त असें संस्थान नाममात्र चिनी–नियंत्रणाखालीं निर्माण करावें व जपानी लष्कर मांचुरियांतून काढून घ्यावें असा निर्णय दिला. या निर्णयाला जपाननें २७ मार्च १९३३ रोजीं उत्तर पाठविलें कीं, लीगच्या नियमाप्रमाणें दोन वर्षांची नोटीस पाहिजे !

चीनने मात्र मांचुकोला केव्हाच मान्यता दिली नाहीं व चिनी जपानी तेढ वाढतच गेली. शांघाय या चिनी बंदरांतून जगांतील सर्व राष्ट्रांकडे चीनचें दळणवळण सुरू असे व शांघाय बंदर हें अंतरराष्ट्रीय बंदरच झालें होतें म्हटलें तरी चालेल. १९३२ सालीं शांघायमधील चिनी म्युनिसिपल हद्दींत एक प्रकरण घडलें. तेथें चापेयी नांवाचें ठिकाण आहे. त्यासाठीं चिनीजपान्यांची अनेक दिवसपर्यंत कटकट पडली. अखेर चिन्यांना पराभवच खावा लागला; तरी जपान्यांशीं लढतांना आपण तग धरूं शकूं असा आत्मविश्वासहि त्याच वेळेला त्यांना प्रथम उत्पन्न झाला.

१९३५ सालापासून उत्तर चिनांतील जपानी लष्कराने आवाडाव करण्याची बुद्धि धरली; व चिनी प्रांताधिकाऱ्याकडे उत्तर चीन अलग करून मागण्याचा सपाटा लावला. ही चळवळ दोन वर्षेपर्यंत चेतविण्यांत आली व योग्य संधि येतांच पायपिंग लिगेशन गॅरिझनमधील जपानी लष्करानें ७ जुलै १९३७ रोजीं सुप्रसिद्ध मार्को पोलो पुलावर चिनी लष्करांत गोळ्या टाकण्यास सुरवात केली. पुढील तीन आठवडेपर्यंत जपान आणि मांचुकोमधून जपान्यांना सैन्य-साहित्याचा नुसता पूर भरून मदत येत होती; २८ जुलै रोजीं पायपिंगवर जपान्यांनी प्रत्यक्ष मोठीथोरली मोहीमच सुरू केली व तेथून अवघ्या सहाच महिन्यांत उत्तर चिनांतले पांच मोठे प्रांत संपूर्ण जिंकून कब्जांत घेतले. नंतर पाठोपाठ जपान्यांनी शांघायवरहि हल्ला चढविला. हा हल्ला १३ ऑगस्ट १९३७ रोजीं झाला. तीन महिनेपर्यंत हल्ला सुरू होता पण त्यांत जपान्यांचेंच अपरंपार नुकसान झालें. चिनी वैमानिकांनी जपानी आरमारांतील इडझुबो या निशाणाच्या गलबतावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला, त्या वेळीं नागरी वस्तीची

मात्र फार हानि झाली, अमेरिकन आरमारांतील ऑगस्टा गलबताचें नुकसान झालें, व जपानी विमानहल्ल्यांत ब्रिटिश वकिलातातील वकील जखमी झाला. पण अखेर जपान्यांनी चिन्यांना खरडून बाहेर काढून शांघायचा कबजा मिळविला व पाठोपाठ नानकिंगवर चाल केली.

## पूर्व-चीन ग्रासला

७ डिसेंबर रोजीं जपान्यांनी नानकिंगवर हल्ला सुरू केला. या हल्ल्याच्या वेळीं त्यांना शांघायला जी घुमस खावी लागली होती त्याचा पुरा वचपा त्यानी काढला. त्यांची जखडबंदी इतकी पक्की बसली होती की, चीन आता खासच तग धरू शकत नाहीं असें सार्वत्रिक मत झालें. फार काय जपाननेहि आता चिनी शुद्धीवर आले असतील म्हणून 'तहास या' असेंहि त्यांस फर्माविलें. पण चीनने तितक्याच दृढ निश्चयाने तहास नकार दिला; व आपली राजधानीच सोडून देऊन ते मागे हजार मैला-पर्यंत आंत चुंगकिंग येथें गेले. दरम्यान यांगत्सी नदीच्या मध्यावर हँको येथें चँग कै शेकने आपली तात्पुरती लष्करी व मुलकी छावणी ठेवून, तेथून राज्यकारभार व लढाई अशी दोन्हीहि सुरू ठेविली; परंतु १९३८ च्या आक्टोबरांत हँकोहि जपान्यांनी छिनावून घेतलें. तें कसेंहि असो, सांगण्याचा मुद्दा हा कीं, चीन शरण येईल ही जपान्यांची आशा फोल ठरली तेव्हां सारा चीन देशच जिंकून त्याचे दुसरें मांचुको संस्थान बनविण्याची सूडाची आसुरी महत्त्वाकांक्षा जपानने धरली व जे कोणी फितुरी हाताशीं सांपडतील ते धरून एक 'प्रोव्हिजनल गव्हर्मेंट ऑफ चायना' आणि दुसरें 'रिफॉर्म्ड गव्हर्मेंट' अशीं दोन संस्थानें पायपिंग आणि नानकिंग येथे चालू केली. नंतर वरून किनाऱ्याने उतरत चीनचा बहुतेक पूर्व किनारा आणि तेथून आंत लांबवरचा प्रचंड प्रदेश त्यांनी गिळंकृत केला. १९३८ च्या ऑक्टोबरपर्यंत त्यांनीं चीनची किनाऱ्याकडील सर्व रेल्वे, मुख्य बंदरें व पायपिंग, टिन्स्टिन, शांघाय, नानकिंग, कॅन्टन आणि हँको, यांसारखीं मातबर शहरें जिंकून टाकलीं. या बंदरीं पूर्व भागांतच चीनचे सर्व राष्ट्रीय कारखाने, उद्योगधंदे, संपन्न शहरें आणि संपत्ति एकत्रित झालेली होती ती सर्व जपान्यांच्या

ताब्यांत गेली. औरंगजेबाच्या कारकीर्दींत सर्व महाराष्ट्राची धूळधाण झाली, तेव्हां दूर जिंजीस राजधानी हालवून तेथून मराठ्यांनीं मोंगलाशीं लढा चालू ठेवला तोच कांहींसा प्रकार नानकिंगहून चुंगकिंगला चिनी राजधानी हालली त्यांत दिसून येतो.

चीनला पाश्चात्य राष्ट्रांची मदत मिळण्याची फार आशा होती. कारण ग्रेट ब्रिटन व अमेरिका यांचें भांडवल आणि हितसंबंध चिनांत फार खोलवर गुंतलेले. अमेरिकेपेक्षां सहापट अधिक भांडवल ब्रिटनचें चिनांत गुंतलें होतें. सावसावकारी, व्यापारी गलबत वहातूक, आणि प्रत्यक्ष इस्टेट खरेदी वगैरे धंद्यांत ब्रिटनचा अगणित पैका चिनांत गुंतलेला; उलटपक्षी, व्यापाराच्या बाबतींत चीन हें अमेरिकेला फारच मोठें गिऱ्हाईक होतें. खेरीज फार दूरदर्शीपणाने अमेरिकेने अनेक वर्षांपासूनच चीनमध्यें नाना मिषांनीं मिशन्स पाठवून चीनला आपल्या जाळ्यांत ओढण्याची पूर्ण तयारी चालविली होतीच.

दरम्यान युरोपांतील युद्धाचा डोंबाळा उठण्याचीं पूर्वचिन्हें म्हणजे स्पॅनिश राज्यक्रांति व ऑस्ट्रियाचा जर्मनीने केलेला ग्रास इत्यादि गोष्टी घडून आल्या, म्हणून ब्रिटनला चीनकडे लक्ष देण्यास फावलें नाहीं. परंतु इंग्लंड, अमेरिका व जपान यांचा भावी काळांत जबरदस्त विरोध येणार अशी मुत्सद्द्यांना भीति वाटूं लागली व हीं तीनहि राष्ट्रें आपआपल्या परी जबरदस्त होऊं लागलीं. जपानने १९२२ व १९३० सालीं केलेले आरमारी तह व करारमदार मोडून टाकले व १९३७ सालीं पंचवार्षिक योजना आंखून आरमाराची वाढ सुरू केली. त्याच वेळीं अमेरिकेनेहि तसेंच काम सुरू केलें व इंग्लंडनेहि सिंगापूरचा अपूर्व आरमारी तळ सिद्ध केला. १९३८ च्या फेब्रुवारींत इंग्लंडने सिंगापूरची पुरी बंदोबस्ती करून हाँगकाँगची तटबंदी केली.

## उभयपक्षीं तयारी सुरू

पुढें युरोपांत युद्ध सुरूं झाल्याबरोबर पूर्वआशियाची नवी घडी बसविण्याच्या योजना जपानने आरंभिली. १ ऑगस्ट रोजीं प्रधानपंत प्रिन्स कोनोयो याने बृहत्तर पूर्व आशियाची आणखी एक योजना जाहीर केली

व त्यांत जपान, मांचुको, चीन, इंडोचायना आणि ईस्ट इंडीज यांचा समावेश केल्याचें सांगितलें. ही यादी पुन्हां आणखीहि वाढविण्यात येऊन त्यांत थायलंड, ब्रह्मदेश आणि न्यू कॅलेडोनिया यांचीहि भर झाली. दरम्यान युरोपांत फ्रान्सचा चक्काचूर होऊन ब्रिटनवरील स्वारीचीच तयारी होत होती. तेव्हां तोच मुहूर्त साधून चिनांतील जपानी सैन्याने इंडोचायनास दबावानें आहारीं आणलें, व ऑगस्टांत तर ते जवळ जवळ तेथले अधिराजेच बनले. २२ सप्टेंबर रोजीं जर्मनीच्या दडपणाखाली व्हिशी सरकारने इंडोचायनाचा लष्करी अधिकार जपानला बहाल केला. यानंतर पुढें पांचच दिवसांत इटली–जर्मनीच्या कूटांत जाहीरपणें सामील होऊन जपानने अमेरिकेला आव्हान दिलें !

तेव्हां अमेरिकेनेही जपानकडे जाणारा कच्चा माल बंद केला. २५००००० डॉलर्स इतकें कर्ज चीनला दिलें; हवाई बेटांतील अमेरिकन सैन्य खूप वाढविलें व जपानच्या प्रदेशांतील अमेरिकेनांनी परत अमेरिकेस निघून जावें असे इषारे दिले. आपल्या बाजूनें ब्रिटनने चीनकरता बर्मा-रोड पुन्हा चालू केला, आणि रशियानें चीनला पूर्वीसारखीच मदत चालू ठेवण्याचें आश्वासन दिलें; याचा परिणाम हा झाला की, टेंकीला आलेला चीन पुन्हा सावरला व त्यानें जपानशी तह करावयाचाच नाही असे ठरविलें. त्यानंतर चीनला आणखी पक्कें बांधून घेण्यासाठी पुन्हा अमेरिकेनें १० कोटी डॉलर्स मदत चीनला दिली व ब्रिटिशांकडूनहि १ कोटी पौंड देवविले.

तिकडे युरोपांत जर्मनीने रशियावर प्राणसंकट आणलें म्हणून रशियानें दक्षिण बाजू निर्वेध करण्याकरता जपानशी पांच वर्षांचा अनाक्रमणाचा तह १३ एप्रिल रोजीं केला. प्रत्यक्ष लढण्याची अमेरिकेची अद्याप तयारी नसल्यामुळें वॉशिंग्टन येथे मार्च महिन्यांत अमेरिका-जपानचीं बोलणीं सुरू करण्यांत आलीं. तीं बरेच दिवस लांबत चाललीं. त्यांत सामादामानें जपान कांहीं समजुतीच्या गोष्टी ऐकण्याचें दिसेना. तेव्हां अमेरिकेने ' लेंड लिज बिल ' पास करून घेतलें व उजळ माथ्याने ब्रिटनला व चीनला भरपूर साहित्य-सामान पाठविण्यास सुरवात केली. खेरीज चिनांत आपले मिलिटरी मिशनही रवाना केले. मग मात्र जपाननेहि टोल्यास प्रतिटोला हाणण्यास सुरवात केली. २६ जून रोजीं त्यानें जपानी बेटांच्या

दुप्पट मोठा असलेला इंडोचायना प्रांत उघडपणें गिळंकृत केल्याचें जाहीर केलें. तेव्हां अमेरिकेच्या पाठोपाठ ब्रिटन, बर्मा, हिंदुस्थान आणि नेदर्लंड इंडीज, यांनीं जपानशी केलेले व्यापारी करार पटापट रद्द केले. अमेरिकेने फिलिपिन्समध्यें उघडपणें लष्कर–भरती सुरू करून तेथे पहिली अमेरिकन कमांड स्थापन केली.

रशियाकडील परचक्राचा पक्का बंदोबस्त झालेला असल्यामुळे अखेर ३० नोव्हेंबर रोजीं जपानी आरमार प्रत्यक्ष अमेरिकेशी मुकाबला घेण्याच्या इराद्यानें बाहेर पडलें व पुढें ७ डिसेंबर रोजीं पर्ल हार्बरवर त्याने अमेरिकन आरमाराला जबरदस्त तडाखा दिला.

## जपानची महायुद्धांत उडी

पर्ल हार्बर हा सबंध पॅसिफिकमधील अमेरिकेचा सगळयांत मोठा आरमारी तळ; व त्याच्या पश्चिमेस ६००० मैलांवर ब्रिटिशांचा सिंगापूर हा तळ. या दोन्ही ठिकाणी इंग्रज अमेरिकनांना एकाच सुमारास अलग अलग टोलें लगावून त्यांचा एक हात होण्याची शक्यता जपानने नाहीशी करून टाकली. शिवाय हीच वेळ तेथे टोले हाणण्यास सोयीची होती; कारण पाहिजे तितकें प्रचंड आरमार त्यावेळीं पर्लहार्बरवर अमेरिकेला ठेवता आलें नाहीं; इंग्लंडचें सर्व आरमार तर बहुतेक ॲटलांटिकमध्येंच गुंतलें होतें व अमेरिकेलाहि पर्लहार्बरवर पाहिजे होती तेवढी दक्षता ठेवता आली नाहीं. पर्लहार्बर येथे जपान्यांनी आठ प्रचंड लढाऊ गलबते बुडविली व दुय्यम प्रतीचीं शेंकडों गलबतें बाद केलीं. यांत जवळ जवळ ३००० आरमारी लोकांचे बळी घेतले गेले. त्यानंतर तीनच दिवसांनीं सिंगापूरहून बाहेर पडलेली ब्रिटिशांचीं 'प्रिन्स ऑफ वेल्स' आणि 'रिपल्स' हीं दोन जंगी लढाऊ गलबतें वैमानिक जपान्यांनी बुडविली. या पहिल्या दोन प्रचंड तडाख्यांतच जपानने नैर्ऋत्य पॅसिफिकचा पूर्ण कब्जा मिळविला व तेथून आपल्या पद्धतशीर आक्रमणास सुरुवात केली.

पर्लहार्बरपासून फिलिपाईनपर्यंत अमेरिकनसंरक्षक सांखळीतले तीन दुवे म्हणजे मिड्वे, वेक आणि गुआम बेटे. यांपैकीं वेक आणि गुआम हीं बेटें जिंकून जपान्यांनी फिलिपिन बेटें निराधार केलीं. बाटान

द्वीपकल्प अमेरिकनांनीं बरेच निकराने लढविले. पण ९ एप्रिल १९४२ रोजीं ते लोक कॉरिजिडॉर बेटाच्या आश्रयास गेले. तेही त्यांनी महिनाभर झुंजविलें. पण ६ मे रोजीं तेंही त्यांना सोडणें भाग पडलें व फिलिपिन्सचा कबजा जपान्यांनी मिळविला. यानंतरही जपान्यांना विजयामागून विजय मिळत गेले. ख्रिस्मस्च्या पहिल्या दिवशीं हॉंगकॉंग शरण गेले व २१ डिसेंबर रोजीं थायलंडने शरणागति पत्करली. नंतर सिंगापूरची पाळी आली. सिंगापूरचा आरमारी बंदोबस्त फारच जबरदस्त करण्यांत आलेला असला तरी सिंगापुरांत मलायन जंगलांतून खुष्कीनें शिरण्याची जी चारशें मैल लांबीची पट्टी होती तिचा कांहींच बंदोबस्त ब्रिटिशांनीं केलेला नव्हता व आता ह्या तजविजीस लागणें म्हणजे तहान लागल्यावर विहिर खणण्याचाच तो प्रकार होता. खेरीज तद्देशीय लोकांना फितूर करण्यांत जपान्यांनीं इंग्रजांवर मात करून दाखविली. शेवटीं व्हावयाचें तेंच झालें व फेब्रुवारीच्या मध्यास सिंगापूर पडलें. ५० हजार सैन्य कैद झाले व ब्रिटिशांची नाचक्की झाली. सर्व युद्धांत सिंगापूरचा तडाखा फारच जबर होता असें चर्चिल यांनीच पार्लमेंटांत उघडपणें बोलून दाखविल्याचें वाचकांस स्मरत असेलच.

सिंगापूर जिंकल्यानंतर जपान्यांनी चीनला अलग पाडण्याचा घाट घातला. त्यांनी थायलंडमध्यें पक्का लष्करी तळ उभारला होताच. तेथून उत्तरेस तोंड करून बर्मा रोड तोडण्यासाठी त्यांनीं कूच सुरू केले. बर्मारोडचें मुख्य तोंड रंगून बंदर. तें त्यांनी १० मार्च रोजीं जिंकलें आणि पुढील दीड महिन्यांत दुसरें टोंक लॉशिओहि कब्जांत घेतलें. तें जातांच चीनची पुरीपुरी जखडबंदी झाली, व यापुढे चीनला पाठवावयाची मदत मोठ्या कष्टाने मैनाक पर्वतावरून उड्डाण करणाऱ्या मारुतीप्रमाणें हिमालयाच्या तिबेटिअन शिखरावरून उडून जाऊन विमानांना द्यावी लागली.

## जपानचें पॅसिफिकमध्ये थैमान

पण याहीपेक्षा मोठा सपाटा जपान्यांनी मारला तो नेदर्लंड्स इंडीज बेटें काबीज करून. फिलिपिन्समधील डाव्हाओ बंदरांतून स्वारी काढून

त्यांनीं मकासार खाडींत प्रवेश केला व बोर्निओचा दक्षिण किनारा गांठला. त्याच वेळीं त्या बेटांच्या उत्तर किनाऱ्यासहि स्वाऱ्या नेऊन, रॅबॉल त्यांनी जिंकलें. रॅबॉल हें न्यू ब्रिटन बेटांतील ऑस्ट्रेलियाच्या राखोळीस दिलेलें ठाणें होतें; रॅबॉलचा कब्जा घेण्यांत जावाला येणारी सर्व अमेरिकन रसद विनायास मारून काढावी हा मुख्य हेतू! १० मार्च रोजीं जावाचा संपूर्ण कब्जा त्यांनी घेतला. एवढ्या काळांत १५ लक्ष स्क्वेअर मैलांचा अत्यंत संपन्न असा खनिज द्रव्यांचा प्रदेश आणि १२ कोटि गुलाम जपानला मिळाले. मिडवे बेटापासून हिंदुस्थानापर्यंत आणि सायबेरियापासून ऑस्ट्रेलियाच्या उत्तरेकडील बेटापर्यंत अफाट पॅसिफिकचें स्वामित्व जपानला मिळालें. फक्त हिंदुस्थान आणि ऑस्ट्रेलिया तेवढा त्यांच्या तडाक्यांत त्या वेळीं सांपडूं शकला नाही; परंतु रॅबॉल आणि लेसालेमाऊ येथून ऑस्ट्रेलियांत शिरण्याची धडपड त्यानें सुरू केली.

मे महिन्यांत कोरलसीच्या किनाऱ्याने मोहिमा काढून, सॉलोमन आणि न्यूसिएड बेटांत लष्करी तळ मिळविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. पण येथपासून जपान्यांना प्रतिकार सुरू झाला. यावेळच्या झटापटींत अमेरिकन विमानांनी तुलाघी बंदरांत अनेक जपानी सैन्य-वाहक गलबतें बुडविलीं. एक जंगी क्रूझर व विमान–वाहकहि रसातळास नेलें. ही कोरल-सीची लढाई, म्हणून प्रख्यात झाली. दक्षिण पॅसिफिकमध्ये ही पहिली थप्पड बसली तेव्हा त्यांनीं उत्तर व मध्य पॅसिफिककडे मोर्चा वळविला. किंबहुना कोरल समुद्राकडे दिखाई दाखवून, अमेरिकन आरमार तिकडे ओढून न्यावयाचें व इकडे मिडवे बेटाकडे निवांतपणें धूमाकूळ घालावयाचा असा जपान्यांचा डावच होता म्हणतात. ८० गलबतांचें प्रचंड आरमार नेऊन मिडवे बेटानजीक दीडशें मैलांवर कतार धरून, तेथून त्या बेटांवरील दोस्तसैन्यांवर त्यांनी विमान हल्ले सुरू केले; पण तें साधलें नाही. कारण अमेरिकन आरमारानेहि जबरदस्त प्रतिकार केला व जपान्यांचीं चार विमानवाहक गलबतें, दोन जंगी क्रुझरें व तीन विनाशिका नष्ट केल्या. अमेरिकनांचेंहि एक विमानवाहक व विनाशिका बुडाली.

याच सुमारास जपान्यांनी अट्टु आणि किस्का बेटेंहि जिंकलीं.

न्यूगिनींतील लेसालामाउ प्रदेशांतून पोर्ट मोरस्बीकडे जाण्याला खुष्कीची वाट जपान्यांना मिळेल म्हणून ते किनाऱ्याकिनाऱ्याने खाली गेले व त्यांनीं बोनागोना गांठलें. तेथून सारा डोंगरी जंगलगर्क प्रदेश. त्यांतून जाऊन अखेर मोरस्बीपासून ३२ मैलावरचे एक टोंक त्यांनीं पकडलें. हा प्रकार १७ सप्टेंबरला घडला; पण पुढें चार महिन्यांनीं दोस्तांच्या प्रतिहल्ल्याचा जोर वाढत चालला व बोनागोना प्रदेश सोडून त्यांना पुनः 'ले' आणि 'सालामाऊ' ठाण्यांच्याच आश्रयास जाणें भाग पडलें.

## पहिली ठोकर खाल्ली

सॉलोमन द्वीपसमूहांतील आग्नेयकडील बेटांत तुलाघी येथे जपान्यांनी एक आरमारी तळ आणि विमानतळ निर्माण केला होता. हा विमानतळ तुलाघीनजीक असलेल्या ग्वॉडाल कॅनाल या त्या मानाने बऱ्याच ऐसपैस असलेल्या बेटांत तयार केला होता. हीं दोन परस्परांचा पाठपुरावा करणारीं जबरदस्त ठाणीं अर्थातच अमेरिकेकडून ऑस्ट्रेलियाला जाणाऱ्या वाहतुक मार्गाची धुळदाण उडविण्यास समर्थ होती. या दोन ठाण्यांतून वेळीं स्वाऱ्या शिकाऱ्या पाठवून किंवा विमानें उडवून रसद आणणाऱ्या अमेरिकन गलबतांना दर्यागर्क करून टाकणें जपान्यांना चांगलेंच सुलभ जात होतें. अर्थात् हे जपानी तळ मारून—झोडून काढणें दोस्तांना विशेषच अगत्याचें होतें म्हणून त्यांनीं ७ ऑगस्ट १९४२ रोजीं झुंजुमुंजू होतांच तुलाघी आणि ग्वॉडाल कॅनालवर अचानक छापा घातला व पुष्कळ सैन्यहि तेथें आणून उतरविलें. येथून दोस्तांना हुसकावून देण्यासाठीं जपान्यांनी जंग जंग पछाडले. तीन महिनेपर्यंत झोंबी सुरू होती. पण किनाऱ्यास अमेरिकन्स जी तरमुंडी देऊन बसले ती कांही केल्या सोडीनात. जपान्यांनी तीनदां निकराचे एल्गार केले, पण दरवेळीं ती सारी आग पिऊन ते तेथेंच राहिले. अखेर एवढ्याने भागत नाही म्हणून जपान्यांनी नोव्हेंबरांत भरपूर सैन्य मागविले. तेव्हा निर्वाण समजून अमेरिकन विमानांनी विलक्षण मेहनत करून ती जपान्यांची कुमक मोडून तोडून बुडवून टाकली. तुलाघीनंतर लगेच ग्वॉडालकनाल नजीकहि घोरांदर आरमारी युद्ध झालें. हें युद्ध गलबताला गलबत भिडून

तीन दिवस अहोरात्र सुरू होतें, त्यांत मात्र जपान्यांचा पुरा मोड झाला. जपान्यांची दोन जंगी लढवाई गलबतें, आठ क्रूझर्स, सहा विनाशिका, बारा सैन्य-वाहक बतेले, आणि २५००० शिपाई ठार झाले. त्या मानानें अमेरिकन हानि फारच स्वल्प म्हटली पाहिजे. कारण त्यांची फक्त दोन क्रूझरें आणि सात विनाशिका तेवढ्या बुडाल्या.

खरोखर येथूनच पुढें जपानची ओहोटी सुरू झाली म्हणावयास हरकत नाही. सबंध पॅसिफिकभर जपानी आक्रमणाच्या लाटा अनिरुद्धपणें पसरत होत्या. भरती पूर्ण झाल्यावर कांहीं वेळ 'समा' म्हणजे समस्थिति असते व नंतर आंतून ओहोटीचा उलट जोर सुरू होतो. ती स्थिति आता प्राप्त झाली. त्या समेच्या काळांत मंडुकप्लुति करीत करीत एकेक ठाणें घेत बरेच दिवस आता अगदी कंटाळवाणेच गेले. पण मोठ्या प्रतिचढाईचाहि समय नजीक आला व ती चढाई आपणांसच करावी लागणार हे ओळखून अमेरिकेनें सर्व लष्करी व राजनैतिक धागेदोरे जुळविण्यांत ते दिवस खर्च केले. पर्ल हार्बर प्रकरणानंतर अमेरिका, ब्रिटन, चीन व हॉलंड, यानी एकीचा आपसांत तह केला होताच. आता अमेरिका, ब्रिटन, हिंदुस्थान, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, नेदर्लंडस् आणि चीन इतक्याजणांनी मिळून 'पॅसिफिक अलायन्स' नांवाचा आपसांत मैत्रीचा तह जपानविरुद्ध केला. त्याला पुढें ता. १ जानेवारी १९४२ रोजीं सव्वीस राष्ट्रांनी अनुमति दिली.

## अमेरिकन प्रतिचढाई सुरू झाली

या महिन्यांत खुद्द पर्ल हार्बरपासून अमेरिकनांनी छापे सुरू केले. पर्ल हार्बरवर जपान्यांनी अचानक जी धाड घातली होती ती मार्शल बेटांतील तळावरून. आता त्याच जपानी तळावर अमेरिकनांनी हल्ल्याचें सत्र सुरू केलें. जपानी बॉंबर-विमानांचा जपान ते मार्शल बेटापर्यंतचा रस्ता म्हणजे मार्कस आणि वेक बेटावरून जावयाचा. तेव्हा तीहि दोन्ही बेटें फेब्रुवारी मार्चांत दोस्तांनी झोडपून काढलीं. अर्थात् हे सर्व वैमानिक हल्ले होत. पर्ल हार्बरपासून दक्षिणेस आणि पश्चिमेस न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलिया येथपर्यंत निरनिराळ्या नाक्यांच्या बेटांचा कबजा घेऊन एक अखंड

सांखळी तयार करण्याचें काम या काळांत अमेरिकेने पुरे करीत आणलें. कुमक पाठविणें कठिण असल्यामुळें जावा कांही दोस्तांना तगवितां आलें नव्हतें. अर्थात् तेथून दक्षिणेकडे जपान्यांचा पराश्रम न होऊं देण्याची कामगिरी ऑस्ट्रेलिया व न्यूझीलंड यांचेवर टाकण्यांत आली. ती त्यांनी यथाशक्ति बजाविलीच; खेरीज पुढें जी अमेरिकन प्रतिचढाई होणार त्याचें सर्व साहित्य करून देण्याची कामगिरीहि त्या दोन देशां-वरच पडली. किंबहुना अॅटलांटिकमधील युरोपांतील युद्धासाठी ज्याप्रमाणें अमेरिकेने इंग्लंडचे ' आर्सेनल ' बनवून टाकलें, त्याचप्रमाणें पॅसिफिक-मधील लढाईचें आर्सेनल ऑस्ट्रेलिया–न्यूझीलंडला बनविण्यांत आलें ! ता. २ मार्चपासून अमेरिकन सैन्य ऑस्ट्रेलियांत येऊन उतरूं लागलें-मॅक्आर्थरही तेथे पोचून त्याने सरलष्करी स्वीकारली. पाठोपाठ अमेरिकन आरमारी हशमांचे सैन्य आणि अमेरिकन दर्यासारंग हेहि न्यूझीलंडमध्यें जाऊन रुजू झाले.

४३ च्या सप्टेंबरांत " मध्य–सालोमन्स " द्वीपापैकी ' मुंडा ' विमान-तळ अमेरिकनांनी जिंकला. यांतील हेतु रॅबॉलला शह देण्याचा होता. याच वेळीं तिकडे ऑस्ट्रेलियनांनीं लेसालामाऊ प्रदेश जपान्यांच्या हातून पुरा छिनावून घेण्यासाठीं झडप घातली. नोव्हेंबरांत बुगॅनव्हिल बेटावरील जपानी तळ जिंकून अमेरिकन लष्कर रॅबॉलच्या आणखी नजीक गेलें. तिकडे ऑस्ट्रेलियनांनी न्यूगिनीमध्यें फिनशॅफेनवर चढाई केली. याच काळांत रॅबॉलच्या पूर्वेस पंधराशे मैलांवरील गिल्बर्ट द्वीपसमूहापैकी तारावा आणि माकीन हीं बेटें अमेरिकन आरमारी हशमांनी झगडून भांडून कबजांत घेतली डिसेंबरांत तर अमेरिकन्स खुद्द न्यूब्रिटन बेटावरच उतरले. या सर्व स्वाऱ्या-शिकाऱ्यांचा हेतु रॅबॉल असहाय करून एकाकी पाडणें हा होता.

दरम्यान कैरो येथें ता. २२ नोव्हेंबर रोजीं सुप्रसिद्ध जाहिरनामा निघून जपानने बिनशर्तच शरण आलें पाहिजे असें वजावण्यांत आलें. हा जाहीरनामा चर्चिल, रुझवेल्ट व चँग-कै- शेक यांनीं काढला. त्यांत निःसंदिग्धपणें असें जाहीर करण्यांत आलें कीं, " १९१४ सालानंतर पॅसिफिकमधील जीं जीं बेटे जपाननें गिळलीं तीं सारीं ओकावयास

लावून चीनचे मांचुरिया, फोर्मोसा आणि पिस्कॅडोस इत्यादि जे प्रदेश आणि जीं बेटें जपाननें खाल्लीं तीं सारी परत घेऊन चीनचीं चीनला बहाल करूं; खेरीज कोरियालासुद्धां त्याचें स्वातंत्र्य परत मिळवून देऊं."

## ब्रह्मदेश जिंकून आसामवर चाल

१९४२ च्या जानेवारींत अँग्लो–अमेरिकनांचे संयुक्त सर सेनापति म्हणून वेव्हेल यांची नैर्ऋत्य पॅसिफिकमध्यें जाहीर नेमणूक झाली.

ता. १५ फेब्रुवारी रोजीं सिंगापूर सर होतांच अपेक्षेप्रमाणें ३०००० जपानी लष्कराने ब्रह्मदेश स्वारीसाठीं इंडोचायनांत प्रवेश केला. तेव्हां वेव्हेलही हिंदुस्थानचे सरसेनापती बनले. पण कांहीं उपाय चालला नाही. जपान्यांनीं रंगून घेतलें; अंदमान बेटांतून ब्रिटिशांना हुसकावून दिलें; आणि खालीं दक्षिणेस कोलंबो ते उत्तरेस विजगापट्टण व कोकोनाडा या हिंदुस्थानच्या पूर्व किनाऱ्यावरील बंदरांवर वैमानिक हल्ले सुरू केले. नंतर ब्रिटिशांना ब्रह्मदेशाची राजधानी मंडालेहि सोडावी लागली आणि जपान्यांनीं अक्याब बंदरहि जिंकलें; तेव्हां अमेरिकेने अपरंपार सैन्य, विमाने व साहित्यसामान हिंदुस्थानला पुरविलें.

जुलैअखेर सारा ब्रह्मदेश जिंकून झाल्यामुळें जपान्यांनी तेथें आपलें नवें सरकारहि चालू केलें.

१९४३ सालच्या फेब्रुवारींत खुद्द हिंदुस्थानांतच शिरण्याच्या इरा-द्यांनी जपान्यांनी आसामवर स्वारी करून वैमानिक हल्ल्याचें सत्र सुरू केलें, त्याच वेळीं आग्नेय बंगालमधील फेणी वगैरे ठाण्यांवरहि त्यानी बॉंब टाकले. मे महिन्यांतच आराकानांत प्रगति करून मॉंगडॉ-बुथेडॉंग रोड त्यांनीं जिंकला.

यानंतर जून महिन्यांत हिंदुस्थानची सरलष्करी ऑकिनलेक यांस देण्यांत आली.

१९४४ च्या फेब्रुवारींत ग्रीन आंयलडस्चा ताबा घेण्यांत आला; व मार्चांत न्यूब्रिटनच्या उत्तरेस एमीराऊचा कब्जा मिळविला. यामुळे ५०००० जपानी सैन्य असाहाय व एकाकी पडलें आणि सॉलोमन्सची लढाई संपलीच. अमेरिकनांनी अशा रीतीने बेटांमागून बेटें घेतलीं. असें

असतां जपानी आरमाराने कांही कसा प्रतिकार केला नाही हा प्रश्न राहतो. परंतु त्याचें उत्तर येवढेंच की, आपले वाहतूक मार्ग कायम ठेवण्यांतच जपानी आरमाराला जिवापाड मेहनत पडत होती व खुद्द जपानदेशाभोवतालची आंतरकक्षा पक्की अभेद्य राहावी म्हणूनहि जपानी आरमार तेथून बाहेर पडत नसे. ता. १६ फेब्रुवारी रोजीं अमेरिकन्सनी क्यारोलिन्स मधील 'ट्रूक' बेटावर न भूतो असा प्रचंड वैमानिक हल्ला केला. तसेच आरमारी व हवाई झुंज घेऊन क्वाजालीन, रोई आणि नामूर या मार्शल द्वीपांतील बेटांवर चढाई केली. क्वाजालीन हें दुसरें तरावाच होते. तेथे उत्कृष्ट तटबंदी केलेली असून, १०००० जपानी फौज होती. या ठाण्यावर समोरून हल्ला न चढवितां भोवतालचीं बेटें घेत तेथून तोफा लावून क्वाजालीन जिंकण्यांत आले. तेथील १०००० शिपायांपैकी अवघे २६४ जपानीच कैद झाले. यावरून जपानी फौजांनी किती पिसाटाप्रमाणे लढून आत्मार्पण केलें तें कळतें !!

## सैपानचें युद्ध

यानंतर ट्रूकच्या वायव्येस सहाशे मैलांवरील मेरीआना द्वीपसमूहापैकी तीनिअन–गुआम आणि सैपान या बेटांवर हल्ले करण्यांत आले. पुनः त्यानंतर ता. २८ मार्च रोजीं अमेरिकन आरमारी काफिल्याने फिलिपिन बेटांच्यापासून केवळ ६०० मैलांवर असलेल्या पालाऊ बेटावर झडप घातली. याआधी एप्रिल महिन्यांत मौंटबॅटनच्या आरमारी पथकांनी सुमात्रा आणि साबांग यांवर छापे घातले असल्यामुळे, सध्यांच्या या झडपा-पाठोपाठ अमेरिकन्स या बेटांवर प्रत्यक्ष सैन्यच आणून उतरावितात अशी जपान्यांस भीति वाटूं लागली व ते त्या तरतुदीस लागले. पण या वेळीं दोस्तांनी जपान्यांना चांगलें फसविलें. कारण यानंतर दोस्तांचे हल्ले सुरू झाले ते न्यूगिनींतील हॉलंड या आइटेप, बेक बेटें आणि बिआक यांवर. या सार्वत्रिक चौफेर छाप्यामुळे जपानभोवताली दोस्तांनीं उभें करीत आणलेलें हवाई तळांचें कडें अधिकाधिक आकुंचित होऊं लागून जपानचा श्वासनिरोध सुरू होण्यास फार मदत झाली.

इतके दिवस झालेले हल्ले मुख्यतः वैमानिक होते; पण ता. ७

जूननंतर त्यांच्या जोडीस आरमार–पथकेंही बाहेर पडून टिवियान, सैपान आणि गुआम बेटांवरील जपान्यांची त्यांनी पार धूळदाण उडविली. या लढायांत १४० जपानी विमानें बाद झालीं, १३ गलबतें बुडालीं, आणि १६ गलबतें जाया झालीं. जून १४ रोजीं तर खुद्द योकोहामापासून ६०० मैलांवरील बोनीन बेटांनाही तडाखा बसला त्याच दिवशीं सैपान बेटावर अमेरिकनांनी प्रत्यक्ष सैन्य उतरवून जुन्या गुआम बेटावरही इभ्रत पाडली. सैपान हें जपान हून बाहेर स्वारीशिकारीस निघण्यास आणि जपानकडे साहित्यपुरवठा रसद आणण्याचे मार्ग यांच्या तिठ्याचें नाकेंच असल्यामुळे त्याची बंदोबस्ती त्यांनी भरभक्कम केली होती. तेथे २० हजार कजाखी सैन्य ठेवण्यांत आलें असून त्यांना ‘ मरून खरे व्हा, पण सरून शरण जाऊं नका ’ असा निकराचा हुकूम दिला होता. अर्थात् येथलें युध्द बरेच दिवस लांबलें यांत आश्चर्य नाही. परंतु ता. ८ जुलै रोजीं अमेरिकन्स सैपानवर शिरले. अमेरिकन हानि फारच झाली. सुमारे १६ हजार अमेरिकन्स ठार वा जखमी झाले. उलटपक्षी २० हजार जपानी शिबंदीपैकीं १९७९३ जपानी शिपायांना कंठस्नान घातलें असें अमेरिकन म्हणतात. खेरीज ९०० जपानी विमानें आणि ५० गलबतें नष्ट झालीं. यावरून या भीषण संग्रामाची कल्पना येऊं शकेल. हें बेट ताब्यांत आल्यामुळे अत्यंत महत्त्वाचे असें वैमानिक नाक्याचे तळ अमेरिकनांच्या कब्जांत आले. येथून टोकिओ १५०० मैल, मॅनिला १६०० मैल, आणि शांघाय १९०० मैल होतें.

## कोंडी पूर्ण झाली

ता. १५ जूनपासून खास नव्या बनावटीच्या अमेरिकन विमानांनी खुद्द जपानांतील कुयुशु बेटावरील यावाटा पोलाद-कारखान्याचा विध्वंस केला. हीं नवीन अमेरिकन विमानें म्हणजेच बी २९ नांवाचे सवाई उडते किल्ले. हे पूर्वीच्या उडत्या किल्ल्यांपेक्षाही विशेष भारी असे होते. हे सवाई उडत्या किल्ल्यांचे हल्ले चिनी किनाऱ्यावर करण्यांत आले. ता. ७ जुलैपर्यंत त्यांनी पुनः एकदा यावाटा, सासेबा आरमारतळ इत्यादिकांचा विध्वंस केला.

याच सुमारास जपान्यांना आसामांतून हुसकावून देण्यांत येऊन मणिपूरच्या डोंगराळ मुलुखांत कोंबण्यांत आलें. ब्रह्मदेशांत चिनी आणि चिन्डीट गनिमांनी चांगलीच प्रगति केली होती. फक्त खुद्द चीनमध्यें मात्र जपान्यांनी चांगला सर करून अमेरिकेला बराच पेच निर्माण केला. प्रे. रूझवेल्ट यांनीच तेथील परिस्थिति विकट आहे, असे उद्गार काढले.

यानंतर अखेरचें पर्व सुरू झालें. ९ ऑगस्ट रोजीं ग्वॅम सर झाले. ऑक्टोबर २० रोजी फिलिपिन्सवरच मारा सुरू झाला व बाटान आणि कॉरिजिडॉर बेटें जिंकून तां. ५ फेब्रुवारी १९४५ रोजीं पुनः अमेरिकन सैन्याने मॅनिलांत प्रवेश केला. येथून जपानचा गळा पक्काच आवळला गेला. त्यावर आणखी एक वेढा इवोजिमाच्या स्वारीमुळें पडला. इवोजिमा आणि पुढे ओकिनावा गेल्यामुळें तर जपानच्या नाड्याच आंखडल्या. ओकिनावाची लढाई हीच जपानचे भवितव्य निवडील म्हणून जपान्यांनींही जाहीर केलें. ५००००० अमेरिकन्स बळी घेऊ तेव्हांच ओकिनावा अमेरिकेला मिळेल, असे आव्हान देऊन जपान्यांनीं तें म्हणणें खरें करूनहि दाखविलें; म्हणजे अमेरिकनांची अपरंपार हानि केली. परंतु ती सोसून अमेरिकेने ओकिनावा जिंकलेंच. येथून जपान सर्वच बाजूनी कोसळूं लागला. लॅडो बर्मा रोड म्हणजेच स्टिल्वेल रोड नवा बांधून तयार झाला आणि चीनला अपरंपार युद्ध साहित्य जाऊन पोहोचूं लागलें. रंगून आणि मंडाले हीं सर झालीं. या वेळीं तिकडे जर्मनयुद्धाची शेवटची घटका भरत येऊन सर्व जगाचें लक्ष तिकडेच केंद्रित झालें होतें. तरी जपानवर अमेरिकेने तितक्याच निकराने हल्ले सुरू ठेविले; व तिकडे युरोपचें युद्ध संपताच साऱ्या सामुग्रीचा लोट एकदम जपानकडे वळविला.

यापुढील सर्व प्रकार ताजाच असल्यामुळें वाचकांच्या लक्षांत असेलच. ऑगस्ट ९ रोजीं रशियाने जपानविरुद्ध युद्ध पुकारलें व ॲटम बॉंबचा पहिला धडाका उडाला. समुद्रमंथनांतून अमृत आणि हालाहल हीं जशीं बाहेर पडलीं, तसा पराजयाच्या विषाचा घोट जपानला घ्यावा लागला आणि यशाचें अमृतपान करून दोस्त विजयी झाले.

★

— ३ —

# नेपाळ, पॅलेस्टाइन व इजिप्त

## अमेरिकेची नेपाळशीं लगट कां ?

गेल्या सालच्या ऑक्टोबरांत नेपाळचे मंत्री जनरल सिंग हे प्रथम कॅनडास आणि तेथून अमेरिकेस गेले. अमेरिकेंत त्यांचा एक महिनाभर मुक्काम होणार असें प्रसिद्ध झालें होतें. त्याच वेळीं ता. ५ ऑक्टोबर १९४५ च्या केसरींत आम्ही स्पष्टपणें असें सूचित करून ठेविलें होतें की, अमेरिका व नेपाळ यांच्या नव्या राजनैतिक संबंध-स्थापनेबाबतच नेपाळ मंत्र्याचा हा दौरा असावा. तो तर्क पूर्णपणें खरा ठरला आहे हें परवा ३१ तारखेस प्रसिद्ध झालेल्या वॉशिंग्टन वृत्तांवरून दिसून येतें. त्यांत ' नेपाळचे सर सेनापती बाबर समशेरजंग बहादूर राणा हे एक ' गुडवुइल ' मिशन घेऊन म्हणजे नेपाळ-अमेरिकेंत सलोखा व स्नेह वाढविण्यासाठी शिष्टमंडळ घेऊन आले आहेत, त्यांच्याबरोबर इतर बरेच लोक आहेत अशी माहिती आहे. वॉशिंग्टनच्या रायटर प्रतिनिधीनेहि यापुढे नेपाळ हें राष्ट्र आपला एकलकोंडीचा कोश फोडून बाहेरच्या जगाशीं संबंध जोडणार याचीं हीं पूर्वचिन्हेंच होत असें म्हटलें आहे. परवा ता. ३१ रोजीं नेपाळी सर सेनापतीने प्रेसिडेंट ट्रुमन यांची मुलाजमत घेतली व त्यांस स्नेहाची भेट म्हणून एक सोन्याची कुकरीहि नजर केली.

## नेपाळची वकीलात

बोलून चालून या राजकीय मुत्सद्यांच्या भानगडी, तेव्हा त्यांच्यांत प्रसिद्धीबाबत गौप्य राखणें किंवा अखेरच्या क्षणापर्यंत त्याबाबत इन्कार

करीत राहणें ही रीतच असते आणि त्यास अनुसरूनच नेपाळी शिष्टमंडळाला आपण अमेरिकेशीं राजनैतिक संबंध प्रस्थापित करणार ना ? म्हणजे अमेरिकेंत नेपाळची व नेपाळांत अमेरिकेची वकिलात स्थापणार ना ? असें विचारलें तेव्हा तूर्तच कांही नाही असें उत्तर मिळालें; परंतु तशी वकिलात यापुढे लौकरच स्थापली जाईल असें धरून चालण्यास बिल्कूल हरकत नाही. आजपर्यंत नेपाळने फक्त इंग्रजांशींच तेवढा स्नेह राखला होता व परस्परांच्या राष्ट्रांत परस्परांच्या वकिलाती होत्या. इंग्लंडने नेपाळी सरकारला आवर्जून खूष कां ठेवावें हें नकाशा घेऊन त्यावरून भौगोलिक परिस्थिति पाहिली असतां सहज कळून येण्यासारखे आहे.

## एकसंघ नवी फळी

मात्र इतकें दिवस नेपाळी सरकार ब्रिटिशांच्या तंत्राने चालें तें भावी काळांत अमेरिकेच्या तंत्राने चाललेलें दिसेल ! गेल्या महायुद्धांत ब्रिटन हें दुय्यम दर्जाचें राष्ट्र बनून गेलें असून सर्व आघाड्यांवर अमेरिकेनेच आपला वरचष्मा प्रस्थापित केला आहे. भावी काळांत जें महायुध्द पेटण्याचा संभव आहे तें अमेरिका व रशिया या दोघांत. इंग्लंड हें अमेरिकेचें बाहुलें म्हणूनच खपेल. रशियाने हिंदुस्थानच्या दोन्ही खांद्यावर आपले पाय आणून टेकले आहेत. पामीरचें पठार हें काश्मीरचें शीर म्हटलें तर इराण, अफगाणिस्थान हा त्याचा डावा खांदा व नेपाळ, तिबेट व सिगकिंयांग हा त्याचा उजवा खांदा होय. रशियाने इराण आपलासा केलाच आहे. येऊन-जाऊन दक्षिण इराणांत ब्रिटिशांनी त्याला थोडासा पायबंद घालण्याचा प्रयत्न चालविला आहे. परंतु तेथेहि रशियन प्रचार पुढे गेलेला असून सर्वत्र तीव्र ब्रिटिशविरोधी वातावरणच प्रतीत होत आहे; व वेळींच काळजी घेतली नाही तर येथील ब्रिटिश हितसंबंधांना पूर्ण धोका पोहोचेल असें ' लंडन टाइम्स ' मध्ये पार्लमेंटचे एक मजूर सभासद जोन्स यांनी पत्र लिहून इशारेहि दिले आहेत. हे जोन्ससाहेब पार्लमेंटतर्फे दक्षिण इराणांत तेथील अँग्लो-इराणी तेल कंपनीच्या मजुरांची परिस्थिती समक्ष पहाण्यासाठी जें तिघा सदस्यांचें शिष्टमंडळ पाठविण्यांत आलें होतें त्यापैकीं एक होत. अर्थात् त्यांच्या

इशाऱ्याचें निराळें महत्त्व सांगणें नको. सारांश इराण रशियानें ग्रासला, अफगाणिस्तानशीं रशियाचीं बोलणीं चालू आहेत, सिक्यांग प्रांत इराणसारखाच रशियाने तिसऱ्याच्या नांवाखाली परंतु स्वतःच्याच आहारीं आणला आहे. सिक्यांग प्रांताखालीच तिबेट व तिबेटाखाली नेपाळ आहे.अशी एकंदर परिस्थिति असल्यामुळे रशियाला शह देण्यांसाठी किंवा तिबेटाखाली आपलें पक्कें स्नेहाचें हातचें संस्थांन असावें म्हणजे रशियन आक्रमणाला पायबंद बसून चीन, नेपाळ, पंजाब, काश्मीर, बलुचिस्तान अशी आपली एकसंध फळी उभी करतां यावी व वहातूक मार्ग सलग राखले जावे हाच अमेरिकेचा हेतु असणार व भावी संकटांत जो खरा बलिष्ठ असेल त्याच्याच पदरीं पडावें या धोरणानेंहि अमेरिकेशीं वाढतें स्नेहसंबंधाचें सूत्र नेपाळनेंहि जोडलें असावें.

## पॅलेस्टाइनचा पेंच

अँग्लो-अमेरिकन तज्ज्ञ समितीनें अरबप्रांत, ज्यूप्रांत, जेरुसलेम आणि नेगप्रांत अशा चार भागांत पॅलेस्टाइनची फाळणी करावी म्हणजे दोन्ही जमाती अलग राहून मध्यवर्ती ब्रिटिश नियंत्रणाखाली स्वायत्तता भोगतील व तसें झालें म्हणजे सध्या एक लाख व नंतर आणिकहि ज्यू वाटेल-तितके पॅलेस्टाइनमध्ये हळुहळू आणून सोडतां येतील अशी योजना सादर केली. वास्तविक या योजनेंत अमेरिकेने आपलें म्हणणें बरेंचसें साधलें होतें व ही योजनाहि दोघांकडील तज्ज्ञांनीं मिळूनच बसून सादर केली. तथापि अखेर ती तूर्त तरी अमान्य म्हणून शिक्का मारून प्रेसिडेंट ट्रूमन यांनी ब्रिटनला फारच मोठा आश्चर्याचा धक्का दिला! वरील योजना ब्रिटिश पार्लमेंटांत मांडण्यांत येऊन चर्चा झाली व उपप्रधानपंत हरबर्ट मॉरिसन यांनी वाटाघाटीसाठी ती आधारभूत म्हणून ब्रिटनने मान्य केल्याचेंहि सांगितलें. परंतु याचवेळीं तिकडे प्रेसिडेंट ट्रुमन यांनी नाट लावल्यामुळे ती चर्चा स्थगित झाली व ब्रिटिश मुत्सद्दी गडबडून गेले. आता ॲटली किंवा बेव्हिन यांनीच जातीने अमेरिकेला जाऊन प्रेसिडेन्ट ट्रुमन यांची भेट घ्यावी असेंहि घाटत आहे म्हणतात. एकंदरींत ब्रिटनला हा

मोठा अपशकून झाला आहे व ८ आक्टोबरपर्यंत पार्लमेन्ट तहकूब करण्यांत आल्याचेंहि जाहीर झालें. दरम्यान या प्रकरणीं आणखी काय काय घडामोडी होतात त्या पाहाव्या.

## ज्यू लोकांचें वजन

ट्रुमन यांनी अशी कोलांटि उडी मारण्याचें कारण उघड आहे. त्यांच्यावर जागतिक प्रश्नांत किंवा युरोपांतील राजकारणांत अमेरिकेने स्वतःस गुरफटून घेऊं नये असें म्हणणाऱ्या प्रबळ विविक्ततावादी पक्षाने अनिवार दडपण आणण्यास सुरुवात केली आहे. खेरीज अमेरिकन राजकारणांत ज्यूंचा फारच प्रभाव असतो. बहुतेक मोठमोठ्या राज्यकारभारांतील व कारखान्यांतील नाक्याच्या जागा ज्यूंच्या हातीं आहेत. साऱ्या जगाच्या पाठीवर मिळून एक कोटी वीसलक्ष ज्यू आहेत. पण त्यांपैकीं चार लक्ष पन्नास हजार एकट्या अमेरिकेंत आहेत. शिवाय गेल्या महायुद्धापासून अमेरिकेने ज्यूंना स्वतंत्र राष्ट्र म्हणून स्थान निर्माण करून देण्याचें वारंवार अभिवचन दिलेलें आहे. यामुळें ज्यूंचा जिव्हाळा अमेरिकेला अधिक वाटतो हें स्वाभाविक होय.

## अंतस्थ चुरस

पण वरील कारणाखेरीज आणखी दुसरी खोल अशी राजकारणेंहि या प्रश्नामागे आहेत. तीं म्हणजे इंग्लंड व अमेरिका या दोघांतीलच अंतस्थ चुरस इत्यादि होत ! इंग्लंडला इजिप्त, पॅलेस्टाइन सौदी अरेबिया वगैरे सर्व मुसलमानी राष्ट्रांचा गट आपल्या ताब्यांत ठेवावयाचा आहे तर तीच महत्त्वाकांक्षा अमेरिकेचीहि आहे व 'चंचुप्रवेशे' या न्यायाने पॅलेस्टाइनचें हें प्रकरण अमेरिकेला आयतेंच हातीं लागलें आहे. पॅलेस्टाइनची फाळणी करून त्यांत एक भाग ज्यूंचें स्वायत्त संस्थान म्हणून स्थापूं देण्याला अरबांचा आणि सर्व अरबराष्ट्र-गटांचा जो विरोध आहे त्याचें कारण त्यांना अशी भीति वाटतें कीं, त्या ज्यू राष्ट्राच्या पाठीमागे बसून इंग्लंड किंवा अमेरिका अखेर आक्रमण करून अरबी राष्ट्रांचा निःपात करतील किंवा त्यांना ग्रासून टाकतील. ही अरबांची भीति साधारच आहे.

इंग्रज–अमेरिकनांच्या दृष्टीने मात्र स्वतःच्या वर्चस्वासाठी त्यांची आपआपसांत चुरस आहे.

## इजिप्त-वाटाघाटी फिसकटल्या

पॅलेस्टाइनचा प्रश्न आणि इजिप्शियन वाटाघाटींचा प्रश्न हे एकरीतीने परस्परावलंबी असल्यामुळे पॅलेस्टाइन प्रश्नाचा चढउतार पाहून इजिप्शियन मुत्सद्द्यांनी अखेर सर्व वाटाघाटी उधळून लावून 'पहिले पाढे पंचावन' केले आहेत. यामुळेहि ब्रिटनला पेंच पडला आहे. ब्रिटनचा विचार असा होता की ईजिप्तमधील ब्रिटिश लष्करी तळ हलवला तर तो पॅलेस्टाइनमध्यें आणून ठेवावा. पण पॅलेस्टाइनच्या प्रकरणीं झोका बसल्यामुळे ब्रिटनला आता काय करावें असा प्रश्न पडेल. इजिप्तच्या वाटाघाटी मोडून इजिप्तमधील ब्रिटिशांचे वळ कायम ठेवतां आलें तर पॅलेस्टाइनमध्ये अमेरिकन वर्चस्व वाढूं देण्याला ब्रिटन कदाचित् राजी होईल. ईजिप्त धरावा व पॅलेस्टाइन सैल सोडावा तर पॅलेस्टाइनमध्यें अमेरिका येऊन बसणार व ब्रिटनच्याहि पाठीमागे अमेरिकेचा शह लागणार व पुढेंमागे पॅलेस्टाईनमधून ब्रिटनला अमेरिका खरडून काढणार हें निश्चित आहे. बरें पॅलेस्टाइनबाबत अमेरिकेला धाब्यावर बसवावे व आपल्याच मताने पॅलेस्टाइनचा कारभार हाकावा तर अमेरिका बिथरणार असा पेंच निर्माण झाल्यामुळेच चर्चिल यांनी अशी तोड काढली आहे कीं पॅलेस्टाइनवरील मँडेट ब्रिटनने सोडून देऊन तो प्रश्न युनोपुढे निकालास पाठवावा. म्हणजे तेथे इंग्लंडचें साधले नाही तरी अमेरिकेचेंहि साधणार नाही व कांहीतरी निराळी तोड निघेल.

पॅलेस्टाइनबाबत लंडनमध्यें अरबांची राउंड टेबल कॉन्फरन्स बोलावण्याचा घाटहि फिसकटणारसें दिसतें. कारण ज्या चार राष्ट्रांनी परिषदेचें आमंत्रण स्वीकारलें आहे त्यांच्या कांही अटी आहेत व दुसरीं कांही अरब राष्ट्रे ज्यू प्रतिनिधींबरोबर बसायलाच तयार नाहींत !

केसरी, ६–८–४६

★

## — ४ —

# पॅरिसच्या तहपरिषदेतील मतभेद

### नांदीच्या गायनाचें चऱ्हाट

पॅरिस येथील तहपरिषद सुरू होऊन एक आठवडा होऊन गेला तरी मुद्याच्या कोणत्याच प्रश्नाला अद्याप हात लागलेला नाही आणि तो लागणार तरी कसा ? कारण प्रकट अधिवेशनांतील भाषणें किंवा वाद-विवाद किंवा निर्णय जे पुढे व्हावयाचे ते बड्या चौकडीच्या खलबत-खान्यांत आधीं ठरतील त्याप्रमाणें ! परंतु पूर्वींपासूनच रशिया व अँग्लो-अमेरिकन्स यांमधील मतभेद वाढत आहेत व प्रकट अधिवेशनांत आपल्या बाजूस अवश्य तितकें बहुमत मिळवून दुसऱ्यावर सरशी कशी करता येईल हेंच एका बाजूस रशिया व दुसऱ्या बाजूस इंग्लंड-अमेरिका यांचें उद्दिष्ट झाल्यामुळे तहपरिषदेंतील काम-काज कोणत्या नियमाने चालावें याबाबतच वादावादी सुरू असून रशि-याच्या निगरगट्ट विरोधी धोरणामुळे परिषदेचें काम लळतलोंबत कसें तरी सुरू आहे. नाटक सुरू झाल्याची घंटा होऊन पडदा वर गेला व सूत्रधार आपल्या परिपार्श्वकासह नांदीचीं पदेंहि गुलाल उधळून म्हणूं लागला परंतु पहिल्या प्रवेशांतील पात्रांतच रंगपटांत मारामारी सुरू झाल्यामुळे आत गोंधळ उडाला व म्हणून 'प्रॉम्पटर' च्या सूचनेनुसार वेळ काढण्या-साठी सूत्रधार आपलें नांदीगायनाचेंच चऱ्हाट भरमसाट लांबवीत बसला आहे, असाच कांहीसा प्रकार तहपरिषदेच्या नाटकांत दिसत आहे.

## ‘दोन तृतीयांशा’चें शुक्लकाष्ट !

अँग्लो अमेरिकनांच्या वादाचें मुख्य कलम म्हणजे दोनतृतियांश बहुमताचें ! पॅरिस तहपरिषदेंत एकादा ठराव नेहमीप्रमाणें साधी मतमोजणी करून त्यांत बहुमताप्रमाणे पास झाला असें धरावें किंवा एकूण मतदानापैकी दोन तृतियांश बहुमत एकाद्या ठरावावर झालें म्हणजेच तो ठराव पास झाला असें धरावें असा मुद्दा आहे. आणि या मुद्दयाचा निकाल लागल्याखेरीज इतर कोणत्याहि प्रश्नांचा निकाल लागू शकणार नाही अशी परिस्थिति आहे. यापूर्वी बड्या चौकडीच्या खलबतांत दरवेळीं रशियाने अडवणुकीचें विरोधी धोरणच पत्करल्यामुळे अँग्लो–अमेरिकनांनी वैतागून शेवटीं रशियावर मात करण्याकरिता ज्यांनी महायुद्धांत प्रत्यक्ष भाग घेतला त्यांच्या अनुमतीनेंच तहांची कलमें उलगडलीं पाहिजेत असा साधूपणाचा आव आणला. पोटांतील डाव हा की, तेथे आपण सहज बहुमत मिळवून दर वेळीं रशियाचा पाडाव करूं व आपल्या मनासारखे ठराव करून घेऊं. वरील डावांतील हेतू रशियाने ओळखलेला असला तरी युद्धमान असलेल्या राष्ट्रांच्या संमतीखेरीज तह उरकून घ्या असें उघड म्हणणें त्याला शक्य नव्हतें. पण त्याने तरीहि बड्या चौकडीनेच कार्य तें करावयाचें असें पॉट्सडॅम ठरावांत ठरल्याचा कांगावा चालू ठेवला व अखेर दोन-तृतीयांश बहुमताची अट अँग्लो-अमेरिकनाकडून कबूल करवून घेऊन मगच ता. २९ जुलै रोजीं तहपरिषद बोलावण्यास एकदाची संमती दिली. पण तेंच दोन-तृतियांशाचें भूत अँग्लो–अमेरिकनांच्या मानगुटीस बसून रशिया आता अडवणूक करीत आहे. बड्या चौकडीनेच स्वतः दोनतृतियांश बहुमताला मान्यता दिल्यामुळे कुठलाहि प्रश्न निघाला तरी तीं चार मतें व बेलोरशिया आणि युक्राइन मिळून सहा मतें रशियाच्या बाजूने निश्चित पडावयाचीं. रशियाने फक्त आणखी २ मतें आपल्या बाजूस मिळविली कीं कोठलाहि ठराव कोलमडून टाकणें त्याला सहज शक्य होईल.

## रशिया-अमेरिकेची खडाजंगी

गेल्या ता. ५ व ६ या दोन दिवशीं अमेरिकन परराष्ट्रमंत्री बायर्न्स

आणि रशियन परराष्ट्रमंत्री मोलोटॉव्ह यांची जी खडाजंगी उडाली आणि रशियाने पुनः जें अडवणुकीचें धोरण दर्शविलें त्याचीं जीं वर्णनें प्रसिद्ध झालीं आहेत तीं वाचून उद्वेग व कुतूहल निर्माण होऊन हिंदुस्थानांत एकमत करा म्हणून सांगणाऱ्या आणि नाकाने कांदे सोलणाऱ्या ब्रिटनची फटफजिती झालेली पाहून मौज वाटते. बायर्न्स यांनी रशियावर उघड हल्ला चढविला व सांगितलें की रशिया अमेरिकेवर विसंगत वागणुकीचा आरोप करतो पण तो खरा नाही. शक्य तितक्या कमी राष्ट्रांच्या गटाकडून तहाचा विधी उरकून घेण्याचा रशियाचा डाव आहे. उलट जास्तींत जास्त युध्यमान राष्ट्रांचा समावेश करून त्यांच्याशीहि तहाच्या वाटाघाटी व्हाव्या असें आमचें व्यापक उदार धोरण आहे व त्या हेतूला धरूनच फ्रान्स व चीनच्या हक्काचें समर्थन व पाठपुरावा गेल्या ऑगष्टांत लंडन येथे भरलेल्या परराष्ट्रमंत्र्यांच्या परिषदेंत व नंतर पुनः दोनदा झालेल्या बड्या चौकडीच्या बैठकींत अमेरिकेने केला आहे. पहिल्यापासून आम्ही अशी सोडवणूक करून ठेवली होती की 'रूल्स' परिषदेने कामकाजाचे नियम ठरविले तरी तहपरिषदेच्या वेळीं त्या नियमांत दुरुस्त्या वाटतील त्या सुचविण्याचा इतर राष्ट्रांना हक्क आहे. कामकाजाचे नियम ठरले म्हणजे ते ब्रह्मलिखित नव्हेत. परिषदेला पटतील त्या सूचना स्वीकारण्याचा हक्क आहे. अमेरिकेने आपलें बोलणें फिरविलें म्हणून रशिया आरोप करतो तर याच रशियाला आठच दिवसापूर्वी, ठरलेल्या कराराबाहेर जाऊन तहाच्या खर्ड्यांत बदल करून हंगेरीशीं होणाऱ्या तहसमितीवर पोलंडला बसविण्याची सूचना करण्याचें कसें सुचलें ? ते कांही नाही, रशियाला कोठून तरी गाड्यांत खीळच घालावयाची आहे ! ता. ४ जुलै रोजीं २१ राष्ट्रांना तहपरिषदेसाठी आमंत्रण देण्याचें ठरलें तें रशियाने मान्य केलें; परंतु दुसऱ्याच दिवशीं कोलदांडा घातला की आमंत्रणाबरोबरच कामकाजाचे नियम म्हणून ठरविले आहेत तेहि पाठविलेच पाहिजेत ! मोलोटॉव्ह खोटे बोलतात. त्यांच्या रशियांत भाषण-स्वातंत्र्याची मुस्कटदाबी आहे. त्यांनी माझें भाषण छाती असेल तर रशियन पत्रांतून समग्र छापावें म्हणजे त्यांचेच लोक त्यांच्या तोंडांत शेण घालतील. ”

इतकें आव्हान मिळाल्यावर मोलोटॉव्ह यांनीहि अमेरिकेची हजेरी घेतली व अमेरिकेंत भांडवलवाल्यांच्या हुकमतीखाली वृत्तपत्रांचें मत-स्वातंत्र्य कसें चेचून टाकण्यांत येतें याचा झोंबण्यासारखा उल्लेख केला व साळसूदपणें सांगितलें की कामकाजाचे नियम कामाआधी ठरविणें यांत कांहीच गैर नाहीं. रशियाने त्याबाबत हट्ट धरला म्हणून झालें हें क्षुल्लक कामहि आठवड्याने झालें. एरवी आणखी महिनाहि लागला असता! $\frac{2}{3}$ बहुमताचा आग्रह हीं कांही जगावेगळी गोष्ट नव्हे. खुद्द अमेरिकेच्या राज्यघटनेंतच तिचा अनेकवार उपयोग सांगितला आहे!

## रशियाचा हट्ट पुढें चालू

या वादविवादानंतर अध्यक्षांनी $\frac{2}{3}$ बहुमताच्या प्रश्नावर आलेल्या अनेक उपसूचना मतास घालणार आहे असें सुचविलें. त्याबरोबर रशियाने झेकोस्लाव्हियाकडून अशी उपसूचना मांडली की, आलेल्या सर्व उपसूचना परस्परांत फारशा कांहीं विसंगत नाहीत तेव्हा त्यांचाच समन्वय करण्यासाठी एक सबकमिटी नेमावी. परंतु हा कालहरणाचा डाव साधला नाही. ११ वि. ९ मतांनी सूचना नापास झाली. चीन व इथियोपिया तटस्थ राहिले. नंतर हॉलंड-ब्रेझीलने न्यूझीलंडसाठी आपापल्या सूचना परत घेतल्या व मग न्यूझीलंडने नेहमीप्रमाणे साध्या बहुमतानेच परिषदेंत निर्णय घेतला जावा अशी सूचना मांडली. त्याचबरोबर पुनः रशियाने त्याला हरकत घेऊन सांगितलें कीं 'छे छे! सॅनफ्रॅन्सिस्को परिषदेंतील दाखल्याप्रमाणेच ही न्यूझीलंडची सूचनाहि $\frac{2}{3}$ बहुमताने पास झाली तरच ती पास झाली असें समजलें पाहिजे!!' शेवटीं अध्यक्ष स्पाक यांनी हात जोडून सांगितलें कीं 'अशाने जगाच्या अंतापर्यंतहि निकाल लागावयाचा नाही. कृपाकरून आपसांत तडजोड करा.' या वेळीं मोलोटोव्ह, बायर्न्स व मॅकनेल यांची पुनः एकदा झटापट उडाली आणि रशियाचा पित्त्या युगोस्लाव्हिया, त्याच्या प्रतिनिधीने उठून साफच जाहीर केलें कीं '$\frac{2}{3}$ बहुमताखेरीज पास झालेला दुसरा कोणताहि ठराव आम्ही मानणार नाही. आम्ही तुमच्या बरोबरीची स्वतंत्र स्वायत्त राष्ट्रें आहों.'

## कशांतच एकमत नाहीं

परिषदेंत चर्चेस येणाऱ्या विषयांच्यासाठी अनेक तज्ज्ञ समित्या नेमण्यांत आल्या होत्या; पण त्या समित्यांतहि एकमत होऊं शकत नाही. जर्मनीच्या बाजूने लढलेलीं पांच राष्ट्रें म्हणजे इटाली, हंगेरी, रुमानिया, बल्गेरिया व फिन्लंड. या पांच राष्ट्रांशीं तहपरिषदेंत एकवीस तत्कालीन युद्धयमान दोस्त–राष्ट्रांकडून पक्का तह करावयाचा. पण त्या तहांच्या कच्च्या खर्ड्यांबाबतच अनेक मतभेद आहेत. किंबहुना निर-निराळ्या २८ कलमांबद्दल एकमत बड्या चौघांच्या तज्ज्ञसमितींतच होऊं शकलेलें नाही. इटालीच्या आरमाराची वाटणी इंग्लंड, अमेरिका व रशिया यांत कशी करावी त्याची खूप भवति न भवति करून तज्ज्ञ उपसमितीने प्रत्येकास द्यावयाच्या आरमाराची एकेक स्वतंत्र यादी तयार केली; पण अखेर त्यांतहि मतभेद झाला व रशिया म्हणूं लागला कीं चिठ्या टाकूं ! त्यांत येईल त्याने येईल ती यादी उचलून समाधान मानलें पाहिजे. या रशियन सूचनेला ब्रिटनने विरोध केल्यामुळे त्याहि प्रश्नाचा निकाल पुनः अनिर्णीतच राहिला आहे. खेरीज मुख्य जो जर्मनी त्याच्याबाबत अँग्लो–अमेरिकन्स व रशिया यांचें एकमत होऊंच शकत नसल्यामुळे इतर कोणत्याहि रीतीने तहाचें नाटक उरकून टाक-ण्यांत आलें तरी खरे मतभेद मिटत नाहीत आणि यामुळेच सध्याच्या पॅरिस परिषदेला कांहीच महत्त्व नाही असा इंग्लंड–अमेरिकेंतील कांहीं मुत्सद्दी उघडपणे प्रचार करूं लागले आहेत.

केसरी, ९–८–४६

★

— ५ —

# चीन व कोरिया या देशांत वाढती तेढ

## चीनचा दोहींकडून ग्रास

युरोपांतील भांडणाच्या नगाऱ्यापुढे पूर्वेकडील म्हणजे चीन, कोरिया-कडील घटनांची टिमकी ऐकूं आली नाही तरी तिकडेहि रूसो-अमेरिक-नांचे डावपेच एकमेकांवर सारखे सुरू असून, त्या दोघा बलिष्ठांच्या महत्त्वाकांक्षेपायीं चिनी व कोरियन जनता अगदी रंजीस आली आहे. युरोपियन महायुद्धाच्या आधीपासून पांच—सहा वर्षे चीनचें जपानशीं युद्ध सुरू झालें. त्यानंतर महायुद्धाची पांच वर्षे होऊन गेलीं, व युद्ध थांबूनहि एक वर्ष गुदरलें तरी अद्याप बिचाऱ्या चीनला शांततेचा क्षणहि लाभला नाही. पूर्वी त्याला एकट्या जपानविरुद्ध लढावयाचें होतें; आता त्याला रशिया व अमेरिका या दोघाविरुद्धहि भांडावें लागत आहे. जपानशीं भांडण्यासाठीं म्हणून चीनने अमेरिकेची मदत मागितली व अमेरिकेनेहि ती इतकी भरपूर दिली की, परवा झालेल्या एका आर्थिक करारान्वये चिनांत अमेरिकनांनी नेलेलें प्रचंड युद्धसाहित्य आतां निरुपयोगी व परत अमेरिकेस वाहून नेण्यास फार कष्टाचें म्हणून अमेरिकेने चीनलाच विकत घ्यावयास लावलें! इसापनीतींतील गोष्टीप्रमाणें आपल्या शत्रूंचा पराभव करण्यासाठी म्हणून चिनी घोड्याने आपल्या पाठीवर अमेरिकेला खोगीर चढवूं दिले; पण मागाहून त्याच्या नशिबी अमेरिकेची कायमची ताबे-दारीच बसलेली दिसते.

जपानच्या पराभवाचा मोका साधून रशियाने चीनचा उत्तर प्रदेश

म्हणजे मांचुरिया बळकावला व पुढे तो सोडला तरी आपल्या कम्युनिस्टांच्या हातीं देऊन सोडला! सारांश उत्तर चिनांत रशियाचें व दक्षिण चिनांत अमेरिकेचें वर्चस्व बसलें आहे. महायुद्ध समाप्त झालें आणि प्रत्येक राष्ट्राच्या स्वातंत्र्याचा हक्क मान्य करण्याचे जाहीरनामेहि गाजले; तथापि चीनचें नष्टचर्य संपलें नाही. सध्या रशियाने चिनी कम्युनिस्टांस हातीं धरलें असून अमेरिकेने चांग-कै-शेक यांच्या राष्ट्रीय चिनी सरकारास हाताखाली घातलें आहे व त्या दोघांत यादवी माजून रशिया व अमेरिका चीनचा चिंधीचोळा करीत आहेत. त्रयस्थांना हें उघडच दिसतें की, रशियाने व अमेरिकेने चिनांतून आपलें अंग काढून घेतलें तर चिनांतील यादवी थांबेल व परवांच चिनी राजकारणांतील एक वृद्ध अनुभवी व पक्षातीत म्हणून गाजलेल्या मिसेस् सन्-यत् सेन यांनीहि अमेरिकेला तुम्ही आपलें सैन्य काढून घ्या म्हणजे सर्व कांही ठीक होईल अशी कळकळीची विनंतीहि केली; परंतु अशा गोष्टी कोठे होत असतात?

## अमेरिकेची चीनला मदत

अमेरिकेने ज. मार्शल यांना म्हणे चिनी पक्षोपपक्षांत समेट करण्यासाठी पाठविलें आणि त्यांनी तसा अनेकवार प्रयत्न केल्याच्या जाहिरातीहि लागल्या. तात्पुरते युद्धतहकुबीचे, शस्त्रसंधीचे करारहि झाले; पण मौज ही की, त्यांपैकी एकहि करार पाळला गेलेला नाही आणि अमेरिकेने आता तर चिनी वकील डॉ. वेलिंग्टन कू यांच्या मुखाने असें सांगूनच टाकलें आहे कीं, अमेरिका चिनांतून सैन्य काढून घेणार नाही. एवढेंच नव्हे तर डॉ. कू यांनी असाहि एक गौप्यस्फोट केला आहे की, लवकरच म्हणजे महिन्याभरांतच अमेरिका चीनशीं एक नवा व्यापारी करारहि झाल्याचें जाहीर करील! ज. मार्शल म्हणजे प्रेसिडेन्ट ट्रुमन यांनी चिनी पक्षोपपक्षांत समेट घडवून आणण्यासाठी पाठविलेले खास मध्यस्थ व चिनांत अमेरिकेने नुकतेच वकील म्हणून नेमणूक केलेले आणि साऱ्या चिनांत लोकप्रिय म्हणून गाजलेले स्टुअर्ट यांनी परवा १० तारखेस एक संयुक्त पत्रक काढून चिनांतील तडजोडीचे सर्व प्रयत्न सप-

शेल फसल्याचीहि अधिकृत कबुली दिली. म्हणजे यापुढे चिनांतील पक्ष रूसो–अमेरिकन सैन्यबळाच्या जोरावर कोणकोणावर कुरघोडी करतो एवढेंच पाहावयाचे. तूर्त चिनांत यादवीचा कहर झाला आहे. गेल्या ता. ३० रोजीं टिन्‌स्टिनहून पेकिंगला जाणारी आगगाडी कम्युनिस्टांनी उडवून दिली. उत्तर क्रांसी प्रांतांतील रेल्वे लायनी परत जिंकण्यासाठी एक लाख चिनी सरकारी सैन्य चढाई करीत आहे. उलटपक्षीं कम्युनिस्ट लष्कर खंदक खणून, गाडून उभें राहून लढत आहे. अमेरिकेच्या विमानांचें भरपूर साह्य चिनी सरकारी फौजांना मिळत असून, येनानवर म्हणजे कम्युनिस्टांच्या मर्मावर वैमानिक हल्ले निकराने सुरू झाले आहेत. टिन्‌स्टिन्, पेकिंग इत्यादि शहरांतच तीस हजारांवर अमेरिकन आरमारी हशम व खेरीज पांच हजार पायदळ आहे असें सांगतात. सातवें अमेरिकन आरमार चिनांत आहे तसेंच आम्ही सज्ज राखणार आहों असें त्या आरमार दलाचे दर्यासारंग ' चार्ल्स कुक ' यांनीहि गेल्या ६ तारखेस जाहीर केलें आहे !

## कोरियाची फाळणी

चीनप्रमाणेच कोरियांतहि रूसो-अमेरिकन बेबनाव कळसास पोहोचला आहे. कोरिया द्वीपकल्प हें एका अंगाने मांचुरियाला जोडलेलें आहे, व तें आशिया खंडाच्या नाकासारखें पुढे आलेलें आहे. कोरियापासून जपानी बेटें अवघीं ११० मैलांवर आहेत. सध्या अमेरिका व रशिया यांनी जगाचे जे प्रदेश आक्रमण केले आहेत त्याकडे नकाशावरून पाहिले असतां एक मौज आढळून येते ती ही की, उत्तरेस एका टोकास ॲल्युशिअन्स–अलास्काच्या बाजूने अमेरिका मनांत आणिल तर रशियाच्या सायबेरीयन प्रदेशांत घुसूं शकेल, तर दुसऱ्या टोकास मांचुरिया व उत्तर कोरिया यांतून रशियाला अमेरिकन–व्याप्त जपानवर चाल करून जातां येईल ! भावी कालांत या ज्या दोन महान् राष्ट्रांत लढा व्हावयाचा त्याचें ' व्हिशस सर्कल ' जणू पूर्ण होऊन राहिलें आहे.

## कोरियावरील संकट

गेल्या महायुद्धाच्या अखेरीस दोस्तांनी कोरियांतील लोकांना जपानविरुद्ध उठविण्याचा खूप प्रयत्न केला व त्या पायीच १९४२ मध्ये

जपान्यांनी कोरियनांची कत्तल केली. १९४३ सालीं ‘ कायरो ’ येथून काढलेल्या जाहीरनाम्यान्वयें अमेरिका, ग्रेटब्रिटन आणि चीन यांनी कोरियाला स्वातंत्र्य देण्यांत येईल म्हणून जाहीर केलें; पण पुढे जपानच्या शेवटच्या पराभवाच्या सुमारास अकस्मात् रशियानेच चढाई करून मांचुरिया सबंध खाल्ला व तशीच पुढे चाल करून बहुतेक कोरियन द्वीपकल्पहि बळकावण्याचा प्रसंग आणला. तेव्हा लगोलग जपानकडून अमेरिकेनेहि आरमार व सैन्य पाठवून दक्षिण कोरियांत घुसून जेवढा मुलूख दाबतां येईल तेवढा दाबला आणि सध्या अशी स्थिति आहे की, २४०००००० लोकसंख्येचा हा कोरियन प्रदेश रशियन व अमेरिकन लष्करी अंमलाखाली, स्वतंत्र होण्याऐवजी दुप्पट चेचला जात आहे. कोरियन जनतेला मिळणारें स्वातंत्र्य फार दूर आहे. उलट रशियन अंमल बरा कीं अमेरिकन अंमल बरा याचीच विचक्षणा त्यांना करणें भाग पडत आहे; कारण उत्तर कोरिया रशियाच्या ताब्यांत असून दक्षिण कोरिया अमेरिकेच्या ताब्यांत आहे व सध्या त्या दोघांचा इतका बेबनाव झाला आहे कीं, दक्षिण प्रदेशांतून तिकडे जळण, लांकडें इत्यादिकांचा पुरवठा करण्याचें तिनें बंद केलें आहे, तर उत्तरेंतून धान्यपुरवठा अजिबात बंद करून अमेरिकेची हलाखी रशियाने सुरू केली आहे. मात्र त्रास होणार तो सारा गरीब बिचाऱ्या कोरियन प्रजेलाच हें उघड आहे.

## दोन ‘ बड्यां ’ मधील भांडण

चालू सालच्या जानेवारी महिन्यांत कोरियाबाबत रुसो अमेरिकनांची बाचाबाची प्रथम चव्हाटयावर आली. त्या वेळीं रशियाचें म्हणणें असें होतें—‘ मास्को परिषदेंत अमेरिकेनेच सुचविलें होतें कीं, अमेरिका व रशिया यांच्या संयुक्त नियंत्रणाखाली कोरिया रहावा. नंतर कांहीं दिवसांनी लष्करी अंमल उठविल्यावर पुन्हा रूसो-अमेरिकन संयुक्त मुलकी सरकारने कोरियाचा कारभार पाहावा व त्यानंतर कांही दिवसांनी चार राष्ट्रांच्या विश्वस्त मंडळाकडे कोरिया सोपवावा.’ पण रशिया असें म्हणत होता की, कोरियांतील लोकपक्षाच्या साहाय्याने एक तात्पुरतें कोरियन सरकार स्थापावें व त्याने चार राष्ट्रांच्या विश्वस्त मंडळाच्या सल्ल्याने कारभार

हाकावा. या भांडणानंतर फेब्रुवारींत तात्पुरतें हंगामी सरकार स्थापण्याच्या दृष्टीने समसमान रूसो-अमेरिकन प्रतिनिधी असलेलें १० जणांचें एक कमिशनहि स्थापण्यांत आलें पण रूसो-अमेरिकनांचें जमणें अशक्य झाल्यामुळे २१ मे रोजीं त्या कमिशनचें काम स्थगित करण्यांत आलें. सध्या तर अमेरिकनव्याप्त दक्षिण कोरियांत रशियाविरुद्ध चळवळ उठविण्यांत आली असून, 'फितुरी रशियन कम्युनिस्ट' या आरोपावरून 'पाईनक्यांग' येथील कम्युनिस्ट पक्षाची कचेरी बरखास्त करण्यांत आली आहे व कांही वृत्तपत्रांचीहि मुस्कटदाबी झाली आहे. मात्र कोरियन जनतेला गोंजारावें म्हणून कोरियन लोकांचें एक विधीमंडळ आपल्या भागापुरतें स्वतंत्रपणें अमेरिकन लष्करी सरकार स्थापणार असा हेतु ले. ज. जॉन हॉज या सरसेनापतीने प्रकट केला आहे. आतां रशियन प्रतिक्रिया याला काय उत्तर देतें तें पहावयाचे !

केसरी, १३–८–४६

★

— ६ —

# पॅलेस्टाइनमधील ज्यूंची धर्मयुद्धाची तयारी

## सर्वांनाच नापसंत

ब्रिटनने पॅलेस्टाईनसाठी फाळणीची किंवा फेडरल घटनापद्धतीची अशी वैकल्पिक योजना आंखली होती तिला अमेरिकेनेच नकार दिल्यामुळे ब्रिटनची फारच शोचनीय अवस्था झाली आहे. तिने आंखलेली योजना ज्यू किंवा अरब या दोघांसाठी होती; पण ती त्या दोघांनाहि कदापि मान्य होणार नाही हेंहि ठरलेंच होतें; आणि त्याप्रमाणे ता. ९ रोजीं पॅलेस्टाइन ज्यू संघटनेने व ता. ८ रोजीं पॅलेस्टाइनमधील अरब संघटनेने अधिकृतपणे चक्क सांगूनहि टाकलें. एका अमेरिकेचा पाठींबा असता म्हणजे मग ब्रिटनने मूढमर्दाईने अरबांना व ज्यूंना पॅलेस्टाइनमध्ये वठणीस आणून मनासारखे आपापल्या जागेवर बसविलें असतें; परंतु आता अमेरिकाच याबाबत ब्रिटनला विरोधी निघाल्यामुळे अरब आणि ज्यू दोघेहि आपापल्या परीने शेफारून जाऊन ब्रिटनलाच उलट गोष्टी सांगूं लागले आहेत, किंबहुना ब्रिटन—अमेरिकेचा शत्रु जो रशिया त्याला उघड आवाहन् करीत आहेत, आणि त्याच्याकडून हस्तेपरहस्ते मदत मिळवीत आहेत ! गेल्या ता. ८ रोजीं अरबांचे प्रतिनिधी अहंमद शुक्री यांनी पॅलेस्टाईन प्रकरणी अमेरिकेप्रमाणेच रशियानेहि कां पुढाकार घेऊं नये अशी पृच्छा केली, रशियन धोरणाकडे साऱ्या अरबांचें लक्ष लागून राहिलें आहे म्हणून सांगितलें व ज्यू प्रकरणी रशियन सरकार काय करतें यावरच त्या सरकारच्या धोरणाची कसोटी लागणार आहे अशीहि चेतावणी दिली. उलटपक्षी जर्मनी, पोलंड, रुमानिया इत्यादि रशियन

छापेखालील मुलखांतून पॅलेस्टाईनकडे जाऊं इच्छिणाऱ्या ज्यूंकडे, रशियाला कानाडोळा करावयास सांगून ज्यू लोक पॅलेस्टाइनच्या धर्मयुद्धासाठी हजारो ज्यू सैनिक इटालींत आणवून ओतीत आहेत.

अमेरिकेच्या नकारानंतर गेल्या आठवड्यांतच पॅलेस्टाइनचा प्रश्न असा निकरास आला आहे की, कोणच्या क्षणीं या धर्मयुद्धाची सुरुवात होऊन रक्तपात सुरू होईल याचा नेम राहिलेला नाही. किंबहुना त्यास सुरुवातहि झाली आहे. ता. १३ रोजीं कर्फ्यू हुकुमाचा भंग करून किनाऱ्याकडे निघालेल्या हैफाच्या हजारो ज्यू नागरिकांवर गोळीबार करण्यांत आला व त्यांत १ स्त्री ठार होऊन ९ जण जखमी झाले. हैफा बंदराकडे ज्यूंना उतरवींत असतां तो भाग ज्यूंना बंद केला होता तरी कायदा तोडून ज्यू तिकडे धांवत आहेत. तेलाव्हीवमध्ये तर सार्वत्रिक दंगल सुरू झाली असून सरकारी मोटारींची जाळपोळ होऊन चकमकी झडत आहेत.

## ब्रिटनची तयारी

उलटपक्षी ब्रिटनने आपल्या बाजूने कडेकोट तयारी केली आहे. तिने आपलें लढाऊ आरमार भूमध्य समुद्रांत लोटलें असून अजॅक्स व मॉरिशस या लढाऊ गलबतांना पॅलेस्टाइनच्या १६० मैल लांबीच्या बाऱ्यावर अखंड गस्त घालीत बसविलें आहे. खेरीज भूमध्यसमुद्रांतून फिरणाऱ्या गलबतांना संशयावरून हटकण्याचें, त्यावरील संशयित इसमांना पकडून गिरफदार करण्याचें व लहानसहान गलबतांतून चोरीछपीने ज्यूंची पॅलेस्टाइनकडे आयात होत असेल तर तीं गलबतें पागेस लावण्याचे सक्त हुकूम सुटले आहेत. ब्रिटिश वैमानिक काफले वर आकाशांत घिरट्या घालीत राहून तांबड्या समुद्रांत शिरणाऱ्या गलबतांचा छडा लावणार आहेत. वैमानिक व आरमारी बंदोबस्ताप्रमाणेच पॅलेस्टाईनमधील लष्करी बंदोबस्तहि कडक झाला असून परवा 'हायफा' बंदरांत हजारों नवें ब्रिटिश सैन्य आणून उतरविण्यांत आलें. पॅलेस्टाइनमध्ये जवळ जवळ लष्करी कायदाच पुकारल्या सारखा आहे.

## ज्यूंची तयारी

एकंदरींत पॅलेस्टाइनची पुरी कोंडी करून ज्यूंना थंड करण्याचा ब्रिटनचा अट्टाहास आहे, तर उलट ज्यूहि आता फारच भडकले असून त्यांनी काय वाटेल तें झालें तरी पॅलेस्टाइनमध्ये घुसूंच घुसूं असा संकल्प सोडला आहे. ते कांही अहिंसावादी सत्याग्रही बुद्धभिक्षू नव्हेत तर प्रबुद्ध बुभुक्षू आहेत. त्यांची क्रांतिकारक भूमिगत संघटना नुसत्या पॅलेस्टाइनमध्येच नसून ती युरोपांत व अमेरिकेंतहि खोलवर पसरली आहे व अमेरिकेंतून वाहणारी सुवर्णाची गुप्त सरस्वती तिला रोज समृद्ध करीत आहे. किंग्ज डेव्हिड हॉटेल उडवून दिल्यानंतर पुनः ता. ५ रोजीं दोघां ब्रिटिश लष्करी अधिकाऱ्यांचे खून करण्याचा प्रयत्न झालाच. ता. १ ऑगस्टपासून एक लक्ष दोन हजार ज्यू लोकांच्या झडत्या झाल्या. त्यांची दारुगोळ्यांचीं व हत्यारांचीं कोठारें ब्रिटिशांनी शोधून काढून जप्त केलीं तरी त्यांची संघटना मेलेली नाहीं व इरतऱ्हेने ज्यूंना पॅलेस्टाइनमध्ये आणण्याचा त्यांचा क्रम सुरू आहे. युरोपांतील भूमिगत ज्यू संघटनेची शिस्त इतकी बसलेली आहे की कोणाहि ज्यूने त्या संघटनेस कळवून आपण जीवित्वास उदार होऊन पॅलेस्टाइनमध्ये जाण्यास खुषी आहोंत एवढें कळविलें की, ती संघटना नाना उपयांनीं त्याला पॅलेस्टाइनला पोंचविण्याची हमी घेते. ज्या गलबतांतून हे लोक पॅलेस्टाइनमध्ये चोरोछपीने उतरविले जातात, त्यावर 'संदेशक्षेपकांची अद्ययावत् सर्व सामुग्री असते व पॅलेस्टाइनमधील ज्यूंना कळवून त्यांच्या आदेशाप्रमाणे संकेतस्थळीं तीं गलबतें उतारूं नेऊन उतरवितात. गेल्या १२ तारखेस अशीं बेकायदा ज्यूंनी भरलेलीं दोन गलबतें नवीं आलीं असून तींवर अनुक्रमे ७५८ व ५४० ज्यू आहेत. खेरीज आणखी ३ गलबतें पॅलेस्टाइनजवळ आल्याचीहि ताजी वार्ता आहे. आतापर्यंत बेकायदा पॅलेस्टाइनमध्ये शिरलेल्यांची वर्गवारी लक्षांत घेण्यासारखी आहे–१९४५ डिसेंबर २५२, जानेवारी १९४६–९९१, फेब्रु. १५, मार्च ९७३, एप्रिल ९० मे ६६२ जून १७४३, जुलै ३८००. यापुढेहि हजारांनी ज्यू युरोपकडून येतील अशी अपेक्षा असल्यामुळे त्या सर्वांना पकडून 'सायप्रस' बेटांत नेऊन कैदेंत ठेवण्याची ब्रिटिशांनी तजवीज केली आहे.

## पॅलेस्टाइनमधील ज्यूंची धर्मयुद्धाची तयारी ५१

### युरोपांतून ज्यू कसे येतात ?

इंग्लंडवर हा मोठाच पेंच आला आहे व यांतहि रशिया त्याला छळीत आहे. युरोपांतुन जी ज्यू आयात होते ती रशियाच्या चिथावणीने किंवा मुद्दाम केलेल्या दुर्लक्षामुळे अशी त्यांची समज असून त्याने मॉस्को येथील आपल्या वकिलाकडून तशी तक्रार गुदरली आहे. मौज अशी झाली आहे की, रशियाने आपल्या प्रांतांतून ज्यूंचें प्रचंड पेंढार हुसकावून दिलें आहे तें नेमकें अँग्लोअमेरिकनव्यात प्रांतांतून आसरा घेत आहे. इंग्लंडला सध्या एकहि नवा ज्यू पॅलेस्टाइनमध्ये नको असला तरी आताच १००००० व मागाहून अनेक लाख ज्यू पॅलेस्टाइनमध्ये नेऊन सोडण्याची अमेरिकेची प्रतिज्ञाच आहे; अर्थात् हें सर्व ज्यू पेंढार अमेरिकन विभागातील 'अनरा'च्या अन्नछत्रांत जेवून पॅलेस्टाइनकडे निघण्याची वाट पहात बसून राहिलें आहे. पोलंडमधील ५००० ज्यूंना हाकलण्यांत आलें, त्यांना ऑस्ट्रियाच्या अमेरिकनव्यात विभागांत वस्तीसाठी परवां ता. १० रोजीं अमेरिकन सेनापतीने सवलत दिली. जर्मनींत ८०००० ज्यू आले आहेत. त्यांपैकी खरे जर्मनींतील १५००० आहेत आणि बाकीचे रशियाने हाकून आंत घुसविलेले आहेत ! हे सर्व ज्यू जर्मनी विरुद्ध रशियाच्या बाजूने गेल्या महायुद्धांत लढलेले असून त्यांना आधुनिक शस्त्रास्त्रांची व गनिमिकाव्याची पूर्ण ओळख आहे. शिवाय ते ब्रिटनचे कट्टे शत्रू आहेत. त्यांतील लहानमोठ्यांची इर्षा अशी की, आम्हाला एकदा आमच्या पॅलेस्टाइनमध्ये जाऊन उतरूं द्या, मग आम्ही अरबांनाहि पाहून घेऊं व ब्रिटिशांनाहि पाहूं ! आम्हालाहि आता लढाया कशा खेळाव्या हें उत्तम माहीत झालें आहे !

केसरी, १३–८–४६

★

— ७ —

# रशियानें दार्दानेलिसचा प्रश्न निकरावर आणला

## रशियाचा बॉंब

सध्या सर्व राजनैतिक आघाड्यावर अँग्लो-अमेरिकन्स व रशिया यांचा संघर्ष सुरू असून क्षणाक्षणाला ठिणग्या उडत आहेत. पॅरिसला शांतता प्रस्थापित करण्यासाठी म्हणून तहपरिषद सुरू आहे; पण तेथे इतके तीव्र मतभेद उफाळून आले आहेत की, या तहपरिषदेंतून अँग्लो-अमेरिका व रशिया हीं राष्ट्रें सलोख्याने हास्तांदोलन करून बाहेर पडण्या-ऐवजी आपापल्या म्यानांतील तलवारी उपसूनच बाहेर पडतील असाच रंग आहे. आतापर्यंत वादाचा रोज एकेक नवा मुद्दा निघून हमरीतुमरी होत होती, त्यांतच आता रशियाने एकदम दार्दानेलिस खाडीच्या स्वामित्वाची तुर्कस्तानाबरोबरीने मागणी करून महास्फोटक असा बॉंबच फेकला आहे. दार्दानेलिसचा हा प्रश्न अँग्लो-अमेरिकनांच्या दृष्टीने फारच नाजूक असून तो रशियाच्या मनासारखा सोडवावा लागला, तर रशि-याला मेडिटरेनियन म्हणजे भूमध्य समुद्र खुला होऊन या सहस्रवीर्याचे आजानुबाहू साऱ्या आफ्रिका खंडाला व सर्व मुसलमानी राष्ट्रगटाला ग्रासून अँग्लो-अमेरिकनांच्या ॲटलांटिक महासागराच्या ऐलकिनाऱ्या-वरील वर्चस्वाला ग्रासून टाकतील.

या पूर्वीहि एक दोनदा रशियाने हा प्रश्न उपस्थित केला होता; परंतु या वेळचा रशियाचा मोहरा थोडा भीतिदायकच आहे. रशियाने

तुर्कस्तानला मॉंट्रो–करार दुरुस्त करून दार्दानेलिस बाबत समान स्वामित्व देण्यास फर्माविणारा खलिता पाठविला; पण तो पूर्वीप्रमाणें मुत्सद्यांच्या मऊ दरबारी भाषेंत न पाठवितां त्यांत उर्मटपणा दर्शविला व गेल्या महायुद्धांत तुर्कस्थाननें तटस्थपणाच्या सोंगाखाली जर्मनीशीं अंतस्थ मैत्रीच ठेवली, रशियाला दगा करण्याचा बेत केला होता असें स्पष्ट आरोप करून त्या काळांतील तुर्की प्रधान व तुर्कस्थानांतील जर्मन वकील फॉन पॅपेन यांचा तत्संबंधीचा गुप्त पत्रव्यवहारहि चव्हाट्यावर मांडला; एवढेच नव्हे तर आपण या वेळच्या मागण्या निश्चित तुर्कस्थानास मान्य करावयास लावूं हें दर्शविण्यासाठी व त्याला भयप्रदर्शन करण्यासाठी रशियाने तुर्कस्थानच्या पूर्वेस कॉकेशस पर्वतांत २२ डिव्हिजन्स सैन्यहि जमवून सज्ज केलें आहे. यावेळीं रशिया कदाचित् अतिप्रसंग करीलहि अशी तुर्कस्तानला भिती वाटू लागली असल्यामुळे त्याने तावडतोब अमेरिकेचे पाय धरले व तिनेहि प्रसंगाचें गांभीर्य ओळखून रशियाला दटावण्याकरिता गेल्या आठवड्यांत आपलें कांही लढाऊ आरमार भूमध्य समुद्रांत घुसवून दार्दानेलिसच्या खाडीच्या तोंडीं खडें केलें आहे. या आरमारांत फार्गो, हंटिंग्टन व फ्रॅंकलिन–रुझवेल्ट असली मातबर लढवाई गलबतें आहेत. रुझवेल्ट गलबत तर अद्ययावत् ४५ हजार टनी असून त्यावरून १३७ विमानें उडविण्याची सोय आहे.

## कराराची पूर्वपीठिका

ज्या कराराच्या दुरुस्तीसाठी रशियाने मागणी केली आहे त्याची थोडक्यांत पूर्वपीठिका अशी आहे. पहिल्या महायुद्धानंतर दार्दानेलिसची खाडी तुर्कस्थानाकडून आंतरराष्ट्रीय कमिशनच्या ताब्यांत गेली व मग त्या कमिशनने खाडीच्या दोहीं तोंडांस तुर्कस्थानने संरक्षणासाठी जे बुरूज बांधले होते व तटबंदी केली होती ती सर्व पाडून टाकविली. पुढे १९३६ सालीं दुसऱ्या महायुद्धाआधींचें जर्मन आक्रमण सुरू झालें. तेव्हा तुर्कस्थानने भावी धोका ओळखून खाडीच्या दोन्ही तोंडास पुनः तटबंदी उभारण्यासाठी कमिशनकडे परवानगी मागितली. ही परवानगी ९ नोव्हेंबर १९३६ सालीं झालेल्या मॉंट्रो–करारान्वयें देण्यांत आली. त्या

करारावर ब्रिटन, रशिया, फ्रान्स, बल्गेरिया, ग्रीस, रुमानिया, युगोस्लाव्हिया व जपान यांच्या सह्या होत्या. करारांत अशी शर्त घालण्यांत आली कीं हा करार २० वर्षेपर्यंत अमलांत राहावा. मात्र करारांत कांही दुरुस्त्या करून घेण्याचा प्रश्न उद्भवला तर दर पांच वर्षांनी तसें करण्यास अधिकार असावा; व त्याची ठराविक मुदती आधीं तीन महिने नोटीस देण्यांत यावी. या वेळीं रशियाने नऊ ऑगस्ट १९४४ रोजींच तशी नोटीस तुर्कस्तानला व कराराशीं संलग्न असलेल्या राष्ट्रांना वेळींच दिलीहि होती. दरम्यानच्या काळांत महायुद्धाने मोठेंच स्थित्यंतर होऊन जर्मनी—जपानचा संपूर्ण पराभव झाला व जपानची जागा अमेरिकेने घेतली. पूर्वीच्या करारांत मॉन्ट्रो-करारावर जपानची सही होतीच. अर्थात् त्याची जागा अमेरिकेने घेतली व अमेरिकाच रशियाबरोबरीने सर्ववरिष्ठ ठरल्यामुळे तुर्कस्थान व रशिया या दोघांनाहि दार्दानेलिस खाडी प्रकरणीं अमेरिकेची हमी आवश्यक वाटूं लागली. अर्थात् अमेरिका एकापायावर तयारच होती ! तिने १९४५ च्या नोव्हेंबरांत मॉन्ट्रो–करार दुरुस्त झाला तर त्यांत सामील होण्यास अनुमति दर्शविली.

## तुर्कस्तानची दुटीळ वृत्ति

ब्रिटन मागे पडून अमेरिका या प्रकरणीं कशी पुढे घुसली हें समजण्यास आणखी थोडा पूर्वेतिहास लक्षांत घेतला पाहिजे. गेल्या महायुद्धांत पहिल्या तीन वर्षांत जर्मनीने रशियाचा जवळ जवळ नष्टांश करून सारा युरोप खंड ग्रासून टाकला. त्या वेळीं जर्मनीचें दुर्निवार दडपण तुर्कस्थानावर बसलें होतें व तो तुर्कस्थानला आपल्या बाजूने युद्धांत ओढण्यासाठीं खटपट करीत होता व तसें न झाल्यास कॉकेशसमधून त्यावर स्वारी करण्याचें भय घालीत होता. उलट बाजूस इंग्लंड अमेरिका त्याला 'निदान तूं तटस्थ रहा' असे परोपरीने विनवून त्याचें ताटस्थ्य राखण्यासाठीं त्याला वाटेल ती मदत करण्यास तयार होतीं. तुर्कस्थानची या दोन बलिष्ठांच्या कात्रींत कोंडी झाल्यामुळे तो दोघांशींहि निरनिराळे सलोख्याचे व व्यापारी तह रोज नवेनवे करून कालहरण करून दोहीकडे थोपवाथोपवी करीत होता. पुढे १९४३ च्या सुरुवातीस कॉकेशसकडील

जर्मनीचा धोका संपला व आफ्रिकेकडे दोस्तांनी जर्मनीचा पराभव केला व इंग्लंड तुर्कस्तानशीं अधिक लगट करूं लागलें. फेब्रुवारींत खास चर्चिल आपल्या पायाने चालत जाऊन आडाणा येथें तुर्की प्रधानास भेटले व त्यांनी तुर्कस्तानला सर्व लष्करी साहाय्याचें अभिवचन दिलें. त्याबरोबर तुर्कस्तानहि आपण आपलें सैन्य बिलकुल कमी करणार नाही असें जाहीर करूं लागला. यानंतर जून महिन्यानंतर तुर्की आरमाराची पुनर्घटना करण्यासाठी तीन बडे ब्रि. आरमारी तज्ज्ञ वर्षभर तुर्कस्तानांत ठेवून घेण्यास तुर्कस्तानने ब्रिटनशीं करार केला. त्या सालच्या डिसेंबरांत तर कैरो येथें सर्व वरिष्ठ तुर्की लष्करी अधिकारी व मुत्सद्दी, रूझवेल्ट, चार्चिल व रशियन प्रतिनिधींना जाऊन भेटले व तुर्कस्तान आता दोस्तांच्या बाजूने युद्धांत पडणार असा उघड संभव निर्माण झाला; परंतु मुत्सद्द्यांच्या कुटिल राजनीतीला अनुसरून तुर्कस्तानने आतून बदमाशीच केली होती. त्याचें अजूनहि अंतस्थ, जर्मनीशीं सूत्र असून, इंग्लंडची शस्त्रसामुग्री घ्यावी; पण नुसतेच जबरदस्त होऊन बसावे व वेळीं त्याच शस्त्रास्त्रांनीं इंग्लंडवर उलटावे असा त्याचा डाव होता! इंग्लंड त्याला विमानें व वैमानिक पाठवूं लागले तर तो म्हणे तुमची विमानें तेवढी द्या, वैमानिक नकोत आणि युद्धकालापुरते कां होईना पण तुर्कस्तानाने वैमानिक तळ इंग्लंडने मागितले तेव्हा ते देण्यास त्याने साफच नकार दिला. अर्थात् इंग्लंडहि सावध झालें व त्यानें तुर्कस्तानला मदत व युद्धसामुग्री पाठविण्याचें ४४ च्या मार्चांत बंद केलें.

## पुनः अमेरिकेची मदत

यानंतर महायुद्ध संपलें. जर्मनी-जपानचा निःपात झाला; परंतु दोन अतर्क्य गोष्टी नवीन निर्माण झाल्या. पहिली ही की, रशिया पुनः जिवंत झाला एवढेंच नव्हे तर सर्व दोस्तांत बलिष्ठ मानकरी होऊन बसला व दुसरी गोष्ट ही की, सर्वच बाबतींत इंग्लंडचें महत्त्व संपून त्याची जागा अमेरिकेने घेतली! महायुद्धोत्तर पुनर्घटना करणें हें प्रत्यक्ष युद्धापेक्षाहि अधिक त्रासाचें कसें झालें आहे तो इतिहास आपण रोज पहातच आहों. रशिया आपले एकूणएक मुद्दे उगवून घेऊं लागला

आहे. दार्दानेलिसच्या खाडीचा प्रश्न त्याच्या दृष्टीने सर्वांत महत्त्वाचा. आणि तुर्कस्तानचा कायमचा निकाल लावल्या खेरीज तो सुटत नाही, म्हणून युद्धानंतर 'पॉटस्डॅम' परिषदेंत ह्या प्रश्न रशियाने निकराने मांडून भांडणाचें सूतोवाच करून ठेविलें. 'दार्दानेलिस' खाडी रशियाला बहाल करणें म्हणजे युरोप आफ्रिकेंतील आपल्या अस्तित्वावर आपल्या हाताने बोळा फिरविण्यासारखें आहे हें अमेरिका व इंग्लंड जाणत असल्यामुळे त्यांनी टोलवाटोलवी चालविली, व मॉंट्रो करार इंग्लंड-अमेरिकेने व रशियाने परस्पर आपापल्यापरी तुर्कस्तानाशी बोलणीं करून सोडवावा असें ठरविलें. त्याबरोबर पडत्या फळाची आज्ञा घेऊन रशियाने तुर्कस्तानाच्या कार्स, अर्धान व आर्गन या प्रांतांचीच तुर्कस्तानकडे मागणी केली व तुर्कस्तान हें फॅसिस्ट राष्ट्र आहे असा जबरदस्त प्रचार चालविला!! रशियानें आपलें खरें स्वरूप प्रकट केल्यामुळे तुर्कस्तानांत क्षोभ उठला. जनतेने रशियाविरोधी चळवळ सुरू केली. डिसेंबर १९४५ त रशियन वकिलातीवरहि हल्ला झाला, व पुढील महिन्यांत प्रत्यक्ष तुर्को-रशियन सरहद्दीवर लढाई सुरू झाल्याच्या भुमकाहि उठल्या. तुर्कस्तानने इंग्रज-अमेरिकनांच्या मदतीने बळकटी केली. रशियाविरुद्ध इस्टर्न युनियन स्थापिली व अरब लीगला तींत गोवण्याची खटपट चालविली. मार्च महिन्यांत अमेरिकेने एक कोटी डालर्सचीं नवीं शस्त्रें तुर्कस्तानाला विकलीं व खूप कर्जाऊ रक्कमहि दिली. शिवाय आपली लढवाई गलबतें दार्दानेलिसच्या खाडीच्या तोंडीं इस्तंबूलनजीक नेऊन खडी केली, व तुर्कस्तानला आश्वासन दिलें. इराकशींहि त्याच वेळीं तुर्कस्तानाने मैत्रीचा तह करून टाकला व पुनः १९४६ च्या जून महिन्यांत अमेरिकेकडून नव्वद दशलक्ष डॉलर्सचें रणसाहित्य मिळविलें. या बनावानंतर रशियाने थोडी सबुरी करून आपले लक्ष इराणकडे वळविलें व तुर्कस्तानचा प्रान्त नाही तर इकडे इराणचा अझरबैझान प्रांत गिळंकृत केला. आतां इराण आपल्या छापेखाली आणण्याचें काम पूर्ण झाल्यावर तो पुनः मुख्य मुद्द्याचा प्रश्न जो दार्दानेलिसची खाडी तो निकरास आणू पहात आहे.

## रशियाच्या मागण्या

रशियाने दार्दानेलिस बाबतचा करार तुर्कस्तानकडे दुरुस्त करून मागितला आहे. त्यांत सहा कलमें आहेत. (१) गेल्या महायुद्धांतील अनुभवावरून हें स्पष्ट झालें आहे की, काळ्या समुद्रकांठच्या राष्ट्रांना मॉंट्रो-करार घातक व धोक्याचा ठरला आहे (२) दार्दानेलीसची खाडी सर्व राष्ट्रांच्या व्यापारी गलबतांना खुली असावी. ( ३ ) काळ्या समुद्रावरील राष्ट्रांच्या लढाऊ गलबतांनाहि ती सदा खुली असली पाहिजे. ( ४ ) काळ्या समुद्रावरील राष्ट्रांखेरीज इतर कोणासहि ती खाडी लष्करी गलबतांस खुली नसली पाहिजे. फक्त कांही जादा सवलत विशेष कारणासाठीं देणें असेल तर तसा स्पष्ट उल्लेख करून ठेवला पाहिजे. (५ ) खाडीवर तुर्कस्तान व काळ्या समुद्राभोंवतालच्या राष्ट्रांचेंच विश्वस्त मण्डळ हवे. (६) तुर्कस्तान व रशिया दोनच राष्ट्रें दार्दानेलिसची खाडी निर्वेधरीतीने सर्वांस उपयुक्त करूं शकणार असल्याने व त्या दोघांचेच हितसंबंध त्यांत विशेष गुंतलेले असल्यामुळे त्याच दोघांचें एक संयुक्त अधिकारमंडळ स्थापून त्यांनी काळ्या समुद्रांतील राष्ट्रांना दार्दानेलिस खाडींतून निर्माण होणारा इतर शत्रू–राष्ट्रांचा संभाव्य धोका नाहीसा करावा.

गेल्या महायुद्धांत शत्रूने म्हणजे जर्मनांनी या खाडीचा रशियाविरुद्ध व दोस्तांविरुद्ध लष्करी व गलबत वाहतुकीला उपयोग केला, अर्थात् त्याची जबाबदारी तुर्कस्तानवरच पडते !! आणि म्हणूनच बर्लिन परिषदेंत दार्दानेलिसचा प्रश्न रशियाने आग्रहाने मांडला. त्या वेळीं परिषदेने असा निर्णय दिला की, रशियाची तक्रार बरोबर असून मॉंट्रो करार दुरुस्त होणें रास्त आहे व इंग्लंड, अमेरिका व रशिया तिघांनी मिळून तुर्कस्थानशी स्वतंत्रपणें याबाबत बोलणं करावें. त्याप्रमाणे २ नोव्हेंबर १९४५ रोजी व १९ नोव्हेंबर १९४५ रोजी अमेरिका व ब्रिटन यांनी आपापलें म्हणणें तुर्कस्थानला कळविलें; तें रशियाला माहीत आहे. तें लक्षांत घेऊनच आम्ही आमचें म्हणणें तुर्कस्तानला कळविलें आहे.

रशियाचें हें मागणें तुर्कस्थान मान्य करणें शक्य नाही व त्याने हा आंतरराष्ट्रीय महत्वाचा प्रश्न असल्यामुळे आंतरराष्ट्रीय हमीनेच तो सोड-

विला पाहिजे असें प्रत्युत्तर दिलें आहे. भौगोलिक परिस्थितीच अशी आहे की, तुर्कस्तानने रशियाला आपला हाडवैरी समजावे ! एक त्याने रशियाचा स्नेही, हस्तक किंवा मांडलीक म्हणून तरी राहावें किंवा इंग्लंड, अमेरिकादि दुसऱ्या वलिष्ठ राष्ट्रांशी घरोबा करून आपलें स्वातंत्र्य टिकवावें.

केसरी, ६–८–४६

★

— ८ —

# इराणांतच तिसऱ्या महायुद्धाची सुरुवात होणार ?

## इराणचें वादस्थळ

ॲंग्लो-अमेरिकन्स व रशिया यांच्यांत मध्यपूर्वेतील ज्या तीन प्रदेशांबद्दल निकराची तेढ आहे ते म्हटले म्हणजे (१) दार्दानेलिस (२) इराण व (३) ट्रिएस्ट होत. यांपैकीं दार्दानेलिससंबंधीची हकीगत गेल्या अंकीं दिलीच आहे. ट्रिऐस्टचा प्रश्न धुमसत आहे. पण तूर्त त्याचा मोठा स्फोट झालेला नाही. राहिले इराण ! त्याचा मात्र स्फोट झाल्यासारखाच आहे. कारण एका बाजूने रशियन्स व दुसऱ्या बाजूने इंग्रज यांनी आपापल्या सैन्यांच्या हालचाली सुद्धा सुरू केल्या. रशियाने आपल्या २२ डिव्हिजन्स इराणच्या उत्तरेस कॉकेशस प्रदेशांत जमवून उभ्या केल्या आहेत. ती जागा रशियाने मोठी नामी शोधली आहे. कारण त्याला तेथून जरूरीप्रमाणे तुर्कस्तानांत किंवा इराणात कोठेहि तें सैन्य सहज घुसवितां येईल. इंग्रजांना पर्शियन गल्फमधूनच शिरणें सोईचें. त्यांनी गेल्या दोन आठवड्यांपूर्वी हिंदुस्थानातून सैन्य नेऊन इराणी सरहद्दीनजीक बसऱ्यास दाखल केलें आहे.

या घटनेवरून युरोपांत पुनः युद्धास तोंड लागतें की काय अशी भीति वाटल्याखेरीज राहात नाही. भूमध्यसमुद्रांत ॲंग्लो-अमेरिकन आरमारांनी संयुक्तपणे जय्यत तयारी केल्याचें नुकतेच अमेरिकन सरकारमार्फत जाहीर झालें. उलटपक्षीं स्टॅलिननेहि एक ताजें वक्तव्य करून

'आमचीहि लढाईची खुमखुम जिरलेली नाहीं' असें दोस्तांस बजाविलें आहे. स्टॅलिन क्वचितच तोंड उघडतो. पण मौनव्रत घेणाऱ्याला जशी वाचासिद्धि प्राप्त होते म्हणतात त्याप्रमाणे त्याचें भाषण प्रभावी ठरतें असा अनुभव आहे. परवा १° तारखेस 'जपान पराभव स्मरणदिनोत्सवा'चें निमित्त करून त्याने अँग्लो–अमेरिकनांना इशारा दिला. तो हाच कीं, 'आम्ही जुन्या फॅसिझमचा चक्काचूर करून टाकला. आमचें बाहुबल किती आहे तें अखिल विश्वांतील कामगार बांधवांना समजून चुकलें आहे. आमच्या समाजवादाची खच्ची करण्यासाठीं पुनः आंतरराष्ट्रीय फितवेखोरांनीं कंबरा कसल्या आहेत. पण त्यांचीं सारीं कारस्थानें आम्ही डोळ्यांत तेल घालून पहात आहों. रशिया आपलें लष्कर वाढवून, आद्ययावत् साधनांनीं सज्ज होऊन बसला आहे व बसेल.'

## ब्रिटन-रशिया इराण गिळतात

इराण देश हा मध्यपूर्वेचा मध्यबिंदूच आहे व लष्करी दृष्ट्या त्याची जागा फार मोक्याची आहे. तेथून एका अंगास रशियाकडे व दुसऱ्या अंगास ईजिप्त–हिंदुस्थानकडे हमरस्ते वाहतात. गेल्या महायुद्धांत हिटलरने इराणला वर कॉकेशसकडून येऊन व पश्चिमेस इजिप्तकडून येऊन चिमट्यांत धरण्याचा प्रयत्न चालविला होता. व पूर्वेकडून जपानी फौजा हिंदुस्थानांतून जाऊन इराणखाली असलेल्या तेलप्रदेशांत पोंचून तेथे जर्मन लष्कराशीं हस्तांदोलन करण्याची महत्त्वाकांक्षा बाळगून होत्या. परंतु दोस्तांनीं जर्मनीवर मात केली. रशियाला मदत पाठविण्यास इतर कोठलीच बाजू मोकळी न राहिल्यामुळे, त्यांनी बेलाशक हकनाहक इराणवरच धाड घातली. १९४१ मध्ये रशिया व ब्रिटन इराणवर स्वारी करणार असे तर्क किंवा भुमका उठून त्या विलीन होण्याच्या आंतच जलदी करून उत्तरेकडून रशियाने व नैऋत्येकडून इंग्रजांनी इराण गिळंकृत करून टाकला. त्यावेळीं रशिया जिवंत, जाग्यावर लढत उभा राहण्यानेच ब्रिटन वाचणार असल्यामुळे इराणच्या छातीवर रूळ पसरून आणि डांबरी सडका बांधून विजय मिळेपर्यंत अँग्लो–अमेरिकनांनी अमुप रणसाहित्य रशियाला पोंचविलें. नंतर अँग्लो-अमेरिकनांचा जय झाला आणि मग त्यांच्या विजयोत्सवाचे नगारे थमल्यावर त्यांच्या

पायाखाली चेचल्या गेलेल्या इराणचे कण्हणें कुंथणें प्रकट होऊं लागलें. व दिवसेंदिवस तें अधिकाधिक भयानक होत आहे. तथापि मोटारीखाली चेंगरलेल्या कुत्र्याच्या करुण किंकाळ्याप्रमाणेंच कांही काळाने तेंहि आपोआप शांत होईल. कारण इराणला त्याचें स्वातंत्र्य परत मिळण्याचा प्रश्नच उरला नसून, इराण देश रशियाने बळकवावा का ब्रिटनने गिळावा याबद्दलच वाद त्या दोघांत निघून प्रत्यक्ष गोळी वाजण्यापर्यंत मज येऊन ठेपली आहे.

## ब्रिटन-रशिया यांचे परस्परावरील डाव

इराणच्या नैऋत्य भागांत प्रचंड तेलखाणी असून त्यासाठी तो भाग कायमचा आपल्या हातीं राखण्याची इच्छा ब्रिटनला आहे. इंग्लंडने युद्धकाळांत बिचाऱ्या इराणी सरकाराकडून वाटेल तसे करार करून घेऊन, त्या प्रदेशाचें फार लांब मुदतीपर्यंत जवळ जवळ स्वामित्वहि संपादन केलें आहे. इंग्लंडला सारा इराण सुखाने मिळतां तर नको असें नव्हतें. परंतु तितका निर्लज्जपणा करण्याची त्याची तयारी नव्हती. शिवाय जोडीस अमेरिकन दादा असल्यामुळे व ते धर्मराजाचा—लोकशाहीचा—मुखवटा लावूनच आलेले असल्यामुळे त्यांनी त्याला तसें करूंहि दिलें नसतें हें पुढें अमेरिकेने आपलें सैन्य इराणांतून काढून घेतलें यावरूनहि स्पष्ट दिसते. उलटपक्षी रशियाचा डोळा इराणवर फार पूर्वीपासूनच असून रशियाचें ध्येय आक्रमणाचें आहे. तुर्कस्तान, इराण, खाल्ल्याखेरीज त्याला भूमध्य समुद्र व अरबी समुद्र खुले होऊं शकत नाहीत. बारा महिने केव्हाही न गोठणारी बंदरे रशियाच्या प्रदेशांत नाहीत ही त्याची पुरातन अडचण असून त्यासाठी वरील दोन समुद्रद्वारें खुली करून घेण्याचें त्याचें ध्येय आहे. रशियाने गेले महायुद्ध संपल्यावर इराण सोडण्याची गोष्ट राहोच, परंतु रशियन सरहद्दीला लागलेला इराणचा वायव्येकडील अझरबैझान नांवाचा प्रांत आहे तो कम्युनिस्टांचें प्रभावी प्रचारतंत्र अवलंबून गिळंकृत केला. हा प्रांतहि तेलखाणींनीं समृद्ध आहे. अर्थात् हे सर्व तत्प्रांतीय लोकांतच फितूर पसरून त्यांच्याकडूनच करवून घेतले व आझरबैझानचें आपल्या पंखाखाली स्वतंत्र स्वायत्त सरकारहि निर्माण करविलें.

एवढेंच करुन रशिया थांबला नाही. त्याने कुर्दी लोकांनाहि चेतविले. या लोकांच्या वस्तीचा डोंगराळ प्रदेश तुर्कस्थान, इराक, इराण यांच्या सरहद्दीवर असल्यामुळे या सर्व राष्ट्रांना छळण्यास किंवा तेथें बंडाळ्या उभारून आपला प्रवेश करून घेण्यास रशियाला सुलभ आहे. स्वतंत्र कुर्दीस्तानची कल्पना पूर्वी एके काळीं इंग्लंडने स्वतःच्या फायद्याकरिता म्हणून निर्माण करविली होती. पण तिचा बेमालूम उपयोग रशियाच करून घेऊं लागला आहे. इराणच्या सबंध पश्चिम भागास पसरलेल्या पहाडी प्रदेशांतहि कुर्दी लोकांची वस्ती आहे. रशियाने त्यांनाहि चिथाऊन दिलें व स्वतंत्र कुर्दीस्ताननेंहि आपल्या स्वातंत्र्याचा जाहीरनामा काढून स्वतंत्र आझंर बैझान प्रांतांशीं जोडूनहि टाकल्याचें उद्घोषित केलें ! !

## इराणी सरकारची कुतरओढ

अशा रीतीने इराण रशियाच्या घशाखाली उतरूं लागला तेव्हा ब्रिटिशांनी इराणी सरकारावर दडपण आणून त्याला त्याचा प्रतिकार करण्यास सांगितले. पण त्या बिचाऱ्याच्या हातून तें कोठलें पार पडणार? इराणी सरकारला इंग्रज व रशियन्स दोघेही परकीय. दोघांनीहि काळे करावें हीच त्याची खरी इच्छा ! एकाला खूष करण्यास जावे तों दुसरा हुश करून दुशी मारतो अशी त्याची केविलवाणी स्थिती झालेली. म्हणून तोंडाने अमेरिकेने घोषित केलेल्या अटलांटिक चार्टरचा आक्रोश करीत दोघांच्या लाथा चुकविण्यासाठी अंग चोरण्याची कसरत करीत तो राहिला आहे. पण एकंदरीत रशियानेच ब्रिटनवर मात केली. पहिले ब्रि. तंत्राने चालणारे हकीमी मंत्रीमंडळ त्याने उलथून टाकले व घावम सुलताने या रशियन पक्षपाती मुत्सद्यास प्रधानपदावर आणिले व त्याजकडून अझरबैझानची स्वातंत्र्यसनद मान्य करून घेतली. यूनोत तक्रारी झाल्या तरी शेवटी अझर बैझान व रशिया ही शेजारी राष्ट्रें आहेत त्यांनी आपापसातच आपले वाद तोडून घ्यावेत असेहि अमेरिकेच्या हुकमतीखालील यूनोकडून तात्पुरते कबूल करून घेतले.

उलट दक्षिण इराणांत ब्रिटिश दडपणामुळे साऱ्या खुजीस्तानभर

ट्रेड युनियन पुढाऱ्यांच्या दावणी धरण्यांत येउन अँग्लोइराणी ऑईल कंपनीतील उपद्व्यापी कामगार पुढाऱ्यांना बडतर्फ करण्यांत येत आहे. अगदी ताज्या वार्तेप्रमाणे १८ ऑगस्ट रोजी इराणी प्रधानपंताने सात प्रमुख पुढाऱ्यांना एकदम गिरफदार करण्याचा हुकूम केला. त्यापैकी पांच रशियन पक्षपाती म्हणून पकडले व डॉ. लाहेरी व दौलताबादी हे दोन कट्टर ब्रिटिश पक्षपाती म्हणून पकडले ! ! आणि हे करतांना इराणच्या अंतर्व्यवस्थेत हात घालण्याचा परकीयांना अधिकार नाही, तर झाले तरच इराण ब्रिटनशी व रशियाशी मैत्री ठेवील अशी वक्तव्येंहि ते करीतच आहेत !

## गोळी वाजणार

दक्षिण इराणांतील ब्रिटिशव्याप्त तेलटांपूत गेल्या अनेक दिवसापासून जे दंगे चालू होते ते रशियन स्फूर्तीनेच होत. तेथील तेलखाणीतील कामगारांनी संप सुरू केले. गेल्या ता. २७ जून रोजी ते कसेबसे मिटले. पण तेथपर्यंत सर्वत्र लष्करी कायदा पुकारावा लागला होता. अनेक लोक ठार व जखमी झाले. पुनः जुलै महिन्यांत संप झाला, तो फारच उग्र असून त्यांत ५०००० मजूर सामील झाले होते. ही बंडाळी म्हणजे प्रत्यक्ष रशियन स्वारीच्या आधीचेंच चिन्ह समजून मग मात्र ब्रिटनने प्रतिकाराचाच पवित्रा टाकला व आपलें लढाऊ आरमारहि तिकडे नेलें. व तांतडीने हिंदुस्थानांतील सैन्य बसऱ्यास नेऊन दाखल केलें. इतका प्रकार झाल्याबरोबर इराणी सरकारने रशियाच्या लकड्यामुळे तक्रार गुदरली कीं, इराणवर स्वारी करण्यासाठीच हें सैन्य तुम्ही आणलें आहे, त्यास आम्ही इराणांत घुसतांना प्रतिकार करूं. यावर इराकशी केलेल्या तहाप्रमाणे बसऱ्यास सैन्य आणण्यास आम्हाला अधिकार आहे असें इंग्लंडनेहि बजाविले आहे. पण आता या सर्व उत्तरप्रत्युत्तरांच्या पलीकडे मजल गेलेली असून, ब्रिटिश सैन्य इराणी सरहद्दींत शिरल्याचेहि एक वृत्त आलें आहे.

केसरी, ९–८–४६

★

— १ —

# मध्यपूर्वेतील कुर्दी प्रश्नाची पार्श्वभूमी

## कुर्दांची लोकसंख्या

गेल्या अंकीं कुर्दी लोकांना चिथावून त्यांचें छोटें स्वतंत्र, स्वायत्त राष्ट्रहि निर्माण करवून रशियाने चालू इराणी राजकारणांत कसा गोंधळ घातला त्याचा ओझरता उल्लेख केला होता. हा कुर्दीस्तानचा गोंधळ यापुढेहि मध्यपूर्वेतील राजकारणांत निरनिराळ्या रूपाने डोकावणार असल्यामुळे व रशिया, ब्रिटन आणि अमेरिका यांचे राजकारणी हितसंबंध त्यांत निगडित झालेले असल्यामुळें कुर्दी प्रश्नाची माहिती करून घेणें आवश्यक आहे.

कुर्दी लोकांचें स्वतंत्र राष्ट्र असें अस्तित्वांत नाहीं; तथापि नकाशावर कुर्दीस्तानचा प्रदेश मात्र दाखविलेला असतो. हा प्रदेश म्हणजे इराण, तुर्कस्तान व इराक यांच्या एकमेकाला लागलेल्या सरहद्दीवर आहे व या कुर्दीस्तानला समीपच रशियाचा प्रदेश लागतो. एकूण कुर्दी लोकांची लोकसंख्या कमींत कमी २४–२५ लक्ष तरी असून, त्यापैकीं १० लक्ष तुर्कीहद्दींत, ७ लक्ष इराणहद्दींत, ५ लक्ष इराकहद्दींत, एक लक्ष सीरियांत व सुमारें तितकीच ट्रान्सकॉकेशियन रशियांत आहे. कुर्दी स्वातंत्र्याचे प्रचारक आमची एकूण लोकसंख्या ८० लक्ष ( ८०००००० ) असून अफगाणिस्तान, बलुचिस्तानांतहि आमचे बांधव आहेत असा दावा सांगतात. कसेहि असो, अधिकृत साधनांनी केलेली गणना २४।२५ लक्षांहून कमी नाही एवढे खास.

## वैशिष्ट्य व गुणदोष

हे कुर्दी लोक कमींत कमी ४३०० वर्षें अखंड या वरील प्रदेशांतच किंवा आसपास रहिवास करीत आलेले असून, दहाव्या शतकांत त्यांचें मोठें थोरलें राज्यहि होतें म्हणतात. या सर्व काळांत युरोपांतील कोणत्याहि जातीपेक्षा यांची वंशशुद्धि अभंग राहिली आहे. फक्त बोलींत किंवा भाषेंत कांहीसा फरक पडून ती इराणी धरतीवर आलेली आहे. हे लोक आपल्या इकडील भिल्ल, कोळ्यासारखे पहाडी, अर्धजंगली, जमाती करून रहाणारे असून भिल्लकोळ्याप्रमाणेच सर्व गुण दुर्गुण त्यांत उतरलेले आहेत. म्हणजे ते उमदे, धाडसी, क्रूर, खाल्ल्या मिठास जागणारे; परंतु कोणाचीहि सक्ति किंवा ताबेदारी न जुमानणारे असे आहेत. ते कधीहि कोणास कर देत नाहीत. मराठी इतिहासांतील चौथाईचा इतिहास असाच आहे. जव्हारकडील कोळी जमाती पोर्तुगीज मुलुखाला सतत उपद्रव देत असत, म्हणून पोर्तुगीज सरकारनेच त्यांना दरसाल कांही खंडणी पोहोचती करून आपल्या मुलुखावरील त्यांचे छापे थांबविले. ही खंडणी म्हणजेच मराठी इतिहासांतील सुप्रसिद्ध चौथाईचा उगम ! त्या कोळ्यासारखाच या कुर्दी जमातीचा प्रकार दिसतो. असो.

## रशियाचा पाठिंबा

कुर्दीस्तानच्या भौगोलिक परिस्थितीमुळे रशियाला आपली महत्वाकांक्षा सफळ करण्यासाठी फार उपयोग होत आहे. भूमध्यसमुद्र व अरबी समुद्र खुले करून घेण्यासाठी रशियाला तुर्कस्तान आणि इराण केव्हां तरी खालेच पाहिजेत व म्हणून रशिया या कुर्दी बंडाच्या द्वारें त्या राष्ट्रांत आपला हात शिरकविण्याची शिकस्त करीत असतो. १९१९ सालच्या सुमारास एक कुर्दीस्वातंत्र्य समिति म्हणून निर्माण झाली होती व महायुद्धकाळांत कुर्दीस्तानचे स्वतंत्र राष्ट्र म्हणून स्थापण्याविषयींची बोलणीं त्या वेळच्या रशियाच्या झारसरकाराशीं सुरू होतीं. आता गेल्या दुसऱ्या महायुद्धापर्यंत रशियाने तुर्कस्तानांत दोन, इराणांत तीन व इराकांत तीन अशीं मोठी कुर्दी बंडें करविलीं व सध्या तर त्याने इराणच्या पोटांतच एक छोटें स्वतंत्र कुर्दिस्तान निर्माणहि केलें आहे.

## तुर्कांनीं कुर्दी प्रश्न कसा सोडविला ?

सर्वांत मोठी म्हणजे १० लक्ष कुर्दी संख्या तुर्कस्तानांत; त्याच्या आग्नेय कोपऱ्यांत आहे. व तें तुर्कस्तानला मोठें शल्य आहे. रशियानें किंवा परकीयांनी या कुर्दी जमातीच्या उपयोग करून घेतलेला पाहून, तुर्कस्तान सावध झालें व ऐतिहासिककाळीं इकडे शिवाजी आदि छत्रपतींनी व पेशव्यांनी ज्याप्रमाणे भिल्ल कोळ्यांचीं बंडें सवाई जबरदस्ती करून मोडलीं तसाच प्रकार त्यांनी केला. त्यांनी १७३७-३८ सालीं तर कुर्दी लोकांच्या कत्तलीच केल्या. त्यांच्या मुलखाचे अगदीं बारीक बारीक भाग पाडून ते लष्करी पहारे ठेवून एकमेकांपासून अलग केले व पहाडांतील हजारों कुर्दींच्या दावणी धरून नेऊन त्यांना शेतावरील मजुरी करण्यास लावले व तिकडेच तुर्कस्तानच्या अंतर्प्रदेशांत त्यांच्या वसाहती करविल्या. आम्ही मोठी मायनॉरिटी आहों, असा दावा तुर्कस्तान कुर्दी लोकांना सांगूंच देत नाही. ते म्हणतात, तुम्हांस आम्ही पचविलें आहे. तुम्ही तुर्कीच आहांत, तेव्हा तुम्हास निराळे हक्क किंवा संरक्षण कसलें मागतां? आणि खरोखरीच तुर्कस्तानांत या कुर्दी लोकांचा उल्लेख 'माऊंटनटर्क्स म्हणजे 'पहाडी तुर्क' असाच करतात.

## इराणांतील कुर्दी बंडें

तुर्कस्तान खालोखाल कुर्दांची मोठी वस्ती इराणांत आहे. यांची वसाहत मुख्यतः अझरबैझान, करमनशहान या जिल्ह्यांत आहे. १९१७ नंतर इंग्रजांचा डाव हुकवून रेझाशहा पहल्वीने इराणची गादी मिळविली. या रेझाखानानें कुर्दी जमातींचा पराभव करून त्यांना जर्जर केलें व त्यांना निःशस्त्र करून टाकलें. १९४१ साली रुसो-ब्रिटिशांची इराणवर स्वारी झाली. व इराणी लष्कर तजावजा झालें. मुलुखांत बेदिली माजली. त्या संधीस पुनः कुर्दांनीं एकदम बंडाळी माजवून उर्मीया, सिनेह, महाबाद येथील सरकारी शस्त्रागारें लुटली व पुनः आपली स्वतंत्र वनवृत्ति अनुसरण्यास आरंभ केला. या बंडाला लगतच्या इराक व तुर्कस्तानांतील कुर्दांनीहि हातभार लावला होता; आणि त्या सर्वांचें आधिपत्य एकाच महंमदअली रशीद नांवाच्या माणसाकडे होतें. रशियाची या बंडाला सक्रिय सहानु-

भूति होती. पुढे १९४२ मध्ये ब्रिटन-रशियाने इराणशीं तह केला; तेव्हापासून तर रशियन चाळे फारच वाढले. साजबलाघ ऊर्फ महाबाद येथील कुर्दांना रशियाने तोफा, टँक्स व मोटारवाहनेहि पुरविलीं व हजार कुर्दी लोकांचें रशियन अधिकाऱ्यांच्या देखरेखीखालीं एक पलटणहि शिकवून तयार केलें.

## ब्रिटिशांच्या पोटांत पाप होतें.

कुर्दी-स्वातंत्र्याचा राजनैतिक आधाडयावरूनहि रशिया सतत प्रचार करीत राहिला आहे. १९१९ सालीं पॅरिस येथील तहपरिषदेंत 'शरीफ पाशा' नामक कुर्दी पुढाऱ्याने शिष्टमंडळ नेऊन, स्वतंत्र कुर्दिस्तानची मागणी केली होती. पुढे सेव्हर्सच्या तहांतील बासष्टाव्या कलमांत तुर्कस्तानांत कुर्दीराष्ट्र स्थापण्याचे नमूदहि झालें. त्यांत अशी योजना होती की, इंग्रज, फ्रेंच, इटालियन प्रतिनिधींचें एक कमिशन नेमून, त्यांनी सहा महिन्यांत तुर्कस्तानांत कुर्दीस्तानसाठी जागा मुक्ररहि करावी. पण हा तह कागदोपत्रींच राहिला. त्याची अंमलबजावणी झालीच नाही. गाझी केमालपाशाने तुर्कस्तानच्या सरहद्दींचा कडेकोट बंदोबस्त करून, कोणासही आंत फिरकण्यासच बंदी केली. या वेळीं ब्रिटिशांच्या पोटांत पाप होतें. कुर्दीस्तानचें बफर संस्थान निर्माण करून, ब्रिटिश मॅंडेटखाली आलेला 'मोसल किरकूक' तेलखाणींचा प्रदेश त्याला तुर्की आक्रमणापासून निर्वेध करावयाचा होता. आतां पुनः गेल्या १९४५ च्या एप्रिलांत सॅनफ्रॅन्सिस्को परिषदेंत एका अधिकृत कुर्दी शिष्टमंडळाने स्वतंत्र कुर्दिस्थानची मागणी केलीच आहे.

## अँग्लो-अमेरिकन-रशिया यांचे विरोधी संबंध

वास्तविक स्वतंत्र कुर्दिस्तान स्थापावयाचें म्हणजे पाकिस्तानप्रमाणेच अव्यवहार्य होय. व यूनोची संमति त्यांना मिळणें कठिण. कारण तसें करावयाचें म्हटलें म्हणजे तुर्कस्तान, इराण, इराक या तीन राष्ट्रांच्या मुलुखांचे लचके तोडून घ्यावे लागतील. तुर्कस्तानांतील या तुकडयांतच क्रोम खाणींचा अमूल्य सांठा आहे. बरे, इराकांतील तुकडा पहावा तर

त्यांत मोसल व किरकूक येथे तेलांचा सांठा आहे. अर्थात् तुर्कस्तान किंवा ब्रिटन कधींतरी हे भाग सोडण्यास खुषीने तयार होतील काय ? केवळ इराणांत स्थापिलेल्या स्वतंत्र कुर्दिस्तानला संमति दिली तरी लगत्याचे तुर्कस्तानांतील कुर्द इराणांतील कुर्दांशी एक हात करून उठणारच. केव्हां तरी आपल्या राष्ट्राचा एकजिनसीपणा सांभाळण्यासाठी पुनः तुर्कस्तानला तलवार उपसून उठावेच लागेल. सारांश सर्वच दृष्टींनी स्वतंत्र कुर्दीस्तानचा प्रश्न भानगडीचा आहे व इंग्लंड अमेरिका त्याला विरोधच करतील. परंतु रशियाला इराक, इराण व तुर्कस्तान तिन्ही खावयाचे असल्यामुळे व तो सध्या अति बलिष्ठ झाल्यामुळे जमेल तेथे शस्त्राच्या जोरावर आणि नाही तेव्हा नीतीशास्त्राच्या जोरावर हा प्रश्न तो धसास लावीत असतो.

केसरी, २७–८–४६

★

## — १० —

# बोलणें फोल झालें

### भानगड कशांतून निघाली ?

गेल्या आठवड्यांत अकस्मात् अमेरिकेने तिरीमिरीवर येऊन युगोस्लावियाला एक निर्वाणीचा खलिता पाठविला व त्याचें ४८ तासांत समाधानकारक उत्तर आलें नाही तर आम्हांस सुचेल तें ताबडतोब करूं, अशी धमकी दिली; आणि वृत्तपत्रांनीहि, रोज कांही ना कांही तरी धक्के देणारी तिखट बातमी ऐकण्यास चटावलेल्या वाचकांचे, भीतिदायक मथळे देऊन थोडें समाधानहि केलें ! परंतु पिकल्या आधी विकणाऱ्या आणि शिजल्या आधी वाढणाऱ्या 'तज्ज्ञ वार्ताहरांनी' आणि 'खास प्रतिनिधींनी' आपणांस अखेर फसविलेंच असें वाचकांस आढळून आलें ! ! त्यांच्या सेन्सेशनचा प्रकार महासागरांतील वादळासारखा न ठरतां चहाच्या पेल्यांतील वादळासारखा हास्यास्पद ठरला !

हें 'वादळ' युगोस्लाव्हिया प्रकरणीं उद्भवलें. अँग्लो–अमेरिकनांनी ट्रिएस्टचें स्वतंत्र आंतरराष्ट्रीय संस्थान निर्माण केल्यापासून त्यांच्यावर त्या प्रदेशाशीं संबद्ध असलेल्या सर्वच लहानमोठ्या राष्ट्रांचा मोठा राग झालेला आहे. अँग्लो–अमेरिकन लष्करी सरकारच्या देखरेखीखाली इटालियन व युगोस्लाव्ह यानी त्या संस्थानचा कारभार हाकावयाचा आहे. इटली, युगोस्लाव्हिया हीं शत्रु राष्ट्रें. त्यांच्या आपसांत रोज प्रत्यक्ष मारामाऱ्याहि सुरू आहेत; परंतु त्या दोघांचेंहि इंग्लंड अमेरिका दोषी असल्याबद्दल मात्र एकमत आहे ! अँग्लो–अमेरिकनांनी सर्व हक्कदार अशा संबंधीं राष्ट्रांना गुंडाळून ठेवून त्यांस अन्याय करून स्वतःच्या स्वार्था-

करितां मध्य-युरोपाच्या द्वारा सारखें असलेलें आड्रिॲटिक समुद्रांतील हें ट्रिएस्ट बंदर दाबलें असा त्यांचा उघड आरोप आहे; आणि हा आरोप करण्यांत युगोस्लाव्हिया हा प्रमुख आहे. तो रशियाचा दत्तकपुत्र असल्यामुळे त्याच्या पाठीशीं रशियाचें सामर्थ्य एकवटलें आहे, व त्या जोरावरच तो अँग्लो-अमेरिकनांशीं केवळ उद्धटपणानें वागत आहे. ट्रिएस्ट बंदर युगोस्लाव्हियासच मिळालें पाहिजे, अँग्लो-अमेरिकनांनी ट्रिएस्ट संस्थानाबाबत ठरविलेल्या सरहद्दी आपणांस बिलकूल मान्य नाहींत व त्या आपण बदलावयास भाग पाडूं अशी युगोस्लाव्हियाची प्रतिज्ञा आहे. यामुळे इटली, युगोस्लाव्हिया व अँग्लो-अमेरिका असे तिरंगी दंगे, अत्याचार व गोळीबार सुरू आहेत. ट्रिएस्टचें अँग्लो अमेरिकन सरकार व युगोस्लाव्हिया या दोघांनींहि आपापलीं सैन्यें केव्हांहि सज्ज राहावीं अशी तरतूद केली आहे, व ही तरतूद करण्याच्या उद्योगांतूनच वर उल्लेखिलेली भानगड निर्माण झाली.

अलीकडे बऱ्याच दिवसांपासून अमेरिकन विमानें युगोस्लाव्हियाच्या मुलखावर बिगर कायदा फिरत राहून टिटोनें चालविलेल्या लष्करी तयारीची मुद्दाम टेहळणी करीत असत, म्हणून युगोस्लाव्हियानें अमेरिकेकडे तक्रार केली; परंतु ती तिनें मानली नाहीं. किंबहुना तो उपक्रम अधिकच वाढविला, म्हणून शेवटीं युगोस्लाव्हियानेंहि निकरास येऊन, अमेरिकन विमानावर हल्ले करून तीं खालीं पाडलीं! गेल्या आठवड्यांतच अमेरिकेचीं ४४ विमानें युगोस्लाव्हियावरून उडत होतीं. हीं सर्व लष्करी विमानें होतीं. आणि त्यांपैकीं एक तर फ्लाइंग-फॉर्ट्रेस असून ल्युब्लिजानावरून नेण्यांत आलें. फार काय, ९ ऑगस्ट रोजीं एक अमेरिकन लष्करी विमान सध्या ब्लेड येथे मार्शल टिटो जाऊन राहिला आहे त्याच गांवावर नेमकें प्रकट झाले, असा युगोस्लाव्हियाचा दावा आहे! गेल्या ता. ९ ऑगस्ट रोजीं व त्यानंतर पुन्हां १९ ऑगस्ट रोजीं युगोस्लाव्हियन विमानांनी या अमेरिकन विमानांवर झडप घालून तीं खालीं पाडलीं. पहिल्या वेळच्या विमानांतले सर्व सैनिक कैद करून ठेवले. दुसऱ्या वेळचें विमान कोसळतांना पेटलें व त्यांतले सर्वच उतारू किंवा लष्करी सैनिक ठार झाले. इतका प्रकार झाल्यावर अमेरिकेला प्रतिकार करणें नाप्राप्त झालें

व तिने वर उल्लेखिलेला 'निर्वाणीचा खलिता' युगोस्लाव्हियाला देऊन ४८ तासांची मुदत दिली.

## अमेरिकेचा निर्वाणीचा खलिता

सदर 'निर्वाणीच्या' खलित्यांत अमेरिकेने आपलें म्हणणें मांडलें, ते असें, " आमच्या वैमानिकांची प्राणहानि झाली ती अपघाताने, अशी तुम्ही सारवासारव करता. परंतु ती निव्वळ छपवाछपवी आहे. आमच्या प्रवासी उतारूं विमानांचा मार्ग व्हिएन्ना ते उडाईन आहे हें तुम्ही जाणतांच व आमचें विमान खरोखर प्रवासी उतारूंचेंच आहे हें माहीत असून तुम्ही बुद्धया त्यावर गोळीं चालविली. १० ऑगस्टपासून तुमच्या मुलखांत आमची ४४ विमानें शिरल्याचें अगदीं चित्रगुप्ती टिपण तुम्ही देतां; परंतु त्या मार्गावरून जाणाऱ्या आमच्या विमानांच्या टाईम टेबलांत विमानांची संख्या ३२ च नोंदलेली आहे. मग आमच्या टाईम-टेबलांत नसलेली आणखी नवी बारा विमाने तुम्ही कोठून पैदा केलीत ? शिवाय त्या ३२ विमानांनाहि आमचे सक्त हुकूमच होते की, 'चुकूनहि तुमच्या मुलुखांत आक्रमण करूं नये.' अशा स्थितींत आमचें एखादें विमान तुमच्या हद्दींत घुसलें असेल तर ते केवळ प्रतिकूल हवेमुळे, नाईलाजानेंच, हेंहि तुम्ही लक्षांत घेऊं नये ? ९ ऑगस्ट रोजीं क्लॅगनफुर्ट जवळ तुम्ही आमचें विमान गोळया मारून पाडलें तें पाडलें, पण त्यांतील उतारूंना कैद करून अद्यापपर्यंत डांबून ठेवले आहे; आणि त्या कैद्यांची भेट घेण्यासाठीं आम्ही आमचे सरकारी प्रतिनिधी पाठविलें त्यांनाहि तुम्ही किती हिसके दिलेत व शेवटीं भेटूं दिलेत तें लष्करी अधिकाऱ्यांच्या गराड्यांत ! १९ तारखेच्या प्रकारांत आमचे वैमानिक प्राणासच मुकले. त्यास निःसंशय तुम्हीच जबाबदार आहांत. तुम्ही सांगतां की क्लॅगेनफुर्टवर आमचें विमान आलें तेव्हा त्यास बारा मिनिटेंपर्यंत खाली उतरण्याचे संदेश देऊनहि ते ऐकेना म्हणून गोळी चालवावी लागली; परंतु क्लॅगेनफुर्ट ठाण्यांतील रजिस्टरांवरून असें सिद्ध होत आहे की, आमच्या वैमानिकाने त्या ठाण्यास कळविलें होतें की, 'मी क्लॅगेनफुर्टवर आहे म्हणजे युगोस्लाव्हियाच्या हद्दीबाहेर आहे !' तथापि या प्रश्नाची शहा-

निशा आम्ही आमच्या वैमानिकांची सुटका झाल्यावरच तुम्हास करून देऊं ! पण क्षणभर तें विमान तुमच्या हद्दींत शिरलें असें धरलें तरी मित्र म्हणविणाऱ्या तुम्हीं, त्यावर गोळी चालवावी काय ? साधी माणुसकीहि तुम्हीं दाखविली नाही. तुम्हीं युनोच्या चार्टरमधील कलमाचा भंग केला आहे. अर्थात् हें आमचें निर्वाणीचें पत्र म्हणजे अल्टिमेटम् समजा. आमच्या वैमानिकांची ताबडतोब मुक्तता करा व त्यांस बदरका देऊन युगोस्लाव्हियाच्या हद्दीबाहेर सुरक्षित काढून द्या. जर ४८ तासांच्या आंत आमच्या मागण्या पुऱ्या झाल्या नाहीत, तर आम्हांस सुचेल तें करूं. यूनोच्या संरक्षक समितीची तांतडीची बैठक बोलावून हा प्रश्न घसास लावूं. ”

## टिटोचें प्रत्युत्तर

पण अमेरिकेच्या या निर्वाणीच्या खलित्याला मा. टिटोनेहि तसाच खडखडीत जाब लगेच दिला व अमेरिकेलाच उलट दम भरला की, “यूनोकडे जातां ना ? खुशाल जा. आम्ही तिकडेच तुमच्याविरुद्ध फिर्याद घेऊन चाललों आहोंत. तुम्ही आमच्या बोटी डॅन्यूब नदीवर जबरदस्तीने अटकावून ठेविल्या आहेत त्याचा जाब तुम्हांस विचारणें आहेच. बोटी कांही १।२ नाहीत. तर ६ उतारू बोटी, १६ टग्ज, १८ तेलवाहू गलबतें व ११९ मचवे आहेत. आतां चालू प्रकरणीं तुमच्या प्रश्नाचें उत्तर हें की, विवाद्य अमेरिकन विमान तुम्ही म्हणतां त्याप्रमाणें एक वा दोन मैलच चुकून आमच्या हद्दींत आलें नव्हतें. ५० किलोमीटर्स म्हणजे सुमारें ३० मैल आंत घुसलें होतें ! खराब हवेची तुमची सबब तर अजिबातच खोटी आहे; कारण त्या दिवशीं आकाश अगदी स्वच्छ, निरभ्र, निर्मळ असून वैमानिकाला साफ दिसत असलेंच पाहिजे. आमच्याच मुलखावर उडून, वर मुजोरी करून पावतासपर्यंत केलेले खाली उतरण्याचे हुकूमहि तुमचा वैमानिक ऐकेना तेव्हा त्यास शुद्धीवर आणणें आम्हांस भागच होते.”

अशा रीतीने अनपेक्षितपणें उलट गरगरीत टोलाच आला, तेव्हा अमेरिकेने बघितलें की, धमकीला हा भीत नाहीं; आणि या क्षुल्लक मुद्याचें महत्त्व वाढवून त्याला प्रत्यक्ष युद्धाचें तात्कालिक कारण बनवावें

अशीहि अद्याप वेळ आलेली नाहीं; आणि खरें पाहिलें तर दोष आपणां-कडूनच घडलेला आहे. तेव्हा तिने लगेच आपला पवित्रा बदलला. अनेक लटपटी करून आपला निर्वाणीचा खलिता अनधिकृत होता अशी व्रता-वणी केली व वाटाघाटी करून अखेर गोडीनेच या प्रकरणाचा शेवट करून घेतला. तो असा की, मार्शल टिटोने अडकवून ठेवलेले वैमानिक सोडून द्यावे, उलटपक्षीं अमेरिकेने आपला व्हिएन्ना ते उडाईन हा वैमा-निक मार्ग अजिबात बदलून तो ब्रेन्नर खिंडीमार्गे चालू करावा. म्हणजे एकंदरींत अमेरिकेलाच या प्रकरणी पड खावी लागली आहे; तथापि आपल्या प्रसिद्धी खात्यातर्फे उलट-सुलट भडक बातम्यांचा गोंधळ उडवून देऊन "अमेरिकेचें म्हणणें खरें ठरलें." "टिटो नमला !" "रशियालाहि अमेरिकेचें बळ कळलें !" असा प्रचार चालवून स्वतःचो स्वतःच पाठ थोपटून घेण्याचा तिने उद्योग सुरू केला आहे; पण बारीक पाहणाराला वस्तुस्थिति काय आहे ती कळतेच.

## अमेरिकाच नमली

या प्रकरणीं सर्वच दृष्टींनी आपण दोषी आहों अशी अमेरिकेची खात्री असल्यामुळे तिला 'अधिकृत' 'अनधिकृत' असल्या शब्दांची चाळवाचाळव करण्याचा प्रसंग आला. कसें तें पहा. ज्या क्लॅगनफुर्टबद्दल आणि तेथल्या रेकॉर्डांबद्दल अमेरिकेने आपल्या अल्टिमेटममध्ये हवाला दिला त्याबद्दल तिची स्वतःचीच खात्री नाही. म्हणूनच 'आमचे वैमानिक आम्हाकडे सुटून आल्यावर आम्ही नक्की स्थळाचा निर्देश करून तुम्हास कळवूं' अशी तिला सोडवणूक करून ठेवावी लागली. दुसरी गोष्ट वैमानिक टाइमटेब-लाची ! रेल्वे टाईम-टेबलांत जेवढ्या गाड्यांची नोंद केलेली असते त्या-खेरीज किती तरी अधिक गाड्या म्हणजे मालगाड्या, स्पेशल्स इत्यादि रोज जात येत असतातच. त्याचप्रमाणे अमेरिकेच्या प्रवासी वैमानिक टाईम-टेबलांत त्यांची संख्या ३२ च असेल; पण म्हणून युगोस्लाव्हि-याच्या दाव्याप्रमाणे अमेरिकेची इतर १२ लष्करी विमाने त्यामार्गें युगोस्ला-व्हियावर पाठविण्यांत आलीं नसतील हें कशावरून ? किंबहुना ती लष्करी होती म्हणूनच युगोस्लाव्हियाने त्यावर गोळ्या चालविल्या असल्या पाहि-

जेत. आपलाच दाम खोटा असल्यामुळे अमेरिकेने अखेरची अशी मख-लाशी केली आहे की, अल्टिमेटम किंवा निर्वाणीचा खलिता म्हणून जे पत्र युगोस्लाव्हियाला पाठविण्यांत आलें तें कांही ट्रुमन यांनी पाठविलें नव्हतें तर तें पॅरिस येथून सेक्रेटरी बायर्नस यांनी पाठविलें होतें ! अर्थात् तें अधिकृत अल्टिमेटम ठरूंच शकत नाही; शिवाय खलित्यांत उल्लेखि-लेली ४८ तासांची मुदत कोठपासून सुरू होते याबाबत मुग्धताच स्वीका-रण्यांत आली आहे !!!

केसरी, ३०–८–४६

★

— ११ —

# ॲंग्लो–इजिप्शिअन वाटाघाटी कां मोडल्या ?

## इजिप्तवरील इंग्लिश वर्चस्व

चारपांच महिने चाललेल्या ॲंग्लोइजिप्शियन करारासंबंधीच्या वाटाघाटी अखेर गेल्या ता. २१ ऑगस्ट रोजी पूर्णपणें मोडल्याचें अधिकृतपणें जाहीर झालें. पहिल्या महायुद्धापासून स्वातंत्र्यप्राप्तीसाठी निकराचा झगडा इजिप्त खेळत असून १९३६ सालीं झालेल्या ॲंग्लो-इजिप्शिअन करारान्वयें इजिप्तला निम्मेशिम्मे स्वातंत्र्य मिळालें होतें. आता दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर उरलेंसुरलें तेंहि मिळवून पूर्ण स्वतंत्र राष्ट्र म्हणून जाहीर व्हावे अशी इजिप्तची धडपड सुरू आहे. परवा वाटाघाटी मोडल्या त्या १९३६ चा करार बदलून घेण्यासंबंधांतच. तेव्हा तो करार व ॲंग्लो-इजिप्शिअनांचे पूर्वापर संबंध थोडक्यांत समजून घेणें अवश्य आहे.

इजिप्तदेश मध्यपूर्वेंत समाविष्ट आहे. मध्यपूर्वेची भौगोलिक परिस्थिति लष्करी दृष्ट्या फार महत्त्वाची असल्यामुळे हा प्रदेश स्वतःच्या हातीं तरी राखावा किंवा निदानपक्षीं तो आपल्या शत्रूंच्या ताब्यांत तरी जाऊं देऊं नये ही करामत ज्यांना साधली त्यांनीच जागतिक युद्धें जिंकलीं असें इतिहास सांगतो. इजिप्तचें महत्त्व अलीकडच्या काळांत प्रथम नेपोलियनने ओळखलें. १७९८ मध्ये त्यावर त्याची स्वारी झाली. त्याचे प्रतिस्पर्धी म्हणून तेव्हापासूनच इंग्लंडचा इजिप्तशीं संबंध आला. व हळूहळू त्या प्रदेशांत त्याने आपलें वर्चस्व प्रस्थापित करण्यास सुरुवात केली. कालांतराने सुवेझ कालवा खोदण्याची कल्पना निघाली व त्यामुळे इजिप्तचें

महत्त्व शतपट वाढलें. या कालव्यामुळें इजिप्त म्हणजे हिंदुस्थान, पॅसिफिक आणि अतिपूर्व याचाहि हमरस्ता झाला. सुरुवातीस इंग्लंडने हा कालवा म्हणजे बॉस्फरस सामुद्रधुनीप्रमाणे नव्या कलहांनाच कारण होईल म्हणून शक्य तेवढा विरोध केला; पण त्याच्या विरोधाचें कांहीं चाललें नाही व सुवेझ कालवा प्रत्यक्ष सिद्धच झाला तेव्हा मात्र इंग्लंडने नाना मुत्सद्दी डाव टाकून अखेर त्या कालव्याच्या सुरक्षिततेची हमी घेण्याची जोखीम पत्करली म्हणजे तेथलें लष्करी स्वामित्व मिळविलें ! यानंतर १८८२ सालीं इंग्लंडने साऱ्या इजिप्तवरच आपला लष्करी अम्मल बसविला आणि तेव्हांपासूनच इजिप्तमधील स्वातंत्र्याच्या चळवळीची प्रतिष्ठापना झाली म्हटलें तरी चालेल.

## १९२२ चा स्वराज्याचा हप्ता

पहिल्या महायुद्ध काळांत इजिप्शिअन पुढारी झगलूलपाशा याने केलेली स्वातंत्र्याची चळवळ सुप्रसिद्धच आहे. १९१४ सालीं तुर्कस्थान जर्मनांच्या बाजूने युद्धांत पडल्याबरोबर इंग्लंडने इजिप्त 'ब्रिटिश प्रोटेक्टरेट' म्हणून जाहीर केलें. त्याने इजिप्शिअन लोकांत फार क्षोभ झाला; आणि युद्ध संपून १९१८ चा आर्मीस्टिस जाहीर झाल्यावर दोनच दिवसांत ते प्रोटेक्टरेट रद्द करण्याची निकराची मागणी इजिप्शिअनांनी केली. ती इंग्लंडने धुडकावून लावलीं. पण चळवळ फारच चेतल्यामुळें १९२२ च्या फेब्रुवारींत इंग्लंडने इजिप्तचें 'स्वातंत्र्य' मान्य केलें व तेथल्या सुलतानाला राजा ही पदवी स्वीकारू दिली. पण हा देखावाच ठरला ! कारण इंग्लंडने सत्तेचीं सर्व केंद्रें आपल्या हातीं तशींच राखून ठेवण्याची खबरदारी घेतली होती. १९२२ च्या घटनेनंतरच इजिप्तची राज्यघटना म्हणून आखण्यांत येऊन सनदशीर लोकशाही कारभार सुरू झाला. साहजिकच अनेक पक्ष उपपक्ष उत्पन्न झाले. पूर्वीं जो एकच वफद पक्ष प्रबळ होता त्याचीं शकलें होऊन निरनिराळे राजकीय पक्ष माजले व कांहीं काळपर्यंत त्यांच्यातच सत्तासंपादनासाठी कलह लागून राहिले. तथापि त्या सर्व पक्षांचें इंग्लंडचें वर्चस्व पूर्णतया काढून टाकून खरें निर्भेळ स्वातंत्र्य मिळविणें या ध्येयांत मात्र एकमतच होते.

यानंतर १९३६ साल उजाडलें. इटलीने ॲबिसिनियावर स्वारी करून

तो जिंकला. सूडान व अबिसिनिया एकमेकांना लागलेले असून अशा सरहद्दीची लांबी थोडीथोडकी नव्हे तर ८०० मैल आहे. खेरीज इजिप्तचे जीवन असलेल्या नाइल नदीचा उगम सूडानमध्ये असल्याने, इटली स्वारी करून सर्वच घशाखाली घालील अशी भीति निर्माण झाली. इंग्लंड व इजिप्त यावेळी समदुःखी असल्याने तें अरिष्ट टाळण्यासाठी म्हणून १९३६ चा सुप्रसिद्ध अँग्लो-इजिप्शिअन करार घडून आला. या करारानें उभयपक्षीं बरीच देवघेव झाली, म्हणजे इजिप्शियन लोकांच्या स्वातंत्र्याच्या हक्कांत आणखी प्रगति झाली व इंग्लंडलाहि इजिप्तमध्ये आणखी कांही दिवस आपलें बस्तान ठेवण्यास सवड राहिली. इंग्लंडने आपला हायकमिशनर परत घेतला व इजिप्तचें स्वातंत्र्य कबूल करून इतर राष्ट्रांचे वकील इजिप्तच्या दरबारी ठेवण्यास अनुमती दिली व स्वतःचाहि वकील त्या दरबारीं ठेवला. इंग्लंडमार्फत इजिप्तला लीग ऑफ नेशन्समध्यें सभासद म्हणून प्रवेश मिळाला. इजिप्तमधील परकीय लोकांच्याहि संरक्षणाची जबाबदारी इजिप्तने स्वीकारली.

## इंग्लंडने राखलेले हातचे

पण या कराराच्या १७ कलमांना ज्या अनेक पुरवण्या जोडण्यांत आल्या होत्या त्यांतूनच इंग्लंडनें पुढील गोष्टी साधल्या—( १ ) इंग्लंडने सुवेझ कालवा विभागांत आपलें ब्रिटिश सैन्य १०,००० व पायलट्स ४००, ठेवावे. ( २ ) सूडानचा ' कॉंडोमीनियम ' म्हणजे ब्रिटिश नियंत्रित दुतर्फी अंमल तसाच चालावा; ( ३ ) सूडानच्या संरक्षणांत इजिप्तने भाग घेतला पाहिजे व ( ४ ) इजिप्तच्या दरबारीं असलेल्या परराष्ट्रीय वकिलांतील ब्रिटिश वकिलाचा दर्जा इजिप्तने वरिष्ठ समजून चालवावा. म्हणजे या कराराने ब्रिटिशांचें लष्कर इजिप्तमध्ये राहिलेंच व सूडानचाहि निकाल झाला नाही. करारांत फक्त एकच सोडवणूक होती ती अशी की, उभयपक्षी संमतीने १० वर्षांनंतर हा करार दुरुस्त करून घेतां येईल.

यानंतर दुसऱ्या महायुद्धांत इजिप्तला पुनः मोठा धोका जर्मनांकडून आला. अलेक्झांड्रियापासून अवघ्या ४० मैलांवर रोमेल आला होता.

पण या वेळी इजिप्तने आपलें गांभीर्य बिलकूल ढळूं दिलें नाही व इंग्लंडला सर्वतोपरी मदत केली. इंग्लंडच्या बाजूने त्याने तावडतोब युद्धहि जाहीर केलें असतें; परंतु चर्चिल यांच्याच सांगण्यावरून त्याने त्या वेळीं तसें केलें नाही. इजिप्तनजीक अलअलामीनची लढाई इंग्रजांनी जिंकली; परंतु त्यांच्या 'डेझर्ट आर्मीसाठी' सर्व लाग-लागवड, साहित्य-सामान, रस्ते, रेल्वे यांची तरतूद इजिप्शिअनांनीच करून दिली होती. या वेळीं इजिप्तचा असा मनोभावे पाठिंबा नसता तर तें युद्ध जिंकणें केवळ अशक्य होतें. ३६ च्या करारास जागून या संकटकाळीं इजिप्तने इंग्लंड म्हणेल त्याप्रमाणें मार्शल लॉ सुद्धा, जारी केला, संपूर्ण वृत्तनियंत्रण केलें, आपल्या लोकांचे हाल करून घेतले व इंग्लंडचें सैन्य आपल्या देशांत सुखाने ठेवून घेतलें. पण आता महायुद्ध संपून वर्षहि होऊन गेलें तरी तें सैन्य काढून घेण्याचा इंग्लंडचा विचार दिसेनासा झाला. म्हणून पुनः ब्रि. विरोधी चळवळ तेथे जोराने चेतली व १९३६ चा करार दुरुस्त करून घेण्याची मागणी सुरू झाली.

## नव्या वाटाघाटी

या वर्षीच्या जानेवारींत ब्रिटनने आपण तहाचा फेरविचार करण्यास कबूल असल्याचें कळविलें व एप्रिलांत परराष्ट्रमंत्री बेव्हिन यांनी वाटाघाटींत मुखत्यार म्हणून काम करण्यासहि सुरवात केली. यावेळीं जहाल पक्षीयांनी इजिप्तचे प्रधान पंत सिदकी पाशा यांजवर, दंगे अत्याचार करून भयंकर दडपण आणलें, म्हणून त्यांनी ता. १९ एप्रिलपासून आजारी पडल्याचा बहाणा करून वाटाघाटी थांबवल्या. आधी ब्रिटिश सैन्य काढून घेतल्याखेरीज कसलेंच बोलणें सुरू होता कामा नये असाच लोकांचा आग्रह व त्यासाठी हे दंगे व निदर्शनें! फेब्रुवारी महिन्यांत कैरो, अलेक्झांड्रिया येथे दंगे व ब्रिटिशविरोधी निदर्शनें होऊन अनेक लोक ठार व जखमी झाले. पुनः मार्चच्या ४ तारखेस अलेक्झांड्रियांत विद्यार्थ्यांचा दंगा होऊन १४ ठार व २०० जखमी झाले. एप्रिलमध्ये सूडानमधील विद्यार्थ्यांनी ब्रिटिशांच्या बखारी जाळल्या. त्याच महिन्यांत ३० तारखेस अलेक्झांड्रिया येथील फरूक युनिव्हार्सिटीच्या विद्यार्थ्यांनी

दंगा केला. त्यांत २५ पोलीस जखमी व २ ठार झाले व ब्रिटिश लष्कराला विद्यालय कबजांत घ्यावें लागलें.

इजिप्शअन लोकमताचें हें उग्र स्वरूप पाहून तारीख ७ मे १९४६ रोजीं प्रधान पंत ॲटली यांनी पार्लमेंटांत जाहीर आश्वासन दिलें की, आम्ही आपलें सैन्य इजिप्तमधून निश्चित काढून घेणार आहों. खात्री बाळगा. पाठोपाठ बेव्हिन यांनीहि अगदीं निःसंदिग्धपणे पार्लमेंटांत असें स्वच्छ जाहीर केलें की 'दुसऱ्या राष्ट्रांत आपलें सैन्य ठेवून त्याची मैत्री आपणास मिळणें शक्य नाहीं; आपण भावभक्तीनेच तीं राष्ट्रें आपलीशीं केलीं पाहिजेत. हें शहाणपण इंग्लंड अनुभवाने आता शिकलें आहे.' इतक्या आश्वासनानेहि दंगे थांबत ना. कारण तो ब्रिटनचा शब्द, त्यांत ब्रिटनने बदमाशी केलीच आहे, असें इजिप्शिअन लोक म्हणूं लागले; कारण ब्रिटनने सैन्य सर्व केव्हा काढून घेऊं याची तारीख कोठे सांगितली? ६ मे रोजीं पुनः कैरोंत बॉम्बचे अत्याचार सुरू झाले. तेव्हा इंग्लंडला नक्की कांहीतरी मुदत सांगणें भाग झालें. आमचें सर्व सैन्य काढून घेण्यास ५-६ वर्षें तरी पाहिजेत. कारण आमच्या सैन्या-साठी छावण्या, लष्करी तळ वगैरे बांधण्यास इतका अवधी पाहिजेच असें ते म्हणूं लागले. तेव्हा त्या मुद्द्यावर पुनः वाटाघाटींत बांधा आला. या वेळीं ब्रिटनतर्फे लॉर्ड स्टॅनगेट बोलणीं करीत होते ते परत २ जून रोजीं वाटाघाटी मोडून इंग्लंडला निघून गेले. ७ व ८ जून रोजीं कैरो व अलेक्झांड्रिया येथे पुनः अत्याचारांना ऊत आला.

## अखेर कशावर मोडलें?

ब्रिटिशांची अडचण ही की, इजिप्तमधून सैन्य हलविलेंच पाहिजे हें खरें पण तें इजिप्त शेजारींच ठेवलें पाहिजे हेंहि तितकेंच आवश्यक. म्हणून त्यांनी मध्य-पूर्वेतील आपला मुख्य तळ इजिप्तच्या सरहद्दीबाहेर अवघ्या १० यार्डांवर पॅलेस्टाइन हद्दींत १० लाख पौण्ड खर्च करून बांधण्यास सुरुवात केली. हेतू हा की, निदान आता तरी इजिप्तचें समाधान व्हावें. दरम्यान इंग्लंडला प्रतिशह देण्यासाठी इंग्लंडचा हाड-वैरी ग्रँड मुफ्ती पॅरिसहून अचानक कैदेंतून पळून गेला. त्याला इजिप्तच्या

बादशहांनी राजरोसपणे आसरा दिला. तेव्हा पुनः स्टॅनगेट ता. ८ जुलै रोजीं अलेक्झांड्रिया येथे येऊन वाटाघाटी सुरू झाल्या. पण वांधे तुटण्याचें चिन्ह दिसेना. ‘ कम्युनिस्टांचा हात तुमच्या राजकारणांत शिरला आहे व त्यांचे अतिशय प्राबल्य सर्व इजिप्तभर झालें आहे ’ असें खुसपट इंग्लंडने काढलें. कम्युनिस्टांचें वर्चस्व होणें म्हणजे रशियन पक्षपाती होणें आणि आपण रशियन पक्षपाती ठरलों तर अँग्लो-अमेरिकनांचें वर्चस्व असलेल्या यूनोंत आपली दाद मग कोठली लागावयाला, असा तर्क करून इजिप्शयन प्रधानांनी कांही दिवसपर्यंत कम्युनिस्टांच्या झडत्यांचें सत्र सुरू ठेवून इंग्लंडचा गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न चालविला.

यानंतर इजिप्तचा इंग्लंडांतील वकील ब्रिटनकडून पुनः कांही अटी घेऊन आला. त्याबाबत इजिप्शियन मंत्रिमंडळांतच मतभेद झाले. सिदकी पाशासुद्धा चौघे मंत्री अटी स्वीकाराव्या या मताचे होते; पण इतरांनी राजीनामे देण्याची धमकी दिली. ता. १९ ऑगस्ट रोजीं इंग्लंडतर्फे लॉर्ड स्टॅनगेट व इजिप्तमधील ब्रिटिश वकील सर रोनाल्ड कॅंबेल यांनी सिदकी पाशा व लुफरीपाशा आणि सर्व इजिप्शयन लष्करी प्रमुख यांच्याशीं ९० मिनिटेंपर्यंत वाटाघाटी केल्या. पण कांहीच निष्पन्न झालें नाही.

मुख्य वादाचे प्रश्न २।३ होते. पहिला हा की, ब्रिटिश सैन्य किती मुदतींत काढून घ्यावयाचें ? इंग्लंड ५ वर्षे म्हणत होतें. इजिप्तने ३ वर्षे मुदत फार झाली म्हणून सांगितलें. पण या वेळी इंग्लंडने तीहि मान्य केली होती. दुसरा प्रश्न परकीय आक्रमणाविरुद्ध करावयाच्या संयुक्त योजनेबाबत. त्या वेळीं आक्रमण कशास म्हणावें यावरच मतभेद झाला. मध्यपूर्वेतील कोणत्याहि राष्ट्रावर आक्रमण झालें तर तें स्वतःवरच समजून इजिप्तने ब्रिटिश सैन्याला ससैन्य मदत द्यावी असें इंग्लंडचें म्हणणें पडलें तर इजिप्त म्हणूं लागलें की, आमच्या देशाच्या सरहद्दीला लागून असलेल्या शेजारी राष्ट्रांवर परचक्र आलें तरच इंग्लंडबरोबर संयुक्तपणें आम्ही लढण्यास उठूं. तिसरा प्रश्न सूडानबाबतचा; सूडान हा इजिप्तचाच भाग आहे तो इंग्लंडने इजिप्तच्या हवाली करावा असें इजिप्शिअनांचें मागणें; पण हें मागणे ब्रिटनने नाकारलें.

अशा रीतीने चार महिनेपर्यंत चाललेल्या वाटाघाटी फिसकटल्या आहेत. तथापि दोघांनाहि आपापल्यापरी तहाचा फेरविचार करणें भागच आहे. इजिप्तला जर आज नवा तडजोडीचा तह करून घेतां आला नाही, तर १९३६ चा तह कायमच राहतो, व त्याअन्वयें सुवेझ कालव्याजवळ १९५६ पर्यंत ब्रिटिशांना आपलें सैन्य ठेवण्याचा हक्क राहतो !

केसरी, ६–९–४६

★

— १२ —

# लंडनची पॅलेस्टाईन परिषद व ज्यू-अरब बहिष्कार

## ज्यू काय करीत आहेत ?

गेल्या महिन्यांत इराण-दार्दानेलिस व ट्रिअेस्ट या दुसऱ्या महत्त्वाच्या प्रश्नांना एकाएकी तोंड लागल्यामुळें पॅलेस्टाइनचा. प्रश्न पाणी पडलेल्या रांगोळीप्रमाणे कांही काळ निष्प्रभ झाला होता. परंतु १० सप्टेंबर रोजी ब्रिटनने लंडन येथे पॅलेस्टाइन परिषद भरविण्याचें नक्की केल्यामुळे त्या प्रश्नाला पुनः तजेला प्राप्त झाला.

पॅलेस्टाइन प्रकरणी अरब, ज्यू, ब्रिटन, आणि अमेरिका असा चौरंगी लढा आहे. हे चारहि पक्ष आपापल्या परी काय करीत आहेत तें अलग अलग पहाणें सोईचें होईल. प्रथम ज्यू. त्यांच्या दहशतवादी भूमिगत क्रांतिकारक संघटनेचें अत्याचाराचें कार्य अविरत सुरू आहे. ब्रिटिशांचे चौक्या पहारे ओलांडून आणि ब्रिटिश आरमाराची नाकेबंदी चुकवून पॅलेस्टाइनमध्ये चोरीछपीने युरोपांतून ज्यू आणून भरणें आणि पॅलेस्टाइन-मध्ये व इतरत्र अत्याचारांनी ब्रिटिशांना सळो की पळो करून सोडणें हीं त्यांचीं तूर्तचीं दोन प्राप्त कर्तव्यें. तीं नेटाने पार पाडण्याची शिकस्त ते करीत आहेत.

पॅलेस्टाइनमध्ये आयात होणाऱ्या ज्यूंची मुख्य उतारपेठ इटली देश झाला असून, तेथे निरनिराळ्या चाळीस राष्ट्रांतले ज्यू आलेले आहेत. दरमहा आल्प्स पर्वताच्या अवघड घाटाखिंडींतून १००० पर्यंत ज्यूंची

आयात इटालींत होत असते म्हणतात. ज्यूंचे युरोपांतून येणारे चारपांच मार्ग आता माहीत झाले आहेत. कांही क्रॅकोकडून कारपेथिअन्स ते ब्राटिस्लाव्हा, व्हिएन्ना, म्यूनिक, बेन्नरखिंड या मार्गाने इटलींत जिनोआ किंवा नेपल्स बंदरांत येऊन पोहोचतात. या मार्गाने येणाऱ्या ज्यूंची पाठवणी व परामर्श पोलीश ज्यूंची ' Thou Shalt go ' नामक जहाल संघटना आहे ती करते. कांही ज्यू पोलंडांतून पश्चिम जर्मनींत जातात व तेथे हद्दपार किंवा Expelled जर्मनांत ते मिसळतात आणि मग तेथून पॅरिस मार्सेलिसला पोहोचतात. या खेरीज पश्चिम रशियांतूनही ज्यूआयात होत असते. बुकोव्हीना ते बुखारेस्ट आणि तेथून कॉन्स्टंझा बंदर ते गांठतात.

सध्या पॅलेस्टाइनमध्ये जाण्यासाठी म्हणून पंधरा हजारांवर ज्यू इटलींत जमलेले आहेत. यांपैकी राजरोस ब्रिटिश पास मिळवून २३०० लोक पॅलेस्टाईनमध्ये उजळ माथ्याने शिरले. परंतु बाकी राहिलेल्यापैकीं अनेक जण चोरीछपीने रात्रीं मिळेल त्या पडावांत, मचव्यांत, मच्छिमाऱ्या होड्यांत बसूनहि पॅलेस्टाईनकडे पसार होतात. खेरीज ज्यू संघटना स्वतंत्र गलबतें भरूनहि पाठवितात. गेल्या महिन्यांत १९ ऑगस्ट रोजीं असेच ' सॅन किसेरो ' नामक गलबतांतून ८१५ ज्यू बेकायदा हायफाला पोचले. पुनः दुसऱ्या दिवशींहि सर्व कोंडया फोडून २०० ज्यू तेलव्हिव्हला पोचल्याचें वृत्त होतें व अगदी परवांच ३ सप्टेंबर रोजी " फोर फ्रीडम् " नामक गलबतांतून पुनः १२०० ज्यू हायफाला उतरविण्याचा धाडसी प्रयत्न करण्यांत आला.

खुद्द पॅलेस्टाइनमध्ये दहशतवादी चळवळ पराकोटीला पोहोचली आहे. किंग्ज डेव्हिड हॉटेल बॉंबने उडवून देऊन शंभरावर ब्रिटिश अधिकाऱ्यांचे बळी एका सत्यांत घेण्याचा पराक्रम ज्यूंनीं करून दाखविल्यामुळे आता त्यांच्या टेलिफोनवरील खोट्या दहशतींनीहि ब्रिटिशांच्या लष्कर-संरक्षित कचेऱ्या हुली उठून वारंवार ओस होण्याचा चमत्कार घडत आहे. ऑगस्ट १६ रोजीं जनरल पोस्ट ऑफिस व बार्कले बँकेंत हा प्रकार घडला. अमेरिकेंतील ज्यूंनीहि पॅलेस्टाइनमधील आपल्या बांधवांचा कित्ता लगेच गिरवला व १९ रोजीं वॉशिंग्टन येथील ब्रिटिश वकिलातीला फोन करून ' तुमची वकिलातच १० मिनिटांत उडवून देतों. सावध रहा ! ' असा

दम भरला. फार काय पॅरिस येथे ब्रिटिश परराष्ट्रमंत्री बेव्हिन गेले; त्यांचा खून करण्यासाठी ज्यू रवाना झाले व त्या दहशतीमुळेच ३ आठवडे पॅरिस परिषदेंत प्रकट होण्याचें धैर्य बेव्हिन यांना झालें नाहीं, अशी शेखी ज्यू क्रांतिकारकांनी मिरविली आहे.

## ब्रिटनची दडपशाही

उलटपक्षी ज्यूंना वाटेल त्या निष्ठुर उपायांनी वठणीला आणण्याचें कार्य ब्रिटिश आरमारावर व लष्करावर पडलें असून ते तें तितक्याच तत्परतेने बजावीत आहेत. गलबतांतून येणाऱ्या ज्यूंना पकडून सायप्रस बेटांतील बंदीशाळांत नेऊन घालण्याचें काम आरमार करीत असून ब्रिटिश लष्कराने पॅलेस्टाईनमधील ज्यू दहशतवादाची पाळेमुळे खणण्याचा सपाटा चालविला आहे. तेथे सर्वत्र लष्करी कायदा जारी असल्यासारखा असून ६ ज्यूंमागे १ ब्रिटिश सैनिक इतकें ब्रिटिश लष्कर तेथे जमलें आहे. पण ज्यू क्रांतिकारकांची ईर कमी होण्याचें चिन्ह नाही. पूर्वी हायफा रेल्वे लाईन उडवून दिल्याच्या आरोपावरून १८ ज्यूंना फांशी आणि चार ज्यू तरुणींना जन्मठेपीची सजा ठोठावण्यांत आली. त्याबरोबर या लोकांना कसें फांशी देतां तें पाहूंच असें उघड आव्हान क्रांतिकारकांनी दिलें व स्टर्नगॅंगच्या मासिक पत्रकांत ' यांपैकी एकाहि ज्यूच्या प्राणाला धक्का पोह्चला तर पॅलेस्टाइनमधील एकूण एक ब्रिटिश टिपून मारण्यांत येईल ' अशी धमकी देण्यांत आली. तेलाव्हीव्ह हा सारा ज्यू वस्तीचा गांव. त्याला ब्रिटिश सैन्याचा संपूर्ण वेढाच बसला आहे. ज्यूंच्या ' हंगामी ' संघटनेचा पुढारी ' मोरो स्नेह ' हा दुर्योधनाप्रमाणे त्या गांवांत दडी मारून बसला आहे अशा संशयावरून तें गांव ऑगस्टच्या सुरवातीस चार दिवसपर्यंत नुसते घुसळून काढण्यांत आलें ! सायप्रसहून ज्यूंना पोचवून आलेलें ' एम्पायर रायव्हल ' हें ब्रिटिश गलबत हायफा बंदरांत नांगरलें होतें तें स्वतःचा जीव धोक्यांत घालून तिघा ज्यूंनी रात्रीं पोहत जाऊन ' लिम्पेट ' पाणसुरुंगांनी उडविण्याचा धाडसी प्रयत्न केला. ते तिघे तरुण हायफानजीक ' सिदयाम ' गांवांत लपल्याच्या आरोपावरून त्या गांवचा चिंधीचोळा करण्यांत आला. फार काय, अशाच कांहीं

संशयावरून छत्री सैनिकांनी विमानांतून डेझर्टमधील खेडींहि छापे घालून झांवडलीं. पण आरोपी हातीं लागले नाहीत.

पॅलेस्टाईनचा प्रश्न ब्रिटिशांच्या फार मोठ्या राजकीय स्वार्थाचा तर आहेच, शिवाय तो आता इभ्रतीचाही होऊन बसल्यामुळे साऱ्या जगाच्या शिव्या खाऊनहि ते लष्करी दडपशाही करीतच आहेत. परंतु दडपशाहीने भाग तुटणार नाही हेंहि ते पक्के जाणतात आणि म्हणूनच ज्यू व अरब या दोघांत कांहीं तरी तडजोड करण्याची त्यांची खटपटहि सुरूच आहे. यासाठी मागेच अँग्लो-अमेरिकन तज्ज्ञ मंडळाकडून एक योजनाहि तयार करण्यांत आली होती. त्या वेळी अमेरिकाच त्या योजनेंत सहभागी असल्यामुळे ज्यू व अरबांना तिचा विचार करावाच लागेल, अशी ब्रिटिशांची अपेक्षा. परंतु त्या दोघांनीहि ती धिःक्कारली. पण खुद्द अमेरिकेनेंहि ती नाकारली यामुळें ब्रिटिशांच्या डोक्यांत दगडच पडला ! पण त्यांनी चिकाटी सोडली नाही. ती योजना 'बेसिस' म्हणजे प्राथमिक बोलणीं करण्यासाठी स्वीकारण्यास तरी हरकत नसावी अशी अमेरिकेला गळ घालून तिची कबुली त्यांनी आता मिळविली आहे.

## ब्रिटिशांची योजना

ब्रिटिश योजना सामान्यतः अशी होतीः—( १ ) पॅलेस्टाईनची फाळणी करावी परंतु ज्यूंना बराच मोठा मुलूख तोडून द्यावा. ( २ ) त्या भागांत ज्यूंनी वाटेल तेवढे आपले भाईबंद आणून भरावे. ( ३ ) ज्यूंकडे गॅलिली, नेजेब, मध्य-जॉर्डन व्हॅली आणि शेजारची जोडलेली डोंगरकडडी जावी व जाफा बंदरासकट समारिया प्रांत अरबांस द्यावा. ( ४ ) ही फाळणी झाली तरी मध्यवर्ती सत्ता ब्रिटिशांचीच राहावी व त्यांनी पॅलेस्टाईचें संरक्षण, परराष्ट्रीय राजकारण, कस्टम, एक्साइज, पोलिस, तुरुंग, न्याय, टपाल वगैरे कामें मुखत्यारीने पाहावीं. कालांतरानें यांपैकीं कांही कामें ज्यू व अरब प्रांतिक सरकाराना देण्यांत यावींत.

या योजनेवर चर्चा करण्यासाठी नऊ सप्टेंबर तारखेस लंडनला परिषद भरावयाचें ठरलें. पण अरब व ज्यू दोघांनीहि ती आपापल्यापरी धिक्कारली. तरी चिकट ब्रिटिश त्यांना पुनः समाजवीतच राहिले की

'आमची योजना राहिली, तुमची योजना सांगा पण ती त्या बैठकींत सांगा ! परिषदेत अमुकच प्रश्नांची चर्चा करण्याचें बंधन आम्ही घालीत नाही. ज्यूंना व अरबांना एका बैठकीवर बसावयाचें नाही तर त्यालाही आमची हरकत नाही ! आम्ही सकाळीं अरब व दुपारीं ज्यू प्रतिनिधींशीं बोलूं; तर मग झालें ? ' ज्यू प्रतिनिधींनी यावें म्हणून ब्रिटिशांनी अखेर १२ ज्यूंची फांशीहि रद्द केली आहे !!

अरबांनी तर ब्रिटिशांना उलट कोलदाण्डा घातला आहे की, आमचा ग्रँड मुफ्ती हाच पॅलेस्टाइन अरब हायर कमिटीचा प्रतिनिधी म्हणून चर्चेस आम्ही पाठवूं ! पण हा मुफ्ती ब्रिटिशांचा हरामखोर म्हणजे गुन्हेगार असल्यामुळे त्यांनी त्याला लगेच नकारच दिला आहे. हा ग्रँड मुफ्ती म्हणजे हाजी अमीन एल हुसेनी, पॅटेस्टाइन अरबांचा धर्मगुरु. १९२१ मध्यें ब्रिटिशांनीच त्याची प्रथम मुफ्ती म्हणून स्थापना केली पण तो कमालीचा ज्यू-द्वेष्टा निघाला. १९३७ सालीं त्याला एका खुनांत गोवल्यामुळे तो पॅलेस्टाइनमधून अदृश्य झाला. पुढें महायुद्ध सुरू झाल्यानर त्याने हिटलर व मुसोलिनीशीं संधान बांधलें व ज्यूंचा निःपात करण्याच्या हिटलरी योजनेचा पुरस्कार केला. इराकांतील बंड यानेच उठविलें. महायुद्ध संपल्यावर तो चोरून स्वित्सर्लंडांत राहिला व मग पॅरिसमध्ये राहिला व अलीकडे पॅलेस्टाईन प्रकरण पेटतांच नेमका ईजिप्तमध्ये प्रकट झाला.

## अमेरिकेचे दुराग्रह

अलीकडे प्रसिद्ध झालेल्या ताज्यांतल्या ताज्या वृत्तप्रमाणें अरब हायर कमिटीचा कोणीहि प्रतिनिधि लंडन–परिषदेला आला नाही. त्याचप्रमाणे कोणीहि पॅलेस्टाईनमधील ज्यू प्रतिनिधीहि हजर झाला नाही; किंबहुना पॅलेस्टाईन ज्यूंनी तोच मुहूर्त धरून पुनः बॉंब टाकून, पूल उडवून देऊन आपला राग जाहीर केला आहे. तथापि इंग्लंडने इतर अरब राष्ट्रप्रातिनिधींना व ज्यूइश एजन्सीखेरीज इतर १६ ज्यू संस्थांना निमंत्रणें पाठवून आपली परिषद साजरी केली आहे. खुद्द पॅलेस्टाइनमधील जहाल ज्यू गट सोडले तर त्या मानाने इतर मवाळ किंवा समजूतदार अरब व ज्यू

गट आहेतच. त्यांची तरी मोट बांधावी व त्यांचे मत अजमावावें असा इंग्लंडचा प्रयत्न आहे हें ॲटली यांच्या परिषदेच्या उद्घाटनाच्या भाषणावरून स्पष्ट झालें आहे. तो कितपत कसा सफळ होतो हें लवकरच कळेल.

ज्यू वादांतील चौथा पक्ष अमेरिकेचा. अमेरिकेला जरी इंग्लंडने सुरू केलेल्या लंडन परिषदेंत कांहीं स्वारस्य वाटत नसल्याचें ट्रुमन यांनी जाहीरच केलें असलें, तरी ते तिला विक्षेप आणूं इच्छित नाहीत; फक्त आम्ही आमचे त्रयस्थ निरीक्षक म्हणून अमेरिकन प्रतिनिधि त्या परिषदेस पाठवूं इच्छित नाही असें त्यांनी जाहीर केलें आहे. उलटपक्षी पॅलेस्टाइनमध्ये मात्र ट्रुमन आपला खास प्रतिनिधि प्रत्यक्ष परिस्थिति पहाण्यास पाठवणार आहेत. "पॅलेस्टाइनमध्ये एक लाख ज्यू नेऊन भरण्याचा माझा संकल्प अद्यापि कायम आहे." असें त्यांनी ता. ५ रोजीं जाहीरहि केलें आहे. मात्र त्याचबरोबर अमेरिकेंतहि कॉंग्रेसकडून एक बिल पास करून घेऊन, बरेचसे ज्यू युरोपांतील इतर निराश्रितांबरोबर अमेरिकेंत रहिवाशी म्हणून न्यावें अशीहि त्यांनी एक युक्ति काढली आहे. असें करण्यांत तुम्हांला ज्यूंचा इतका प्रेमा आहे तर आपल्या अमेरिकेंत कां त्यांना नेऊन कोंबीत नाहीं? या इंग्लंडच्याहि आक्षेपाला उत्तर दिल्यासारखें होतेंच.

केसरी, १३-९-४६

## — १३ —

# रूसो-अमेरिकनांची आरमारी स्पर्धा

### रशियन तयारीच्या नव्या बातम्या

ॲंग्लो अमेरिकन्स व रशिया यांचा सर्व आघाड्यांवर तीव्र बेबनाव सुरू झाल्यामुळे उभयपक्षी युद्धाची सज्जता राखण्याची तत्परता होत आहे हें वृत्तपत्रांतील वार्तांवरून स्पष्ट दिसतें. युद्ध लगेच उद्या सुरू होईल असा अर्थ नाही, पण युद्धाची सज्जता हाच युद्ध टाळण्याचा किंवा तें लांबणीवर टाकण्याचा एक प्रमुख उपाय होय असे सेनापती व मुत्सद्दी यांचें सूत्रच असतें.

गेल्या ८-१९ दिवसांत एकदम रशियाच्या आरमारासंबंधीच बातम्या प्रसिद्ध होऊं लागल्या. चोवीस ऑगस्टची एक वार्ता अशी होती की, आर्चेन्जल व व्हॅडिव्होस्टॉक येथील अमेरिकन आरमारी प्रतिनिधींना अमेरिकन सरकारने काढून न्यावे अशी मागणी रशियाने केली व त्याप्रमाणे अमेरिकेने आपले प्रतिनिधि काढूनहि घेतले! २७ ऑगस्ट रोजीं दुसरें असे वृत्त आलें की, पॉट्सडॅम करार मोडून रशियाने आपल्या ताब्यांतील जर्मन विभागांत युद्धसाहित्याचें उत्पादन निकडीने सुरू केले आहे व त्यांत एअरोनॉटिकल उपकरणें, यूबोटीचे विभाग इत्यादींचा समावेश आहे. जेन्ना येथे कार्लझेस कारखान्यांत नऊ हजार ( ९००० ) तज्ज्ञ जर्मन कामगारांकडून हीं कामें होत आहेत. पोलाद व इतर साहित्य यू बोटी विभागासाठी लागते तें रशियांतून तेथे आणून पोहोचविण्यांत येत आहे. मॅगडेबर्ग येथील ' वोल्क्स् वर्क्स ', ड्रेसडेन येथील

' व्रकूनिअर ' कारखाना व बर्लिनमधील ' अस्कानिया ' वर्क्स या तीन ठिकाणीं सत्तर ते दीडशें यू बोटींचे भाग बनविण्यांत येत आहेत. हीं सर्व कामें जर्मन तज्ज्ञ लोकाकरवीच करून घेण्यांत येत आहेत ही त्यांतील विशेष गोष्ट. जर्मनीच्या उत्तर किनाऱ्यास डेन्मार्क-समोर वार्नेमुंडे बंदर आहे. तेथे नवी संरक्षक लष्करी तटबंदी तयार करण्यांत आली असून त्यावर ८८ मिलिमीटरी जर्मन तोफांच्या बातेऱ्या उभारल्या आहेत. जर्मनांचे यू बोटीवरील व बंदरी आरमारांतील हजारो खलाशी व अधिकारी रशियाने पूर्वी पकडले त्यांनाच रशियाने आता आपल्या कामास लावले आहे. फार काय दोघां माजी जर्मन आरमारी लेफ्टेनण्टस्‌ना त्यांच्या जुन्या हुद्यावर व पगारावर रशियन आरमारांत घेण्यांत आले असून त्या करवी आपल्या आरमारांत जर्मन खलाशी व आरमारांतील यांत्रिक तज्ज्ञ लोक यांची भरती केली जात आहे.

याखेरीज आणखीहि एका प्रकाराने रशियाने आपलें आरमार वाढविण्याचा उद्योग सुरू केला आहे. तो म्हणजे बुडालेली किंवा बुडविलेली लढाऊ जर्मन गलबतें पुनः उपसून वर काढणें व दुरुस्त करणें हा होय. त्याप्रमाणें ' बार्थे ', ' आफ्रिकाना ', ' शेल्सविग ', ' हॉल्टेन ', ' नेसेन्यू ' इत्यादि वर आलीं आहेत. ' नेसेन्यू ' हें जर्मन लढवाई गलबत ४१७०० टनांचे व १४६१ खलाशांचें होतें. ' हॉल्टेन ' लढवाई गलबत पोलिश सरकार मागत होतें; पण तें रशियाने त्याला देण्याचें नाकारलें आहे.

## रशियन मुत्सद्द्यांची हाकाटी

याच्याच जोडीस ' अमेरिका ऐकत नाही, तिच्या पोटांत पाप आहे, तेव्हा आम्हांलाहि नाविक सज्जता राखणें प्राप्तच आहे ' असा मतलबी प्रचारहि जोराने सुरू केला आहे. परवा तेराच तारखेस रशियन रिअर ॲडमिरल श्वेड याने प्रवदा पत्रांत आपल्या सहीवर लेख लिहून " अमेरिकेचें आरमारी सामर्थ्य सर्वांत मोठें असल्यामुळें तिच्या विजिगीषु मुत्सद्द्यांना नवीन नवीन मुलूख दाबण्याची खाखा सुटली आहे व ते आक्रमक धोरणाचा पुरस्कार करीत आहेत; पण या योगे ' वळी तो

कान पिळी ' या दुष्ट धोरणाचाच अमेरिकेकडून अंगीकार होत आहे. अमेरिकन आरमाराची तयारी व हालचाली या जिंकलेल्या मुलखाच्या संरक्षणाच्या द्योतक नसून, उघड उघड आक्रमणासाठीच आहेत " अशी ओरड केली आहे; व याच वेळीं इझ्वेस्ता इत्यादि रशियन पत्रांनीहि जपानांतील मॅकऑर्थरच्या कारवाया या रूसो-जपानमध्ये म्हणजे रूसो-अमेरिकेमध्ये स्नेहाचा सेतु उभारण्यासाठी नसून जपानांतून रशियावर उडी टाकण्यासाठीच चालू आहेत असें म्हटलें आहे. अर्थात् याच वेळीं रशियाचें आरमारी बळ खरोखरी आहे तरी किती, याची माहिती करून घेणें उपयुक्त होय.

## आरमारांची तुलना

रशिया हा लष्करी व हवाईदलांत अँग्लोअमेरिकनांच्या बरोबरीचा होता व आहेच; परंतु त्याचे आरमारी बळ बरेच कमी पडते व रशिया-सहि त्याची जाणीव आहे. व या पुढील युद्ध अँग्लो-अमेरिकनांशींच व्हावयाचें हें ठरून गेल्यामुळे व तीं राष्ट्रें सर्वस्वी दर्यावर्दी व आरमारांत वरचढ असल्यामुळे त्यांच्याशीं टक्कर घेण्यापूर्वी रशियाला आपलें आर-मारी सामर्थ्य त्या दोघांच्या तोडीचे तरी बनविणें भागच आहे. आज जगांतील सगळया मोठ्या मानकऱ्यांत रशियाचा मान अमेरिकेबरोबरीचा झालेला असला तरी तो आरमारांत उणा आहे. सध्या आरमारी बळांत रशियाचा तिसरा नंबर लागतो. पहिली अमेरिका; तिच्याजवळ ७५६ लढवाई गलबतें आहेत. दुसरे ब्रिटन; त्याच्याजवळ ४९१ लढवाई गल-बतें आहेत. व नंतर रशिया, ह्याच्यापाशीं २०४ च गलबतांची भरती आहे. आता जर्मन व इटालियन आरमारांतील अनेक गलबतें रशियाला त्याच्या वाट्याची म्हणून मिळतील त्यामुळे त्याच्या आरमारांतील गलबतांची संख्या वाढेल हें खरें; परंतु त्याच प्रमाणांत त्याच मार्गानें अमेरिकन व ब्रिटिश आरमारांतहि भर पडणारच. तेव्हा अन्य अनेक मार्गांनीच रशियाला आपलें आरमार वाढविण्याचा व्याप घालणें भाग आहे.

१९२८ पासून रशियाने खास आरमारवृद्धीचे असे पंचवार्षिक

कार्यक्रम आंखले. पहिल्या पांच वर्षांत वाहतुकीची, भारदारी व व्यापारी गलबतें बांधण्याकडे विशेष लक्ष देण्यांत आलें. दुसऱ्या पांच वर्षांत पाणबुड्या बांधणें व जुन्या झारशाहींतील लढवाई गलबतें सुधारून अद्ययावत् करणें हा कार्यक्रम होता. या दुसऱ्या कार्यक्रमाची मुदत भरण्याच्या आंतच रशियाचें आरमार त्याच्या लष्करी तयारीच्या बरोबरीने आलें. शेवटच्या तिसऱ्या पंचवार्षिक उपक्रमांत रशियाने फारच प्रचंड प्रमाणावर आरमार–निर्मिति सुरू केली. त्यांत नव्या पाणबुड्या बांधणें व अद्ययावत् नवीं जंगीं, लढवाई गलबतें तयार करणें, बंदरें, धक्के सुधारणें आणि नवे बांधणें इत्यादि बहुविध प्रकार होते.

## संरक्षक धोरणाचें आक्रमक धोरणांत पर्यवसान

पहिल्या हप्त्यापर्यंत रशियाचें धोरण स्वसंरक्षणापुरते आरमार तयार करण्याचें होते तें हळुहळू बदलत चाललें व १९३६ च्या सुमारास ते बदलून त्याचें विजिगीषु आक्रमकपणांत रूपांतर झालें व त्याचें प्रत्यंतर हें कीं १९३६ ते ३८ च्या दरम्यान आरमारखात्यालाहि इतर खात्यांप्रमाणें प्रचंड ' पर्जेस ' देण्यांत येऊन शेकडो जुने आरमारी अधिकारी भडाभड बडतर्फ करण्यांत आले, व नव्या धोरणाला पाठिंबा देणारे विश्वासू लोक तेथे भरण्यांत आले. इतर राष्ट्रें आपलीं आरमारें वाटेल तशीं वाढवीत आहेत अशी ओरड सुरू करून रशियाने आपला उद्योग जाहीरपणें सुरू केला. १५ जानेवारी १९३८ रोजीं यू. एस्. एस्. आर्.च्या सुप्रीम कौन्सिलांत कॉमिसार मोलोटाव्ह यांनीं असें जाहीरपणें सांगितलें कीं, "रशियासारख्या बलिष्ठ राष्ट्राला त्याच्या दर्जाची 'सामुद्री' व ' महासागरी' आरमारें अवश्य असलींच पाहिजेत. हीं आरमारें रशियाचे हितसंबंध रक्षण करण्याकरिता व त्याच्या महान् ध्येयप्राप्तीसाठी जरूर आहेत" यांतील 'महान ध्येय' म्हणजे पराक्रमण आणि विजिगीषा हें सांगणें नकोच; व पुढे ६ च महिन्यांनीं लेनिनग्राड गोद्यांतील मजुरांपुढे भाषण करतांना कालिनीन यांनी तसें स्वच्छ सांगूनहि टाकलें. ते म्हणाले, " कोणत्याहि भांडवलशाही प्रबळ राष्ट्रांपेक्षां म्हणजे इंग्लंड, अमेरिका, जपान, फ्रान्स व जर्मनी यापेक्षां आपले नाविकबल वाढविण्याचा रशियाचा कृतनिश्चय झाला आहे."

## नवीन जहाजनिर्मिती

१९३८ पासूनच्या तिसऱ्या पंचवार्षिक मुदतींत रशियन आरमारांत अनेक सुधारणा तज्ज्ञांकडून करवून घेण्यांत आल्या व अत्यंत गुप्तपणाने लढाऊ जहाजें बांधण्याचा क्रम सुरू झाला. त्यासंबंधाची माहिती अगदी गुप्त म्हणून ठेवण्यांत आलेली असली तरीहि ३९ सालीं असें बाहेर प्रसिद्ध झालें होतें की, जर्मनी व जपान या दोघांमिळून जितक्या पाणबुड्या आहेत त्यांपेक्षा अधिक रशियाने निर्माण केल्या आहेत. गुप्तपणें लढाऊ गलबतें बांधण्याचा सपाटा १९४१ च्या जूनपर्यंत म्हणजे जर्मनीची रशियावर स्वारी होईतों जोराने सुरू राहिला. याच अवधींत अमेरिकेंतील कार्प कॉर्पोरेशनकडूनहि जंगी लढवाई गलबतें बांधून घेण्याचा एक करार रशियाने केला होता; परंतु तो सफळ झाला नाही. १९४१ सालापर्यंत रशियन आरमारांत पुढीलप्रमाणें भरती झाल्याचें तज्ज्ञांनी सांगितलें होतें. पांच लक्ष टनांची हलकीं लढवाई गलबतें. भारी लढवाई गलबतांत एक बारा हजार टनी विमानवाहू समाविष्ट होतें. झारशाहींतील तीन प्रत्येकीं तेवीस हजार टनांची लढवाई गलबतें सुधारून अद्ययावत् केलेली. नव्या दोन जंगी लढवाई गलबतांची बांधणी सुरू होती. खेरीज सात ते दहा हजार टनी नऊ क्रूझरें, ८८०० टनी 'कीरॉव्ह' वर्गापैकीं सहा क्रूझरें, ५० विनाशिका, २०० वर मोठ्या पाणबुड्या, २०० टनी वजनाच्या 'माल्टका' जातीच्या सत्तर छोट्या पाणबुड्या, ५० सुरुंगकाढी गलबतें, १३० मोटार टारपिडो बोटी व अनेक आईस ब्रेकर्स म्हणजे हिमच्छेदक गलबतें.

## गेल्या युद्धांतील कामगिरी

रशियाच्या या सुधारून वाढविलेल्या व अद्ययावत् केलेल्या आरमाराने गेल्या दुसऱ्या महायुद्धांत आपली कामगिरी चोख बजाविली यांत शंका नाही. तें आरमार आक्रमण करण्याइतकें मोठें झालेलें नव्हतें, तरी संरक्षण करण्याइतकें तें निःसंशय बालिष्ठ होतें. बाल्टिक समुद्रांत, काळ्या समुद्रांत व अतिपूर्वेस अशी त्याची सामान्यतः वाटणी केलेली होती. बाल्टिक समुद्रांत दोन जंगी लढवाई गलबतें व अनेक क्रूझरें होतीं.

काळ्या समुद्रांत एक लढवाई जंगी जहाज व अनेक लहानमोठीं क्रूझरें होतीं. अतिपूर्वेस बहुधा साऱ्या पाणबुड्याच होत्या व त्या सत्तर तरी असाव्यात. रशियाच्या उत्तर आरमाराने 'व्हाईट सी' आणि 'बॅरेंट्स सी' मध्ये गस्त घालून ब्रिटन व अमेरिकेकडून येणाऱ्या मदतीचे मार्ग निर्वेध राखण्याची कामगिरी केली. त्या आरमाराने जर्मनांची पांच लक्ष टनांचीं गलबतें बुडविलीं. बाल्टिक आरमाराने लेनिनग्राडचें संरक्षण करून फिन्लंडांतील हंगो प्रदेशावर शह दिला व बाल्टिक किनाऱ्याकडे रशियन चढाई सुरू झाली, तेव्हा बर्लिन व पूर्व प्रशियाच्या वाऱ्यांवर फार मदत केली. काळ्या समुद्रांतील आरमाराने ओडेसा, सेबॅस्टेपोल आणि कॉकेशसकडील समुद्रभाग यांत नांवाजण्यासारखी कामगिरी करून रशियन सैन्याच्या पिछाडीस गलबतांतून उतरण्यास शत्रूला एकदाहि सवड दिली नाही. महायुद्धाच्या पहिल्या तीन वर्षांतच रशियन आरमाराने शत्रूचें एक ऑक्झिलिअरी क्रूझर, दोन चिलखती गलबतें, २७ विनाशिका, ५० पाणबुड्या व इतर अनेक लहानसहान गलबतें बुडविलीं होतीं व त्याच्या विमानखात्याने शत्रूचीं ६००० विमानेंहि गारद केली.

## पुढील धोरण

असा पराक्रम रशियन आरमाराने केला व त्याबद्दल २२ जुलै १९४५ रोजीं रशियन आरमारी दिनाच्या दिवशीं स्टालिनने आपल्या आरमाराचा हा पराक्रम रशियाच्या नाविक इतिहासांत सुवर्णाक्षरांनी नोंदला जाईल अशी शाबासकी दिली ती यथार्थच होती. तथापि रशियाच्या आरमाराचेंहि अतोनात नुकसान झालेंच असलें पाहिजे. त्याचे अधिकृत आंकडे दोस्तांनाहि मिळूं शकले नाहीत; पण पूर्वोक्त आरमारदिनाच्या वेळीं स्टालिनने नव्या आरमार बांधणीचा कार्यक्रम जाहीर केला, त्यावरून तें सूचित होतेंच. या नव्या कार्यक्रमांत नव्या बनावटीची लढवाई गलबतें बांधणें, नवे नाविक तळ स्थापणें, खलाशांच्या व अधिकाऱ्यांच्या शिक्षणांत सुधारणा करून ते जर्मनाबरोबरीने करणें इत्यादिकांचा समावेश आहे. आरमारी, दर्यावर्दी, खलाशी लोक ही चीज पैदा करणे सोपें नाही. लष्करी शिपायापेक्षां आरमारी खलाशी किंवा शिपाई तयार करणें

शंभरपट कठिण जातें. अगदी प्रथम पीटर धी ग्रेटने रशियन आरमाराचा पाया घातला, तेव्हापासूनच कालान्तराने रशियाला हें कळून चुकलें की, रशियाजवळ जंगलांची भरपूर सोय असली आणि म्हणून नुसतीं लांकडीं गलबतें तो वाटेल तेवढी तयार करूं शकला तरी नाविक तज्ज्ञांच्या अभावी डच, ब्रिटिश व अमेरिकन लोकांची मदत त्यास घ्यावी लागली. पुढे वाफेचीं गलबतें निघालीं आणि गलबतांना पोलादी कवचें चढविण्यांत येऊं लागलीं. त्या यांत्रिक सुधारणा युगांत रशिया मागासलेलाच राहिल्यामुळे त्याच्या आरमाराची किंमत शून्यवत् झाली होती. आता दुसऱ्या महायुद्धाच्या वेळीं इतकी सुधारणा होऊनहि आरमारी लोकांचें शिक्षण जर्मन खलाशांच्या शिक्षणासारखें नाही ही रशियाला पुरी जाणीव झाली आहे. म्हणूनच रशियाने त्यासाठी भगीरथ प्रयत्न सुरू केले आहेत. अलीकडे अकरा आरमारी कॉलेजेस मुद्दाम स्थापिलीं आहेत तीं त्यासाठीच होत.

केसरी, १७–९–४६

★

— १४ —

# भोंगळ कारभाराचें ओंगळ प्रदर्शन

## वॅलेस यांचा बायर्नसना सुरुंग

पॅरिस परिषदेपासून रशियाने जगाला अनेक चमत्कार करून दाखविले; परंतु परवा १३ सप्टेंबर रोजी अमेरिकेने जो चमत्कार करून दाखविला किंवा आपल्या भोंगळ कारभाराचें जें प्रदर्शन केलें, त्यायोगे सर्व लोक क्षणभर हतबुद्धच झाले म्हटलें तरी चालेल. त्या दिवशीं प्रे. ट्रुमन यांच्या कारभारी मण्डळांतील बायर्नसच्या जोडीचे एक जबाबदार मंत्री वॅलेस यांनी एक जाहीर भाषण न्यूयॉर्क येथे केलें आणि त्यांत काय होतें ? तर अमेरिकन सरकारच्या चालू धोरणाचा निषेध आणि कसेंहि करून रशियाशीं मिळतें घेण्याची मागणी !! वॅलेस यांचें म्हणणें कीं, " ब्रिटनच्या ओंजळीने पाणी पिण्याचें धोरण सोडून देऊन अमेरिकेने स्वतःच्या डोळयांनी जगाकडे बघावें. इंग्लंड हें साम्राज्यशाही टिकविण्याचाच कावा अमेरिकेच्या पंखाआड साधीत आहे. तरी इंग्लंडला गचांडी देऊन स्वतः-च्या फायद्यातोट्यावरच अमेरिकेने यापुढे लक्ष ठेवून चालावें व रशियाशीं सलोखा करून घ्यावा; त्याचे म्हणणें समजावून घ्यावे, त्यास योग्य तीं आश्वासनें द्यावीं म्हणजेच जागतिक शांतता प्रस्थापित होऊन ती कांही वर्षे तरी टिकेल. इंग्रजांची आमची मायबोली एकच असली, त्यांचे आमचे आचारविचार आणि ऐतिहासिक परंपरा ही एकच असली तरी अमेरिका म्हणजे इंग्लंड नव्हे. इंग्लंडमुळेच आपणांस पुनः युद्धाच्या खाईत पडावें लागेल. रशियाशीं आपण ताठरवृत्ति धरली की तो आप-

णांहून ताठर बनतो. वास्तविक स्थिति अशी आहे की, जगाच्या एक-तृतीयांश भागांत रशियन ध्येयकल्पनांचा आणि वर्चस्वाचा आसर पडलेला आहे, तर उलटपक्षी बाकीच्या दोन-तृतीयांश जगाच्या भागांत अमेरिकेच्चेंच वर्चस्व किंवा छाया पसरली आहे. तेव्हा दोघांनी एकमेकांकडे कानाडोळा करावा आणि आपापल्या ध्येयकल्पनांचे प्रयोग आपापल्या क्षेत्रांत खुशाल करून पाहावे. शेवटी जें उत्कृष्ट असेल तेंच अवशिष्ट राहील. रशियाला यासाठी अमेरिकेने एकदा स्पष्ट सांगून टाकावें की, इंग्लंडला आम्ही पाठबळ देणार नाही. तसेंच अमेरिकेला मध्यपूर्वेतील तेल मिळविण्यासाठी अमेरिकन लोकाचे निष्कारण वाटेल तितके बळी द्यावे अशी दुराशाहि नाही."

यापूर्वी आठच दिवस ६ सप्टेंबर रोजी स्टुटगार्ट येथे अमेरिकन परराष्ट्रमंत्री बायर्नस यांनी मुद्दाम खुलासेवार भाषण करून रशियाबाबत अमेरिकेचें धोरण यापुढें निःसंशय कसें टणक राहील त्याचा स्पष्ट उच्चार केला होता. त्यावेळीं त्यांनी "यापुढे रशिया जबरदस्ती करील तर अमेरिकाहि प्रतिकार करण्यास मागेपुढे पाहाणार नाही" असें सूचित केलें व "जर्मनीला रशियाच्या मनाप्रमाणे कायमच्या दास्यांत पिचत टाकण्याची अमेरिकेची इच्छा नाही; तसेंच पोलंडची पश्चिम सरहद्द रशियाच्या मनाप्रमाणे ठरवून देण्यास आम्ही बांधलेलों नाही, किंबहुना आम्ही ती बदलणें भाग पाडूं" असाहि खुलासा त्यांच्या भाषणांत होता.

## ट्रूमन यांची दोन तोंडें

रशियाच्या आडमुठेपणाच्या धोरणाला लोक कंटाळून गेलेले असल्यामुळे बायर्नस यांची सगळीकडून मोठी वाहवा झाली व सगळ्यांनी त्यांच्यावर अभिनंदनपर लेख लिहिले. पण त्या लेखांची शाई वाळते न वाळते तोंच पाठोपाठ हा वॅलेस यांच्या भाषणाचा बॉम्ब उडाला व सर्वजण अचंबा करीत बसले. बायर्नस हे ट्रूमन यांचे परराष्ट्रमंत्री तर वॅलेस हे व्यापारमंत्री ! एक उजवा हात तर दुसरा डावा हात इतकाच फरक !

किंवा ट्रुमन दत्ताची डाव्या उजव्या अंगांचीं हीं दोनें तोंडेंच; पण हीं दोन तोंडें परस्परविरोधी घोषणा करूं लागलेलीं पाहून जगाने चमत्कार न मानावा तर काय करावें ?

या चमत्कारामुळे पॅरिस परिषदेंत, इंग्लंडांत व अमेरिकेंत तर नुसता गोंधळ उडाला आणि ट्रुमन यांच्या कचेरीला खुलासे प्रतिखुलासे करण्याचा इतका प्रसंग आला व त्यांत अमेरिकन कारभारपद्धतीची व अतिरेकी मतस्वातंत्र्याची इतकी विटंबना झाली की पुसता सोय नाही. प्रथम ट्रुमन यांनी सांगितलें की, "होय; वॅलेस यांचें भाषण मीं अगोदर वाचलें होतें. त्यांच्या व बायर्नसच्या भाषणांत विलकूल विरोध नाही !!" नंतर दुसऱ्या वेळीं खुलासा केला की, "वर्तमानपत्रप्रतिनिधींनी माझ्या विधानांचा विपर्यास केला. मी कांही वॅलेस यांचीं मतें मला मान्य आहेत असें म्हणालों नव्हतो; तर वॅलेस यांना त्यांचीं स्वतःची वैयक्तिक मतें जाहीर रीतीने सांगण्याचा हक्क मी मान्य केला एवढेंच म्हणालों होतों." सरकारी दस्तऐवज फोडण्यांत अगदी पटाईत असलेला ड्रयू पिअरसन याने ती संधि साधून यापूर्वी २३ जुलै रोजीं वॅलेस यांनी अमेरिकन परराष्ट्रधोरणासंबंधी जो विस्तृत खलिता ट्रुमन यांना सादर केला होता तोच सरकारी फाइलींतून पळवून सारांशरूपाने छापून टाकला. तेव्हा वॅलेस यांनीहि मग ट्रुमन यांना न विचारतांच तो अस्सल खलिता स्वतःच छापून टाकला.

## रशियाशीं सख्य जोडा

तो खलिता म्हणजे १३ तारखेच्या वॅलेस यांच्या भाषणापेक्षाहि अधिक विदारक होता. त्यांत वॅलेस यांनी असें म्हटलें होतें की, "दुसरें महायुद्ध निश्चित पेटणार. त्यासाठी अमेरिकेने कडेकोट तयारींत रहाणें अत्यावश्यक झालें आहे असेंच लोकमत दिसतें. पण युद्ध टाळण्याकरितां केलेल्या प्रचण्ड तयारीने युद्ध उलट लवकर पेटतें असाच इतिहासाचा हवाला आहे. विजयदिनापासून अमेरिकेचें धोरण हेंच स्पष्ट झालें आहे की, युद्ध झालें तर तें आपणच जिंकले पाहिजे किंवा आपण

लष्करीदृष्ट्या इतके जबरदस्त झाले पाहिजे, की साऱ्या जगाने दबकून बसावें. मन्रोपॉलिसीचा विस्तार करून पश्चिम जगतांतील राष्ट्रें या अमेरिकेच्याच लष्करी चौक्या म्हणून अमेरिका सज्ज करून ठेवीत आहे; ॲटम बॉम्बचें गुपित तिनें स्वतःच्याच हातीं राखिलें आहे. जगतांतले अतिदूरदूरचेहि लष्करी तळ ती मिळवीत आहे व ब्रिटिश धोरणालाच ती पाठिंबा देत आहे. यामुळे तिचें रशियाशीं वैर पडणार. डॅन्यूब नदीचें किंवा दार्दानेलिसचें स्वामित्व आंतरराष्ट्रीय कारभाराखाली व्यावें ही योजना रशिया कशी मान्य करील? सुवेझ कालवा किंवा पनामा कालवा आंतरराष्ट्रीय करा म्हणून रशिया म्हणूं लागला तर इंग्लंड व अमेरिका तें मानतील काय? रशियाला अमेरिकेबद्दल संशय कां वरें येऊं नये? युद्ध संपलें तरी पुनः अमेरिकेने आपल्या लष्करी व आरमारी खात्यासाठी १३००,००,००,००० इतक्या डॉलर्सची प्रचंड रक्कम मंजूर केली. आताच बिकिनी बेटावर ॲटम बॉंबचे प्रयोग केले. बॉंबनिर्मिति तर अखण्ड सुरूच आहे. लॅटिन-अमेरिकेला शस्त्रास्त्रें आपल्या खर्चाने पुरवून सज्ज ठेवण्याची हमी घेण्यांत आलेली आहे. जगाचा निम्मा भाग आक्रमण करून तेथे वैमानिक तळ निर्माण असे केले आहेत की, तेथून उरलेला जगाचा भाग बॉंबबरसातीने हुकुमी बरबाद करतां येईल. अशा स्थितींत रशियाने आपलें युद्धोत्पादन वाढवावें व आपली संरक्षक कक्षा शक्य तितकी विस्तृत करण्याचा अट्टाहास करावा हें स्वाभाविक नाही काय? अमेरिकेच्या किनाऱ्यापासून हजारों मैल दूर असलेल्या ग्रीनलंडांत किंवा ओकिनावांत जर अमेरिकेला विमानतळ हवेत, तर रशियाने पूर्व-युरोपांत किंवा मध्यपूर्वेत आपली संरक्षक सरहद्द वाढवून मागितली तर ती मागणी खरोखर स्वल्पच आहे. ब्रिटनला अमेरिका युद्धोत्तर वाटेल तेवढें कर्ज देते पण रशियाला मात्र तें नाकारतें याचा अर्थ आपणांस विरोधी असा गट स्थापण्यासाठीच तें कर्ज आहे असें रशियाने कां समजूं नये? एकंदरींत मला असें वाटतें की, रशियाला अमेरिकेची भीति कां वाटते ते दिलखुलासपणें विचारून घ्यावें व देऊ-दिलाऊ करून त्याचें समाधानच करावें. तरच युद्ध टळेल व कांही वर्षे तरी जगाला शांतता लाभेल."

## अखेर वॅलेस यांचा राजिनामा घेतला

या पत्राच्या प्रसिद्धीनंतर मात्र ट्रुमन यांना कांहींच संपादणी करतां येणें शक्य नव्हतें. दरम्यान वॅलेस यांनीं "मी राजिनामा देत नाही; मला तो मागण्यांत आलेला नाहीं; मी पुन्हा असेंच भाषण करणार आहे." असें सांगण्याचा सपाटा चालविला; तर उलट बाजूने तोंडघशीं पडलेले बायर्नेस यांनीं 'माझा राजिनामा स्वीकारा' अशी ट्रुमनना धमकी दिली. त्याचप्रमाणें ट्रुमन यांच्या कारभारी मंडळांतले युद्धखात्याचे सेक्रेटरी पॅटरसन आणि आरमारखात्याचे सेक्रेटरी फॉरेस्टल यांनींहि पत्रक काढून वॅलेस यांच्या विधानांचा इन्कार केला; तेव्हां अखेर ट्रुमन यांनीं वॅलेस यांना तंबी देऊन सरकारी कचेरीला आधीं दखल दिल्याखेरीज अमेरिकेच्या परराष्ट्रीय धोरणाबाबत वॅलेस यांनीं जाहीर भाषण करतां कामा नये असें फर्माविलें. तें वॅलेस यांनीं मान्य केल्याचें वृत्त होतें; पण अखेर ट्रुमन यांनी वॅलेस यांचा राजिनामाच मागितला व तो त्यांनी दिला.

## ब्रिटनला अमेरिकेवर तोंडसुख घेण्याची संधि

अशा रीतीनें हें प्रकरण संपलें. अमेरिकेचें रशियाविरोधी धोरण, हलवून खुंटा बळकट करावा त्याप्रमाणें, अधिक ठाम झालें व बिचाऱ्या इंग्लंडचा जीव भांड्यांत पडला. वॅलेस यांनीं सगळ्यांत बेअब्रू केली असेल तर ती इंग्लंडचीच ! आणि त्याला कारण ट्रुमन यांचा भोंगळ कारभारच. यामुळें ब्रिटिशपक्षपात्यांनीं ट्रुमन यांजवर चवताळून असें कांहीं तोंडसुख घेतलें की विचारतां सोय नाहीं. ते सांगू लागले, "रुझवेल्ट कोणीकडे आणि ट्रुमन कोणीकडे ! दैवयोगानें या ट्रुमन बाहुल्याला अमेरिकेच्या अध्यक्षाची गादी मिळाली, पण इसापनीतींतील दोन बायकांच्या दादल्याप्रमाणें या बावळटाची त्याच्या दोन मंत्र्यांनीं दोहींकडे ओढाताण करून टाकली. पूर्वी एक वेळ रूझवेल्ट यांनीच व्हाईस प्रेसिडेन्टच्या जागेकरिता वॅलेस यांची नेमणूक करण्याचें ठरविलें होतें. या जागेवर नेमा-

वयाचा तो मनुष्य वजनदार परंतु सात्त्विक असावा, फारसा धालमेली स्वभावाचा कारस्थानी नसावा, म्हणजे त्याच्या वजनाचा उपयोग विरोधी पक्षांतील मतें आपल्या बिलांच्या बाजूने मिळविण्यांत होतो ही कल्पना; परंतु वॅलेस यांनी तेव्हांच आपल्या कट्टर ध्येयवादी मतांचा एकदोनदां बेलगामी प्रचार केला. यामुळे रूझवेल्ट सावध झाले व त्यांनी वॅलेसला उपाध्यक्ष नेमण्याची योजना दूर करून ट्रूमन यांना तेथे नेमले आणि रूझवेल्ट अकस्मात् वारल्यामुळेच ट्रूमनना प्रेसिडेन्टशिप मिळाली. पण रूझवेल्ट यांचा दम या बावळटांत नाही तेव्हा एकाच प्रधानमंडळांतील प्रधानांनी एकमेकांविरुद्ध प्रचार करण्याचा प्रसंग न ओढवेल तरच आश्चर्य!" 'To err is human' याऐवजी सध्या अमेरिकेंत 'To err is Truman' अशी म्हण पडली आहे ती यथार्थच होय. अमेरिकेंत चोकाळलेल्या 'सवाई लोकशाहींत' असेंच व्हावयाचें! पूर्वी महायुद्ध चालू असतां चर्चिल यांना पार्लमेंटांत विरोधी सभासदांनी कांही गुप्त माहिती जाहीर करण्याबाबत इतकें छेडलें की, तें अखेर उद्वेगाने म्हणाले "इंग्लंडांत 'लोकशाही' आहे म्हणूनच उघड उघड असले देश-घातकी प्रश्न पार्लमेंटांत उजळ माथ्याने हे मेहरबान सभासद विचारूं शकतात!" इंग्लंडची साधी 'लोकशाही' तर अमेरिकेची सवाई 'उदार लोकशाही'! तेव्हा सरकारी धोरणाविरुद्ध, एका प्रधानाने दुसऱ्या प्रधानाला खोड्यांत टाकावें हें सरळच! आता वॅलेसचा राजी-नामा घेऊन बायर्नसप्रणीत परराष्ट्रीय धोरणच अमेरिका ठेवणार हें पक्कें झालें हें खरें व तेंच व्हावयास पाहिजे. परंतु अमेरिकन मंत्रिमंडळांत रशियन प्रश्नावर फार मोठी दुही आहे हें गृहछिद्र बाहेर पडलेंच व त्याचा फायदा घेऊन रशिया यापुढे ताठरवृत्तीच धरील याची वाट काय? तेव्हा 'बुंदसे गई ते हौदसे आती नही' हेंच खरें!

केसरी २४–९–४६

★

[library stamp]



# ब्रिटिशांच्या इराणांतील कारवाया पुढें चालूच

## ब्रिटिश सैन्य इराण हद्दीवर

सुमारें एक महिन्यापूर्वी इराणचा प्रश्न इतका निकरास आल्यासारखा भासत होता की, युद्धास प्रत्यक्ष तेथेच सुरुवात होते की काय असें जगास भासलें. कारण ब्रिटनने एकदम हिंदुस्थानांतून बरेंच सैन्य नेऊन बसऱ्यास दाखल केलें व इराणनेहि " हें इराणवर स्वारी करण्याकरिताच आणलें आहे, त्याची बदनजर दिसतांच आम्ही बेलाशक प्रतिकार करूं " असें बजावलें; परंतु परस्परास भयप्रदर्शन करण्याखेरीज त्यांतून अधिक कांहीं निष्पन्न झालें नाही; पण तेवढ्यामुळे तेथला वाद संपला आहे असें होत नाही. किंबहुना वाद पुनः निघाल्यास आपल्या सैन्याच्या जोरावर तो हटकून जिंकावा अशी मजबुतीच उभयपक्षी करण्यांत येत आहे.

रशियाने सारा इराण आत्मसात् केल्यासारखाच आहे. त्याने इराणचा शेंडा म्हणजे अझरबैझान प्रांत खुडून खाऊन टाकला व इराणी सरकारच्या प्रधान मंडळांतहि तीन टुडेहपक्षीय मंत्री घेण्यास भाग पाडलें. येऊन जाऊन इराणचा बुडखा किंवा दक्षिणेकडचा भाग तेवढा ब्रिटिशांच्या वर्चस्वाखालीं राहिलेला आहे. त्या प्रांतांत ब्रिटिशांचें जीवन असलेल्या तेल खाणी असल्यामुळें व त्या इराणी सरकाराकडून कांहीं कराराने त्यानी भोगवट्यास मिळविलेल्या असल्यामुळे त्यास ते बिलगून राहिले आहेत.

## खुजीस्तान तेलटापूंतील ब्रिटिश हितसंबंध

१९०१ सालीं अगदी प्रथम डार्सी नांवाच्या ब्रिटिश गृहस्थाने इराणच्या शहाकडून तेलाची खाण खोदण्याचा परवाना मिळविला. सात वर्षे निरनिराळ्या ठिकाणीं खणून पाहतां अखेर १९०८ साली 'अहवाझ'च्या उत्तरेस ६० मैलांवर असलेल्या मसजीद-इ-सुलेमान येथे तेल लागलें, व पुढील साली अँग्लो-पर्शियन ऑइल कं. लंडनमध्ये स्थापण्यांत आली, व १९१२ पर्यंत पर्शियन गल्फवरील 'आबादान' बंदरापर्यंत १४५ मैल लांबीचे नळहि आणून पोहोचविण्यांत आले. कालान्तरानें तेलाचें उत्पादन वाढतच चाललें. १९१२ साली ४३०८४ टन तेल निघालें तर दुसऱ्या महायुद्धाच्या सुरवातीस म्हणजे १९३८ सालीं १३०००००० टन तेल निघालें! ४३।४४ या सालांत या तेलनळांतून ८४३६०४७ टन तेल म्हणजे सुमारें ५१००००००० रुपये किंमतींचें तेल बाहेर पाठविण्यांत आलें. ३३ सालीं इराणचा शहा जागा झाला व त्याने करारदुरुस्तीचा तगादा ब्रिटिशांमागे लावला, तेव्हां इराणी सरकाराला मिळणारी स्वाभित्वादाखलची रक्कम वाढवून देण्यांत आली. १९४१ सालीं ही स्वामित्वाची रक्कम ६००००००० रुपये वाढली होती. एवढ्या जगड्व्याळ तेलकारखान्यांतून ५०००० कामगार खपत असतात.

## रशियन खबरदारी

अर्थात् हा प्रदेश हर एक प्रयत्नांनी आपल्या हातून जाऊ न देण्याची पराकाष्ठा ब्रिटन करील. हा वेळपर्यंत टुडेहपक्षीय रशियनछाप चळवळ्यांनीं ब्रिटिशांच्या तेलखाणी विभागांत फितूर पेरून दंगे, संप, अत्याचार यांचें सत्र सुरू ठेवलें होतें आणि आता तर इराणी सरकारांत प्रचारखात्याचा व मजूर खात्याचा मंत्री म्हणून नेमण्यांत आलेला आहे तो टुडेहपक्षीयच आहे. अर्थात् तो इराणच्या या दक्षिण भागांतील इंग्रजांनी व्यापलेल्या तेल टापूंत आपला 'प्रचार' कसा करीत असेल आणि मजुरांचें हित कोणत्या धोरणाने पाहात असेल हें सांगणें नकोच. त्याचें अगदी ताजें प्रत्यंतर हें आहे की, या मंत्र्याने परवाच इराणी सरकारा-

विरुद्ध ब्रिटिश मदतीने झालेला राज्यक्रान्तीचा एक कट उघडकीस आणला; त्याची हकीकत अशी—

इराणच्या दक्षिणेकडील ज्या नैर्ऋत्य कोपऱ्यांत .ब्रिटिश तेलखाणी आहेत, त्यांच्या आसपास खुजिस्तान किंवा अरबीस्तान नांवाचा एका जमातीचा प्रदेश आहे. अझरबैझानी लोकांना सैन्य व शस्त्रें पुरवून इराणच्या उत्तरेस ज्याप्रमाणे रशियाने बंड करविलें, तो प्रान्त स्वतंत्र करविला, व गाईला चरत सोडून, तिच्या आश्रयाने मृगया करणाऱ्या शिकाऱ्याप्रमाणे इराणी सरकारहि ग्रासलें तोच डाव दक्षिणेकडून आता ब्रिटन खेळत आहे. हा खुजिस्तान प्रांत पूर्वी एकेकाळीं इराकचा भाग होता. खुजिस्तानांतील फितुऱ्यांना चिथावणी देऊन, इंग्लंडने सांगितलें की, " अरे, तुम्ही स्वस्थ काय बसलां ? तुम्हांला आम्ही सर्व साहित्य पुरवितो. तुम्ही इराणी सरकाराविरुद्ध बंड करून उठा, आणि अझरबैझानसारखें स्वतंत्र राष्ट्र व्हा. तुम्ही मूळ कांहीं इराणीसरकारची प्रजा नव्हता. तुम्ही इराकचे प्रजाजन होता. इराणने जिंकून तुम्हांस आपल्या दास्यशृंखलेंत गोंवलें आहे. तुम्ही इराकसरकाराकडे जा आणि त्याला कळवा की, आम्ही तुमचीच लेकरें आहोंत, पुनः आम्हांला सोडवून न्या, तर तें सरकार काय नाकारील ? आणि इराकचें सरकार आमच्या अगदी मुठींत आहे हें तुम्ही जाणतांच. मूठ दाबून त्याचा कोंडमारा करून त्यास घामाघूम करणें आमच्या हातचा मळ आहे, तर यापासून कांही बोध घ्या आणि कामाला लागा ! " आणि या शिकवणीचा परिणाम म्हणजेच वर उल्लेखिलेली खुजिस्तानी किंवा अरबिस्तानी चळवळ.

या अरबी जमातींचा पुढारी कोणी 'शेख अबदुल्ला' नांवाचा आहे. त्यानें प्रचारास सुरुवात करून असंतोष भडकविला. गेल्या ऑगस्टांत तो कायरोसहि गेला. त्याने अरब लीगपुढे इराणी सरकारच्या जुलमाची कहाणी कळवळून सांगून, खुजिस्तानच्या स्वातंत्र्याला किंवा इराकी मुलखास तो जोडून घेण्याच्या प्रश्नाला अरब राष्ट्रांची मान्यता मिळविण्याचा प्रयत्न केला. तसेंच इराकांत जाऊनहि त्याने साहाय्य मिळविलें. ३० ऑगस्ट रोजीं अरबिस्तानमधील एक शिष्टमंडळ बगदाद येथे

इराकी सरकारास भेटलें होतें व त्याने ' आम्हांस पुनरपि तुमच्या पंखाखाली घ्या, आम्ही इराकीच आहों ' अशी कैफियत सांगितली होती. त्यानंतर पुढील आठवड्यांतच अरबिस्तानांतील अल्करान जमातीचे पुढारीहि याच कामाकरिता बगदादला गेले होते.

## कट फसला !

ब्रिटिशांनी या चळवळ्यांना इराणी आखातांतून मदत पाठविली व हिंदुस्थानांतलें सैन्य, बंड केल्यास मदतीचा विसार म्हणून नेऊन उभें केलें. ब्रिटिशांनी दक्षिण इराणांत बंदोबस्तास असलेल्या इराणी सरकारच्या सेनापतीलाहि फितूर करण्यांत यश मिळविलें; व दंग्याने तेहरान राजधानीसुद्धा काबिज करण्याचा डाव टाकला ! गेल्या २२ ऑगस्ट रोजीं तेहरान राजधानींत लष्करी सरकारच्या हुकुमानें कर्फ्यू पुकारण्यांत आल्याची एक बातमी प्रसिद्ध झाली होती व बातमीदारांनी ' ही कर्फ्यू कां तें कळत नाही ' असें आश्चर्यहि व्यक्त केलें होतें. पण त्या गूढाचा परिहार वरील हकीकतीवरून सहज होऊं शकेल. कसेंहि असो तेहरान काबीज करण्याचा तो कट वेळींच उमगला. इराणी सरकारचें प्रधानमंडळ वेळींच खडबडून जागें झालें व त्यानें बारीक शोध करून बंडाचा किंवा कटाचा बीमोड करण्यासाठी आपल्या दुडेहपक्षीय मंत्र्यास म्हणजे 'प्रिन्स मुझफ्फर फिरोज' यास रवाना केलें. याला दक्षिण इराणांत इस्पहान येथे कटाचें एक केन्द्र उमगलें. तेथे जाऊन त्याने मार्शल लॉ पुकारला व प्रमुख लोकांना कैद केलें. या कैद केलेल्या लोकांत 'जहानशहा बख्तिआरी' नांवाचा चहारमहालचा गव्हर्नरहि होता. याच्या भावालाहि पकडण्यांत आलें. खेरीज ब्रिटिशांच्या खुजिस्तान तेलटापूंतील इराणी लष्कराचा सेनापति ' कर्नल हेजाजी ' हाहि पकडला आहे. अशा रीतीने हा राज्यक्रांतीचा कट इराणी सरकारने उखडून टाकिला. परंतु यांत त्याला इंग्लंडचा स्पष्ट हात असलेला दिसल्यामुळें 'प्रिन्स मुझफ्फर फिरोज' यानी जाहीरपणे प्रगट केलें कीं, इस्पहान येथील कटाला परराष्ट्राची चिथावणी होती. त्यांनीच बख्तिआरी लोकांना उठविले हें निःसंशय आहे.

## एक फसला तर लगेच दुसरा

पण वरील हें बंड फसलें तर ब्रिटिशांनी दुसऱ्या एका टोळीकडून पुनः दक्षिण इराणांत बंड चेतावित्याचें २१ तारखेचें ताजें वृत्त आहे. हें बंड ‘ कशगाई ’ जमातीचें आहे. ही जमात तुर्कमानी असून, तिची संख्या १३०००० आहे. ही सर्व फिरस्ती जंगली आहे. मात्र या जमातीचे लोक अत्यंत कडवे असून, त्यांच्यासारखे घोड्यावर बसणारे पटाईत शिलेदार साऱ्या जगांत विरळाच सांपडतात अशी त्यांची ख्याति गाइली जाते. त्यांच्या टोळ्यांनीं काझेरून आणि गाहारून हीं दोन गांवें काबीज करून, शिराझकडे चाल ठेवली आहे. शिराझसुद्धा त्यांनी जिंकल्याचें एक अनधिकृत वृत्त आहे. तसेंच बुशायर बंदरहि त्यांनी वेढल्याचें सांगतात. इराणी सरकारनेंहि आपलें लष्करी मोटार दल व विमानें प्रतिकारार्थ पाठविलीं आहेत. ता. २३ रोजीं जनरल महदी फत्तमी हा दक्षिण इराणचा गव्हर्नर तातडीनें घावम सुलतान याजकडे तेहरानास गेला व त्याने बंडखोरांच्या मागण्यांचा एक खलिता प्रधानपंत घावम सुलतान यांस सादर केला. त्यांतील अटीवरून ब्रिटिशांनीच अझरबैझानप्रमाणे द. इराणांतील फार्स प्रांत स्वतंत्र करण्याची कारवाई कशी चालविली आहे तें स्पष्ट होतें. अटी अशा आहेत—१ चालू इराणी प्रधान-मंडळानें राजिनामा द्यावा. फक्त घावम सुलतान यांनीं राहावें व त्यांनी नवें मंत्रिमंडळ बनवावें. (त्याचाच अर्थ टुडेहपक्षीय कम्युनिस्ट मंत्र्यांचें उच्चाटन करावें.) २ नुकत्याच पकडलेल्या बख्तिआरी जमातीच्या लोकांना मुक्त करावें. ३ लष्करांतील बड्या बड्या फितुरी अधिकाऱ्यांना बडतर्फ करावें. ४ अझरबैझान-प्रमाणेच ताबडतोब प्रांतिक कौन्सिलें स्थापून होमरूल म्हणजे स्वायत्तता द्यावी. ५ दक्षिण फार्स भागांतून जो वसूल होईल, त्यापैकी $\frac{2}{3}$ रक्कम फार्सवरच खर्च व्हावी. ६ अझरबैझानप्रमाणेच इराणी सरकार येथे अधिकारी नेमील त्यांना फार्सच्या प्रांतिक कौन्सिलाची संमति घ्यावी. व ७ इराणी मजलीसमध्यें म्हणजे पार्लमेंटांत आम्हांस अधिक प्रतिनिधित्व द्यावें म्हणजे आमची सभासदसंख्या वाढवावी !

या मागण्या शिराज जिंकल्यावर तेथील लोकांच्या संमतीने म्हणजे सामान्य रयत, जमीनदार, कारखानदार, धर्मगुरु यांच्यासुद्धां संमतीनें तयार करून पाठविण्यांत आल्या आहेत असें सांगण्यांत येतें ! यावरून या जंगली लोकांचा 'बोलविता धनी' गुप्त असला तरी तो कोण तें सहजच उमगतें !

केसरी, २७–९–४६

★

— १६ —

# ईजिप्तच्या वाटाघाटी दुसऱ्यांदा मोडल्या

## मुहूर्त लागत नाहीं

अँग्लो-इजिप्शियन करारासंबंधीच्या वाटाघाटींना मुहूर्त चांगला लाभला नसावा. कारण दरवेळीं त्या अपेशीच ठरत आहेत. गेल्या महिन्यांत २१ ऑगष्ट रोजीं त्या वाटाघाटी पूर्ण फिसकटल्याचें जाहीर झालें होतेंच व त्या संबंधींचें विवेचन ६ सप्टेंबरच्या केसरींत आम्ही केलें तें वाचकांच्या स्मरणांत असेलच. या करारासंबंधांतलीं बोलणीं अनिर्णीत राहणें हें इजिप्शियनांच्या व इंग्रजांच्या दोघांच्याहि दृष्टीनें सोयीचें नसल्यामुळे तीं बोलणीं फिसकटलीं तरी उभयपक्षीं पुनः नव्याने बोलणीं सुरू करण्याचा संकल्प सोडण्यांत आला होता. संकल्पाप्रमाणें पुनः नव्या अटी आल्या. नव्या वाटाघाटी झाल्या; पण निकाल मात्र बोलणीं फिसकटण्यांत झाला आहे असें २६ सप्टेंबरच्या वार्तेवरून दिसतें. तेव्हां या मोडलेल्या वाटाघाटींचा इतिहास आता साकल्यानें अवलोकन करण्यास हरकत नाहीं.

## विद्यार्थी पक्ष

इजिप्शियन लोकांत निरनिराळे नरमगरम राजकीय पक्षोपपक्ष आहेत. त्यांतला सर्वांत जहाल पक्ष म्हणजे ईजिप्तमधील विद्यार्थ्यांचा आणि यंग-ईजिप्त पार्टीचा. विद्यार्थीवर्ग हा आधींच भावनावश, अतिरेकी, एकांतिक, भडक गोष्टीला भुलणारा असा असतो. ईजिप्तमधील विद्यार्थीवर्गाला राजकारणाचें बाळकडू झगलूल पाशाच्या वेळेपासून फार मोठ्या प्रमाणांत

मिळालें असून तें आता सार्वत्रिक झालें आहे. पाश्चिमात्य शिक्षणाचा प्रसार त्यांच्यांत चांगलाच झालेला असून ईजिप्तमधील राजकारणांत तेथील विद्यार्थ्यांचा फार मोठा हिस्सा असतो. हा सर्व विद्यार्थीवर्ग इंग्रजाशीं चाललेल्या करारदुरुस्तीच्या वाटाघाटी मोडून टाकाव्या, इंग्रजांचें जोखड फेकून द्यावें, असें म्हणणारा आहे.

## यंग ईजिप्त पार्टी

दुसरा जहालपक्ष यंग इजिप्त पार्टीचा. हा पक्ष स्वतःला सोशॅलिस्ट किंवा अर्धकम्युनिस्ट म्हणवितो. मूळ हा पक्ष फॅसिस्ट पुरस्कर्ता असाच होता. याचा पुढारी मैतर अहंमद हुसेन नांवाचा एक ३६ वर्षे वयाचा तरुण वकील आहे. तो महा चळवळ्या व कारस्थानी आहे. १९३७ सालीं त्याने मुसोलिनीची भेट घेतली व तेथून परत आल्यावर ईजिप्तने इटलीशीं सख्य राखावें असा त्याने प्रचार चालविला. त्याने एक संघहि स्थापिला. त्यांत तरुण इजिप्शिअनांची भरती होत असे. ईजिप्तचा राष्ट्रीय रंग हिरवा म्हणून संघटनेंतील तरुणांचे एकजात हिरवे गणवेश करण्यांत आले. इटलींतील ब्लॅकशर्टस् किंवा जर्मनींतील ब्राऊन शर्टस्‌चीच ती नकल होती. फार काय सलामीची पद्धतीहि नाझी फॅसिस्ट पद्धतीचीच ठेवण्यांत आली! या पक्षाने प्रथमपासूनच अँग्लो-इजिप्शियन करार मोडून टाकण्याचा हट्ट धरला होता. महायुद्ध काळांत अर्थातच मैतर हुसेन याला गिरफदार करण्यांत आलें व त्याचा संघहि बेकायदा ठरवून, नष्ट करून टाकण्यांत आला; पण युद्धानंतर सुटका होतांच अहमद हुसेननें पुनः आपली चळवळ सुरू केली व त्यास अर्थातच ईजिप्शियन तरुणांकडून चांगला पाठिंबा मिळत आहे. गेल्या महिन्याचे सुरवातीस हातबॉंब टाकून ब्रिटिश सैनिकांना ठार मारल्याच्या आरोपावरून या संघटनेच्या वीस सभासदांना अटकहि करण्यांत आली होती.

## सूडानी पक्ष

याखेरीज तिसरा जहाल पक्ष आहे तो सूडानी लोकांचा. "सूडानी लोक हे ईजिप्शिअनांहून निराळे आहेत. त्यांचे हितसंबंध वेगळे,

ध्येय वेगळें इजिप्तच्या हातीं सूडान प्रांत गेला तर इजिप्त त्याला सावत्र भावाप्रमाणे लेखील. आम्ही स्वपराक्रमाने पूर्वी सूडान जिंकला आहे, ही जेतृत्वाची भावना इजिप्शिअनांच्या मनांतून गेलेली नाहीं. तेव्हां सूडानी लोकांनीं इंग्लंडच्या चालू अमलाखालींच राहून स्वातंत्र्य मिळवावें," अशी शिकवण इंग्लंडने सूडानला कितीहि दिली तरी "इंग्रजापेक्षा ईजिप्शिअन लोकच आम्हांस जवळचे आहेत. ते आणि आम्ही घरांत वाटेल तसें भांडूं; परंतु इंग्रजांनी येथून काळे करावें," अशी विचारसरणी असणारा एक प्रबळ पक्ष सूडानमध्यें असून, गेल्या महिन्यांत त्याचें एक शिष्टमंडळहि कैरोला येऊन त्याने इंग्लंडशीं चाललेल्या वाटाघाटी मोडून टाका व ईजिप्तचा प्रश्न थेट यूनोमध्यें काढा असा आग्रह धरला होता.

## जबाबदार राजकीय पक्ष

हे एकांतिक जहालपक्ष सोडले तर जबाबदार राजकारणी असे जे मुख्य पक्ष आहेत की, ज्यांच्या मताधिक्यावरच इजिप्शिअन पार्लमेंटांत अँग्लो-इजिप्शिअन कराराला संमति किंवा असंमति मिळावयाची ते म्हटले म्हणजे लिबरल्स, साडिस्ट्स् व वफद इत्यादि होत. यापैकी वफद पक्षाने गेल्या निवडणुकींत भागच घेतला नव्हता. तेव्हां राहिले दोन पक्ष. त्यांपैकी साडिस्ट पक्ष हा विशेष प्रबळ आहे. गेल्या निवडणुकींत त्याने १२४ जागा मिळविल्या. म्हणजे या साडिस्ट पक्षाच्या हाती चेंबर ऑफ डेप्युटीमधील शें. ४४ जागा मिळाल्या. सेनेटमध्येहि त्यांच्या १८ जागा आहेत. साडिस्ट पक्षाचा पुढारी 'नुकराशी पाशा' असून लिबरल पक्षाचा पुढारी 'हेकल पाशा' आहे.

## सिदकी पाशाची कारवाई

गेल्या महिन्यांत सिदकी पाशाने वाटाघाटी मोडल्या, तेव्हाच मनाशी विचार केला की, आपण जबाबदारीने कांहीं मध्यम क्रम स्वीकारून तडजोडीचा जो समुदा तयार करतो तो इतर पक्षांतले लोक शेवटीं वांधा घालून फिसकटवितात. आपण कांही शर्ती पक्क्या करून करार मान्य म्हणून ठरविला तरी तो अखेर इजिप्शिअन पार्लमेंटांत बहुमताने पास

झाला पाहिजे. तरी आता त्यासाठीं पार्लमेंटांतील पक्षोपपक्षांत अधिकाराची आमिषें दाखवून फाटाफूट पाडून आपल्याला पाठिंबा देईल असें बहुमत तयार करून घेणें भाग आहे. असा विचार करून त्याने पार्लमेंटांतील प्रबळ असलेल्या साडिस्टपक्षाशीं सूत्र जोडलें, व नुकराशी पाशा यांशीं वाटाघाटी करून साडिस्ट पक्षाला प्रधानमंडळांत घेतलें. ही घालमेल इंग्रजांच्याहि मान्यतेनेच झाली असली पाहिजे; कारण लॉर्ड स्टॅनगेट यांची खाजगी रीतीने नुकराशी पाशाशींहि बोलणीं सुरू होतीं.

## नव्या ब्रिटिश अटी

या वेळीं इंग्रजांनी वाटाघाटी दुरुस्त करून अटी चर्चेसाठी मांडल्या त्या अशा–( १ ) ईजिप्त किंवा ब्रिटन यांपैकी कोणावरहि संकटाचा संभव दिसूं लागला तर दोन्ही राष्ट्रांनी एकत्र बसून त्याचा विचार करावा. (२) युद्ध सुरू झालें किंवा पराक्रमण झालें तर आपल्या शेजारच्या राष्ट्रांत ब्रिटनला साहाय्य करण्याकरिता म्हणून इजिप्तने सैन्य पाठवावें. ( ३ ) सूडानची राज्यव्यवस्था १८९९ च्या कन्व्हेन्शनप्रमाणे आणि १९३६ च्या तहाप्रमाणेच यथापूर्व चालावी. इजिप्तने सूडान म्हणेल तर त्याला स्वतंत्र होऊं देण्याचा हक्क मान्य करावा. इजिप्त व ग्रेटब्रिटन यांनी इजिप्तचे महत्त्वाचे हितसंबंध रक्षण करण्यासाठी बोलणीं करून एक कलमबंदी तयार करावी. इजिप्तला सूडानचें स्वामित्व मागण्याचा हक्क आहे; परंतु त्या हक्काला संमति देण्याचा हक्क किंवा अधिकार मात्र ब्रिटनला नाही (!)

## शेवटीं फिसकटल्याच

या अटीवर महिना पंधरा दिवस उभयपक्षीं खूप चर्चा झाली; परंतु इजिप्शिअन शिष्टमंडळाने एकमताने इंग्रजांच्या अटी २६ सप्टेंबर रोजीं फेटाळून लावल्या ! इजिप्तचें म्हणणें थोडक्यांत असें पडलें की, ' इंग्लंडने इजिप्तमधून आपलें लष्कर काढून घेण्याबाबत घातलेली मुदत तीन वर्षांची म्हणजे फार दीर्घ आहे. नवा अँग्लो-इजिप्शिअन करार झाल्यानंतर एका वर्षांत त्यांनीं आपलें सैन्य काढून घेतलेंच पाहिजे. युद्धाचा

धोका असल्याच्या सबबीवर इजिप्त व इंग्लंड यांनी संयुक्तपणें खल केला पाहिजे हें कलम आम्हांस बिलकूल पसंत नाही. आम्ही स्वतंत्र आहो असें मानतो. सूडान हा इजिप्तच्याच नियंत्रणाखालीं असला पाहिजे व नाईल खोऱ्याचें एकीकरण झालेंच पाहिजे. याप्रमाणे वाटाघाटी पूर्णपणें फिसकटल्या आणि त्याचे प्रायश्चित्त म्हणून सिदकी मंत्रिमंडळाला राजिनामा देणें भाग पडलें व त्याने तो २८ सप्टेंबर रोजीं दिलाहि. तिकडें लॉर्ड स्टॅनगेट यांनाहि ब्रिटिश मंत्रिमंडळांतून काढून टाकून त्यांच्या जागीं दुसरा मनुष्य नेमण्यांत येणार असल्यानें लंडनवृत्त आहे.

केसरी, १–१०–४६

★

## — १७ —

# अमेरिकेच्या पाठिंब्यामुळें इजिप्त शेफारला

### सूडानचें स्वामित्व कोणाचें ?

इजिप्त वाटाघाटी या वेळीं मुख्यतः सूडानच्याच प्रश्नावर मोडल्या असें लंडनचे माहितगार सांगतात. सूडान हा कांहीहि झालें तरी इंग्रजांना सोडावयाचा नाहीं. उलटपक्षी तो नाईल नदीमुळे इजिप्तचे ' जीवनसर्वस्वच ' असल्यामुळे त्यांनाहि तो इंग्रजांना पचूं द्यावयाचा नाहीं. अशा स्थितींत सूडानच्या प्रश्नाला महत्त्व केव्हाही आणतां येऊं शकतें. शिवाय आजच त्या प्रश्नाला एकदम आगंतुक महत्त्व आलें आहे असेंहि नव्हे. १९२२ सालापासून सूडान परत मिळविण्याची निकराची चळवळ इजिप्तने केलेली असून त्यापायीं सूडानचा गव्हर्नर जनरल लीस्टॅक याचा खूनहि पडलेला आहे !

इजिप्तच्या दक्षिणेस सूडान प्रान्त आहे. इजिप्तला समृद्ध करणाऱ्या एकमेव नाईल नदीचें उगमस्थान सूडानच आहे. तो जवळ जवळ इजिप्तएवढा किंबहुना थोडा मोठा आहे. १८२१ सालीं इजिप्तचा पाशा महंमदअली याने स्वारी करून सूडान जिंकला व इजिप्तला जोडला. तेथून पुढे ६० वर्षेपर्यंत सूडानवर इजिप्तचा अंमल अबाधित चालला. मात्र या काळांत इजिप्शिअनांनी सूडानी लोकांवर ते जवळ जवळ गुलाम समजूनच निष्ठुरता धरली. नाईल नदीच्या उगमाचें संरक्षण आणि गुलामांचा व्यापार याखेरीज त्यांनी सूडानांत कशाकडेच लक्ष दिलें नाहीं असा ब्रिटिशांचा आरोप आहे. कसेहि असो, सूडान मध्यें १८८० सालीं इजिप्त सरकाराविरुद्ध महदीचें प्रचंड बंड व राज्यक्रांति झाली, व मह-

दींनी इजिप्शिअनांची कत्तल करून टाकली व सूडानमधून इजिप्तचा अंमल उठविला. नंतर तेथे दरवेश्यांचें राज्य सुरू झालें; पण पुढे इजिप्शिअन सरकाराने ब्रिटिश सैन्याची मदत घेऊन, सूडान परत जिंकला. ही गोष्ट १८९८ सालीं झाली. इजिप्तच्या दरबारीं ब्रिटिशांचें कमालीचें वर्चस्व बसलेलें होतेंच. त्यामुळेच स्वाभाविकपणे ब्रिटिशांच्या मदतीची कल्पना निघाली. सूडान जिंकण्याची मुख्य कामगिरी आणि सेनाध्यक्षता ब्रिटिशांचीच होती. ईजिप्तने नाममात्र सैन्य पुरविलें पण मोहिमेला २० लक्ष पौंड खर्च आला. त्यापैकी १५ लक्ष पौंड इजिप्तनेच खर्चास दिले.

## इंग्रजांचा हक्क कसा ?

इजिप्त इंग्रजांच्या मुठींतच गेलेला असल्यामुळे इतर राष्ट्रांना त्याचें आधीच फार वैषम्य वाटत होतें. तेव्हा आता ब्रिटिश सैन्याने सूडान जिंकून तोहि घशांत घालावा हें फ्रेंचादिकांनी उघड्या डोळ्यांनी पाहणें शक्य नव्हतें; आणि याचें प्रत्यंतर हेंच की, लॉर्ड किचनेरने महर्दीचा लढाईत पराभव केला. त्याच सुमारास अर्ध्या खंडाइतकें आफ्रिकेचें वाळवंट तुडवीत फ्रेंच सेनापति मेजर मर्चण्ड सैन्य घेऊन, खार्टूमच्या दक्षिणेस फशोडा येथे दाखल झाला होता ! दक्षिण सूडान फ्रान्सला मिळाला पाहिजे अशी त्याने मागणी केली ! ती किचनेरने फेटाळून लावली व फ्रेंचांत दम नसल्यामुळेंच केवळ अँग्लो-फ्रेंच युद्ध त्या वेळीं टळलें. सांगण्याचा मुद्दा एवढाच की, इतर राष्ट्रांच्या डोळ्यावर येऊं नये म्हणूनच केवळ इंग्रजांनी राजरोसपणे जेत्याच्या हक्काने सूडान खाल्ला नाही, पण कुटिल कारवाईनें दुसऱ्या मार्गानें त्यांनी तो खाल्लाच. त्यांनीं असें ठरविलें की, सूडानचा राज्यकारभार इजिप्शिअन व ब्रिटिश असा दुतर्फी चालावा, म्हणजे सूडान हा इजिप्तच्या राज्याचाच भाग समजावा, परंतु इजिप्तच्या देखरेखीखाली तेथील अम्मल ब्रिटिशांनी चालवावा. ॲलेनबींचे चरित्रलेखक लॉर्ड वेव्हेल यांनासुद्धा ब्रिटिशांनी हा जो लुच्चेगिरीचा करार करून घेतला त्याचें समर्थन करतां आलेलें नाही. त्यांनी त्याची संपादणी "This arrangement so advantageous to Great Britain could only be justified by the unselfish devoted

work by which the British Officials brought peace and prosperity to the land " या शब्दांनी केली आहे. सारांश, सूडानचा हा असा पूर्वेतिहास आहे व म्हणूनच इजिप्त हक्कानें सूडान परत मागतो. पण तो तर इंग्रजांना द्यावयाचा नाही; म्हणून " तुमची भीति कोणती ? तर नाईल नदीची. आपण उभयपक्षी तडजोड करूं व त्या पाण्याला कधीही बाध येणार नाहीं अशी सूडानकडून कबुली घेऊं. त्याची हमीहि तुम्हाला आम्ही देतो ' अशी नवी तडजोड ताज्या वाटाघाटींत इंग्रजांतर्फे सुचविली होती.

## अमेरिकेची फूस

तें कांही असो या वेळीं या वाटाघाटी मोडून टाकण्यास इजिप्तला नवें कोणचें बळ मिळालें असावें ? आमच्या मतें अमेरिका या प्रकरणी ढवळा-ढवळ करूं इच्छित आहे अशी निश्चित आशा किंवा संभव इजिप्तला वाटला असला पाहिजे. याचीं ताजी दोन गमकेंहि सांपडतात. पहिलें गमक हें की, गेल्या १९ सप्टेंबर रोजीं अमेरिका व इजिप्त यांची परस्परांच्या देशांत आजवर जी डिप्लोमॅटिक मिशन्स म्हणून ठेवलेलीं होतीं त्यांच्या 'वकिलाती' केल्याचें अधिकृतपणे जाहीर केलें; व दुसरें गमक म्हटलें म्हणजे मध्यपूर्व व आफ्रिकेबाबतच्या अमेरिकन कारभाराचे जबाबदार अधिकारी डायरेक्टर 'लॉय हेंडरसन' यांनी २० सप्टेंबर रोजीं केलेलें जाहीर वक्तव्य. त्यांत त्यांनी पुढील-प्रमाणे अमेरिकेचें धोरण दिग्दर्शित केलें. 'अमेरिकेचें धोरण निकट-पूर्वेत व मध्यपूर्वेत तेथे असलेल्या राष्ट्रांतील चुरस थोपविण्याचें राहील. त्यांच्या चुरशीमुळे तिसरें जागतिक महायुद्ध पेटावें हें अमेरिकेला इष्ट वाटत नाही. मध्यपूर्वेचा हा भाग कमालीचा नाक्याचा असल्यामुळे महत्वाचा आहे. कारण तेथूनच पूर्व आणि पश्चिम यांत समुद्र, जमीन आणि आकाश यांवरून दळणवळण जोडलें जातें. खेरीज या प्रदेशांत खनिज संपत्ति अतोनात आहे व हा प्रदेश पुढेमागे कृषिसंपत्तीनेहि अत्यंत समृद्ध करतां येण्याची शक्यता आहे. या प्रदेशांतील राष्ट्रें पूर्वी एके काळीं जगतांत गाजलेलीं असलीं तरी, आणि त्या राष्ट्रांतून तेव्हा

फार सुधारणा झालेली असली तरी, आज मात्र अशी स्थिति आहे की, तीं अत्यंत दरिद्री आणि राजकीय दृष्ट्या मागासलेलीं आहेत. आर्थिक दृष्ट्या आणि विज्ञान दृष्ट्या तर बोलावयासच नको! परंतु यांपैकीं कांहीं राष्ट्रें गेल्या कांहीं वर्षांत जागृत झालेलीं आहेत. त्यांना पूर्ववैभवानुसार आपलें कर्तृत्व दाखविण्याची महत्त्वाकांक्षा उत्पन्न झाली आहे व 'आम्हांस संधि द्या म्हणजे आम्ही पाश्चात्यांच्या तोडीचें होऊन दाखवितो,' अशी त्यांची मागणी सुरू आहे. त्यांना स्वयंनिर्णय पाहिजे आहे. 'आम्हांला तो द्या म्हणजे आम्ही आम्हांला योग्य वाटेल त्या पाश्चिमात्य राष्ट्रांकडून तज्ज्ञ आणून मदत घेऊं व तुमच्या तोडीचे होऊं' असें ते म्हणतात. याबाबत तीं राष्ट्रें सध्या तिरिमिरीस येऊन पोंचली आहेत. या असंतोषामुळेच व अस्वस्थतेमुळेच मध्यपूर्वेतील अनेक राष्ट्रांतून अराजक माजलें आहे व त्या राष्ट्रांना परक्यांचे साहाय्य घेतल्यावांचून असंतोषाचें निर्मूलन करतां येत नाही. तेव्हा हीं मध्यपूर्वेतील राष्ट्रें राजकीयदृष्ट्या स्वतंत्र व सबळ झाल्याखेरीज मध्यपूर्वेतील दंगल थांबणार नाही व परक्या राष्ट्रांची गिधाडी दृष्टीहि एरवी मागें वळणार नाही! म्हणून अमेरिकेने असें ठरविलें आहे की, 'काय वाटेल ती किंमत पडो या राष्ट्रांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे हरएक साहित्य पुरवावयाचें व त्या राष्ट्रांतून अमेरिकन तत्त्वांचा वरचष्मा बसवायचा! त्या विभागांत जीं राष्ट्रें आज स्वतंत्र आहेत त्यांचें स्वातंत्र्य व अविभाज्यत्व टिकविण्यासाठीं आमची मदत सुरू झालीच आहे; खेरीज आम्ही आर्थिक, वैज्ञानिक, यांत्रिक बाबींत वाढती मदत देऊं, स्पेशल मिशन्स पाठवूं, सल्लागार किंवा तज्ज्ञ यंत्रविशारद पुरवूं किंवा नव्या वसाहती करण्यासाठी किंवा लागवडीसाठी कर्जे पुरवूं. आम्ही जे लोक पाठवूं त्यांसाठी जादा हक्क किंवा निराळी वागणूक मागणार नाही, **किंवा इतर राष्ट्रांचे कांहीं आर्थिक हक्क राखून ठेवण्यांत आलेले असतील तर ते त्यांना हळूहळू पण निश्चित काढून घेण्यास लावूं.** थोडक्यांत जगाच्या सुरक्षिततेकरितां व उत्कर्षाकरितां मध्यपूर्व खुली केलीच पाहिजे. तिला परकीय राष्ट्रांशीं संबंध जोडण्यास इतर कोणा राष्ट्रांच्या हस्तक्षेपामुळे आर्थिक आडकाठी येतां कामा नये.'

## अखेर हेंच होईल

वरील भाषण इतकें निःसंदिग्ध आहे की त्यामुळेच इजिप्शिअन लोकांनीं ब्रिटनशीं चाललेल्या वाटाघाटी मोडून टाकण्याचें धैर्य दाखविलें असावें. मध्यपूर्वेतील राष्ट्रांतून मिशनऱ्यांच्या किंवा शिक्षकांच्या साहाय्याने बऱ्याच पूर्वीपासून अमेरिकेने चांचपणी करून ठेवलेली असली तरी आजवर मध्यपूर्वेवर सारें वर्चस्व एकट्या ब्रिटनचेंच होतें. गेल्या महा-युद्धापासून मात्र हें गाडें पालटण्यास प्रारंभ झाला. अमेरिकाखंडाच्या समोर तटासारखा पसरलेला पश्चिम आफ्रिकेचा प्रदेश गेल्या महायुद्धांत अमेरिकेने प्रथम आक्रमण करून जिंकला व नंतर मोरोक्को गिळला; आणि तेथून पुढे उत्तर आफ्रिकेचा किनाराहि तिला मिळाला. हा सर्व प्रदेश अरबी किंवा मुस्लिमांचा आहे. येथपासून अमेरिका मध्यपूर्वेच्या राजकारणांत गुंतली म्हटलें तरी चालेल आणि सध्या तर इंग्रजांबरोबरीने अमेरिकेने मध्यपूर्वेंत आपले आर्थिक संबंध वाढविले आहेत. इंग्लंड हें जागतिक राजकारणांत दुय्यम झालेलें असून, अमेरिकाच हरएक बाब-तींत वरचढ झालेली असल्यामुळे, आज ना उद्या इंग्रजांचें वर्चस्व अस-लेलीं सारी मुस्लिम राष्ट्रें अमेरिकाच आपल्या पंखाखाली दाबून टाकणार असा रंग दिसत आहे. पॅलेस्टाईनचा प्रश्न काय, ईजिप्तचा प्रश्न काय, किंवा दार्दानेलिसचा प्रश्न काय, अमेरिकेच्याच हमीने शेवटीं सोडविणें भाग पडणार.

केसरी, ४–१०–४६

☆

## — १८ —

# जेत्यांच्या कोर्टात जितांचा न्याय

### नुरेंबर्गचे निकाल

गेल्या १ ऑक्टोबर रोजीं, नुरेंबर्ग येथे चाललेल्या नाझी युद्धगुन्हेगारांच्या जगद्विख्यात् खटल्याचा निकाल 'इंटर-नॅशनल मिलिटरी ट्रिब्यूनल 'ने सांगितला व गोअरिंग प्रभृति हिटलरच्या नाझी प्रभावळीचें संपूर्ण कंदन केलें! त्याचा खेदकारक तपशील गेल्या अंकीं आम्ही दिलाच होता. एकूण १२ जणांना फांशी व बाकीच्यांना जन्मठेपेपासून कमी अधिक मुदतीच्या भीषण शिक्षा ठोठावण्यांत आल्या आहेत. अर्धे महायुद्ध होऊन गेलें तरी दोस्तांचे युद्धहेतु ठरलेले नव्हते! पण जर्मनीला म्हणजे नाझींना प्रायःश्चित व तें कधी न विसरण्यासारखें उग्र देणें हा युद्धहेतू मात्र १९४२ सालींच दोस्तांनी जाहीर केला होता! पुढें १ नोव्हेंबर १९४३ रोजीं मॉस्को परिषदेंत असा ठराव झाला की गुन्हेगार नाझी प्रमुखांना दोस्त सरकारांच्या संयुक्त निर्णयानुसार शासन करण्यांत यावें. युद्ध जिंकून यश पदरांत पडेपर्यंत अर्थातच या ठरावाला कवडीचीहि किंमत नव्हती; परंतु शेवटीं जयश्रीने दोस्तांच्याच गळ्यांत माळ घातल्यामुळे मॉस्को परिषदेंतील तो निर्णय प्रत्यक्ष अंमलांत आणणें क्रमप्राप्तच झालें, व त्यास अनुसरूनच ता. ८ ऑगस्ट १९४५ रोजीं लंडन येथे इंग्लंड, अमेरिका, रशिया व फ्रान्स या चौघांनी 'चार्टर' काढून 'इंटर नॅशनल मिलिटरी ट्रिब्यूनल' नामक शासनसमिति नाझी युद्धगुन्हेगारांच्या चवकशीसाठी स्थापन केली. त्या चार्टरला दोस्तांच्या पंखाखालील इतर चौदा राष्ट्रांनीहि त्यानंतर लवकरच संमति दिली.

## जाळ्यांत कोण कोण सापडले ?

जर्मनी मे ४५ मध्ये कोसळला. तेव्हापासून दीड–दोन महिन्यांच्या अवधींत जाळें टाकून नीर काढावा, त्याप्रमाणे बहुतेक प्रमुख नाझी मुत्सद्दी व सेनापती दोस्तांनी गिरफदार करण्यांत यश मिळविलें. वेळींच ज्यांनी आत्महत्त्या करून घेतली ते तेवढे अब्रूनिशी बचावले. हिटलर बर्लिन लढवीत असतां आपल्या प्रतिज्ञेप्रमाणे ठार झाला. त्याबरोबर ‘ सूर्या मावळला ! बुडाले आभाळ ’ अशी स्थिति होऊन जर्मन प्रतिकार एकदम समाप्त झाला; व प्रमुख जर्मन लोक परागंदा होण्यासाठी अंतर्धान पावू लागले; परंतु अखेर अमेरिकेच्या, फ्रान्सच्या किंवा इंग्रजांच्या लष्कराच्या कोंड्यांत ते उमगलेच. या रीतीने ज. डिट्मार, फील्ड मा. लिस्ट, फील्ड मा. लीब, मा. रून्स्टेड, जर्मन जनरल स्टाफचा प्रमुख गुडेरियन, ज. केसरलिंग, गोअरिंग, डॉ. वर्नर वेस्ट, मा. शूर्नर, हिमलरचा उजवा हात अर्नेस्ट कार्लटन, फील्ड मा. ग्रिम, परराष्ट्रमंत्री रिबेंट्रॉप आणि लॉर्ड हॉ हॉ एक ना दोन असे शे–सवाशे प्रमुख लोक कैद झाले. हिमलर, गोएबेल्स हे मोठ्या शिताफीने दोस्तांच्या कैदेंत पडल्यावर आत्महत्या करून सुटले. एऱ्हवी त्यांनाहि गोअरिंगप्रमाणे फांसावरच लटकावें लागलें असतें हें निश्चित.

## डोएनिट्सचें जर्मन सरकार

या रीतीने पुष्कळसे प्रमुख नाझी बहाद्दर गिरफदार झाले, तरी अद्यापहि दुसरे पुष्कळच पकडावयाचे राहिले होते व ते काम दोस्तांनीं एक निराळाच व्यूह रचून साध्य केलें. हिटलर मेल्यानंतर जर्मन फ्यूरेर असा कोणीच जाग्यावर नसल्यामुळे दोस्तांना मोठी पंचाईत पडली. बिनशर्त शरणागति घेतल्याखेरीज युद्धाची कत्तल थांबविण्यांत येणार नाही हें तर दोस्तांचें घोषवाक्य ठरून गेलें होतें व जर्मनींत अधिकृत शरणागति देण्यास कोणीच सरकार जाग्यावर नाही अशी स्थिति झालेली. इंग्रज अमेरिकनांना कसेंहि करून युद्ध एकदाचें थांबणें इष्ट झालें होतें; कारण फॉक् स्ट्रम व वेअर वुल्फ्च्या व इतर जर्मन सरकारी गनिमी संघटनांमुळे अँग्लो-अमेरिकन लष्करांना अहोरात्र मेहनतच पडली असती.

उलटपक्षी मुख्य प्रतिकार कोसळल्यानंतर आतां झुंजत राहण्याने सारी जर्मन रयतहि निष्कारण कापली जाईल असें जर्मनांना वाटत होतें. कोणत्या रीतीने असेल तो असो, पण फ्लेन्सबर्ग नभोवाणीवरून हिटलरच्या आरमाराचा सवाई सरखेल ॲडमिरल डोएनिट्झ याच वेळीं प्रकट झाला व त्याने 'ज्या पायावर जर्मन राइश आधारलेली होती तिचे चिरे सर्व कोसळून गेल्यामुळे आता जर्मन राइशचा अवतार समाप्त झाला आहे. राज्ययंत्र व नाझी पक्ष खलास झाला म्हणून आता मीच नवे राइश सरकार स्थापलें आहे' असें जाहीर केलें व अधिकृतपणें जर्मन राष्ट्राची विनशर्त शरणागति लिहून देण्याचें कबूल केलें. दोस्तांनी त्यावेळीं तें लगेच मान्य केलें व जर्मनींतील युद्ध उभयपक्षी थांबलें. त्यानंतर बर्लिनमध्ये शरणागतीचा रीतसर विधीहि झाला.

## विश्वासघात

पण याच घटनेंतून दोस्तांनी आपला कावा अखेर साधला. डोएनिएट्झचें जर्मन सरकार विनशर्त शरण आलें तेव्हाच जर्मन सरकार संपून दोस्त सरकारचा अंमल सुरू झाला असें सांगून डोएनिट्झ प्रभृति ३०० अधिकाऱ्यांच्या जर्मन सरकारला एकाएकी युद्धगुन्हेगार म्हणून एका सट्टयांत गिरफदार करण्याचा त्यांनी हुकूम सोडला. वास्तविक डोएनिड्झ सरकारला मान्यता देऊनच जर दोस्तांनी युद्धतहकुबी केली होती तर त्या सरकारला तरी, जपानांत केले त्याप्रमाणे कायम ठेवून मग आपल्या मनासारखी पारिपत्यें त्या सरकारकरवीच करून घ्यावयाची. पण येथे दोस्तांनी उघड विश्वासघातच केला असें होत नाही काय? डोएनिट्झला अखेरच्या निकालांत फांशीची शिक्षा न देतां त्याला फक्त २० वर्षांचीच सजा दिलेली आहे हे दोस्तांच्या कृतज्ञतेचे किंवा मान्य राजनीति संकेत पाळण्याचे उदाहरण म्हणून दाखवून कोणी समर्थन करील तर तें पटण्यासारखें नाही. जर्मनांना दोस्तांबद्दल जितका द्वेष असेल त्याच्या शंभरपट सूडाची भावना दोस्तांच्या मनांत जर्मनांविषयीं संचारली आहे; आणि म्हणूनच हरएक नाझी घटक पकडून, संपूर्ण खणून टाकण्याची ईर्षा त्यांनी धरली. "जरूर तर पंचवीस तीस वर्षेसुद्धां आमचीं लष्करें जर्मनीचा कब्जा

सोडणार नाहींत. आमचीं नीतितत्त्वें शिकविलेली नवी जर्मनप्रजा वाढून वयांत येईपर्यंत दोस्त जर्मनावरील आपलें नियंत्रण ढिलें करणार नाहींत, " अशा दोस्तातर्फे वेळोवेळीं करण्यांत आलेल्या घोषणा दुसरें काय दर्शवितात ?

## लोक काय इच्छित होते ?

या रीतीने सगळे मासे पकडल्यानंतर दोस्तांनी चौकशी कमिशनचा प्रचण्ड तमाशा सुरू केला. जेते हेच न्यायाधिश आणि जित हे आरोपी तेव्हा निकालाबद्दल कोणासच शंका नव्हती. उलट जग मनांत असेंच म्हणत होतें, 'आता चौकशीची विटंबना तरी कशाला पाहिजे ? शत्रूचें वाटेल त्या उपायांनी निर्मूलनच करावें ही राजनीतीच आहे. तेव्हा नाझी गुन्हेगारांना तुम्ही नाहीसें केलें तर तें मनुष्यस्वभावास धरूनच होईल; आणि खुद्द जर्मन नाझी गुन्हेगारहि मरणाला भीत असतील अशी शंका घेणें म्हणजे निदान त्यांनी प्रकट केलेल्या निस्सीम शौर्याला, एकान्तिक निष्ठेला आणि अतुल देशाभिमानाला कलंक फासण्यासारखे होईल त्यांनी "हें घेतलें व्रत न की अम्हि अंधतेने" अशा डोळसपणानेच आपलें बाण उचलेलें होतें अर्थात् त्यांना भडाभड गोळ्या घालून टाकलें असतें तरच ते दोस्तांच्या लौकिकाला शोभण्यासारखे ठरलें असतें. पण आताचा हा चौकशी ट्रिब्यूनलचा जगड्व्याळ पसारा आणि त्याच्या निर्णयाच्या प्रचाराचा नगारा या गोष्टी मात्र दोस्तांच्या वीरवृत्तीला खचित शोभण्यासारख्या नाहीत.'

## हेंच दोस्त भांडवल

पण हा खटला हेंच तर दोस्तांचें भांडवल. या खटल्याच्या रूपानेच दोस्तांना आपल्या राजनीतिच्या कल्पनांचा जर्मनींत आसर पाडावयाचा असल्यामुळें ते असें सांगत आहेत की, " पूर्वी जगांत जी गोष्ट कधी घडून आली नाहीं ती आम्ही करून दाखविली आहे. आजपर्यंत शेंकडों वर्षे अलिखितपणे कां होईना, परंतु आंतरराष्ट्रिय संकेत किंवा कायदेकानू अंमलांत होते; पण ते कोणी मोडले तर त्याला प्रत्यक्ष शिक्षा ठोठावल्याचें

उदाहरण नव्हते. गेल्या महायुद्धांतील त्यासंबंधीचा शोचनीय इतिहास पाहिला म्हणजे पुरे. म्हणून आम्ही हें प्रत्यक्ष उदाहरणच घालून दिलें म्हणाना ! करार वाटेल तसे करावेत आणि काम संपताच ते बेलाशक ठोकरीने उडवून द्यावे असें मानणाऱ्या भावी मुत्सद्यांना आम्ही आता कायद्याचा धाक निर्माण केला आहे. "पांचामुखी परमेश्वर" याच न्यायाने आमचा हा निर्णय जगताला मान्य करावाच लागेल. आमच्या या योजनेस एकूण अठरा प्रमुख राष्ट्रांची संमती आहे म्हणजे जगांतील सुधारलेल्या लोकांतील बहुसंख्य लोक आमच्या योजनेस पूर्ण अनुकूल आहेत व त्यांतील बुद्धिमान व न्यायी लोकांनीच फार विचारपूर्वक संयुक्तरीत्या ही योजना आंखली आहे."

## पुराव्याचे पर्वत !

खटल्याचें काम १९ आक्टोबर १९४५रोजीं सुरू झालें व जवळ जवळ एक वर्षपर्यंत चालून परवा तें संपलें. पुराव्याचे एवढे डोंगर जमविण्यांत आले कीं, त्याचे ५०००० 'व्हॉल्यूम्स' होतील. एकूण २५०००००० शब्द भरतील एवढ्या जबान्या झाल्या. त्याचीच २०००० छापील पृष्ठें होणार आहेत. वादीतर्फे ३०००००० कागद दाखल करण्यांत आले त्याचें वजन म्हणे ३० टन झालें आहे ! पुराव्यांत ८०।८० हजार फूट लांबीच्या दोन फिल्म्सहि दाखल आहेत. या खटल्याचा इतिहास ५।६ लक्ष शब्द असलेला, ४० व्हॉल्युमांत काढून त्यांची इंग्लिश, फ्रेन्च, रशियन आणि जर्मन भाषांतून भाषांतरें होणार आहेत व हा सगळा खर्च अर्थातच जर्मनीकडून वसूल करण्यांत यावयाचा आहे; व तें सरळच आहे. पराभूत होण्याचें पातक जर्मनीच्या हातून घडलें तेव्हां आपल्या खर्चाने आपल्या निंदेचा नगारा जगाला ऐकविणें हें त्याला प्राप्तच आहे !

## रशियाने फुगा फोडला

न्यायीपणाचा एवढा आव दोस्तांनी दाखवून जगावर छाप बस-विण्याची आटापीट केली खरी; परंतु त्यांचाहि न्याय बरोबर झालेला

नाही असें त्यांच्यांतीलच एक रशियन न्यायाधीश ओरडून उठला आहे, हें मात्र खाचित सूचक होय. त्यांचें म्हणणें असें की, "हेसला फांशीच द्यावयास पाहिजे होतें. डोएनिट्झची तीच गोष्ट. पापेन शाट आणि फ्रिस्चे याना निर्दोषी ठरविले हे चूक झाले. पापेन हा अनेक वर्षे तुर्कस्तानांत जर्मनीचा वकील म्हणून होता व गेल्या महायुद्धांत त्याची रशियाविरुद्ध अनेक कारस्थानें चालू होतीं व त्यासंबंधीचा अस्सल पत्र-व्यवहारहि सांपडल्याचें रशियाने सुमारें १॥ महिन्यापूर्वी प्रसिद्धहि केलें होतें आणि सध्या तर तुर्कस्तानबाबत मोठाच वांधा अँग्लो अमेरिकन्स व रशिया यांत पडला आहे. तेव्हा भावी धोरणावर दृष्टि ठेऊनच आम्हाला नडणारे नाझी कंटक अँग्लो-अमेरिकनांनी वांचवून आपल्या उपयोगाकरिता आपल्या पिन कुशन्सवर सुरक्षित टोंचून ठेवण्याची दक्षता घेतली आहे." असे पुढे मागे रशिया म्हणणार नाही कशावरून ? कारण हा जेत्यांनी केलेला राजकारणी न्यायच आहे !

केसरी, ८-१०-४६

★

— १९ —

# तुजसाठीं लढतां मरणें । हा हाच आमचा छंद ॥

## सुधारलेल्यांचा रानटीपणा

गोअरिंग प्रभृति जर्मन पुढाऱ्यांना देहांताच्या भीषण शिक्षा ठोठावऱ्यांत आल्या आहेत व त्या ते त्यांच्या प्रारब्धाप्रमाणे भोगतीलहि. परंतु खेदाची गोष्ट ही की, पिंजऱ्यांत पकडलेल्या वाघाला खडे मारून, कामट्यांनी टोंचून किंवा अनिर्वाच्य शिव्या हांडसून बायकापोरांनी स्वतःची ग्राम्य करमणूक करून घ्यावी तसाच प्रकार दोस्तांकडील वार्ताहरांनी सुरू केला आहे. वसंतसेनेचा वध केल्याच्या खोट्या आरोपावरून देहांताची शिक्षा दिलेल्या उदारचरित चारुदत्ताला वधस्तंभाकडे नेत असतां तो 'सोहळा' पाहण्याकरिता दाटी करणाऱ्या तमासगिरांचा निषेध, फांशी देणाऱ्या मांगानीहि केला व 'अरे! काय पाहण्याकरितां असे घडपडतां? थोर लोकांचा अस्त डोळ्यांनी पाहूं नये' असे उद्गार काढले व खुद्द चारुदत्तापुढेंहि 'बाबा! राजाज्ञा तुला मारते! आम्ही मारीत नाही' असे खरे सहृदय उद्गार काढले होते. पण हजार वर्षांपूर्वीच्या त्या 'रानटी' काळांतहि प्रत्यक्ष धंदेवाईक मांगानी जितकी माणुसकी दाखविली तितकीहि या सुधारणेच्या शिखरास पोंचलेल्या विसाव्या शतकांतल्या युरोपियन वार्ताहरांना दाखवितां येत नाही!!

## हीन टवाळी

"मरणान्तानि वैराणि" हाच खऱ्या थोर मनाच्या लोकांचा दंडक.

पण तितकी उदात्त मनोवृत्ति अंगीं नसली तरी निदान कांहीच बरें वाईट न बोलतां गप्प बसून पाहण्याचा तरी शिष्टाचार पाळला जावा अशीच साहजिक अपेक्षा. परंतु ती फोल ठरली आहे. एकाने गोअरिंगच्या स्थूलपणाचीच टवाळी यावेळीं सुरू केली, तर दुसऱ्याने निकाल ऐकतांक्षणींच " हा लठ्ठंभारती आपल्या हाताच्या पगी म्हणजे पुष्ट पंजांत डोकें खुपसून मुसमुसूं लागला " असें वर्णन केलें ! दुसऱ्या एकाने गोअरिंगची बायकोहि पुनः चव्हाट्यावर ओढली . आणि ती सिनेमा नटीच होती इत्यादि इतिहास पुनः सांगून " या रंगेल फक्कडाची आता तिच्याशीं ताटातूट होणार आणि त्याच वियोगदुःखामुळे तो तिचे फोटो काढून त्याकडे आपल्या कोठडींत पहात बसला आणि उसासे टाकीत उद्वेगाने शेवटीं त्यानें तो फाडून त्वेषाने दूर फेंकून दिला," असें मिटक्या मारीत वर्णन केलें आहे ! तिसरा एकजण लिहितो, ' वेडपट हेस आपल्या अन्नांत विष घालतात अशा संशयाने इतके दिवस अन्न खात नसे; पण आता फाशी टळल्यामुळेच की काय तो घोड्यासारखा एकदम चरू लागला आहे ! '

## मुसोलिनीचा दृष्टांत

' टाइम्स्चे 'चे लंडन येथिल खास प्रतिनिधि सर स्टॅनले रीड यांसारखे विवेकी व गंभीर लोकहि विजयोन्मादाच्या या लहरीला बळी पडल्याखेरीज राहिले नाहीत हें त्यांनी ' अन्‌रिड्रीम्ड ब्रूट्स् ', ' स्काउंड्रल्स ' इत्यादि जीं शेलकी विशेषणें या जर्मन युद्धगुन्हेगारांसाठी वापरलीं आहेत त्यावरून स्पष्ट दिसत आहे. त्यांनी असें म्हटलें आहे की, जर्मनांनाच आपल्या नाझी पुढाऱ्यांचा इतका त्वेष आलेला आहे की, आरोपितांपैकीं जे लोक निर्दोषी म्हणून सोडून देण्यांत आले आहेत त्यांनाहि ते फाडून खाण्यासाठी टपले आहेत व क्षुब्ध लोकांनी त्यांच्या चिंधड्या उडवूं नयेत म्हणून त्या आरोपींना दोस्त लष्कराला पहारा ठेवून संरक्षण द्यावें लागत आहे. मुसोलिनीला गोळ्या घालून ठार मारतांक्षणीं चोहींकडून ' ड्यूस ' ' ड्यूस ' म्हणून ओरडा करीत इटालियन लोक गिधाडासारखे त्याच्या प्रेतावर तुटून पडले आणि नंतर त्यांनी त्याच्या

प्रेताची किळस आणण्यासारखी भयंकर बिटंबना केली. तोच प्रकार नाझी जुलमाने स्वातंत्र्य व सर्वस्व गमावलेलें जर्मन लोकहि केल्याखेरीज राहाणार नाहीत.

## त्याचें खरें स्वरूप

गांजल्यामुळे, बावरल्यामुळे, हाल, दारिद्र्य इत्यादि विपत्तींनी बेभान झाल्यामुळे कोठल्याहि देशांतील जनता आपल्याच वंद्य पुढाऱ्यावर असले अत्याचार केव्हा केव्हा करते; परंतु ते तिचें खरें मत नसतें; तिचा पश्चात्ताप आणि तिचें खरें मत कालांतरानेच शुद्धीवर आल्यावर कळून येतें. खुद्द मुसोलिनीचेंच उदाहरण याबाबत अगदी ताजे व लागू पडण्यासारखें म्हणून सांगतां येईल. मुसोलिनीला गोळ्या घालून मारल्यावर आणि त्याच्या प्रेताची वाटेल तशी विटंबना केल्यावर त्याला मुद्दाम एका अज्ञात स्थळीं पुरून टाकण्यांत आले. हेतू हा की सामान्य मनुष्याच्या थडग्यावरहि मृत्यूलेख कोरला जातो तेवढाहि सन्मान मुसोलिनीला लाभूं नये व त्याची नांव-निशाणी जगांतून अजिबात नष्ट व्हावी. पण आता इटलींत काय प्रकार घडत आहे ? तेथे पुन्हा मुसोलिनीच्या भक्तांचा एक पंथ बळावत चालला आहे. त्या लोकांनी अखेर त्याचें प्रेत पत्तासुद्धा लावून कबर खणून काढून, सन्मानाने पळवून नेले व त्या प्रेताला साक्षी ठेवून पुन्हा आपल्या कल्पनेप्रमाणे इटालीच्या उद्धारासाठींच पंथ निर्माण केला. ज्याच्या मरणाबरोबर 'ड्यूस' 'ड्यूस' म्हणून चवताळलेले लोक त्याच्या प्रेतावर धावले म्हणून रीडसाहेबांनी वर्णन केले आहे त्याच मुसोलिनी-बद्दल त्याच्या खणलेल्या कबरीवर "महापुरुषा ! अखेर तुला आम्ही शोधून काढले आहे. आता तरी तुझी आमची ताटातूट न होवो" अशा शब्दांची पाटी लिहून ठेवण्यांत आली होती हें लक्षांत घेण्यासारखें आहे. सारांश, हर्षामर्षाच्या भिरडींत प्रकट झालेलें जनतेचें मत हें उत्कट असलें तरी तें तिचें प्रामाणिक किंवा खरें मत असतेंच असें नाही. कालांतरानेच केवळ तें प्रतीत होऊं शकतें.

## चर्चिलचें 'उदार चरित'

प्रस्तुत जर्मन युद्धगुन्हेगारांच्या बाबतींत निदान इंग्रज अमेरिकन नसलेल्या

अशा त्रयस्थ लोकांनी तरी गंभीर, सभ्य, किंबहुना गुणग्राही, विवेचक दृष्टी ठेवावी हेंच युक्त होय. आणि ही गोष्ट खुद्द इंग्रजांपैकीच कांही सूज्ञ लोक प्रत्यक्ष आचरून दाखवीत आहेत; त्यावरूनहि तिचें औचित्य लक्षांत येईल. जर्मन पराभवानंतर जुलै महिन्यांत खास चर्चिल बर्लिनला मुद्दाम एकटेच भेट देऊन आले होते. त्यावेळीं त्यांनी हिटलर जेथे लढत असतां मरण पावला त्या राइशचॅन्सेलरीच्या ऑफिसाचें निरीक्षण केलें तेव्हा "चिंधड्या झालेल्या हिटलरच्या टेबलाजवळ उभे राहून तुमचा फोटो घेतो" म्हणून दोस्त वार्ताहरांनीं फार फार आग्रह केला; पण चर्चिल यांनी तें साफ नाकारिलें! गंभीर मनस्थितीत तें स्थळ पाहून ते परत फिरले. शिकार केल्यानंतर कांही शिकारी वाघाशेजारी, तर कांही त्याच्या पोटावर उभे राहून दिमाखाने आपला फोटो काढून घेतातच. तसें चर्चिल यांनाहि करतां आलें असतें; पण त्यांनी फारच उदात्त वर्तन केलें असें आम्हास वाटतें. तसाच मनोभाव आता खुद्द 'लंडन टाइम्स' वृत्तपत्रीच्या न्यूरेंबर्ग येथे पाठविलेल्या खास प्रतिनिधीने प्रकट केला आहे.

## लंडन टाइम्सचें मत

चार सप्टेंबरच्या अंकांत त्याने नुरेंबर्ग खटल्यांतील वादीच्या वकिलांचीं भाषणें झालीं तीं आणि शेवटच्या दिवशीं गोअरिंगप्रभृति आरोपींचे अखेरचे जबाब झाले ते देऊन त्याचें मार्मिक वर्णन केलें आहे. तो म्हणतो, "या दिवशीं या कोर्टांत आरोपींचे जे जबाब झाले त्यांना चिरंतन ऐतिहासिक महत्त्व खचित प्राप्त होईल. ते जबाब ऐकल्यानंतर त्यांचें मर्म त्या गजबजलेल्या कोर्टांतील प्रत्येक श्रोत्याला प्रतीत झाल्याखेरीज राहिलें नसेल. बहुतेक सर्व आरोपींनी असेंच सांगितलें की, 'आम्ही जें काय केलें तें सर्व देशासाठीच कर्तव्यबुद्धीने केलें व ते कर्तव्य बजावता आल्यामुळे आम्हांस धन्यताच वाटते.' सरकारी वकिलांनी जीं अखेरचीं भाषणें केलीं त्यांत केलेलीं विधानें निराधार असून त्याचा आम्ही निषेध करतो." गोअरिंग म्हणाला, "मी हिटलरखालोखाल जर्मनींतील प्रमुख अधिकारी होतो, याचा फायदा घेऊन असें भासविलें आहे की, घडलेली प्रत्येक गोष्ट मला माहीत असलीच पाहिजे;" आणि

या वेळीं आपला आवाज उंचावून त्याने कोर्टाला ठणठणीतपणे सांगितलें की, "निरपराध खून पाडण्याचा एकहि हुकूम मी कधीहि दिला नाही किंवा छळ वा अत्याचारहि करण्यास केव्हाहि अनुमती दिली नाही. जर्मनांनी फ्रान्स, बेल्जम, हॉलंड, नॉर्वे आणि ग्रीस येथे जे कांही 'अत्याचार' केले म्हणून वर्णन करतां ते खरोखर जिनिव्हा कन्व्हेन्शनच्या नांवाखाली जर्मनीत तुम्ही आज करीत आहांत त्याच्या पासंगालाहि पुरणार नाहीत ! ! तुम्ही जर्मनीतले कारखानेसुद्धा उध्वस्त करून टाकीत आहा आणि जर्मनीतील इतर जीवनोपयोगी वस्तू सुद्धा इतर देशांत लुटून नेत आहा. नाझीवादाचा प्रचार करण्यासाठी शासन करण्यांत येईल असें पूर्वी कोणत्या राष्ट्राने केव्हा जर्मन सरकारला कळविलें होते ? वरें आता त्यासाठी तुम्ही आम्हा कांही लोकांना पकडून शिक्षा ठोठावीतच आहा मग आता जर्मन रयतेला शिक्षा करण्याचा तुम्हाला काय हक्क आहे ? जर्मन लोकांनी अत्यंत एकनिष्ठपणे मोठ्या धैर्याने विपत्ती सहन केल्या आहेत. जर्मन जनता ही निखालस, निखालस निर्दोषीच आहे."

## खरे देशभक्त

रेडर, न्यूरॉथ इत्यादिकांचे जबाब असेच सणसणीत होते. न्यूरॉथ म्हणाला, "असें असतांहि तुम्ही मला दोषीच ठरवीत आहा ! तर हरकत नाही. माझ्या प्राणाची ही अखेरची आहुतीहि मी माझ्या देशासाठीच दिली असें मी अभिमानाने समजतो." हे उद्गार वाचून सुप्रसिद्ध ऐरिश देशभक्त रॉबर्ट एमेट याच्या ब्रि. लष्करी कोर्टासमोर काढलेल्या पुढील अविस्मरणीय उद्गारांचे कोणास स्मरण होणार नाही ?

Yes, weep, and however my foes may condemn,
Thy tears shall efface their decree.
For Heaven can witness though guilty to them.
I have been but too faithful to thee.

रिबेंट्रॉप यानेहि आपला जबाब उत्तमच दिला. त्याने दोस्तांच्याच गळ्यांत त्यांच्या तंगड्या बरोबर घातल्या. महायुद्धाच्या सुरुवातीस रूसो-

जर्मनांचा तह कसा झाला व पुढे स्टालिनशी काय वाटाघाटी झाल्या. तो पुरावा पुढे आणून त्याने असा मुद्दा मांडला की, १९३९ पर्यंत तरी आक्रमक युद्ध करणें हा कांहीं गुन्हा म्हणून दोस्तांनी जाहीर केलेला नव्हता. एरवी पोलिश मोहिम संपल्यावर स्टालिनने हिटलरला जी तार पाठविली तिचा खुलासा कसा? त्या तारेंत असे शब्द होते, "जर्मनी व रशिया दोघांनीहि एकत्र आपलें रक्त या मोहिमेंत सांडलें आहे व त्यामुळे उभय देशांची एकी अभेद्य होईल व ती कायमची टिकेल व वाढेल अशी मला आशा आहे." आज अँग्लो अमेरिकन्स यांच्यापुढे, त्यावेळी जर्मनीपुढे जो प्रश्न होता तोच नाही काय?

रिबेन्ट्रापने काढलेला मुद्दा आज या खटल्याचा निकाल झाल्यानंतर एका अमेरिकन सिनेटरनेहि जोराने पुढे आणला आहे. त्याचे म्हणणें हेंच की, "विशिष्ट कृत्य करतांना तें कृत्य गुन्हा होतो असें ठरविणारा कायदा अस्तित्वांत नसेल तर मागाहून केलेल्या कायद्याखालीं गुन्हा म्हणून त्या कृत्याबद्दल शिक्षा देतां येत नाही. म्हणूनच न्यूरेंबर्गच्या साऱ्या शिक्षा बेकायदेशीर आहेत."

---

केसरी, १०–१०–४६

★

— २० —

# जर्मन खटल्यांतील शेवटचा अद्भुत प्रवेश

## पहिलें अद्भुत

पूर्वी जाहीर झाल्याप्रमाणे अखेर १५ ऑक्टोबरची मध्यरात्र उलटतांच अँग्लो-अमेरिकन यमदूतांनी रिबेंट्राप प्रभृति जर्मन पुढाऱ्यांना फासावर लटकविण्याचें काम सुरू केलें, व एकदोन तासांतच तें पार पाडलें! अशा रीतीने जगाच्या रंगभूमीवर चाललेल्या त्या वीरोदात्त नाटकाच्या शेवटच्या अंकांतील शेवटचा प्रवेश खलास झाला. हा शेवटचा प्रवेशहि इतका परिणामकारक होता की, जगाच्या स्मृतिपटलावरून त्याची स्मृति कदापिहि नष्ट होऊ शकणार नाही. 'अद्भुत' एवढा एकच शब्द त्याच्या वर्णनाला समर्पक ठरेल. पहिल्या युद्धानंतर अवघ्या २५ वर्षांत नामशेष केलेला जर्मनी जिवंत करून जर्मन गरुडाच्या पंखांनी पुनः साऱ्या युरोपभर छाया धरण्याची महत्तम आकांक्षा धरून कांही काळ ज्यांनी ती सफल करून दाखविली तीं हिटलरचीं सारीं नररत्नें अवघ्या तास-दीड तासाच्या अवधींत या जगांतून कायमची अंतर्धान पावली. हा अद्भुत चमत्कार नव्हे तर काय? दुसरी अद्भुत गोष्ट ही की, शिक्षेचा निकाल ऐकल्यानंतर ज्या निधड्या शब्दांत या जर्मन वीरांनी आपलें मनोधैर्य व राष्ट्रभक्ति व्यक्त केली होती ती त्यांची वृत्ति प्रत्यक्ष फांसाचा हिसका गळ्याला बसेपर्यंत अगदी अखेरच्या क्षणापर्यंत तशीच कायम टिकली. अँग्लो-अमेरिकनांना हीच एक मोठी आशा मनांत होती की, आता मध्यंतरीच्या

१५ दिवसांच्या दारुण काळांत तरी या लोकांचीं हृदयें चिंतेने पिचून जातील, पश्चात्तापाने दग्ध होतील आणि ते दीन, याचक वृत्ति स्वीकारून दयेची याचना करतील; पण तसें कांहीच घडलें नाही. यांपैकी गोअरिंग वगैरेंनीं शिक्षेवर अपिलें केलीं; पण तीं ' आम्हाला सोडा' अशी नव्हती तर 'आम्हाला आमच्या योग्यतेप्रमाणे गोळ्या घालून मारा ' हींच होतीं ! शिक्षा कमी करून मागण्याविषयीहि एकदोन अपीलें झालीं होतीं असें दोस्त वार्ताहर सांगत होते. पण तीं त्या आरोपींच्या वकिलांनीच उमाळा येऊन आरोपींना न सांगतां परस्पर केलेलीं होतीं व तीं आरोपींना बिलकुल मान्य नव्हतीं असेंच आता बाहेर आलें आहे.

आरोपींना शिक्षा सांगून त्यांच्या कोठडयांत नेऊन टाकल्यावर तरी त्यांना स्वस्थता लाभू द्यावयाची, परंतु 'सुधारलेल्या' लोकांचे मानसिक छळ करण्याचे प्रकारहि सुधारलेलेच असतात; कारण त्यांच्या कोठडयांतून शिरून वार्ताहरांनी लगेच त्यांच्या मुलाखती घेण्याचें सत्र चालू ठेवलें. याच वेळीं अमेरिकन सरकारच्या एका दीडशहाण्या मानसशास्त्रज्ञ डॉक्टरला फांशी झालेल्या लोकांच्या मनःस्थितीचा अभ्यास करण्याची लहर आली. या शास्त्रज्ञाने आपलें निरीक्षण करून, प्रत्येक आरोपीचें निदानहि प्रकट करून टाकलें. रिबेंट्रॉपबद्दल त्याने असें लिहून प्रसिद्ध केलें की, साऱ्या आरोपींत हा आरोपी आताच अगदी खचून गेला आहे व हा फांसाच्या दोरीपर्यंत तरी आपल्या पायांनी कसा जाईल न कळे ! वाटेंतच तो कोलमडून लोळागोळा होऊन पडेल हें निश्चित. पण शेवटीं जी प्रत्यक्ष गोष्ट घडली, त्यावरून रिबेंनट्रॉपने धीरोदात्तपणे फांशी जातांना आपल्या लाथेने या अमेरिकन मानसशास्त्रज्ञाचें मुस्कटच फोडून टाकलें असेंच सिद्ध झालें. त्यांच्या अपेक्षेबाहेरची ही गोष्ट म्हणून ती अद्भुतच होय.

## गोअरिंगपत्नीचें अपूर्व पतिप्रेम

पण सर्वांत अद्भुत गोष्ट ही की, ज्या गोअरिंगचा गळा फांसाला गोवून त्याला लोंबकळत ठेवलेला पहाण्याचें नेत्रसुख मिळविण्यासाठी अँग्लो-अमेरिकन्स धडपडत होते ती त्यांची आशा गोअरिंगने अखेरच्या

क्षणीं आत्महत्याच साधून बेमालूम विफल केली ! शिक्षा दिल्यानंतर न्यायाधीशांनीच सांगितलें होतें की आता हे लोक आत्महत्येचा हरतऱ्हेने प्रयत्न करून पाहतील तर त्यांवर अत्यंत कडक पहारा ठेवावा व तशी व्यवस्थाहिं झाली होती. अहोरात्र त्यांच्या कोठड्यावर नजर होती; पण गोअरिंगने मात केली. केव्हा फांशी देणार हेंहि मुद्दामच आरोपीं-पासून अगदी गुपित ठेवण्यांत आलें होतें. तरी फांशीच्या नियुक्त वेळेआधी २॥ तास त्याने सायनाईड विषाची कुपी चावून देहपात केला. त्या जालीम विषाचा तडकाफडकी परिणाम झाला व गोअरिंगच्या कोठडींतून घरघर येतांच पर्यवेक्षक व जेल–डॉक्टर तांतडीने त्याला पुनरपी हस्तगत करण्यासाठी धावले; पण मृत्यूने त्याला आपल्या हृदयाशीं कवटाळून केव्हांच धूम ठोकली होती ! गोअरिंगला आत्महत्येस कांही साधन मिळूं नये असा कमालीचा कडक बंदोबस्त असतां आणि घारी-सारख्या दृष्टीचे चार चार नजरबाज भोवती बसलेले असतां त्याने विषाची कुपी कशी मिळविली या विचाराने अधिकारी हतबुद्ध होऊन गेले. आता असा एक तर्क सांगण्यांत आला आहे की, गोअरिंग व त्याची बायको यांची शेवटची भेट तुरुंगांत झाली त्या वेळीं तिने गोअरिंगचें चुंबन घेतलें; त्याच वेळीं तिने आपल्या तोंडांतून ती लवंगेएवढी बारीक विषाची–विषाची कसली अमृताचीच-कुपी त्याच्या तोंडांत दिली असावी. ही गोष्ट खरी असेल तर ती कमालीची अद्भुत नव्हे काय ? म्हणजे ' नटी ' म्हणून ज्या वीरपत्नीचा हलकट उल्लेख दोस्तांनी सुरू केला होता त्या नटीने आपलें ' नाट्यनैपुण्य ' दोस्तांना चांगलेंच दाखविलें म्हणावयाचें ! पण त्याहीपेक्षा तिने प्रकट केलेलें धैर्य, धूर्तता आणि उत्कट पतिप्रेम हीं केवळ अलौकिकच म्हणावीं लागतील.

## आत्महत्येचे प्रयत्न

युद्धांतील शिपायाप्रमाणे सरळ गोळ्या घालून आपणास न मारतां, चौकशीचा फार्स करून कुजविणार व शेवटी अप्रतिष्ठा करून बदमाष गुन्हेगाराप्रमाणे फासावर चढविणार हें भविष्य जर्मन कैद्याना कळलें तेव्हापासूनच प्रत्येकाने आत्महत्या करून घेण्याचा प्रयत्न करण्याचा

कृतनिश्चय केला होता. गोअरिंगचा तो साधला. इतरांचा दुर्दैवाने साधू शकला नाही इतकेंच. गेल्या १५ महिन्यांत आत्महत्येने देहपात करण्याचे अनेक प्रयत्न वेळोवेळीं कसे केले गेले याची अद्भुत हकीकत नुरेम्बर्ग कैदखान्याचा अमेरिकन जेलर कर्नल बर्टन अँड्रूज याच्या मुलाखतींत प्रकट झालीच आहे. प्रथम लक्झंबर्गमधील मॉडॉर्फ किल्ल्यांत या प्रमुख नाझी कैद्यांना ठेवण्यांत आले होते. नंतर त्यांना नुरेम्बर्ग तुरुंगांत नेण्यांत आले. दहा मे रोजीं ॲडमिरल डोएनेट्झ याची साक्ष झाली होती. त्या दिवशीं तो फारच अस्वस्थ दिसला म्हणून त्याच्या कोठडीची झडती घेण्यांत आली. तेव्हां तेथे बुटांच्या वाद्यांची वळलेली पक्की दोरी सापडली ती दरोग्यांनी जप्त केली. बरेच दिवस वाद्या जमवून त्या दोरीने गळफांस लावून घेण्याचा डोएनेट्झचा प्रयत्न चालला होता. दुसरी एक ख्रिस्टाईन श्रोडर नांवाची स्त्री हिटलरची पूर्वी एकेकाळची खाजगी चिटणीस म्हणून पकडली होती. तिची साक्ष महत्त्वाची होती. तिचाहि आत्महत्या करण्याचा उघड हेतू दिसत होता. कारण तिने आपल्या झग्याच्या शिवणींत सायनाईड विषाचा घुंगुर शिवून छपविलेला आढळला. नुरेम्बर्गमधील या जर्मन पुढाऱ्यांच्या नजीकच इतर नाझी एस. एस. ट्रूपवाल्यांचा कैदखाना होता. तेथे हजारो कडवे नाझी तरुण बंदिस्त करून ठेवलेले होते. मध्यंतरीं एकवेळ त्या तरुणांनी कांही युक्तीने अकस्मात् बंड करून उठून गोअरिंगला पळवून नेण्याचा एक कटहि केल्याचें उघडकीस आलें होते, परंतु तो कट फसला; तथापि निदान त्यांनी गोअरिंगला आत्महत्या करण्यासाठीं सुरा तरी पोंचविण्याची युक्ति केलीच. एक दिवस रात्रीं गोअरिंगच्या खोलींत छतावर एक शिकारी सुरा कचकन् येऊन घुसला; पण तो गोअरिंगने काढून घेण्याच्या आंत झडप घालून जप्त करण्यांत आला. कायटेल व जोड्ल यांसहि असे सुरे पोंचविण्याची खटपट झाली होती. जनरल कायटेल याने त्या कोर्टदुरुस्तीच्या कारखान्यांत पडलेले खिळे व पोलादी तुकडे गिळण्याकरिता म्हणून सांठवून ठेवल्याचें उघडकीस आलें होतें. हा उद्योग त्याला पाय मोकळे करण्यासाठी फिरावयास बाहेर काढीत त्या वेळीं त्याने केला.

## धीरोदात्त रिबेन्ट्रॉप

असो. १५ तारखेस मध्यरात्रीनंतर फांशीचा कार्यक्रम सुरू झाला. नुरेन्बर्ग तुरुंगांतच एके ठिकाणीं फांशीचा हौदा तयार केलेला होता. हौदा खूप खोल असून त्यावर कळीची लाकडी तक्तपोशी बसविली होती. हौद्यावर उंच आडवे तुळवट टाकून त्यास ३ फांस लटकावले होते. फांसापर्यंत चढून जाण्यासाठीं १३ पायऱ्यांचा लाकडी जिना किंवा शिडी केली होती. फांशीची जागा सर्वांगांनी लाखलोटासारखी बंद केलेली असून आंत विद्युद्दीपांचा डोळे दिपविणारा झगझगाट केला होता व दर वेळी 'फांशी-चेंबरचें' दार उघडीत तेव्हा एकादी कांचकारखान्यांतली भट्टी उघडावी तसें भासे. प्रथम रिबेंट्रॉपला फांसाकडे चालविले. त्याला हातकड्या घातल्या असून, त्या एका शिपायाच्या हातकडीशीं जोडल्या होत्या. दोन्ही बाजूस दुतर्फा अमेरिकन शिपायांची कतार उभी होती. त्यांमधून रिबेनट्रॉप व त्याच्या मागून एक पाद्री भट असे वधस्तंभाकडे चालले. मध्यरात्रीची वेळ आणि त्यांतच पावसाची बुरबूरहि सुरू झाली होती. जणूं कांही त्या सर्वसाक्षी आकाशालाहि तो करुण प्रकार पहावत नव्हता व ''गमत गगन जणु मिटुनि नयन अणु करुन मलिन मुख करुण रडे' असेंच भासत होतें. फांशीच्या इमारतीपाशीं येताच दरोग्याने जोराने दार ठोठावलें, त्याबरोबर आंत उभ्या राहिलेल्या शिपायाने तें उघडलें व एकदम प्रकाशाचा झोत पडून सर्वांचे डोळे क्षणभर दिपले. आंत शिरतांच रिबेन्ट्रॉपच्या हातांतील हातकड्या काढण्यांत आल्या व त्याचे हात पाठीशीं एकत्र आवळून टाकण्यांत आले. मग दोघा अमेरिकन सोल्जरांमधोमध ताठ मान ठेवून अगदी धीरवृत्तीने रिबेनट्रॉप फांशीच्या चवुतऱ्याजवळ पोंचला. शिडीवर चढण्याआधी त्याला पुकारण्यांत आलें. "तुझें नांव बोल." प्रथम त्याने उत्तरच दिलें नाहीं; पण पुनः पुकारतांच त्याने अगदी खणखणीत आवाजांत "जोकम व्हॉन रिबेन्ट्रॉप" असा आपल्या नांवाचा सावकाश उच्चार केला. मग धीमेपणाने दोन शिपायांमधोमध शिडी चढून तो फांसाखाली जाऊन उभा राहिला. त्यावेळीं तो सरळ नाकासमोर दृष्टि लावून निश्चल होता. आता तुला अखेरचें कांही बोलावयाचें असेल तर बोल, असें तेथल्या अधि-

काऱ्याने पुनः पुकारल्यावर रिबेन्ट्रॉप आपली दृष्टि तशीच खिळलेली ठेवून एवढेंच म्हणाला की, “ देव जर्मनीचें रक्षण करो, जर्मनांची एकी अभंग टिको, हीच माझी इच्छा आहे. ” हे शब्द त्याने असे खणखणीत उच्चारले की, त्या बंद फाशीचेंबरमध्ये त्याचा प्रतिध्वनि निनादून उठला असें तेथे हजर असणाऱ्यांनी वर्णन केलें आहे. यानंतर तावडतोब त्याच्या तोंडावर काळी टोपी इंग्रज मांगाने बसविली आणि काडकन् आवाज होऊन पायाखालची लाकडी तक्तपोशी दुभंगून रिबेन्ट्रॉप खालच्या हौद्यांत अदृश्य झाला. २० मिनिटानंतर तो मेल्याचें तेथल्या डॉक्टरांनी जाहीर केलें.

## साऱ्यांची एकच तऱ्हा

पुढे याच क्रमाने इतर नऊ जणांची वाट लागली. एकेक स्फोटक बॉंब आणून तो पाण्यांत बुडवून शांत करावा, त्याप्रमाणे हे जर्मन चैतन्याचे गोळे एका मागून एक पंचत्वांत विलीन करण्यांत आले. रिबेनट्रॉप पाठोपाठ कायटेल यास ‘फाशी-चेंबरांत’ आणलें. पण तो हाडाचा जर्मन सेनापतीच. रणक्षेत्रावर आपल्या सैन्याचा फरा पहावयास निघावे अशा ऐटीतच त्याने प्रवेश केला. त्यालाहि ‘तुझी शेवटची इच्छा बोल’ म्हणून पुकारल्यावर त्यानें जणूं कांही आपण आपल्या हाताखालच्या अधिकाऱ्यांना कांही हुकूम समजाऊन देत आहों अशा पद्धतीने हलक्या, पण स्पष्ट शब्दांत पुढील शब्द उच्चारले “देव जर्मनीचें रक्षण करो! माझे वीस लक्ष जर्मन जवान अगोदर ज्या मार्गाने गेले त्याच मार्गाने मीहि आता जात आहे. ” एवढे शब्द उच्चारल्यानंतर तो एकदम जोराने ठांसून म्हणाला, “ पण हे सर्व माझ्या जर्मनीकरितां! ” कायटेलनंतर अर्नेस्ट कार्ल्टन ब्रूनर याची पाळी आली; पण त्या पठ्याच्या डोळ्यावरची झापहि अजून गेली नव्हती. त्याला गाढ झोपेंतूनच उठवून आणण्यांत आलें होतें. फांसाखालीं उभे राहिल्यावर झोपाळू डोळ्यांनीच तो उद्गारला “ मी माझ्या मायदेशाची सेवा इमानीपणाने केली आहे. देव जर्मनीचें भले करो. ” यानंतर रुझेनबर्गला आंत आणण्यांत आले. त्याने मला कांही एक सांगावयाचें नाहीं येवढेंच सांगितलें. पुढे हॅन्स फ्रँक आला;

पण खरोखरच तो स्मित करीत होता. जणूं कांही फांशीची शिडी चढण्याऐवजी तो लग्नाच्या बोहल्यावरच चढत आहे ! फ्रँकनंतर फ्रिक. त्याने जोराने जर्मनीचा जयजयकार केला यानंतर कांही वेळाने जनरल ज्युलियस स्ट्रायकर आला. त्याची ती रुबाबदार उग्र मुद्रा तशीच कायम होती. त्याने आपल्या करड्या लष्करी गंभीर आवाजाने शिडी चढत असतां "हेल हिटलर" असा जयघोष केला व हिटलरप्रमाणेच मी आतां देवाघरीं जात आहे असे शब्द उच्चारले. "तुझें नांव बोल" म्हणून पुकारल्याबरोबर त्याने गुरकावून विचारलें "तुम्हाला तें ठाऊक नाही काय ?" तो शिडी चढत असतां पाद्री भटहि पाठोपाठ चढूं लागला. त्याबरोबर तेवढ्यांतहि खवडाळी करून तो त्याला म्हणाला, "अरे, तूं का बाबा मजबरोबर चढतोस ? मी माझ्या पितरांकडे चाललो आहे. तुला तुझा स्वर्ग आतां बोल्शेव्हिक दाखवितील !" स्ट्रायकरनंतर फ्रिट्झ आल्फ्रेड जोड्ल, सेसेन कार्ट इत्यादिकांचा असा सारा एकच प्रकार होता.

## आसुरीबुद्धीचें निंद्य प्रदर्शन

नाझी पुढाऱ्यांचे प्राण तर अशा रीतीने एकदाचे घेऊन झाले. परंतु आतां दुसरी भीति दोस्तांच्या पोटांत उभी राहिली. सीझरपेक्षांहि त्याचें भूत प्रभावी ठरलें. त्याप्रमाणें या नाझी पुढाऱ्यांचीं प्रेतेंहि न जाणो ठरावयाची ! म्हणून दोस्तांनी आपल्या आसुरी कल्पना–कोषांतून नव्या नव्या कल्पना काढण्यास सुरुवात केली. एक अशी कीं, ह्या लोकांचीं प्रेतें कांहीं एक अंत्यसंस्कार न करतां, थडग्यावर नांव–निशाणी न लिहितां, निरनिराळ्या ठिकाणीं गुप्तपणे पुरून टाकावी. मुसोलिनीच्या बाबत घडलेले प्रकार त्यांच्या डोळ्यापुढे ताजेच असल्यामुळे यावेळीं हा गुप्त दफनाचा प्रकार फारच काळजीपूर्वक करण्यांत येईल असें डॉ. रॉबर्ट कॅंपबल, न्युरेंबर्ग खटल्यांतील अमेरिकन वकील, याने जाहीरहि केलें होतें. पण त्यानंतर तीहि कल्पना धोक्याची म्हणून सोडून देण्यांत आली. नंतर दुसरी सवाई कल्पना अशी काढण्यांत आली की ह्या लोकांची प्रेतें जर्मन भूमींतहि राहूं देऊं नयेत, तर तीं सारी शेजारच्या समुद्रांत नेऊन बुडवून

टाकावीं, म्हणजे जर्मन लोकांना आपल्या पुढाऱ्यांच्या स्मृतिपूजनाला माय-भूमींत यत्किंचितहि आधारलेश सांपडणार नाही. पण तीहि कल्पना त्याज्य ठरली आणि शेवटीं त्या लोकांचीं प्रेतें ख्रिस्ती धर्माविरुद्ध जाळून टाकून त्यांची राख फुंकून टाकण्यांत आली आहे ! ! पण द्वेषाच्या आसुरी बुद्धीने केलेले सारे प्रयत्न निष्फळच होतात, किंबहुना त्यांची अनंतपटीने प्रतिक्रियाच होते हा जगाचा न्याय ते विसरले आहेत. जर्मनींतच कोण्या गुप्तस्थळीं नाझी पुढाऱ्यांची प्रेतें पुरण्यांत आली असती तरी जर्मन जनतेचीं मनें बोक्याने मारलेल्या आपल्या पिलांच्या शोधासाठीं फिरणाऱ्या मांजरीप्रमाणे अखंड देशभर भिरभिरतच राहिलीं असतीं व एरवीं उघडपणे त्यांचीं प्रेतें एका ठिकाणीं पुरण्यामुळे जे एकच संकुचित पूजास्थान किंवा स्फूर्तिस्थान निर्माण व्हावयाचें त्या ऐवजीं जर्मन देशाच्या तसूतसूंत "कदाचित् येथे आमचे पुढारी पुरले असतील," अशा भावनेने जर्मन जनतेने अनंत पूजास्थानें निर्मिलीं असतीं. समुद्रात प्रेतें बुडविलीं तरी काय ? त्या समुद्राच्या लाटा एका पाठोपाठ उभ्या राहून अहोरात्र जर्मनीला पुकारीत राहिल्या असत्या की तुझे पांडवासारखे पराक्रमी पुत्र येथे बुडविले आहेत आणि परिमाण हाच झाला असता की तो सारा समुद्रच जर्मन भूमीइतका पूज्य बनून त्यावरून दोस्तांचें निःसंतान करण्याची प्रतिज्ञा जर्मन देशाने केली असती. आणि आता जर्मन पुढाऱ्यांच्या प्रेतांची राख करून ती फुंकून टाकण्याने तरी दुसरें काय व्हावयाचें आहे ? ती राख जर्मनीच्या वातावरणांत एव्हाना भिनून गेली असेल व तें पुनः गूढस्थ रीतीने नाझीमयच बनलें नसेल कशावरून ! देवदैत्यांच्या युद्धांत दैत्यांनी कचाला मारला, त्याचे तुकडे तुकडे केले. तेवढ्याने विश्वास न वाटल्यामुळे त्यांनीं ते तुकडे जाळून टाकले आणि अखेर ती राख मद्यांतून दैत्यगुरु शुक्राचार्य याला पाजली. कल्पना ही की आता तरी कच जिवंत होणार नाहीं. परंतु अखेर तो कच संजीवनी विद्या संपादन करून त्या शुक्राचार्यांचेंच पोट फाडून सदेह बाहेर पडला ! सारांश आसुरी बुद्धीची पराकोटी जर्मन पुढाऱ्यांबाबत दोस्तांनी पोचवली आहे व तिची प्रतिक्रियाहि तिला अनुरूपच झाल्याशिवाय राहणार नाही.

केसरी २२–१०–४६

— २१ —

# तूर्त इराणांत ब्रिटननें रशियावर मात केली

## ब्रिटनचे उपद्व्याप

२७ सप्टेंबरच्या केसरींत रशियन डावाबर तोड म्हणून दक्षिण इराणांत इराणी सरकाराविरुद्ध बंडें उठविण्याचा कट इंग्रजांनीं कसा केला व त्याचें पर्यवसान कसें झालें याचें दिग्दर्शन केलें होतें. ब्रिटनने पेरलेल्या फितुरानी इराणांत बंडांच्या बावटळीमागून बावटळी सुरू झाल्या. गेल्या ऑगस्ट महिन्यांत इंग्रजांनीं बख्तिआरी जमातीकडून बंड करविलें व इस्पहानपर्यंत त्याचे धागेदोरे पोचविले; एवढेंच नव्हे तर त्याच वेळीं दग्याने तेहरान राजधानी सुद्धा काबीज करण्याचा घाट घातला होता; पण तो वेळींच उमगला व इराण सरकाराने फितुऱ्यांची पारिपत्यें करून बंडाचा बीमोड केला; तथापि हें एक बंड मोडलें तर दुसऱ्या एका जमातीकडून सप्टेंबर २१ पासून दुसरें बंड ब्रिटिशांनी चिथावलें व तेंच इतकें चिघळलें की, इराणांत बऱ्याच मोठ्या प्रमाणाचा एखादें युद्धच पेटल्याचा देखावा दिसूं लागला.

ऑगस्टमधील बंडानंतर इराणी सरकारने स्पष्टपणे बंड उठविल्याचा आरोप ब्रिटिशांवर घातला होता तो त्यांनी नाकारला व अद्यापहि ते तो नाकारीत आहेत ! परंतु या सर्व भानगडीमागील इंग्रजांची कारस्थानें आतां पत्त्यामुद्यासुद्धा जगासमोर येत आहेत. टास एजन्सीने तर असें सांगितलें आहे कीं, कशगाईचें बंड खुद्द इराणांतील ब्रिटिश वकीलांनीच शिरोपस्थता स्वीकारून चेतविलें ! अनवाझ येथील ब्रिटिशकॉन्सल ज.

ट्रॉट आणि दुसरा वकिलातीपैकीच जबाबदार अधिकारी चार्लस गोल्ड यांनी कशगाई व बख्तिआरी टोळ्यांना चिथावणी दिली. ट्रॉट हा याचसाठी सप्टेंबरांत इस्पहानला गेला होता. तेथे ट्रॉट, गोल्ड व इराणी पहाडी टोळ्यांचे चार खानबंधु पुढारी यांची खूप खलबतें झालीं; व तेव्हाच १६ सप्टेंबर रोजीं बख्तिआरी जमातीने इस्पहान जिंकावें व खुजिस्तानावर चाल करावी असा नकाशाहि ठरला. बंडखोरांना हत्यारें व युद्धसामुग्री ब्रिटिशांनी पुरविण्याची हमी घेतली व इराणी सरकारच्या सैन्यांतील एक सेनापति क. खेडझारी यासहि फितूर करून घेतलें होतें. त्याच्या मार्फत ती युद्धसामुग्री राजरोसपणें बंडखोर जमातीच्या हातीं जावी अशी तजवीज करण्यांत आली होती. पूर्वी सुमारें २ महिन्यांपासूनच इंग्रजांनी बसऱ्यास खूप सैन्य हिंदुस्थानांतून नेलें होतेंच; तें उघडच बंडखोरांना वेळ पडल्यास मदतीची हमी म्हणूनच हें काय सांगावयास पाहिजे ? तीं सैन्याची भरती ब्रिटिशांनी वाढविण्याचें सुरूच ठेवलें. ता. ३ आक्टोबर रोजींहि कराचीहून पुन्हा दोन अडीच हजार सैन्य बसऱ्याला रवाना झाल्याचें वृत्त होतेंच.

## कशगाई बंडाची हकीकत

इराणी सरकारनें ब्रिटनला त्यांच्या फितुरी वकिलांचीं नांवें कळवून त्या दोघांनाहि काढून न्यावें अशी निकराची मागणी केली व तो आरोप तोंडाने नाकारीत असतांहि प्रत्यक्ष कृतीने पुरी करण्याची तयारी ब्रिटनला करावी लागली. यावरून वस्तुस्थितीवर योग्य तो प्रकाश पडतच आहे. ता. ४ आक्टोबर रोजीं मशारनिल्हे आरोपी चार्ल्स गोल्ड याला ब्रिटिशांनी परत बोलाविण्याचे ठरविल्याचें अधिकृतपणे जाहीर केलें. वास्तविक गोल्ड व ट्रॉट् या दोघांनाहि ताबडतोब काढून घ्यावें अशी इराणी सरकारची मागणी होती; पण कदाचित् हलके हलके ट्रॉट्लाहि पुढे काढून घेण्यांत येईल. लौकिकांत मात्र ब्रिटिश सरकारने असे जाहीर केलें कीं, " इराणी सरकारच्या दमबाजीमुळे कांही आम्ही गोल्ड्ला काढून घेतलेलें नाहीं. त्यांची बदली अगोदरच करण्याचें आम्ही ठरविलें होतें. "

असो; आता इंग्रजांच्या कर्तृत्वाने दक्षिण इराणांत जो युद्धाचा भडका उडाला त्याचा तपशील पाहूं. कशगाई बंडखोर पहाडी, जंगली अशा फिरस्त्या जमातींपैकी असले तरी घोड्यावर बसण्यांत बाळाभ्यासी आणि पटाईत शिलेदार आहेत व त्यांना अँटीटँक गन्स, मशीनगन्स इत्यादि सर्व सुधारलेली यांत्रिक हत्यारेंहि वापरतां येतात. त्यांच्या घोडदळाचे जे फोटो लाईफ् वगैरे पत्रांतून प्रसिद्ध झालेले आहेत त्यांवरून युद्धकलेबाबत तसे ते बिलकूल जंगली नाहींत; उलट युरोपियन सैन्याची शिस्त व शिक्षण त्यांना पोचलेलें दिसतें. या कशगाई व अरब टोळ्यांनी पर्शिअन गल्फच्या उत्तरेस बुशायर, शिराझ, काझरून, आर्डाखान, खोर्मन शहर इत्यादि ठाणी जवळ जवळ जिंकल्यासारखी होती. त्यांनी प्रथम बुशायर व शिराझ या दरम्यानचीं तीन गांवें जिंकून मग बुशायरला वेढा घातला. बुशायर हें इराणांतील मुख्य बंदर व गल्फ्पोर्ट नामक राज्यकारभारप्रमुख खात्याची राजधानी. या गल्फपोर्टच्याच ताब्यांत फार्स प्रांताचा कांही भाग आणि इराणच्या दक्षिणेकडील बंदरे यांचा कारभार असतो. ब्रिटिश कॉन्सल जनरलची कचेरी बुशायरच होय. बुशायर येथूनच शिराझ, तेहरान, इस्पहानकडे व्यापारी रहदारीचे रस्ते वाहतात व याच बंदरांतून बाहेर बसरा, हिंदुस्थान, इंग्लंड, ईजिप्त व इतर युरोपियन राष्ट्रें यांच्याशी व्यापारी दळणवळण चालतें. १७३६ सालीं बुशायर शहराची स्थापना नादिरशहाने केली व येथेच इराणी आरमाराचे मुख्य ठाणें केलें. असल्या महत्त्वाच्या ठाण्याचा कबजा बंडवाल्यांनी घेतला तेव्हा इराणी सरकारानेहि तातडीने मदत पाठविली, पण लाग चालेना; तेव्हां विमान काफलें पाठवून बॉंब बरसात उडविली. बुशायरच्या उत्तरेस आबादाननजिक खोर्मनशहरहि टोळीवाल्यांनी जिंकल्याचें वृत्त होतें. तेहरान आणि बगदादमधील दळणवळणाचें तेंच मुख्य केंद्र होय. शिराझच्या वायव्येस तीन मैलांवरील मशीदबार्डी ठाणें जिंकून त्याच्या उत्तरेस अर्दाखान ठाण्यावरहि त्यांनी हल्ला चढविला; पण त्यांत त्यांचाच फार नाश झाला. शिराझजवळील 'बंडामीर' नांवाचें असेंच एक तिठ्याचें ठाणें बंडवाल्यांनी जिंकलें. बुशायरच्या ईशान्येस व शिराझच्या वायव्येस 'काझरून' नांवाचें महत्त्वाचें लष्करी

ठाणेंहि बंडवाल्यांनी जिंकलें. या ठिकाणीं फारच भयंकर लढाई झाली व बहुधा शहरांतील एकूणएक शिपाई मारला गेला. काझरून येथील नाश इतका मोठा होता की त्यासाठीं तेहरान राजधानींत सुतक पाळण्यांत आलें !

## रशियाचा इराणमागें पुन्हा लकडा

इकडे दक्षिणेंतील ब्रिटिशांच्या या काचामुळे पंतप्रधान घावम सुलताने अगदी कायल झाला होता आणि त्याच वेळीं तिकडे पुन्हा रशियानेहि त्याची हैराणगत आरंभिली ! रशियाने इराणच्या मागे लकडा लावला की, "आमच्या तेलाबाबतच्या सवलतींचा विचार आताच करा. पुन्हा एकदा तुम्हांस समज देतो उर्फ विनंति करतो." यावर रशियाचे तोंड बंद करण्यासाठी घावम सुलतान याने सांगितले कीं, "तशा कराराला इराणी पार्लमेन्टची संमति हवी; तेव्हा नव्या निवडणुका आधी उरकून घेतो." असें ठरवून त्याने इराणी शहाकडून पार्लमेन्टच्या निवडणुकी जाहीरहि केल्या. पण या दंगलीच्या अवस्थेंत त्या होणें अशक्य असें इराणी लोकच उघड म्हणत होते आणि तें लक्षांत घेऊनच पुन्हा रशियाने असे तुट्टे लाविले की, "सध्या सर्वपक्षीय पुढाऱ्यांची एक परिषद बोलावून आम्हांला आधी सवलती देऊन टाका; मग पार्लमेन्ट केव्हा भरेल तेव्हा त्याचीहि मंजुरी सावकाश घेऊन द्या म्हणजे झाले !"

याखेरीज रशियाने इराणी सरकारला असा दुसरा लकडा लावला कीं, १९३७ सालीं सादाबाद येथे तुर्कस्तान, इराण, अफगाणिस्तान आणि इराक यांनी जो एक परस्पर स्नेहाचा व साहाय्याचा करार केला होता तो तत्त्वतः रशियाविरोधी असल्यामुळे, इराणने तरी त्यांतून आपलें अंग काढून घेतल्याचें जाहीर करावे. तसें केल्यास इराणला संरक्षणाची कदाचित् पंचाईत उभी राहील. त्यासाठी रशिया इराणशी एक नवा लष्करी करार करावयास तयार आहे. रशिया वाटेल तेवढी शस्त्रसामुग्री पुरवील. असा करार करण्यास इराणने कबुली दिली तर अझरबैझान् प्रांतांतहि इराणी सैन्याला अडथळा होणार नाही.

## इराणी सरकारची कसरत

अशा रीतीने दक्षिणेकडून ब्रिटिश व उत्तरेकडून रशिया यांनी इराणच्या तंगड्या दोन दोन्ही दिशेस ताणून इराणची जरासंधासारखी अनुकंपनीय स्थिति करून टाकली. दोघांनीहि आणलेलें दडपण मोठें; तेव्हा दोघांच्या तोंडाला हात लावून थोपवाथोपवी करतांना बिचाऱ्या घावम सुलतानला किती कठीण कसरत करावी लागत आहे याची कल्पनाच केली पाहिजे सध्या त्याने जो मार्ग अनुसरला आहे त्यावरून त्याने रशिया व ब्रिटन यांचें तात्पुरतें समाधान कसें तरी केलें आहे. रशियाला त्याने तेलखाणीबाबत स्पष्ट नकार दिला नाहीं, परंतु नवीन पार्लमेंटाकडूनच त्या योजनेला संमति घ्यावी लागेल असें कायदेशीर कारण सांगून, नवीन निवडणुकी या दिवसांत होणें अशक्य असतांहि त्या अमुक अमुक दिवशीं करूं असें जाहीर तर करून टाकलें. तसेंच रशियाच्या इच्छेप्रमाणे इराणांतील एकतरी फितुरी इंग्रज वकील तक्रार करून ब्रिटनला काढून घेण्यास भाग पाडले.

उलटपक्षी ब्रिटनला खूष करण्यासाठी त्याने पुढील गोष्टी केल्या. पहिली मुख्य गोष्ट ही की, रशियनपक्षपाती तीन टुडेह मंत्री, कारभारी-मंडळांत घेतले होते त्यांना काढून लावून, नवे प्रधान-मंडळ बनविलें. या प्रधान-मंडळांत घावम सुलतान याने गेल्या जून महिन्यांत स्थापलेल्या न्यू डेमोक्रॅटिक पक्षाचेच लोक आहेत व त्यांना ब्रिटनचा विरोध नाही. ज्या फार्स प्रांतातील कशगाई टोळ्यांना पुढे करून ब्रिटनने बंड करविले त्या कशगाईच्याहि कांही अटी मान्य केल्या आहेत. मुख्य अट फार्स प्रांतांत प्रांतिक व नागरिक कौन्सिल स्थापणें आणि त्या प्रांतातील इराणी सरकारचे अधिकारी तत्प्रान्तीय नेमणें येवढ्याच महत्त्वाच्या आहेत. बाकी रेल्वे काढूं, रस्ते सुधारूं, आरोग्य सांभाळूं असलीं दुय्यम आशीर्वादात्मक आश्वासनेंच बरींच आहेत. कर्नल हेजाजी हा पूर्वी दक्षिण इराणांतील खुजिस्तान प्रांतातील एक सेनापति होता व २४ सप्टेंबरच्या सुमारास इराणी सरकारने त्यास फितुरी ठरवून राजद्रोह केल्याच्या आरोपावरून पकडलेंहि होतें. पण त्यासच आता इराणी वॉर मिनिस्ट्रीमध्ये थर्ड ब्यूरोचा चीफ म्हणून नेमलें आहे.

ब्रिटनच्या चिथावणीने कशगाईंनी उभारलेले बंड यशस्वी होऊं शकलें नाही. रशियाच्या जबरदस्त साहाय्यामुळे अखेर त्या कशगाई लोकांना इराणी सरकारला शरण जाऊन सलोखा करून घेणेंच भाग पडलें; अर्थात् त्या मानाने ब्रिटनने मिळविलेल्या सवलती कांही वाईट किंवा फार स्वल्प म्हणतां येत नाहीत. असो; आता यापुढील काळांत रशिया व इंग्लंड पुनः काय काय हालचाली करतील व इराणी सरकार पुनः त्याला तोंड कसें देईल व अमेरिका या प्रकरणीं आपला हात केव्हा कसा घुसवील हें पाहत बसलें पाहिजे. अमेरिकेला हस्तक्षेप करण्यास आता इराणी सरकारनेच जाहीर आवाहन केले आहे. परवा प्रिन्स मुझफ्फर याने २४ आक्टोबर रोजीं स्पष्टच सांगितलें की, "अमेरिकेने छोट्या राष्ट्रांच्या हक्कांच्या संरक्षणाची नुसती पोपटपंची न चालवितां तशी कांही कृति करून दाखविली तरच तिच्या शब्दाला कांही किंमत आहे असें आम्ही समजूं. इराणला अमेरिकेने आर्थिक साहाय्य सढळ हाताने करावें."

केसरी, ५-११-४६

☆

— २२ —

# ज्यू क्रांतिकारकांचा धिंगाणा

## तीन क्रांतिकारक संघटना

गेल्या १३ सप्टेंबरच्या 'केसरी'त ब्रिटिश पंतप्रधान अॅटली यांनी लंडन येथे खास पॅलेस्टाईन परिषद बोलावून, पॅलेस्टाइनमधील अधिकृत ज्यू व अरब प्रातिनिधिक संस्थांनी तीवर बहिष्कार पुकारला, अमेरिकेने तीविषयी तुच्छता दर्शविली व ज्यू क्रांतिकारकांनी चेवून अधिकाधिक प्रमाणावर अत्याचार सुरू केले, तरीहि ती परिषद संकल्पाप्रमाणे सुरू केलीच; येथपर्यंत हकीकत नमूद केली होती. त्यानंतरच्या महिन्या-सव्वा महिन्याच्या अवधींत काय परिस्थिती झाली हें आता पहावयाचें आहे.

पॅलेस्टाईन प्रश्नांत गुंतलेले मुख्य चार पक्ष म्हणजे ज्यू क्रांतिकारक, अरब, ब्रिटन व अमेरिका हे होत. प्रथम क्रांतिकारक. यांच्या अविरत उत्पन्नामुळेच पॅलेस्टाइनचा प्रश्न इतका निकरास आला. यांचें बळ अद्यापहि कमी झालेलें दिसत नाही ही खरोखरच आश्चर्याची गोष्ट होय. तेव्हा त्यांच्या हालचाली प्रथम पाहूं.

ब्रिटिशांचे पांच डिव्हिजन इतके म्हणजे ८० हजार सैन्य तेथे लष्करी कायदा पुकारून बसले आहे तरी ज्यूंचे अत्याचार एका मागून एक स्फोट पावतच आहेत. याचें कारण अर्थातच हें आहे की, ज्यू लोक हे अत्यंत बुद्धिमान, कल्पक असून त्यांच्या आत्यंतिक पॅलेस्टाइन प्रेमाला वरील दोन गुणांची जोड मिळाली आहे. अद्ययावत् संहारक शास्त्राची व शस्त्रांची त्यांस पूर्ण माहिती आहे व गेल्या महायुद्धांत हजारो ज्यूंनी

सैनिक म्हणून दोस्तांच्या बाजूने लढाया घेतल्या आहेत. कांही कांही ज्यूंनी तर ब्रिगेडियरसारखे सेनापतींचे मोठे दरकहि चालविले होते. ज्यू क्रांतिकारकांत निरनिराळ्या तीन स्वतंत्र संघटना आहेत. पहिली हॅगाना ही ६५ हजारांची गुप्तलष्करी संघटना असून त्यांत पुन्हा २००० लोकांचे एक पालमाक पथक आहे. पालमाक पथकाचें काम 'कमांडो' जातीचें असून ते बेकायदा ज्यूंना पॅलेस्टाइनमध्ये आणून उतरविण्याच्या कामीं व ब्रिटिश त्यांना सायप्रसला सक्तीने धरून नेतात त्यास विरोध करण्याच्या कामीं मदत करीत असतें. खेरीज रस्ते पूल उडविणें हींहि कामें तें करते. या पथकाने सप्टेंबरच्या सुरवातीपर्यंतच १५१ ठिकाणीं पॅलेस्टाईन रेल्वे रस्ता उडविला व आठ पूल पाडून टाकले होते ! इरगून झावीलेऊमी व स्टर्नग्रॅंग हे दुसरे दोन मोठ क्रांतिकारक पक्ष. स्टर्नग्रॅंग जवळ ५००० कडवे लोक आहेत. प्रत्यक्षच युद्ध सुरू झालें तर १ लक्षपर्यंत तरी कसलेले सैनिक ज्यूंना रणांगणावर खास उभे करतां येतील म्हणतात.

## उत्पातांच्या आवृत्त्यावर आवृत्त्या

ब्रिटनने पॅलेस्टाईन परिषद बोलाविल्यापासून या संघटनांना दुप्पट चेव आला. कारण पॅलेस्टाइनमधील सर्वांत प्रमुख व मोठी अशी जी ज्यूइश एजन्सी तिच्या कार्यकारिणीतील पांच प्रमुख पुढारी व ७००० कार्यकर्ते आधी तुरुंगांत डांबून ठेऊनच नंतर ही परिषद भरविण्यांत आली होती. म्हणून परिषदेंत जे ज्यू पुढारी भाग घेतील ते 'फितुरी' म्हणून त्यांना त्यांनी धमकीची पत्रें पाठविली. फार काय लंडन ब्रिटिश पोलीस हेडक्वार्टरलाहि निरोप पाठविला की, जे ज्यू परिषदेंत भाग घेणार आहेत त्यांना आम्ही नाहीसे करणार आहोत, सावध राहा !

३१ सप्टेंबर रोजी रात्रीं ३ ठिकाणीं ब्रिटिश सैनिकांवर हल्ले करण्यांत आले. सर्वत्र स्फोटक भुइसुरुंग पेरून ठेवण्यांत आले होते. ६ ऑक्टोबर रोजीं पुनः दोन ब्रिटिश सोजिरांचे मुडदे पाडण्यांत आले. हैफा येथील सी. आय. डी. खात्याचे सार्जंट मार्टिन व तेलाव्हीव्हमधील सेक्युरिटी ऑफिसांतील मेजर डेस्मॉंड डॉरन यांचे खून आम्हीच पाडले असें जाहीरपणे स्टर्नगॅंगने घोषित केलें. ८ ऑक्टोबर रोजीं हैफा व तेलाव्हीव्ह

दरम्यान ब्रिटिश सैनिकांनीं भरलेली एक आगगाडी उडवून देण्याचा एक प्रयत्न करण्यांत आला. जेरुसलेम व आसपासच्या रहदारीच्या सर्व रस्त्यावर सुरुंग पेरण्यांत आल्याचें उघडकीस आले यामुळे पॅलेस्टाइन-मधील चारी ज्यू वस्तींतून कर्फ्यू पुकारावी लागली.

लेक गॅलीलीच्या किनाऱ्यावर एके ठिकाणीं क्रांतिकारकांनी सांठविलेले दारु गोळ्याचें व हत्याराचें एक कोठारच उघडकीस आलें. त्यांत शेंकडो अमेरिकन डेटोनिटर्स, शेंकडो हातगोळे व दारुगोळी सांपडली. २० रोजी हैफा व साफेद दरम्यानच्या टेलिफोन तारा क्रांतिकारकांनी तोडून टाकल्या. पुढे दोन दिवसांनी ज्यूईश एजन्सी ब्रिटिशांशीं वाटा-घाटी करूं लागली होती. त्याच्या निषेधार्थ स्टर्नगँगने पुढची चुणूक म्हणून आधी पँफ्लेट बाँब्स् एजन्सीच्या पब्लिक रिलेशन्स ऑफिसर्सच्या अंगावर टाकले. त्याच दिवशीं पुनः दोन रेल्वे इंजिनें व ६० फूट रेल-रस्ता सुरुंगाने उध्वस्त करण्यांत आला. हायफा रेल्वेस्टेशन अगोदर सूचना देऊन, उडवून देण्यांत आलें. २२ रोजीं तेलाव्हीव नजीक एका ब्रिटिश ऑफिसर्स असलेल्या लष्करी लॉरीवर हल्ला चढविण्यांत आला. त्यांत एक ब्रिटिश ऑफिसर ठार झाला. पुनः २ दिवसांनी तेलाव्हीव व हायफा येथे आगगाड्या पाडण्यांत आल्या.

## पॅलेस्टाइनबाहेरहि ब्रिटिशांशी लढा

त्यानंतर लगेच आणखी एक धाडसी प्रयत्न झाला तो पॅलेस्टाईनमधील ब्रिटिश सेनापति ले. ज. सर एव्हलीन बार्कर याला उडविण्याचा. त्याच्या-वर क्रांतिकारकांचा अतीच दांत आहे आणि म्हणूनच पांच महिन्यांतच त्याला परत ब्रिटनमध्ये बदलल्याचेंहि जाहीर झालें होतें. बार्कर ब्रिटनला परत निघण्याच्या दिवशीं एके ठिकाणीं मेजवानी घेत होता, तेथेंच हा बार उडावयाचा होता; परंतु मेजवानीच्या आधीं २ तास क्रांतिकारकांनी आपला बेत टेलिफोनवरून सांगण्याचें औदार्य दाखविलें. त्यामुळे कडक लष्करी बंदोबस्त करून तो समारंभ कसातरी संपवून बार्कर जिवानिशी सुटला ! २२ रोजीं चुणूक म्हणून पँफ्लेट बॉंब टाकल्यानंतर दोन दिव-

सांनी खरेखुरे बॉंब एजन्सी बिल्डिंगमध्ये टाकण्यांत आले. त्यांत अनेक लोक जाया झाले ! नंतर दुसऱ्या दिवशींहि एक अघोरी प्रयत्न झाला ! जेरुसलेम पोलीस स्टेशनांतच अनेक बॉंब सांपडले ! रात्रीं ब्रिटिश पायदळ चौकीसाठी ज्या ज्या जागा धरून उभे राहणार होते, नेमक्या त्या त्या जागींच, महायुद्धांतील जर्मनांप्रमाणे क्रांतिकारकांनी बूबी ट्रॅप्स पेरून ठेवलेले होते. त्यांच्या अपेक्षेप्रमाणे स्फोटावर स्फोट होऊन, अनेक सोल्जर्स जखमी झाले. या हाहाकारामुळे १॥ तासपर्यंत धोक्याच्या सायरन्सच्या विव्हळ-ण्याने सर्वत्र धावाधाव उडून गेली होती. प्रत्यक्ष चकमकीहि बऱ्याच ठिकाणीं झाल्या. नंतर पुनः १ नोव्हेंबर रोजीं तेलाव्हीव्हजवळ स्फोट झाले. ७ नोव्हेंबर रोजीं इरगून झावी संघटनेने ' आमचे रेल्वे रस्ते उड-विण्याचें धोरण असेंच पुढे चालू ठेवण्याचें ठरलें आहे, ' असेंच जाहीर करून टाकलें ! ! सारांश, ज्यूंतील क्रांतिकारक पक्ष आता एकांतिक बनला असून, इतर ज्यू पक्षांनाहि विचारीत नाही. तूर्त ब्रिटिश हेच त्याचे एकमेव हाडवैरी झाले असून, पॅलेस्टाइनांतच काय पण पॅलेस्टाइन बाहेरहि त्यांस सतावण्यास सुरवात त्याने केली आहे. रोममधील ब्रिटिश वकीलातीची इमारत त्यांनी उडवून दिली व पत्रक काढून पॅलेस्टाइन-बाहेरहि ब्रिटिशांशीं युद्ध पुकारल्याचें जाहीर केलें !

## बेकायदा ज्यू आयात

पॅलेस्टाइमध्ये अत्याचार करीत राहणें हा क्रांतिकारक ज्यूंच्या कर्तव्यां-पैकीं जसा एक भाग, तसा दुसरा भाग म्हणजे बेकायदा ज्यू गलबतें भरून आणून ती पॅलेस्टाईनमध्ये उतरविणें. व तें काम सवड सांपडेल त्याप्रमाणे पण नेटाने त्यांनी सुरू ठेवलेंच आहे. ता. २२ सप्टेंबर रोजीं ' पालमाक ' नांवाचें गलबत ब्रिटिश आरमाराने गिरफदार केलें. त्यावर ८०० ज्यू होते व त्यांनी बरोबर भरपूर दारूगोळा व बॉंम्बसहि आणले होते ! हें गलबत ताब्यांत घेतांना ब्रिटिशांना छोटीशी लढाईच करावी लागली. त्या दंगलींत अनेक ज्यू जखमी झाले व एक ठारहि झाला. यानंतर बेकायदा गलबतें फार मोठ्या प्रमाणावर नक्की येणार आहेत अशी हूल उठल्यामुळे किनाऱ्यावरील ब्रिटिश आरमाराचा बंदोबस्त

फारच कडक झाला; पण पुढे १०-१५ दिवस तसे कांही घडलें नाही. म्हणून थोडी शांतता होते तोंच २४ ऑक्टोबर रोजीं पुनः ८१९ ज्यूंचें एक गलबत आलें. तेंहि अर्थात् सक्तीने पकडून सायप्रसला नेण्यांत आलें. त्यानंतर परवा १ नोव्हेंबर रोजीं फिरून १४०० ज्यूंचें एक गलबत हैफाला गिरफदार करण्यांत आले आहे. सारांश, ज्यूंचे क्रांतिकारक उपाय थांबण्याचे चिन्ह दिसत नाही व अमेरिकेने फूस दिल्यामुळे तर ब्रिटिशांनी कितीहि कडक उपाय योजले तरी ते वाढतच आहेत. इंग्लंडचा कितीहि विरोध असला तरी आणखी एक लाख नवे ज्यू पॅलेस्टाइनमध्ये ताबडतोब आणून भरलेच पाहिजेत या पुनः पुनः उच्चारण्यांत येणाऱ्या अमेरिकन घोषणामुळे ज्यू पिसाट बनत आहेत. त्यांतच ८ नोव्हेंबर रोजीं रॉयटरनेच असा स्फोट केला कीं, १ लाख ज्यू निर्वासितांना पॅलेस्टाइनमध्ये आणून सोडण्याची योजना युरोपांतील अमेरिकन लष्करी अधिकाऱ्यांनी पुरी केली असून त्यासाठी इटालींतील जिनोवा बंदरहि मुक्रर केलें आहे! याचा इष्ट तो परिणाम तात्काळ झालाच. इटलींतील अन्नाच्या कँपांत वस्ती करून राहिलेल्या ज्यूंमध्ये मोठी धमाल उडून गेली. 'आपण अखेर जिंकली' या आनंदाने बेहोष होऊन त्यांच्या मोठमोठ्या टोळ्या कायदा गुंडाळून ठेवून वाटेल तसा धुमाकूळ घालीत आहेत. तेथे वार्ता अशाच उठत आहेत की, आरमारेच्या आरमारें भरून सामुदायिक रीत्या ज्यूंना पॅलेस्टाइनकडे नेण्यांत येणार आहे. त्यासाठी जिनोआ, सॅव्होना, आलिस्पेझिया या बंदरांत गलबतें खडीं आहेत.

केसरी २२-१०-४६

★

— २३ —

# पॅलेस्टाइन प्रकरणीं अमेरिकेने ब्रिटनवर मात केली

## ' रामा ' खेरीज ' रामायण '

पॅलेस्टाईन प्रकरणीं क्रांतिकारक ज्यूनंतर महत्त्वाचा घटक ब्रिटन होय. त्याने लंडन येथे पॅलेस्टाईन परिषद बोलावून, तो प्रश्न निकालांत काढण्याचा प्रयत्न केला. पण त्यांत त्यांची कल्पनेबाहेर फजीति झाली. कारण या वादांतील वादी- प्रतिवादी असे जे पॅलेस्टाईनमधील अरब व ज्यू त्यांनी या लंडन परिषदेचें मुखावलोकनहि केलें नाही. या परिषदेंत ब्रिटन आपली जी योजना चर्चेसाठी मांडणार होतें ती अरबांना बिलकुल पसंत नव्हती. त्यांनी कळविलें की, " आधी आमच्या ग्रँडमुफ्तीला निमंत्रण द्या. तोच आमचा खरा पुढारी आहे. दुसरें असें की, तुमच्या परिषदेंत पॅलेस्टाइनची फाळणी, फेडरेशन, किंवा कँटोनायझेन असल्या कोठल्याच बाबी चर्चेसाठी येता कामा नयेत. पॅलेस्टाईनला पूर्ण स्वातंत्र्य देऊन तें स्वयंपूर्ण स्वसत्ताक झालें पाहिजे हीच आमची मागणी व हीवरच परिषदेंत आम्ही चर्चा करूं. " ही मागणी अर्थातच ब्रिटनकडून मान्य होणें शक्यच नव्हतें. यामुळे ३१ ऑगस्ट रोजीं पॅलेस्टाइनमधील अरब हायर एक्झिक्यूटिव्हनें लंडन परिषदेवर जाहीरपणे बहिष्कार पुकारला. उलटपक्षीं पॅलेस्टाइनमधील ज्यूइश एजन्सीनेहि निराळ्या कारणाकरिता पण तोच मार्ग अनुसरला. ज्यूइश एजन्सीच्या मागण्या अशा होत्या की, " परिषदेंत जे ज्यूप्रतिनिधि जातील ते फक्त आम्हीच निवडलेले असले पाहिजेत.

तसेंच परिषदेंत फेडरल प्लॅनची चर्चाच होता कामा नये." सारांश, हे दोन्हीहि मुख्य पक्ष परिषदेंतून गळाले तरी ब्रिटनने हट्टाने परिषद भरविलीच. तिला फक्त अरब राष्ट्रांचेच प्रतिनिधि तेवढे हजर राहिले होते. त्या राष्ट्रांनीहि परिषदेवर बहिष्कारच पुकारावा असें ता ३१-८ रोजीं अरब हायर एक्झिक्यूटिव्हने सुचविलें होतें पण ते सफळ झालें नाहीं. व्यापक दृष्टीने ब्रिटनने मनांत असा विचार योजला होता की, पॅलेस्टाईन अरबांच्या गमजा त्यांच्या भोंवतालच्या सात भाईबंद अरब राष्ट्रांच्या पाठिंब्यामुळे चाललेल्या ! तेव्हा त्यांना फितवतां आलें तर तेच पॅलेस्टाइनमधील अरबांना समजुतीच्या गोष्टी सांगतील व शुद्धीवर आणतील. अरब राष्ट्रें हीं खुद्द पॅलेस्टाइनमधील अरबांइतकीं प्रतिनिविष्ठ असण्याचें कारण नाहीं हें खरेंच. म्हणूनच अखेर सौदी अरेबिया, ट्रान्सजॉर्डन, सीरिया, लेबॅनॉन, इराक, इजिप्त आणि येमेन या अरबी राष्ट्रांचे प्रातिनिधि परिषदेस हजर राहिले; तथापि त्यांनीहि पहिल्या दोनच दिवसांत ब्रिटनवर लाथा झाडून ब्रिटनला अमान्य होतील अशाच भरमसाट मागण्या केल्या.

## अरब राष्ट्रांनी सुचविलेली तोड

ठरल्याप्रमाणे परिषद तर भरली; आणि पंतप्रधान ॲटली यांनी या अरब राष्ट्रप्रतिनिधींना गोंजारण्याचा खूपच प्रयत्न केला. ते म्हणाले, "या परिषदेस पॅलेस्टाइनमधील अरब हजर राहिले नाहीत ही खरोखरच फार खेदाची गोष्ट होय; परंतु तसें पाहिलें तर येथे हजर असलेले इतर अरब राष्ट्रांचे प्रतिनिधि हेही पॅलेस्टाइन अरबांइतकेच प्रतिनिधीभूत आहेत ! ते जो विचार मांडतील तो पॅलेस्टाइन अरबांच्या विचाराशीं फारसा विसंगत नसणारच !" नंतर ॲटली यांनी ब्रिटनने अरब राष्ट्रावर केलेल्या उपकारांचा पाढा वाचून प्रच्छन्नपणें या प्रसंगीं आम्हांवर दया करून, या पेंचप्रसंगांतून आम्हास सोडवा व प्रत्युपकार करा असें सुचविलें. गेल्या महायुद्धांत ब्रिटननेच ऑटोमन साम्राज्य फोडलें आणि म्हणूनच तुम्हा अरब राष्ट्रांच्या उत्कर्षाला व ध्येयसाधनाला वाव मिळाला आहे. 'यूनो 'त ट्रान्सजॉर्डनला ब्रिटनच्या हट्टा-

मुळेच प्रवेश मिळाला. सीरियन व लेबॅनीज राष्ट्रांना तेथे सभासदत्व प्राप्त झाले तेंहि आमच्याच खटपटीमुळे. इतका तुमचा आमचा स्नेह, ऋणानुबंध. फक्त या एकट्या पॅलेस्टाइन प्रकरणींच काय तो ब्रिटिश व अरब हितसंबंधांत तिढा पडलेला दिसत आहे. पण तुम्ही मनावर घेतल्यास त्याचा परिहार सहज होऊं शकेल. असें ॲटलींनी अरब राष्ट्र प्रतिनिधींना खूप गोंजारलें; पण या स्तुतिवादाचा कांहीच परिणाम अरब राष्ट्रप्रतिनिधींवर झाला नाही. त्यांनी एका पाठोपाठ ब्रिटिशविरोधी भाषणें केलीं. शेवटीं तुमची लेखी योजना काय ती द्या असें ब्रिटनने सुचविलें तेव्हा तीहि त्यांनी सादर केली. ती योजना म्हणजे पॅलेस्टाइन-मध्ये अरब वर्चस्व अबाधित रहावें अशीच होती. सात अरबांचें व तीन ज्यूंचें एक इंटेरिम् गव्हर्नमेंट स्थापावें, त्याने ६० लोकांच्या कान्स्टिटयूअंट असेंब्लीच्या निवडणुकीची तयारी करावी, पॅलेस्टाइनच्या नागरिकत्वाचे हक्क १० वर्षे तेथे राहिलेल्यांनाच किंवा १९३९ मे पूर्वी कायम स्थाइक झालेल्यांनाच असावे. हायकमिशनरच्या हातीं व्हेटोची सत्ता असावी व पॅलेस्टाइनमधील कोणत्याहि कारभारखात्यांत $\frac{1}{3}$ पेक्षा ज्यूंचें अधिक प्राबल्य होणार नाही अशी दक्षता कमिशनरने घ्यावी, अशी होती. ही अरब राष्ट्रांची लेखी योजना मिळाल्यावर त्यावर कालहरणाचा राजमान्य मार्ग जो कमिटी नेमणें तो अवलंबून ब्रिटनने परिषद १६ डिसेंबरपर्यंत तहकूब केल्याचें जाहीर केलें !

## पुनः ज्यूंची पायधरणी

अशा रीतीने परिषदेचा पूर्ण विचका झाला. ब्रिटनची एक तऱ्हेने अब्रू गमावली. त्यांतच अमेरिकेने 'परिषद होवो, न होवो, आताच १ लाख नवे ज्यू पॅलेस्टाइनमध्ये तावडतोब आणून भरलेच पाहिजेत' अशी घोषणा करून ब्रिटनला आणखी सतावलें; आणि त्यामुळे पॅलेस्टाइनमधील क्रांति-कारकांच्या अत्याचारांना पुनः प्रचंड भरती आली. ब्रिटन अगदी दीनवाणें झालें. त्यांतच तिकडे इजिप्तचा प्रश्न नेटास लागला व पॅले-स्टाइनचा प्रश्न आधी मोकळा केल्याखेरीज इजिप्तची निरगांठ सोडविणें ब्रिटिशांना इष्ट नाही. कारण इजिप्तमधून हकालपट्टी होणारच तेव्हा

तेथलें सैन्य, मध्यपूर्वेतील ब्रिटिश साम्राज्याच्या स्थैर्याकरिता राखावयाचें तर तें पॅलेस्टाइनमध्ये ठेवणेंच आवश्यक. तेव्हा शेवटीं ज्या ज्यूंना प्रथम त्यांनी झिडकारलें व ज्यांच्या नाकावर टिचून अरब प्रतिनिधींना लंडनला बोलावून ब्रिटनने परिषदेचें नाटक साजरें केलें त्याच ज्यूंची पुनः मनधरणी, पायधरणी करण्याचा प्रसंग त्याजवर आला. या वेळीं त्यांनीं भेदनीतीचें तंत्र अवलंबिलें. ज्यू लोकांत सगळेच कांही जहाल क्रांतिकारक नाहीत. शांत, सौम्य, रागीट, तापट, हेकट, जहाल, ज्वलज्जहाल अशा त्यांत पायऱ्या आहेतच. स्टर्नगँग किंवा इर्गुनझावी असल्या एकांतिक क्रांतिकारकांशीं त्यांना बोलणें करणें शक्यच नव्हतें किंवा नाही; पण डॉ. विझमन किंवा डॉ. गॉल्ड प्रभृतींच्या पक्षाशीं त्यांना दुवा जोडणें शक्य होतें. तो जोडण्यासाठी प्रथम ब्रिटनने निरानिराळ्या कॉन्सेन्ट्रेशन कॅम्पांत अडकवून ठेवलेल्या ज्यूइश एजन्सीच्या कार्यकर्त्यांना हळूहळू मुक्त करण्याच्या उपक्रमाला सुरवात केली. त्याने थोडासा अनुकूल परिणाम झाला. नंतर विझमन प्रभृति पुढाऱ्यांशीं बोलणीं सुरू करून ब्रिटनने असें आश्वासन दिलें की, 'तुमच्या मागण्या आम्ही खासच सहानुभूतिपूर्वक मान्य करूं. परतु आमच्यावर क्रांतिकारकांनी जे अत्याचार हकनाहक सुरू ठेवले आहेत ते थांबवा. आम्हीच तुमचे पहिले जिवाभावाचे स्नेही हें तुम्ही विसरलेले दिसतां.' ही मात्रा लागूं पडली व ब्रिटिशांच्या भेदनीतीचा कांहीसा विजयहि झाला. ता. १० ऑक्टोबर रोजी हॅगाना संघटनेने इर्गुनझावी व स्टर्नगँग संघटनांविरुद्ध प्रचार सुरू करून आपणांस अत्याचार पसंत नाहीत असें जाहीर केलें व ता. २३ रोजीं तसें पत्रकही काढलें. दरम्यान ज्यूइश एजन्सीच्या पोलिटेकल डिपार्टमेंटचे प्रमुख शरटॉक व इतर बेनग्युरिऑन व डॉ. स्नेह यांनाही सोडून दिलें व आता तर ५ नोव्हेंबर रोजीं लटरून कँपांतील सर्व ज्यू-स्थानबद्ध मुक्त करण्यांत आले आहेत. एकंदरींत १६ डिसेंबर रोजीं भरणाऱ्या लंडन परिषदेंत ज्यू भाग घेतील असा ब्रिटनला रंग दिसत आहे.

## अमेरिकेची कारवाई

पण या सर्व प्रकरणीं खरी करामत अमेरिकेची आहे. सूक्ष्म दृष्टीने

पाहिलें तर तिच्याच चिथावणीमुळे ज्यू क्रांतिकारक भडकले व अखेर ब्रिटिशांना ज्यूंशीं समझोता करून घेणें नाप्राप्त झालें. बरें, यापुढे ब्रिटनला ज्यूंशीं ज्या योजनेवर बोलणीं करणें भाग पडणार आहे ती योजना पूर्वी अमेरिच्या संमतीनेच इग्लंडकडे पाठविलेली होती. ती योजना ' ए ज्यूइश स्टेट इन् अॅन अॅडिकेट एरिया ऑफ पॅलेस्टाइन ' हीच होती. म्हणजे पॅलेस्टाइनची फाळणी करून लहानसें का होईना परंतु स्वतंत्र ज्यू संस्थान स्थापावें. " ही योजना फार विचार करण्यासारखी आहे " असें ट्रूमन यांनी ब्रिटनला तेव्हा कळविलेंहि होतें. परंतु आपल्या घमेंडींत तिने तें मानलें नाहीं; पण आता गहूं देण्यास राजी नव्हतें तें ब्रिटन काणिक करून देण्यास तयार होणार ! मुठींत नाक धरून बेव्हिन हे ट्रूमन यांशीं ज्यू प्रश्नाची चर्चा करणार आहेत. बेव्हिन न्यूयॉर्कला ४ नोव्हेंबर रोजीं पोंचले तेव्हा नेहमीप्रमाणे ज्यूंनी विरोधी निदर्शने केलीं नाहीत आणि दुसऱ्या दिवशीच्या खान्याला ज्यूइश एक्झिक्यूटिव्हचे चेअरमन डेव्हिड बेनगर्टन हेहि हजर होते. हा सर्व अमेरिकेचा प्रभाव आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. अमेरिकेने शेवटी ब्रिटनला वठणीवर आणलें असून ज्यूंचा प्रश्न ती आपल्या इच्छेप्रमाणे ब्रिटनकडून सोडवून घेईल व मध्य-पूर्वेतील ब्रिटिश वर्चस्वाला तिलांजली देईल हेंच क्रमप्राप्त आहे. अमेरिकाच हितशत्रु बनल्यामुळे पॅलेस्टाईन प्रकरणीं ओढून धरण्याने अपेशच पदरीं पडेल हें ओळखून चर्चिलसारख्यांनीहि उघडपणें ब्रिटनला सल्ला दिला आहे कीं, ' खुशाल आपलें मॅंडेट सोडून देऊन यूनोच्या गळ्यांत अडकवा. यूनोलाच ठेच बसली म्हणजे ती पुनरपि आपल्याच गळ्यांत पॅलेस्टाइनची जबाबदारी घ्या म्हणून आपल्या पाठीस लागेल व मग झक मारीत पैसा आणि सैन्यहि बंदोबस्तास देईल. तसें झालें तरच ही घोरपड गळ्यांत घ्यावी नाहीं तर नाहीं. '

केसरी, १९-११-४६

★

## – २४ –

# चिनी यादवींतील चढउतार

### सामदामाचे प्रयत्न

ऑगस्ट महिन्यापासून चिनी यादवी धुमसतच आहे. तेव्हापासून एकी-कडे लढाया सुरू होत्या आणि त्याचबरोबर दुसरीकडे तहाच्या तडजोडीच्या वाटाघाटींनाहि ऊत आला होता. ज. चँग कै-शेकने १३ ऑगष्ट रोजीं एक ६ कलमी योजना कम्यूनिस्टांना जाहीर केली. त्या योजनेंत सर्व पक्षांचा समावेश करून घेण्याचा व १२ नोव्हेंबर रोजीं नॅशनल असेंब्ली बोलावण्याचा निश्चय त्यानें जाहीर केला. त्याचबरोबर त्याने कम्यूनिस्टांना दोषहि दिला की, गेल्या जानेवारींत ठरलेल्या तहाप्रमाणें कम्यूनिस्ट वागते तर आणि त्यांनी नॅशनल असेंब्लीसाठीं आपले प्रतिनिधि पाठविले असते तर एव्हाना सुरळीत राज्यकारभार सुरूहि झाला असता.

पण कम्यूनिस्टांनीं चँग कै–शेकच्या नव्या घोषणेंचाहि धिक्कारच केला. कारण लढायांत त्यांचीच थोडी सरशी होत होती. लुंघाई आणि सिंजपू रेल्वे–जंक्शनच्या आसपास पूर्व होनानांत आणि उत्तर क्यांगसूमध्ये लढाया चालू होत्या. त्यांत क्वाईफेंगच्या पूर्वेस लॅनफेंग ठाणें कम्यूनिस्टांनी जिंकलें आणि २५०० सैनिकहि पकडले. कम्यूनिस्टांनी तडजोड सोडून उलट सर्व साधने एकवटून जोराची चढाईचीच योजना आखली व प्रचार असा चालविला की, आम्हालाहि संयुक्त किंवा कोॲलिशन सरकारच पाहिजे आहे. परंतु चिनी सरकारी पक्षाशीं बरोबरीच्या नात्याने देवघेव करण्याचा हुकमी हक्क प्राप्त होण्यासाठी जिंकला गेलेला मुलूख आधी

आम्हाला परत मिळविला पाहिजे. तसें केलें तरच पहिली प्रतिष्ठा आम्हास परत मिळेल. यानंतर २१ ऑगस्ट रोजीं चिनी सरकारी सेनापतीने कम्यूनिस्ट सेनापति येह चेन यिंग याला निरोप पाठविला की, उत्तर शांत्सीतील टाटूंगचा वेढा बऱ्या बोलाने उठवा नाही तर सगळीकडूनच तुमच्यावर चढाई सुरू करूं व येनान व कालगन हे तुमचे बालेकिल्लेहि जमीनदोस्त करूं. उलटपक्षी कम्यूनिस्टांच्या रेडियोवरून घोषणा होऊं लागल्या की, मांचूरियांत स्वतंत्र कम्यूनिस्ट राष्ट्रच स्थापण्यांत येणार व त्याची हार्बीन ही राजधानी होणार.

## अमेरिकेची प्रत्यक्ष मदत

सारांश, अशा रीतीने पुनः युद्धाची कलागत जोराने सुरू होणार, इतक्यांत अमेरिकेने ज. मार्शल व अमेरिकन वकील यांना आणखी एकदां मध्यस्थी करून पाहण्यास सांगितलें. त्याप्रमाणें ते दोघे नानकिंगला आले. त्या राजश्रींनी तोड सुचविली की, विवाद्य सर्व ठाणीं अमेरिकन सरकारच्या राखोळीस द्यावीं ! ! व पुढे निवडणुकी होऊन तीं सरकाराने घ्यावी किंवा कम्यूनिस्टांनीं घ्यावीं, हें जसें ठरेल त्याप्रमाणे त्यांची त्यांस द्यावींत. ही योजना आपणांवर अपेश नको म्हणून चँग कै-शेकने मान्यहि केली. पण हा सर्व लपंडाव होता ! कम्यूनिस्टांना बेफाम ठेवून आपली पुरी तयारी करण्यासाठी हें सिनो-अमेरिकनांचें कपट होतें ! कम्यूनिस्टांनी तें ओळखलें व मध्यस्थी धुडकावली, मानली नाही व पुनः लढाईचा हंगामा जोराने सुरू झाला व ऑगष्टअखेरीस २६ तारखेस मांचूरियांतील कम्युनिस्ट सैन्याने मुकडेन आणि चांगचूनमधील रेल्वे-रस्त्यांवर हल्ले सुरू केले. पूर्व जेहोलमध्येहि चकमकी सुरू झाल्या. चिनी सरकारी फौजांनी चेंगटेहवर हल्ला सुरू केला व तें २९ ऑगस्ट रोजीं जिंकलेंहि. याच वेळीं त्यांनी चाहारमधील कालगन ठाण्यावरही मोहीम सुरू केली. त्याचप्रमाणे मुकडेनच्या आसपास आणि हार्बिन, किरिन या ठाण्यांच्या उत्तरेसहि लढाया चेतल्या. वास्तविक अमेरिका ज. मार्शलच्या मार्फत मध्यस्थ म्हणून जर वागत होती तर तिने आपलें सक्रिय साहाय्य तरी चिनी सरकारास देणें योग्य नव्हे;

परंतु १ सप्टेंबर रोजीं अमेरिकेने चिनी सरकाराशीं तह केला व चिनांतील ८०० दशलक्ष डॉलर्स किंमतीची सामुग्री चीनला विकली. ही सर्व सामुग्री युद्धोपयोगीच होती हें सांगणें नकोच, व तीच तक्रार कम्यूनिस्टांनी केलीहि. त्यांत विमाने, दारूगोळा, हत्यारें इत्यादि सर्व कांही होते. उलटपक्षी युद्धकाळांत चिनांतील अमेरिकन सैन्याला सुखसोयी करून देण्यासाठी अमेरिकेने जीं कर्जें चिनी सरकाराकडून घेतलीं होतीं तीं माफ केलीं व २० दशलक्ष डॉलर्सचा निधि स्थापला व त्यांतून संशोधन, संस्कृति व शिक्षण याबाबत अमेरिकेशीं सहकार्य करण्याचें ठरविलें.

## कम्यूनिस्टांचा डाव

१० सप्टेंबरपर्यंत बहुतेक सर्व जेहोल प्रांत चिनी सरकारी सैन्याने जिंकून परत घेतला. १२ सप्टेंबर रोजीं सुईयुनान प्रांतांतील चिनिंग ठाणेंहि घेतलें व कालगनपासून अवघ्या ४० मैलांवर तें जाऊन पोचलें. तेव्हा २० रोजीं कम्यूनिस्टांनी टाटुंगचा वेढा उठविला व ते कालगनच्या कुमकेस निघून गेले.

चँग के-शेकने आपली मजबुती होईपर्यंत अमेरिकन मध्यस्थामार्फत तहाचें मधाचें बोट लावलें होते. ती मजबुती झाल्याबरोबर त्याने चढाई सुरू केली. अमेरिकन मदतीने ही चढाई व्हावयाची तेव्हा ही निकाली कुस्ती व्हावयाची या भयाने आता कम्यूनिस्टांनीहि आपली तयारी व्हावी म्हणून पुनः तहाचीं बोलणीं सुरू केली ! ! ता. २ सप्टेंबर रोजीं ज. चौ एन लाय याने सांगितलें कीं, " अमेरिकेने आपली मध्यस्थाची भूमिका सोडली आहे हें बरें नव्हे. आम्ही अजून तहास तयार आहों. अमेरिकेने चिनांतून आपलें सैन्य काढून घ्यावें. अमेरिकन वकिलाने पांच लोकांची पंचाईत कमिटी नेमण्याची सूचना केली होती तिला आम्ही मान्यता दिलीच आहे; पण आम्हांस आश्वासन हवें की, गोळीबार बंद करण्यांत येईल. " पण चँग कै-शेकने गोळीबार बंद करण्यास नकार दिला व ' सीझ फायर ' करावयाचा तर माझ्या नव्या अटी ऐका असें सांगितलें ! तें कम्यूनिस्टांनी नाकारलें. चँग कै-शेक सांगू लागला, ' कम्यु-निस्टांनी आताच काय तो पक्का विचार ठरविण्याची वेळ आली आहे.

त्यांनी हत्यारें खालीं ठेवावींत व सुखाने आमच्या सरकारांत अधिकृत विरोधी पक्ष म्हणून नांदावें किंवा संयुक्त कोॲलिशन सरकारला तरी कबूल व्हावें !'

२२ सप्टेंबर रोजीं सरकारी फौजा मुकडेन विभागाकडून ॲंटुंगकडे निघाल्या. हें ठाणें यालू नदीच्या तोंडाशीं आहे. यांतील हेतु त्या बंदरांतून कम्युनिस्टांना हांकून काढणें हा होता. याच बंदरांतून रशिया वाटेल तेवढी लष्करी मदत कम्यूनिस्टांना पोचवीत होता.

## कालगन पडलें

एव्हांपर्यंत कालगनचा वेढा निकरास आला होता, व ज. चौ एन-लाय याने ज. मार्शलला निरोप पाठविला की, चिनी सरकाराची कालगनवरची चढाई चालू राहिली तर मात्र आम्ही यापुढे तहाचें बिलकुल बोलणें करणार नाही. यानंतर चौ एन-लाय व मार्शल यांचीं तडजोडीचीं बोलणीं कांही दिवस पुनः चालू राहिलीं. पण त्यांतून कांहीं निष्पन्न झालें नाहीं व ती बाटाघाट ८ आक्टोबर रोजीं फिसकटल्याचें जाहीर करावें लागलें.

दरम्यान चिनी सरकारी फौजांनी दि. १३ आक्टोबर रोजीं कालगन जिंकलें व कम्यूनिस्टांचें नाकच कापून टाकलें. कम्यूनिस्टांनी कोलाहल सुरू केला कीं, चँगला खरा तह नको, यादवीच पाहिजे आहे. तो अमेरिकन साम्राज्याशाहीचा दत्तक पुत्र बनून चिनांत आपल्या हाताने अमेरिकन साम्राज्यशाहीचा पाया भरण्यास मदत करीत आहे.

कम्यूनिस्टांचे सर्वत्र पराभवच झाल्यामुळें चँगचा पक्ष बरचढ झाला व कम्यूनिस्टांतहि दुदील वृत्ति उत्पन्न होऊं लागली. कम्युनिस्टांतील डेमोक्रॅटिक लीग पार्टीचे लोकहि आता कम्यूनिस्टांनी चँगशीं तडजोड करून टाकण्यांतच शहाणपणा आहे, असें सुचवूं लागले. ते सांगूं लागले, 'आक्टोबरपर्यंत चिनी सैन्याने चाहार, जेहोल, सुरीयान व उत्तर कीआंगसु प्रांतांत सर्वत्र महत्त्वाचे लष्करी विजय मिळविलेले आहेत. तसेच होपे, शांटुंग, शान्सी, होनान, अन्वेहि या प्रांतांतहि त्यांच्या सैन्याची परिस्थिति सुधारून त्यांचा वरचष्मा होत आहे. आता उत्तर चिनांतील बालेकिल्ला कालगान पडल्यामुळे तर होपे-

च्या पूर्वेस असलेलें सर्व कम्यूनिस्ट सैन्य चिरडून जाण्याचा मोठाच मोका चँगला लाभला आहे व तें करून तो मुकडेन-पेकिंग रेल्वे लाईन निर्वेध करून घेईल हे खास. त्यांतच परवा पीत समुद्रावरील कम्यूनिस्टांचे अँटुग बंदरहि छिनावून त्यांच्या फौजांनी चेफूकडे कूच सुरू केले आहे. अशा स्थितींत तडजोड करून आव राखणें हेंच शहाणपणाचें होईल.

## नॅशनल असेंब्ली बोलावलीच

पण कट्टर कम्यूनिस्टांची तह न करण्याची दुर्योधनी वृत्ति बालाग्रहि ढळलेली नाही. म्हणून पुनः लढाई पहिल्यासारखीच चालू झाली. चिनी सरकारी आरमाराने चिहलीच्या आखातांत द. मांचूरियांतून चेफू विभागाकडे जाणारी रसद–कुमक बुडवून टाकली. कम्यूनिस्ट पक्षानेहि शांटुंगच्या उत्तरेस प्रतिचढाई सुरू केली. त्यांनी ५०००० नवें शिकविलेलें सैन्य मांचूरियांतून मदतीस आणलें. तिकडे चिनी सरकारी फौजा डेरिअनच्या उत्तरेस ३३ मैलांवर पूलाटीनला पोचल्या. त्यांचा रोख लियाटुंग द्वीपकल्पाचा मॉंचूरियाशी संबंध तोडावा असा होता. उत्तर शांटुंगमधील चेफू ठाणेहि त्यांनी जवळजवळ जिंकल्यासारखेच आहे. चेफू बंदर फार काळ कम्यूनिस्टांच्या हातीं होतें. तें जिंकल्यावर द. मांचूरियांतील कम्यूनिस्टांच्या फौजा तोडून अलग पडणार.

या वेळीं पुनः एकदा मध्यस्थ डेमोक्रॅटिक पक्षांनी तडजोडीचा अखेरचा निकराचा प्रयत्न सुरू केला. लढाई तहकूब करावी व १२ नोव्हेंबर रोजीं भरविण्यांत येणारी नॅ. असेंब्ली पुढे ढकलावी, असें त्यांचें म्हणणें होतें. प्रथम चांगने चांगलेंच ओढून धरले; पण अखेर दि. ८–११ रोजीं चीन व मांचूरियांतील आपल्या सैन्याला त्यानें 'सीझ फायर' चा हुकूम दिला. धरलेलीं ठाणीं तशींच हातीं राखून पण गोळीबार न करतां राहावें, हल्ला झाला तर मात्र बेशक लढावें असें त्याने फर्माविलें. मात्र १५ 'तारखेला नॅ. असेंब्ली भरविणारच, त्यांत बदल होणार नाही. कम्यूनिस्टांकरिता आम्ही त्यांच्या हिस्श्याच्या जागा राखून ठेवतो, त्यांनी यावे' असेंहि त्याने जाहीर केलें.

ठरल्याप्रमाणे १५ तारखेस त्याने नॅशनल असेंब्ली भरविलीच. अमे-

रिकाच त्याचें सर्व सारथ्य करण्यास उभी राहिल्यावर त्याने तरी आता कम्यूनिस्टांना कां भ्यावें ? देखावा तर खूप होता. क्यूमिटांग व इतर पक्षीय १३५० प्रतिनिधि हजर होते; खेरीज ६० परराष्ट्रांतील मुत्सद्दी व ३०० पत्रकारहि हजर होते, अशीं वर्णनें प्रसिद्ध झालीं आहेत. मात्र त्यांत कम्युनिस्ट पक्षीय एकहि इसम हजर नव्हता ! फार काय कम्यूनिस्ट वकील चौ एन लाय यापुढे सल्ला बिघडला आता लढाईच असें पुकारून येनानला तडक रवानाहि झाला ! ! आता पुनः फार मोठ्या प्रमाणावर चिनांत युद्धाला तोंड लागेलसें दिसतें. एकीकडे नॅशनल असेंब्लीकडून कॉन्स्टिटयूअण्ट असेंब्ली स्थापण्याचें राजकारण खेळून लोकांना आपल्याकडे सामाने ओढण्याचा प्रयत्न व त्याच वेळीं तोफांनी कम्युनिस्टांची हड्डी नरम करणें अशीं दोन्हीं कामें चँग कै–शेक करणार आहे.

केसरी, ४–१०–४६

★

— २५ —

# नेपाळचें वाढतें महत्त्व

## युद्धोत्तर कालांतील महात्म्य

गेल्या महायुद्धानंतर झालेल्या स्थित्यंतरांत हिंदुस्थानाने स्वातंत्र्याच्या दारांत पाऊल टाकलें आहे, यांत शंका नाही; आणि भावी काळांत तर हिंदुस्थान हा अमेरिकेचा एक महत्त्वाचा मोर्चा व पूर्वेकडील महत्त्वाचें लष्करी आर्सेनल किंवा कोठार बनणार हेंहि ठरून गेल्यासारखेंच आहे. सारांश, हिंदुस्थानाला जागतिक घडामोडींत आणि राजकारणांत दिवसेंदिवस वाढतें महत्त्व येणार व तीच स्थिति हिंदुस्थानच्या उत्तरेकडील आजपर्यंत अज्ञात असलेल्या किंवा मागासलेल्या राष्ट्रांनाहि प्राप्त होईल. याचें कारण हेंच की, अमेरिकेला चीनपासून अफगाणिस्तान इराणपर्यंत आपल्या स्नेही राष्ट्रांची भक्कम साखळी उत्तरेकडून दक्षिणेकडे होणाऱ्या रशियन आक्रमणाला पायबंद देण्यासाठी निर्माण करावयाची आहे. उजव्या हातास दक्षिण चीन तर अमेरिकेने आपलासा केलाच आहे. डाव्या अंगास अफगाणिस्तान. रशियाने अफगाणिस्थानाला आपल्या कच्छपी लावण्याची बरीच खटपट अलीकडे केली; पण रशियावर मात करून आता अमेरिकेनेच तेथे आपलें पूर्ण वर्चस्व बसविलें आहे. परवाच ता. २५ नोव्हेंबर रोजीं एक वृत्त असें प्रसिद्ध झालें होते की, अफगाण सरकारने हिंदुस्थानच्या व्यायव्य सरहद्दीपर्यंत काबूल रेल्वेचा फाटा आणून सोडण्याचें ठरविलें असून, इंडो-अफगाण सरहद्दीवरील " तोर्खाम " गांवीं त्या रेल्वेचें स्टेशन होईल. या योजनेमागील हेतु काय असेल किंवा

तिचा भावी काळांत कसा उपयोग केला जाईल हें किंचित् कल्पनाशक्ति चालविली असतां कोणासहि आकलन होऊं शकेल.

## अमेरिकेची लगट

अमेरिकेने कल्पिलेल्या स्नेह्यांच्या साखळींत चीन, तिबेट, नेपाळ, हिंदुस्थान, अफगाणिस्तान असा क्रम आहे. त्यांपैकी सध्या नेपाळबद्दलच लिहावयाचें आहे. गेल्या दुसऱ्या महायुद्धानंतर नेपाळने आपले डोळे उघडले. एकलकोण्डीचा कोश फाडून टाकला व एकदम दोस्त राष्ट्रांपैकी सर्वांत बलिष्ठ जी अमेरिका तिच्याशीं घनिष्ट संबंध जोडले. १९४५ च्या आक्टोबरांत नेपाळचे मंत्री ज. सिंग हे अमेरिकेस गेले; व त्यांनी नेपाळची वकिलात अमेरिकेत स्थापण्याची खटपट सुरू केली. त्यानंतर चालू साली ऑगस्ट महिन्यांत नेपाळचे सरसेनापति बाबरसमशेरजंग बहादूर राणा हे अमेरिकन सरकारकडे गुडवुइल मिशन घेऊन गेले व अमेरिकन सरकारतर्फेंहि ट्रूमन यांनी त्यांना सुवर्णाची कुकरी नजर दिली व त्यांचा सन्मान केला. नेपाळ व अमेरिका यांतील स्नेहसंबंध आता साहजिकच दृढावला असून, नेपाळांतहि अमेरिकेचा वकील बहुधा नेमला जाईलसें दिसतें. परवा ता. १९ नोव्हेंबर रोजीं नेपाळ-नरेशांचा समक्ष सत्कार करण्याची आज्ञा हिंदुस्थानांतील अमेरिकन प्रतिनिधि जॉर्ज मरेल यांना प्रे. ट्रूमन यांनी केली व त्यास अनुसरून मरेल नेपाळास रवाना झाले. या वेळच्या भेटींत अमेरिकेचा नेपाळशीं सलोख्याचा व्यापारी तहनामाहि होईल असेंहि वार्ताहरांनी सूचित केलें होते व तें संभवनीय वाटतें. कारण याच वेळीं चिनी सरकाराचेंहि एक गुड–वुइल मिशन नेपाळांत गेलें आहे. या चिनी मिशनचे अध्यक्ष ‘ शेन सुंगलेन ’ हे असून जी. वाय. चेन आणि मेजर जी. एच. लो इत्यादि त्यांत दुसरे सभासद आहेत. चीन अमेरिका यांचे हितसंबंध सध्या अत्यन्त निगडित असल्यामुळे चीनला जाणारी अमेरिकेची मदत निर्वेध जावी हाच यांत उद्देश असणार. नेपाळचा पूर्वी जो ब्रिटनशीं तह झालेला आहे त्याअन्वये त्याला जगांतून कोठूनहि युद्ध–साहित्य आणवून तें हिंदुस्थानमार्गे नेपाळांत नेण्याची पूर्ण मुभा मिळालेली आहेच.

## तिबेट व हिंदुस्थान

नेपाळच्या वर तिबेट आहे व नेपाळप्रमाणेच चीन-अमेरिकेला तिबेटचें सख्यहि अवश्य हवेंच. तिबेटवर रशियाचा फारा दिवसापासून डोळा असल्यामुळे, त्याला आपल्या पक्षांत ओढण्याची अमेरिकेची व चीनची खटपट सुरू आहे. तिबेटचें क्षेत्रफळ १२ लक्ष स्क्वे. किलोमिटर्स एवढें असून, लोकवस्ती ४००००० तरी असावी. पूर्वी चीनशीं त्याच्या नेहमी कटकटी होत; १९ व्या शतकाच्या प्रथमार्धांत तिबेटवर चीनचाच वरचष्मा झाला व तिबेट हा जवळ जवळ चीनचाच एक भाग समजला जाऊं लागला. यामुळे तिबेटी लोक चीनविरुद्ध नेहमी बंडें करीत. त्याचाच फायदा दर वेळीं रशिया घेऊं पाहात असे. त्याने तिबेट बळकावण्याचा अनेकदा प्रयत्न केला; पण रशियाने तसे करण्याचा आव दाखविला की, ब्रिटनच्या पोटांत धस्स होई; कारण तिबेट गेले म्हणजे हिंदुस्थानच्या डोक्यावरच रशियाने पाय ठेवले. तिबेटचें रशियाला जितकें महत्त्व तितकेंच हिंदुस्थानालाहि तें बफर स्टेट म्हणून दोघांमध्ये असणें हिताचें आहे. रशियाच्या आक्रमणाची भीति हिंदुस्थानला नेहमीच असे. एकदा तर रशियाचें आक्रमण थांबविण्यासाठी हिंदुस्थान सरकारने लगोलग दक्षिण तिबेटवर स्वारीहि केली होती. ती झाल्यावरच रशिया परत फिरला. दक्षिण तिबेट ब्रिटिश सरकारने जिंकला तरी धोरणीपणाने सोडून दिला. वास्तविक तिबेटावर चीनचें अधिराज्य होते; पण ब्रिटिशांनी दक्षिण तिबेट हें आम्ही स्वतंत्र राज्य मानतो असें जाहीर केलें. हा प्रकार १९१२ सालीं घडला. वास्तविक तिबेट हा कांही संपन्न देश नव्हे. कृषीला तो अगदीच निरुपयोगी आहे; परंतु त्याच्या पोटांत खनिज संपत्ति बरीच आहे. तथापि या सर्वांपेक्षां त्याचें भौगोलिक स्थान हेंच चीन व हिंदुस्थान यांच्या दृष्टीने फार महत्त्वाचें आहे. त्याच्या पूर्वेस चीन. आग्नेयीस ब्रह्मदेश, आणि दक्षिणेस व नैऋत्येस हिंदुस्थान असल्यामुळे त्याचें राजकारणी महत्त्व स्पष्टच होते. गेल्या दुसऱ्या महायुद्धांत १९४२ सालीं बर्मा रोड जपानने जिंकल्यामुळे बंद झाला आणि

अमेरिकेला चीनला हिंदुस्थानांतून मदत पोहोंचवितां येईना. त्या वेळीं अमेरिकन सरकारानें प्रथम तिबेटांतून तसा कांही मार्ग शोधण्यासाठी ले. क. टॉलस्टॉय, कॅप्टन ब्रुक डोलान यांना मुद्दाम पाठविलें. त्यांनी त्या आपल्या प्रवासाचें अत्यंत चित्तवेधक वृत्त लिहिलेलें आता उपलब्ध झालेलें आहे. याच मिशनबरोबर अमेरिकन सरकारानें तिबेटी लामाला खूप नजर–नजराणा व भेटी देऊन, तिबेटशीं प्रथमच सख्य जोडलें. प्रत्यक्ष स्नेहाचा तहहि कांही झालाच असेल तरी तो अद्याप गुलदस्तांत असावा.

## नेपाळ–स्नेहाची अमेरिकेस आवश्यकता

चीन आणि तिबेट यांच्या इतकेंच यापुढे अमेरिकेला नेपाळचें सख्य आवश्यक होणार आणि म्हणूनच ते जोडण्याचा उद्योग सुरू आहे. इंग्रज सरकाराचा नेपाळशीं संबंध प्रथम १७४२ सालीं आला. तेथपासून त्यांच्या कलागतीहि खूप झाल्या; परंतु १८१८ नंतर नेपाळ व ब्रिटिश हिंदुस्थान यांची जी सलोख्याच्या तहानें एकी झाली ती अद्याप अभंग टिकली आहे. या एकींतील विशेष उल्लेखनीय गोष्ट ही की, ब्रिटिश सैन्यांतील गुरखा रेजिमेंट्सची भरती आपल्या मुलखांतून करू देण्यास नेपाळ सरकारानें आज अनेक वर्षांपासून संमति दिली आहे. गेल्या दुसऱ्या महायुद्धापूर्वी गुरखा रेजिमेंट्स २० होतीं तीं आता ५० वर वाढलीं आहेत व युद्धानंतर आता तीं कशीं कमीं करावीं हा हिंदुस्थान सरकारापुढें सध्या प्रश्न आहे. नेपाळ सरकारानें ५७ सालच्या बंडापासून इंग्रजांच्या प्रत्येक संकटांत इतकी सक्रिय लष्करी मदत केलेली आहे की इंग्रजांनी नेपाळला आदरानें डोक्यावर घेऊन नाचलेंच पाहिजे.

## मुसलमानांना अफगाणिस्तान तसा हिंदूंना नेपाळ

असो. राष्ट्रीय हिंदुस्थानच्या दृष्टीनें भावी काळांत नेपाळ हा हिंदुस्थानचें एक आशास्थान खचित ठरेल. तें इंग्लंड अमेरिकेच्या मांडीला मांडी लावून बसणारें स्वतंत्र सर्वाधिकारसंपन्न राष्ट्र असून नेपाळ म्हणजे जगद्विख्यात शूर गुरखा शिपायांची विलायत अशी त्याची यथार्थ

ख्याति आहे. नेपाळ सहज पांच—चार लाख कडवें हिंदु सैन्य उभें करूं शकतो. भावी काळांत हिंदु-मुसलमानांचा प्रश्न निकरास आल्यावर पंजाब, सिंध, काश्मीरमधील मुसलमान साहाजिकच शेजारच्या अफगाणिस्तानाकडे मदत मागतील; अशा वेळीं नेपाळची मदत हिंदुस्थानाला केवढ्या मोलाची ठरेल हें निराळें सांगावयास कशास पाहिजे? शिवाय नेपाळ हें अस्सल हिंदुधर्मीय कडवें राष्ट्र आहे व गुरखे हे तर रक्तसंबंधाने रजपूतच आहेत. खुद्द मराठ्यांशींहि त्यांचे रक्तसंबंध झालेले आहेत. सातारकर छत्रपतींची कन्या नेपाळ राजघराण्यांत देण्याची खटपट पूर्वी झाली होती व सध्याच्या मुधोळ संस्थानच्या रीजंट राणीसाहेब या गुरखाच आहेत. म्हणून सर्वच दृष्टींनी नेपाळची इत्थंभूत माहिती यापुढे हिंदूंनी करून घेणें अत्यंत जरूर आहे.

केसरी, १०-१२-४६

★

— २५ —

# नेपाळच्या इतिहासाचें विहंगमावलोकन

## लेखांक पहिला

### प्राचीन नेपाळ

हिमालयांतील पुष्कळ प्रदेशांप्रमाणे नेपाळ प्रांत किंवा नेपाळ खोरें हें एक प्रचंड सरोवर होतें. निसर्गाच्या उलथापालथींत सरोवराचा तळ वर येऊन, त्याचें मैदान बनलें असावें असें भूशास्त्रज्ञ म्हणतात. या त्यांच्या म्हणण्याला हिंदु व बौद्धपुराणांतहि कांहींसा पुरावा सांपडतो. नेपाळ सरोवराभोवती पर्वतांचें कडें होतें तें आपल्या खड्गाने छेदून सरोवरांतील पाणी बाहेर सोडून देण्यांत आलें. हिंदु पुराणें म्हणतात तें विष्णूने केलें. बौद्धपुराणें म्हणतात तें मंजुश्रीने केलें. कसेंहि असो, नेपाळ हा पूर्वी सरोवराचा तळ होता असें मानण्यास आजहि हरकत नाही. कारण नेपाळची सारी भूमि कमालीची सुपीक आहे. ती तशी त्या सरोवरांतील गाळामुळेच बनली असली पाहिजे.

नेपाळ या शब्दाची व्युत्पत्ति ' ने ' वरून लावतात. ' ने मुनी ' नामक एक ऋषि होऊन गेला व त्यालाच नेपाळी लोक नेपाळचा रक्षकपुरुष मानतात. या ने मुनीनेच एका गवळ्याच्या मुलाला राज्यावर बसवून गोपाळ राजवंशाची नेपाळांत स्थापना केली. ने मुनीने ज्याचें पालन केलें तो ' नेपाळ. '

खिस्तपूर्व २५० व्या वर्षी अशोक नेपाळास गेला होता. गौतम बुद्ध कांहीं काळ नेपाळांत होता म्हणून अशोक राजाहि पुण्यक्षेत्र समजून तेथे गेला व त्याने पाटण शहराच्या चार कोपऱ्यांत प्रचंड स्तूप बांधले ते

आजहि पाहावयास सापडतात. कालान्तराने नेपाळांतून बुद्धधर्माचें उच्चाटन होऊन वैदिक हिंदु धर्माचें संस्थापन झालें तरी बौद्धांचें धार्मिक क्षेत्र म्हणून त्याचें महत्त्व अवशिष्ट राहिलेंच व तेव्हापासून नेपाळच्या उत्तरेकडील तिबेट, चीन या देशांतून बौद्धधर्मीय यात्रेकरू नेहमी तेथे यात्रेस येत असतात. इ. स. ६३७ मध्ये हुएनत्संग नेपाळांत गेला होता. त्याने त्याचा उल्लेख 'निपोलो' असा केला आहे. 'येथले लोक रानटी, क्रूर स्वभावाचे आहेत; परंतु कलाकौशल्याच्या कामांत तरबेज आहेत. यांच्यांत हिंदु व बौद्ध अशी खिचडी असून हिंदु व बौद्ध मंदिरें शेजारीं शेजारीं येथे पाहावयास सांपडतात. सध्याचा येथला 'अंशवर्मा' राजा गुणी, सज्जन, विद्येचा भोक्ता असून, त्याची कीर्ति फार दूरवर पसरली आहे,' असेंहि हुएनत्संगने लिहून ठेवलें आहे. उपलब्ध शिलालेखादिकांवरून सातव्या शतकांत चीन व नेपाळ या राष्ट्रांनी परस्परांच्या राष्ट्रांत वकिलाती ठेवल्याचें कळतें. म्हणजे हुएनत्संगच्या मुक्कामानंतर कांही वर्षांतच ही गोष्ट घडली. इ. स. ६४३ मध्ये नेपाळांत नरेंद्रदेवराजा राज्य करीत होता. त्याच्या दरबारीं हें चिनी शिष्टमंडळ आलें होतें. पुढे चीनलाहि एक शिष्टमंडळ नेपाळने नजर-नजराणा व खुषवक्तीचीं पत्रें देऊन पाठविलें होतें. चिनी पुराव्याप्रमाणेहि नरेंद्रदेवाचें राज्य हिंदुस्थानांतील सर्वोत्कृष्ट राज्यांत अग्रेसर होतें.

## नेपाळचा दक्षिण हिंदुस्थानशीं संबंध

याच सातव्या शतकाच्या सुरुवातीस तिबेटांत भुटियांच्या राज्याचा उदय झाला व पुढे त्याने बरेच दिवस नेपाळला आपलें मांडलिक करून टाकलें! एकीकडे हिंदुस्थान व दुसरीकडे चीन हीं राष्ट्रें तिबेटच्या आक्रमणाला भिऊन थरकांप उभीं होतीं. हें तिबेटचें भुटियांचें राज्य नाम्री-नामक पुरुषाने स्थापिलें. त्याचा मुलगा 'स्रोंग' हा बापाहून सवाई, प्रतिशिकंदर निघाला व त्यानेच आज तिबेट म्हणून ओळखला जाणारा प्रचंड भूभाग आपल्या कबजांत आणिला. चीन हिंदुस्थानांत त्याच्या वकिलाती होत्याच. फार काय, याने नेपाळी राजा अंशवर्मन याजकडे सक्तीने त्याच्या कन्येची मागणी केली. त्या विवाहामुळे नेपाळ व तिबेट

यांत सामाजिक संघटन व कालवाकालव फार झाली. तिबेटांतील कला-कौशल्यादिकांवर अद्यापहि हिंदी छाप दिसतो तो त्याचाच परिणाम होय, असें इतिहासवेत्ते म्हणतात. ८ व्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत नेपाळ तिबेटच्या ताबेदारींत मांडलिक म्हणून राहिला. पुढे ९ व्या शतकांतहि नेपाळला महत्त्व नव्हतें. नंतर ११ व्या शतकापासून त्याच्या इतिहासाचा धागा पुनः सुरू होतो. त्या शतकाच्या सुरुवातीस दक्षिणेंतील कोणा 'नान्यदेव' नामक राजपुरुषाने स्वारी करून जाऊन तो देश जिंकला व भटगांव येथे राजधानी स्थापिली, असा उल्लेख सांपडतो. नान्यदेवाने स्वतःबरोबर आणलेल्या प्रचंड दक्षिणी सैन्याची तेथे वसाहतच केली. या सैन्यांतले लोक बहुतेक मलबारांतील नायर होते असें म्हणतात ! व या नायरांपासूनच पुढे सध्या नेपाळांत वर्चस्व असलेले नेवार क्षत्रिय निर्माण झाले असें नेपाळी मानतात ! नायरांप्रमाणेच मल्लराज वराणेंहि दक्षिण हिंदुस्थानांतूनच नेपाळांत गेलेलें आहे. कांचीवरम् येथे मल्ल राजघराणें उदयास आलें व नेपाळी इतिहासकार आपला पहिला राजा 'धर्मदत्त' हा दक्षिणीच होता असें मानतात. कसेंहि असो, तेराव्या शतकाच्या मध्यास नेपाळांत खाटमांडू व पाटण येथे मल्लराजांचा अंमल होता व भटगांव राजधानीची स्थापना 'आनंदमल्ल' राजानेच केली हें खरें.

## गुरखे व नेपाळी

याच सुमारास नेपाळांत 'खास' नांवाची एक जात पुढे आली. नेपाळी भाषेला 'खासकुरा' असेंहि दुसरें एक नांव आहे तें या खास लोकांवरूनच पडलें. खास लोकांची भाषा ती 'खासकुरा'. हे लोक आनंदमल्लाच्या कारकीर्दीच्या आसपास पश्चिमेकडून येऊन नेपाळांत वस्ती करते झाले. याच खास लोकांना नेपाळांत आज 'छेत्री' म्हणजे लढवय्यी क्षत्रिय जाती समजतात. पुढे मुसलमानी स्वाऱ्यांच्या रेट्याखाली ठिकठिकाणच्या हिंदु संस्थानांतील लोक नेपाळांत आश्रयास घुसले. हे लोक अधिक सुधारलेले होते. खास लोकांनी या लोकांची मदत घेऊन आसपासचा बराच मुलूख जिंकला. या परकीय हिंदूंनी अखेर खासांची खास भाषा व संस्कृतीहि जवळ जवळ खाऊन टाकिली व आता खास

ही हिंदीचीच एक अपभ्रष्ट भाषा समजली जाते. नेपाळांत आश्रयास गेलेल्या लोकांत ब्राह्मणहि होते. पुढे क्षत्रियांत व ब्राह्मणांत बेटीव्यवहारहि झाला व त्यांची संतति म्हणजेच सांप्रतची नेपाळांतील लढवय्यांची जात.

बाराव्या व तेराव्या शतकांत नेपाळांत अनेक छोटीं संस्थानें असून त्यांचा आपसांत सदा कलह लागलेला असे. चौदाव्या शतकांत सन १३२६ सालीं सिमराहूनचा राजा हरिसिंह देव याने सारा नेपाळ जिंकला. सिमराहू म्हणजेच सध्याचें ' तिरहूट. ' हें तिरहूट संस्थान तेवढें एकटें मुसलमानी आक्रमणाला टक्कर देऊन टिकून राहिलेलें होतें; पण ग्यासुद्दीन तघलकाच्या स्वारींत त्याचाहि मोड झाला व हरिसिंह देव नेपाळांत घुसला व पुढे त्यानेच तो देश स्वाऱ्या करून कबजांत घेतला. तेथपासून हरिसिंहाचे वंशज नेपाळावर राज्य करू लागले. त्यांच्याकडून तें अखेर ' पृथ्वीनारायणा'ने जिंकलें.

पूर्वी उल्लेखिलेल्या छत्रीपैकी एक प्रमुख छेत्री घराणें गुरखा गांवीं राज्य करीत असे. त्या राजाने आपल्या प्रजेस गुरखाली असें नामाभिधान दिलें. म्हणजे गुरखा राज्याचे अनुयायी ते गुरखे असें रूढ झालें. परंतु गुरखाली म्हणून वास्तविक जी त्यांतल्या त्यांत विशिष्ट जातिसंज्ञा आहे, ती गुरख्यांतील उंची रक्ताच्या क्षत्रियांना लावतात. हे उंची रक्ताचे क्षत्रिय शिसोदे रजपूत वंशीय म्हणवितात. पृथ्वीनारायणाचा उदय झाला त्या वेळीं काश्मीर सरहद्दीपर्यंत या गुरख्यांचीं लहान–मोठीं २४ स्वतंत्र संस्थानें किंवा राज्यें पसरलेलीं होतीं. त्यांना ' चौबिसिया ' राज्यें म्हणत.

## गुरखे नेपाळ जिंकतात

१७४२ सालीं पृथ्वीनारायणाचा उदय झाला. त्यावेळीं सारा नेपाळ अंतःकलहाने पोखरून गेला होता. तेथील भटगांव, खाटमांडु व पाटण हीं तिन्हीं संस्थानें एकमेकाशीं लढत होतीं व त्यांतच एक बुद्ध भिक्षु सारा नेपाळ पुनः बौद्धधर्मीय करण्याची मोठी चळवळ करून राहिला होता. या संधीचा फायदा पृथ्वीनारायणाने घेतला. यापूर्वी त्याने चौबिसियांतील सर्व संस्थानें जिंकून आपलें वर्चस्व बसविलें होतेंच; तेव्हा

साहजिकच त्याला नेपाळ जिंकण्याचीहि महत्त्वाकांक्षा उत्पन्न झाली. याच सुमारास पाटणच्या राजाचा खून झाला; व पाटणकरांनी गुरखा राजा पृथ्वीनारायण याला आमंत्रण दिलें. पृथ्वीनारायणाने या वेळीं स्वतः न जातां आपला भाऊ पाठविला. पण पुढे चार वर्षांतच त्याला तेथल्या लोकांनी त्या राज्यावरून हाकून लाविला. तेव्हा मात्र चिडून पृथ्वीनारायणाने नेपाळची वेसच असलेलें असें ' नवाकोट 'चें ठाणें जिंकण्याचा प्रयत्न केला. पण खाटमांडुकरांनी निकराचा प्रतिकार केल्यामुळे त्यावेळीं तो बेत फसला. पुढे कांही दिवसांनी भटगांव व खाटमांडु या राज्यांचीं भांडणें सुरू झालीं. तेव्हा भटगांवने पृथ्वीनारायणाची मदत मागितली. आणि नवाकोट या वेळीं विनायास पृथ्वीनारायणाच्या हातीं आला. नंतर त्याने नेपाळ खोऱ्यांत शिरून कीर्तिपूरला वेढा बसविला. तें ठाणें पाटणकरांचें होतें. पण त्यांनी त्याची कांहीच कुमक केली नाही. तथापि खाटमांडूचा राजा जयप्रकाश मर्द होता. त्याने पृथ्वीनारायणावर हल्ला चढवून त्याचा पूर्ण पराभव केला. पण जयप्रकाशचा व कीर्तिपूरवाल्यांचा पुढे जयप्रकाशच्या चढेलपणामुळे बेबनाव झाला व कीर्तिपूरवाल्यानेच आपण होऊन कांही डोंगरी किल्ले पृथ्वीनारायणास दिले. मग पृथ्वीनारायणाने साऱ्या नेपाळखोऱ्याची वाटबंदी करून पुरी कोंडी करून टाकिली. आंतबाहेर माणूस, अन्नवस्त्र कांहीएक फिरकूं दिलें नाही व याच्या जोडीस आंतून खाटमांडूकरांच्या राज्यांत फितूर पेरला. कांही धार्मिक खुसपट काढून तेथले २००० ब्राह्मण त्याने आपल्या फितुरांत घेतले होते. यानंतर १७६५ सालीं त्याने पुन्हा कीर्तिपूरला वेढा घातला. पण या वेळींहि त्यास माघारच खावी लागली. तरी पुन्हा तिसऱ्यांदा त्याने कीर्तिपुरावर स्वारी केलीच. या वेळीं मात्र भटगांवकर, खाटमांडूकर व पाटणकर असे तीनहि पृथ्वीनारायणाविरुद्ध एक झाले होते. या स्वारींत पृथ्वीनारायणाने एकदाचें कीर्तिपूर जिंकलें व आजपर्यंतच्या पराभवाचें उट्टें अत्यंत क्रूर कत्तल करून फेडलें. अंगावर पिणाऱ्या पोराखेरीज बाकी एकूण एक माणसांचे नाक, कान त्याने कापविले व मोठ्या समारंभाने कीर्तिपूरचें ' नकटीपूर ' असें नवें नाव जाहीर केलें !

## नेपाळांतील इंग्रजांचा पहिलाच चंचुप्रवेश

कीर्तिपूर जिंकल्यानंतर पृथ्वीनारायणाने पाटणवर स्वारी केली. परंतु याच वेळीं नेपाळांत ब्रिटिश फौज कॅप्टन किनलॉक घेऊन आल्याचा त्याला सुगावा लागल्यामुळे तो माघारी निघून गेला. वास्तविक हें ब्रिटिश सैन्य पूर्वी कीर्तिपूरच्या वेढ्याच्या वेळींच जयप्रकाशाने कंपनी सरकारकडून मदतीस मागविलें होतें; पण नद्यांच्या पुरामुळे, दलदलीमुळे आणि तापसराईमुळे या इंग्रज सैन्याला कांहीच प्रगति करतां आली नव्हती; किंबहुना या वेळीं तें परत फिरण्याच्या विचारांत होतें. ब्रिटिश सैन्य परत निघून गेल्याबरोबर पुनः पृथ्वीनारायण नेपाळावर चाल करून आला. या वेळीं त्याचा रोख खाटमांडूवर होता. त्याने तेथील ब्राह्मण रयत फितविली होतीच व एक दिवस खाटमांडूची शिबंदी कांही सणा-समारंभांत मग्न आहे अशी संधि साधून पृथ्वीनारायणाचा सेनापति इंद्रजित शहरांत शिरला. नंतरच्या दंगलींत राजा कसाबसा पाटणास पळून गेला. पुढे पृथ्वीनारायणाने पाटणहि जिंकलें व कौल देऊनहि तेथील एकूण एक सरदार ठार मारला! यानंतर आठच महिन्यांत त्याने १७६९ च्या जुलैंत राहिलेलें भटगांवहि जिंकलें. या भटगांवकर राजाचे सात लेकवळे होते तेच पृथ्वीनारायणास फितूर झालेले होते! मात्र भट-गांव जिंकल्यावर पृथ्वीनारायणाने त्या लेकवळ्यांचा बडेजाव न करतां त्यांना ठार मारून टाकिलें! पृथ्वीनारायणाने भटगांवकर राजा रणजित-मल्ल म्हणून होता त्याला बाह्यात्कारी बहुत सन्मानाने वागविलें व त्यास राज्यावर तसेंच राहण्यासहि अनुज्ञा दिली; परंतु त्या राजानेच राज्यत्याग करून काशीवासाची परवानगी मागितली. पाटणकराला जन्मभर तुरुं-गाची हवा खावी लागली. खाटमांडूकर लढाईंतील जखमांनी जेर होता, त्याला त्याच्या इच्छेप्रमाणे पशुपतिनाथापुढे मरावयास परवानगी दिली गेली. अशा रीतीनें संपूर्ण नेपाळ गुरखा राजा पृथ्वीनारायण याच्या पूर्ण कब्जांत आला.

गुरख्यांचें राज्य नेपाळांत सुरू झाल्यावर तेथले मूळ रहिवाशी जे नेवारी लोक ते हीनावस्थेस पोहोचले. तेथील फक्त ब्राह्मणवर्गालाच

तेवढी प्रतिष्ठा राहिली. गुरख्यांतील रजपूत सरदारांचें महत्त्व कमालीचें वाढलें. सर्व अधिकाराच्या जागा व उत्तमोत्तम जमिनी त्यानीच बळकावल्या. नव्या गुरखा राजाचें परराष्ट्रीय धोरण फार कडक होतें. युरोपियनांवर त्याचा पहिल्यापासून राग. संपूर्ण घाटबंदी करून परकीयाला नेपाळांत राहण्यास बंदी करण्यांत आली. पृथ्वीनारायण १७७१ सालीं वारला. नंतर त्याचा मुलगा 'सिंगप्रताप' गादीवर आला. त्यानेहि पराक्रम करून नेपाळच्या नैऋत्येकडील आणखी मुलूख राज्यास जोडला. पण तो अकस्मात् वारला व त्याचा अल्पवयी मुलगा 'बहादुरशहा' १७७५ सालीं गादीवर आला. त्याचा कारभारी चुलता बहादुरशहा नांवाचाच होता. त्याने चौबीसाई संस्थानाच्या पश्चिमेस असलेलीं २२ संस्थानें जिंकलीं व सध्याची नेपाळहद्द जी काली नदी आहे ती ओलांडून कुमाऊंचा मुलुखहि जिंकला.

## नेपाळचें चीनशीं युद्ध

पश्चिमेकडील संस्थान जिंकल्यानंतर गुरख्यांनी पूर्वेकडे आपला मोर्चा फिरविला व सिकीम प्रांत जिंकून त्यांनी तिबेटांतहि खूपच आवाडाव केली. इतकी की, एकवेळ त्यांनी ताशीलंपू येथील मोठ्या लामाच्या राजवाड्यावर धाड नेऊन खूप लूट केली. वास्तविक लामा हे चिनी राष्ट्राचेहि शंकराचार्य किंवा धर्मगुरु; पण राजकीय आक्रमणाच्या वेळीं सारेच धर्मविर्म गुंडाळून ठेवीत असतात. तिबेटच्या लामाने नेपाळकडे तक्रार करून केलेली लूट परत मागितली. पण गुरख्यांनी ती धुडकावून लाविली. तेव्हां या शत्रूचा काटा काढण्यासाठी तिबेटने आपल्या सत्शिष्यबिरुदावलींतील प्रमुख असें जे चिनी सरकार त्याला आवाहन केलें. चीनला अनायासेंच ही सोन्यासारखी संधि मिळाली. लौकिकांत आपल्या शंकराचार्यांचें संस्थान वांचविण्यासाठी तो उडी घालून आला; परंतु वास्तविक यापुढे चीनने आपल्या जोखडाखालीं तिबेट पक्का बांधून घेतला! १७९२ सालीं चिनी सरकाराने ७० हजार सैन्य पाठवून तिबेटावर चाल करून आलेल्या गुरखा सैन्याशीं सामना सुरू केला. तिबेटसारख्या अवघड पहाडी मुलुखांत लढायांचा हंगामा पडल्यामुळे चिनी सैन्याचें नुकसान

गुरख्यांनी अतोनात केलें, तरी त्यांचें संख्याबलच फार प्रचंड पडलें आणि त्याच्याच जोरावर गुरख्यांना चिनी सैन्यानें तिबेटांतूनच नव्हे तर अखेर नेपाळांत त्यांच्या खाटमांडूनजिक अवघ्या २० मैलांवरील नवाकोटा-पाशीं रेटून मागे घातलें. तेव्हा गुरख्यांना चीनशीं तह करून त्याची तावेदारी मान्य करणें भाग पडलें. तहांत असें ठरलें की, ( १ ) नेपाळने चीनचें सार्वभौमत्व मान्य करावें. ( २ ) कांही थोडा नेपाळी राज्याचा मुलूखहि चीनला द्यावा व पांच वर्षांनी नेपाळांतून पेकिंगला सौदागर व्यापाऱ्यांचें मिशन पाठवीत जावें.

चीनच्या या नेपाळ–स्वारीच्या वेळीं पुन्हा इंग्रजांचा संबंध आला होता. बहादुरशहाने इंग्रजांची लष्करी मदत मागितली होती. पण लॉर्ड कॉर्नवालिसची इच्छा प्रत्यक्ष सैन्याची मदत करावी अशी नव्हती. मात्र त्याने तुम्हां दोघांत मध्यस्थी करून सलोखा करून देण्याचें पत्करतों असें कबूल करून कर्नल कर्कपॅट्रिक याला १७९२ च्या सुरवातसिच नवाकोटा येथे रवाना केलें होतें. परंतु कर्कपॅट्रिक येऊन पोचण्यास अडचणीमुळे उशीर लागला व त्याआधींच गुरख्यांना तह करून घेणें भाग पडलें होतें आणि तहानंतर ब्रिटिशांची ढवळाढवळ गुरख्यांना औषधापुरतीहि नको होती! म्हणून कर्कपॅट्रिकने 'आता निदान आमचा ब्रिटिश रेसिडेंट तरी तुमच्या दरबारीं ठेवून घ्या' असें सुचविलें. त्यालाहि साफ नकार देण्यांत आला व कर्कपॅट्रिक हात हालवीत परत गेला. यापूर्वी एकाही इंग्रज मनुष्याचा प्रवेश नेपाळांत झाला नव्हता तो या वेळीं या निमित्ताने झाला. इंग्लिश लोकांच्या व्यवस्थित व धोरणी स्वभावानुसार कर्कपॅट्रिकने आपल्या नेपाळ–मिशनचें तपशीलवार प्रतिवृत्त लिहून ठेवलें तें पुढे १८११ सालीं प्रसिद्ध झालें.

## नेपाळचा 'ब्राह्मण राजा'

असो; अशा रीतीने पूर्वेकडे गुरख्यांना थप्पड बसली तरी त्यांची चळवळ थांबली नाहीं. त्यांनी त्याचा वचपा पश्चिमेकडे स्वाऱ्या करून काढला व १७९४ त गडवाल व कुमाऊन हे प्रांत जिंकले. म्हणजे नेपाळची सरहद्द पूर्वेस सिकीम तर पश्चिमेस थेट काश्मीरपर्यंत भिडली.

सध्याचें हिंदुस्थान सरकारचें सिमला ठाणेंहि अर्थातच त्या वेळीं नेपाळच्या मालकीचें होतें.

नंतर १७९५ सालीं नेपाळचा अल्पवयी राणा उमेदवार झाला व त्याने चुलत्यास कारभारावरून काढून राज्यसूत्रें आपल्या हातीं घेतलीं परंतु चुलत्याचा वकूब आणि शौर्य त्याच्या ठिकाणीं बिलकूल नव्हतें. त्याने बेफामपणे पुढील पांच वर्षांत इतका कांही जुलूम केला की त्या योगें सर्वजण नाराज व असंतुष्ट झाले. त्यांतच त्याने एक लोकक्षोभकारक गोष्ट करण्याचें ठरविलें; तीमुळे त्याची लोकप्रियता रसातळास गेली. त्याची राणी त्रिपुरसुंदरी हिला मूलबाळ झालें नाही म्हणून त्याने एका ब्राह्मण कन्येशीं विवाह केला. यामुळे सर्व ब्राह्मणवर्ग खवळून गेला. हा वर्ग नेपाळांतील कर्त्या व प्रमुख वरिष्ठ ज्ञातींपैकी कारभारी असा होता. ब्राह्मणांप्रमाणेंच इतरांनाहि तें मोठेंच वैषम्य वाटलें आणि परिणाम हा झाला कीं राणा बहादुरशहाला १८०० सालीं सक्तीने राजसंन्यास घेणें भाग पडलें. राणा बहादुर त्रिपुरसुंदरीस घेऊन काशीला वनवासास गेला. मात्र त्याच्या जागीं त्या ब्राह्मण राणीपासून झालेल्या मुलासच लोकांनी गादीवर बसविलें. वास्तविक तो राजपुत्र गीर्वाणयुध हा अधर्म्य किंवा लेकावळा म्हणून ब्राह्मणांनी जाहीर केलें होतें. यानंतर गिर्वाणयुधाचा राज्यभारभार दामोदर पान्रे हा पाहूं लागला. याच दामोदर पान्ऱ्याने कुमाऊ प्रांत नुकताच जिंकून नेपाळ राज्याला जोडला होता. या वेळीं पुन्हा नेपाळांत हात घुसविण्याची इंग्रजांना संधि आली होती. राणा बहादूर काशीवासास गेला; पण काशी तर इंग्रजांच्या ताब्यांत होती. अर्थात् राणा बहादूर ब्रिटिशांशीं तेथे बसून कारस्थान करील व पुन्हा नेपाळच्या राज्यावर येण्याची कारवाई करील अशी भीति उत्पन्न झाल्यामुळे दामोदर पानऱ्याने लगोलग ईस्ट इंडिया कंपनीशीं एक व्यापारी तह करून त्यांचा स्नेह संपादण्याचा प्रयत्न केला. पण तहांत इंग्रजांनी आपला जुना मुद्दा उगवून घेतला तो हा की, कंपनी सरकारचा एक ब्रिटिश रेसिडेंट कायमचा खाटमांडूस राहावा! नेपाळने ती गोष्ट अर्थातच नाईलाजाने कबूलहि केली; परंतु त्यांनी त्या वकिलाशीं इतकें कांही मगरुरीचें वर्तन ठेविलें की, नेपाळांत वकिलात ठेवण्यांत कांही लभ्यांश

नाही असें ठरवून कंपनी सरकाराने तेथली आपली रेसिडेन्सी हलविली. १८०२ सालीं कॅप्टन नॉक्स् पहिला ब्रिटिश रेसिडेन्ट म्हणून कामावर रुजू झाला होता तो १८०३ च्या मार्चांत याप्रमाणें परत गेला आणि पुढे विधिपूर्वक १८०४ सालीं नेपाळशीं केलेला व्यापारी तहहि विसर्जन करण्यांत आला.

## ‘ पानरे ’ व ‘ थापा ’

राणाबहादूर व त्याची राणी त्रिपुरसुंदरी काशीवासास जाऊन राहिली होती, परंतु तेथेहि राण्याने अनाचाराची कमाल चालविली. तेव्हा त्रिपुरसुंदरीने परत नेपाळांत येऊं द्यावें म्हणून दामोदर पान्रे यास विचारिलें. पान्रे याने तें कबूल केलें. त्रिपुरसुंदरी आली ती रिजन्ट राणी म्हणून आली. यापूर्वी राणाबहादुराने काशीस जातांना आपल्या अल्पवयी गीर्वाणयुधाच्या संगोपनाचें काम आपल्या एका राखेवर सोपविलें होतें. आता त्रिपुरसुंदरी परत आल्यामुळे ती राख भयाने पळून गेली. त्याच सुमारास पालपाचा संस्थानिक नेपाळची गादी स्वतःस मिळावी म्हणून कारस्थान करीत होता त्यास हद्दपार करण्यांत आलें व दामोदर पान्रे सर्वाधिकारी बनला. पण पुढे पुन्हा राणा बहादुरालाच परत नेपाळच्या गादीवर आणण्याचें ठरलें व त्याप्रमाणे येऊन तो पुन्हा नेपाळच्या सिंहासनावर बसला ! ! काशीहून येतांना त्याच्याबरोबर ‘ भीमसेन ’ नांवाचा विश्वासू रजपुतवंशीय गुरखा सरदारहि आला व तो लवकरच नेपाळचीं सर्व सूत्रें आवळून बसला. आपल्या मराठ्यांच्या इतिहासांत ज्याप्रमाणे जेधे-खोपडे, भोसले-घोरपडे, मोरे-बांदल इत्यादि घराण्यांचे पिढीजात हाडवैर प्रसिद्ध आहे तसेंच नेपाळांत ‘ पान्रे ’ आणि ‘ थापा ’ या दोन घराण्यांचें आहे. दामोदर हा ‘ पान्रे ’ होता व भीमसेन हा ‘ थापा ’ होता. राणा बहादुराने पुन्हा राज्यसूत्रें हातीं घेतल्याबरोबर थोड्याच दिवसांत या भीमसेनाने दामोदर पान्र्याचे व त्याच्या मुलांचे खून केले व मग भीमसेनच प्रधान किंवा कारभारी बनला; व त्याने ३३ वर्षेपर्यंत कारभार केला. पान्र्यापाठोपाठ भीमसेनाने पालपाच्या राजाचाहि मुडदा पाडला. अशा रीतीने राणा व आपण निर्वेध झाल्यावर भीमसेनाने मुलुखगिरीस

सुरवात केली. प्रथम पालपा संस्थान खालसा करण्यांत आलें. चोविसी संस्थानांपैकी एवढें एकटेंच काय तें स्वतंत्र राहिलें होतें तेंहि अशा रीतीने नामशेष झालें. या चौविसी मुलखांतूनच गुरख्यांना पुढे वाटेल तेवढ्या जवानांची लष्करांत भरती करून घेण्याची सोय झाली. पालपा घेतल्यावर भीमसेनाने आपल्या बापास कांगऱ्यावर पाठविलें. त्याचें नांव 'अमरसिंग थापा'; पण त्याच वेळीं तिकडून शिखांचा रणजितसिंगहि कांग्रा जिंकण्यासाठी आला होता. अर्थात् या दोन सैन्यांचीच लढाई होऊन अमरसिंगाला पळ काढावा लागला व कांग्रा प्रदेश गुरख्यांच्या ऐवजी शिखांच्या हातीं पडला.

## भीमसेनाची कारकीर्द

दरम्यान राणा बहादुराचे अनाचार व जुल्म पराकोटीला पोचले. फिरून त्याने ब्राह्मणवर्गावर हत्यार धरलें व त्या साऱ्यांची खासगी मालमत्ता जप्त केली, किंबहुना देवस्थानेंहि जप्त केलीं व आपली तिजोरी भरली. परिणाम हाच झाला की, राणा बहादुराचा खून झाला व राणा बहादुराला त्याच्या ब्राह्मण राणीपासून झालेला पुत्र 'गीर्वाणयुध'च पुनः गादीवर बसला व त्रिपुरसुंदरी को-रीजन्ट बनली. हा सर्व प्रकार १८०७ सालीं घडला.

यानंतर भीमसेनाने प्रत्यक्ष कंपनी सरकारच्याच मुलुखावर स्वारी केली. पश्चिमेस रणजितसिंग, पूर्वेस चीन व उत्तरेस दुर्लंघ्य हिमालय. फक्त दक्षिण तेवढी मोकळी. तेव्हा तिकडेच त्याने तोंड वळविलें. इंग्रजां-विषयी भीमसेनाला प्रथमपासून संशय व धास्ती. परंतु गेल्या ४० वर्षांत कंपनी सरकारने नेपाळच्या कारभारांत कांहीं हात न घुसविल्यामुळे तें नरम प्रकरण आहे असें समजूनच भीमसेनाने १८०४ ते १८१२ पर्यंत ब्रिटिश मुलुखांत आक्रमण सुरू ठेविलें व १८१२ पर्यंत तराई आणि तिरहूटमधील दोनशे गांवें कबजांत घेतलीं. इंग्रजांनी तक्रार केल्यावर दोघांनी मिळून चौकशी-कमिशन नेमिलें. त्या कमिशनने नेपाळविरुद्ध निकाल दिला व विवाद्य मुलुखाच्या रखवालीसाठी कांहीं फौज कंपनी-कडून ठेवविली. पण पावसाळ्यांत त्यावर हल्ला करून गुरख्यांनी तीं खेडीं

पुनः जिंकलीं. तेव्हा १८१४ च्या नोव्हेंबरमध्ये कंपनी सरकारने नेपाळशीं युद्ध पुकारलें. सुरवातीस इंग्रजांची अतोनात दुर्दशा उडाली. चार ब्रिटिशांची लष्करें गुरख्यांशीं झगडत होतीं, त्यांपैकी तिघांचा पूर्ण पराभव झाला. फक्त कुमाऊनकडील ब्रिटिश तुकडीला कांहीसा जय मिळवितां आला. यानंतर जनरल ' ऑक्थरलोनी ' हा १८१५ त मोहिमेचा सरसेनापति होऊन आला व त्याने १८१५ च्या मे महिन्यांत कुमाऊनमध्ये अमरसिंग थापाचा संपूर्ण पराभव केला. गुरख्यांना तह करणें भाग पडलें आणि सतलज ते काली नदीपर्यंतचा गेल्या ३० वर्षांत जिंकलेला सारा मुलूख त्यांना सोडून देणें भाग पडलें. या तहानंतरच रुखसत केलेल्या गुरख्यांच्या सैन्यांतील गुरख्यांनी ब्रिटिश सैन्यांत प्रथम नोकऱ्या धरल्या !

## इंग्रजांशीं लढाई

नाइलाज म्हणून गुरख्यांनी तह केला खरा. परंतु तो पाळण्याचें त्यांच्या मनांत नव्हतें. याच सुमारास कंपनी सरकारचें शिखांशीं व मराठ्यांशीं युद्ध पेटण्याचा संभव निर्माण झाला व कंपनी सरकार त्यानें व्यग्र झालें. तेव्हा केलेला तह पार मोडून टाकून पुनः १८१६ सालीं गुरख्यांनी इंग्रजाविरुद्ध युद्ध पुकारलें. या वेळींहि ऑक्थरलोनीच इंग्रज सेनापति होता. त्याने खाटमांडूवर सरळ चाल धरली. चुरिया घाटांत ( ब्रिटिश सरहद्दीपासून ३० मैलांवर ) त्याची गुरख्यांशीं गांठ पडली. ऑक्थरलोनीने चुरिया खिंडीच्या पश्चिमेस एका ओढ्यांतून जाऊन गुरख्यांना अर्धी प्रदक्षिणा घालून त्यांच्या पिछाडीवर हल्ला चढविला. तेथे त्याचा पराभव झाला. नंतर पुनः माकवानपूर येथे शेवटची कचाकची झाली. त्यांत इंग्रजांची सरशी झाल्यामुळे गुरख्यांनी तहाचें बोलणें लावलें व ४ मार्च १८१६ रोजीं शेगोवली येथे तह झाला. सांगण्याची मौज ही की त्याच तहाचा अंमल आजतागायत उभयपक्षी काटेकोरपणे स्नेहाने होत आहे. या तहाने नेपाळच्या हद्दी ' काली ' आणि ' मेची ', ह्या नद्या ठरविण्यांत आल्या. म्हणजे गढवाल, कुमाऊन, पश्चिमेकडील सर्व डोंगरी संस्थानें तसेंच पूर्वेकडील सिकीम हें सर्व गुरख्यांच्या हातून गेलें. दक्षिणेस तराईचाहि कांही भाग ब्रिटिशांना कांही वार्षिक खंड-

णींत द्यावा लागला. पूर्व-तराई ब्रिटिशांनी आपल्या मुलुखास जोडला व पश्चिम-तराई अयोध्येचा नवाबास देऊन टाकिला. पण यानंतर लवकरच इंग्रजांवर इतर अरिष्टें उत्पन्न झाल्यावर त्यांनी शिलकी खंडाने घेतलेला तराईचा भाग होता तो नेपाळशीं स्नेह टिकावा म्हणून नेपाळला परत केला. तहांतली आणखी महत्वाची गोष्ट म्हणजे खाटमाण्डू येथे ब्रिटिश वकिलाची स्थापना. नेपाळ हें स्वतंत्र राज्य असल्यामुळे इतर देशी संस्थानांतील रेसिडेन्टसारखा महादेवाचा अधिकार या वकिलाला केव्हाहि नव्हता व सध्याहि नाही हें खरें. तथापि वकिलात असल्याने तेथली कच्ची हकीकत अधिकृतपणे कळूं शकते व कारस्थानें खेळविण्यासहि वाव राहतो. हें उंटाचें पिल्लू घरांत शिरूं न देण्यासाठी नेपाळने किती खळखळ केली होती तें वर येऊन गेलेंच आहे.

## पान्ऱ्यांनी घेतलेला सूड

या युद्धानंतर लवकरच गिर्वाणयोधविक्रम देवी येऊन वारला. तो १८ वर्षांचा होता. त्याचा २ वर्षांचा मुलगा राजेंद्रविक्रम म्हणून होता तो गादीवर बसविला. अर्थात् भीमसेन व त्रिपुरसुंदरी यांना कुलमुखत्यारीने राज्यकारभार हाकण्याची पुनः वाढती सोय झाली व १६ वर्षे तें सुख त्यांनी भोगिलें.

१८३२ सालीं त्रिपुरसुंदरी वारली त्या वेळीं राजेंद्रविक्रम १८ वर्षांचा होऊन आपला अधिकार बजावण्यास उत्सुक झाला व त्याची चुणूक त्याने पुढील सालीं दाखविलीहि. दरसाल पांजणीचा सण असतो. त्या वेळीं संस्थानांतील अधिकाऱ्यांची बदली किंवा बडतर्फी व्हावयाची असते. या वेळीं राजेन्द्रविक्रमाने भीमसेनाला कामावरुन काढून घरीं बसविलें. पण यालाहि अंतस्थ कारण पान्रे-थापा विद्वेषाचेंच झालें. या वेळीं दामोदर पान्रे याचा मुलगा रणजंग हा पान्रे यांचा पुढारी होता. या सुमारास राजेन्द्राच्या थोरल्या राणीचा धाकटा मुलगा वारला. तो भीमसेनानेच विष घालून मारविला, फार काय राणीलाहि तसेंच मारण्याचा कट झाला होता, असा आरोप घालून भीमसेन आणि त्याचा पुतण्या मातबरसिंग यांच्या मुसक्या बांधण्यांत आल्या व त्यांची अत्यंत अप्रतिष्ठा करून सारी

चीजवस्त जप्त करण्यांत आली. आपल्या बापाच्या खुनाचा असा सूड घेतल्यानंतर रणजंग प्रधान झाला. पुढे धाकट्या राणीच्या शिफारसीने भीमसेनाची मुक्तता झाली. यानंतर नेपाळच्या कारभारांत कमालीचें अराजक माजलें. दोघी राण्या एकेक पक्ष घेऊन उभ्या राहिल्या व त्यांचीं एकमेकांवर कारस्थानें सुरू झालीं व आज यांचा मुख्य प्रधान तर उद्या त्यांचा अशा उलथापालथी सुरू झाल्या. शेवटीं १८३९ सालीं रणजंगाने सैन्याच्या मदतीने आपल्या शत्रूंचीं निष्ठुर पारिपत्यें केलीं. भीमसेनाला पकडून त्याचा असा छळ केला की, नवव्या दिवशीं त्याने कुकरी पोटांत खुपसून घेऊन जीव दिला. त्याच्या मृत्यूबद्दल तेव्हा नेपाळांत रेसिडेंट असलेल्या ब्रेन हॉजेसनने कंपनी सरकारास केलेल्या रिपोर्टांत म्हटलें आहे की, " भीमसेन हा फार मोठा पुरुष असून महान् मुत्सद्दी होता. ३० वर्षेपर्यंत त्याने या राज्यांत राजापेक्षाहि सत्ता गाजविली. रणजितसिंगाच्या तोडीचा हा गृहस्थ होता यांत शंका नाही. "

सह्याद्री, जानेवारी १९४६

★

— २६ —

# नेपाळच्या इतिहासाचें विहंगमावलोकन

## लेखांक दुसरा

भीमसेनाचा काटा काढल्यानंतर थोरल्या राणीने राजालाहि गुंडाळून ठेवून सारी सत्ता स्वतःच्या हातीं घेतली. ही राणी इंग्रजांची द्वेष्टी होती. तिने पुढल्याच वर्षी म्हणजे १८४०मध्ये ब्रिटिश मुलुखावर स्वारी करण्यास हुकूम दिला व रामनगर जिल्ह्यांतील सुमारे १०० खेडीं जिंकून घेतलीं. इंग्रज रेसिडेन्ट हॉज्सन याने लगेच या कृत्याचा जाब विचारला व 'सैन्य काढून घेऊन संपूर्ण दिलगिरी दाखवा ' असें फर्माविलें. तेव्हा राणीने खाटमांडूंत असलेल्या ब्रिटिशांच्या शिबंदीला चिथावलें व त्यांस खोटीच भीति घातली की, "हिंदुस्थान सरकारच्या हुकमावरून तुमचा पगार कमी करण्यांत यावयाचा आहे." याचा इष्ट तोच परिणाम झाला व ती शिबंदी पिसाळून तिने खाटमांडूंतील रेसिडेन्सीवर हल्ला केला. पण हॉज्सनने मोठ्या शहाणपणाने त्या लोकांना शांत करून वाटेस लाविलें.

यानंतर खुद्द हिंदुस्थान सरकारचाच लेखी हुकूम, ' रामनगरांतून गुरखा सैन्य हालवा' असा आला. तेव्हा मात्र गव्हार्ची कणीक करून देण्याची पाळी आली. नेपाळने सैन्य तर काढून घेतलेंच परंतु पान्ड्यांचें कारभारी मण्डळहि दूर करून एक संयुक्त मंत्रिमंडळ स्थापून इंग्रजांचा रोष कमी करण्याचें ठरविलें. यानंतर १८४१ सालीं राणी ताप येऊन वारली आणि इंग्रज-गुरख्यांतील तेढ माजविणारी मुख्य शक्तिच नष्ट झाली असें भासलें.

तेव्हा राजाने तर ब्रह्मदेश आणि अफगाणिस्तान यांत इंग्रजांचें युद्ध सुरू झालें होतें तिकडे नेपाळी सैन्याची मदत देण्याचेंहि बोलणें लावलें.

## धाकट्या राणीचा वरचष्मा

हा असा परराष्ट्रीय धोरणाचा प्रकार झाला तरी घरच्या यादवींचा प्रकार मात्र अखंड तसाच सुरू राहिला. थोरल्या राणीच्या मृत्यूमुळे धाकटी राणी तिच्या जागीं आली आणि ती तर थापा घराण्याची पक्षपाती व सहाय्यकर्ती! साहजिकच पुन्हा थापांचा वरचष्मा सुरू झाला. राणीने माजी भीमसेनाचा पुतण्या मातबरसिंग इंग्रजांच्या आश्रयास सिमल्यास जाऊन राहिला होता त्याला आणून कारभारी केलें. मातबरसिंगाने आपल्या चुलत्याच्या वधाचा बदला लगेच सव्याज घेतला. अशा रीतीने पान्डे पक्षाचा काटा तर काढण्यांत आला. तथापि लवकरच मातबरसिंगावरहि राणीची गैरमर्जी झाली!! राणीची खटपट अशी होती की, आपल्या मुलाला राज्याचे अधिकार द्यावे, थोरल्या राणीच्या मुलाचे अधिकार रद्द करावेत व ही कारवाई मातबरसिंगाने करावी. तें त्याच्या हातून झालें नाही, तेव्हा ती त्याच्यावर उलटली व राजास कांही तरी भासवून १८४५ सालीं तिने राजवाड्यांत बोलावून तेथेच मातबरसिंगाचा खून करविला. हा खून ज्याच्याकडून करविला तो जंगबहादूर म्हणजे प्रत्यक्ष मातबरसिंगाचा पुतण्या होता व राजाने त्याच्या हातांत भरलेलें पिस्तुल देऊन तें झाडविलें! जंगबहादुर हा धाडसी व शूर होताच. त्याच्या या कामगिरीचें बक्षिस म्हणून त्याला तीन रेजिमेंटाची सरदारी देण्यांत आली व कारभारी मंडळांतील लष्करी खातें त्याजकडे सोपविण्यांत आलें.

## अघोर हत्याकांड

वास्तविक राजाच्या मनांत जंगबहादुराला मुख्य प्रधानच करावयाचें होतें. परंतु तसें करण्याची त्याची इतक्यांतच छाती होईना. त्याचें कारण असें की, राणीचा 'गंगासिंग' नामक सेनापतीशीं अनैतिक गुप्त प्रेमसंबंध होता. त्या गंगासिंगाला सात रेजिमेंटांची हवालदारी होती. म्हणजे खरी सत्ता अद्याप त्याच्याच हातीं होती. यानंतर राजाला आपला सूड घेण्याची

संधि लवकरच आली. त्याने १८४६ सालीं 'गंगासिंगा'चा मारेकरी घालून खून करविला; पण त्याबरोबर राणी इतकी चवताळली की पुसतां सोय नाही. त्या संतापाच्या भरांत त्या महामायेने जी अघोर हत्या केली तिने अंगावर शहारेच उभे राहतात. तिला कटाचा मोठाच संशय आलेला असल्यामुळे तिने कोटांत दरबार भरवून झाडून सारे लष्करी व मुल्की अधिकारी जमा केले व "तुम्ही सर्व कटांत सामील आहां" असा आरोप ठेवला व तेथल्या तेथे पंचावन्न लहानमोठ्या सरदारांचीं व अधिकाऱ्यांचीं डोकीं उडविलीं ! ! यांखेरीज इतरहि ५०० वर लोक मारले ! ! ! ही सर्व अतिशयोक्ति नसून नेपाळ सरकारच्या सरकारी दप्तरखान्यांतच या प्रसंगाचें असें तपशिलवार वर्णन लिहून ठेवलेलें आहे. जंगबहादुराला याचा सुगावा असावा, किंबहुना त्याचा या राणीच्या कटांतहि हात होता. कारण हा प्रकार चालला असतां तो आपलीं ३ रेजिमेंटें घेऊन आला व त्याने कोटाला वेढा घातला त्यावेळीं मोठीच दंगल व गोळी-बार झाला, अनेक लोक प्राणास मुकले. शेवटीं जंगबहादुर आपले निवडक विश्वासाचे कांही लोक घेऊन दुराटी बंदुकांच्या फैरा झाडीत राजवाड्यांत घुसला; व तेथून चौफेर गोळ्यांचा पाऊस पाडून त्याने कोटाचा कबजा घेतला. असें सांगतात की, ही हत्या चालली असतां राणी खिडकींत उभी राहून "मारा ! मारून टाका !!" असे त्वेषाने हुकूम सोडीत होती. ही कत्तल चालू असतांच राणीने प्रधानपद आणि सेनापतिपद जंगबहा-दुराच्या हवालीं केल्याचें जाहीर केलें ! !

## जंगबहादुर

जंगबहादुराचा जन्म १८१७ सालीं झाला होता. बलनरसिंग कुंवराचा तो द्वितीय पुत्र. राणाबहादुरशहाचा खून झाला त्या वेळीं त्या खुनेकऱ्याला ठार मारल्याबद्दल बलनरसिंगाला वंशपरंपरा 'काजीचें' पद देण्यांत आलें होतें व भीमसेनाचा मृत्यु होईपर्यंत त्याने अनेक महत्त्वाचे दरकहि चाल-विले होते. बनलरसिंग वायव्यप्रांतांत कामगिरीवर होता, यामुळे जंगबहा-दुराचें खाटमांडूंत राहाणें फारसें नसे. मात्र तो फार अफाट असून बापाचेंहि ऐकत नसे, अशा वार्ता खाटमाण्डूस राजाकडे येत. जंगबहादुर हा

अत्यंत महत्त्वाकांक्षी व कमालीचा शूर पुरुष होता. शिपायांचा अत्यंत प्यार असे. द्यूतांत आणि शिकारींत त्याचा कोणीहि पराभव करूं शकला नसता. १८३७ मध्ये भीमसेनाच्या मृत्यूनंतर जंगबहादुराच्या बापाचा व त्याचा दरक काढून घेण्यांत आला आणि ते अन्नाला मोताद झाले. जुगारापायीं केलेलीं कर्जें मात्र डोक्यावर होतीं. तीं कर्जें तराईच्या जंगलांत एकांगीं करून धाडसाने रानटी हत्ती पकडून जंगबहादुराने फेडलीं! पुढे कांहीं दिवस लष्करीपेशा सोडून नेपाळत्याग करून तो परागंदा झाला व लाहोरास रणजितसिंगाच्या दरबारीं गेला. पण रणजितसिंगाच्या दरबारीं याचा मुजरा झाला नाही व तेथेंहि पुन्हा कर्जच झाल्यामुळे तो पुन्हा उद्विग्न व बेहोष मनःस्थितींत परत नेपाळांत आला. वास्तविक सैन्य सोडून पळून गेल्याचा त्याच्यावर मोठाच आरोप होता; परंतु त्याबद्दल या वेळीं त्याला शिक्षा न होतां उलट त्याला पुन्हा काजीपद देण्यांत आलें! याचें कारण हें होय की, एकट्याने रानटी हत्ती पकडण्याचें त्याचें कौशल्य पाहिल्याने राजा त्यावर खूष होऊन गेला होता. जंगबहादुराच्या शौर्याविषयी आणि राजनिष्ठेविषयी अनेक दंतकथा नेपाळांत आबालवृद्धांच्या तोंडीं आहेत. किंबहुना 'नेपाळ' शब्द उच्चारिला म्हणजे प्रथम कोणतें एक नांव डोळ्यापुढे येत असेल तर तें जंगबहादुराचेंच! त्याच्या राजनिष्ठेची अशी गोष्ट सांगतात की, राजाने कोणाचाहि प्राण घेतला तरी तो कायदेशीर आहे, नव्हे राजाचा तो हक्कच आहे असें तो मानी! उदाहरणार्थ—युवराज सुरेंद्र-विक्रम याने अनेक वेळा त्याला नाना उपयांनी मारण्याचा प्रयत्न केला; परंतु त्याने त्याचा बदला त्या राजपुत्रावर कधींहि घेतला नाही. फार काय कांहीं प्रसंगीं स्वतःचा जीव धोक्यांत घालून त्याचा जीव वाचविला व पुढे तर त्यालाच राजपद मिळवून दिलें.

मुख्य प्रधान होतांच त्याने सर्व पान्रे कुळाला त्यांची चीजवस्त जप्त करून नेपाळांतून हांकून दिलें व राज्यांतील सर्व खात्यांत आपले विश्वासु लोक भरले. आता त्याला प्रतिस्पर्धी अशी ती महत्त्वाकांक्षी राणी तेवढी उरली; पण तिचाहि लवकरच निकाल लावण्याचा प्रसंग आला. थोरल्या राणीला जे पुत्र होते ते नेपाळ गादीचे वारस व्हावयाचे हें त्या राणीला

सलत होतें, म्हणून तिने त्या राजपुत्रांना मारून नाहींसे करून आपल्याच पुत्रांचा राज्यावर बसण्याचा हक्क निर्वेध करून देण्यासाठी जंगबहादुरामागे सारखा नेट लावला. परंतु जंगबहादुराने तो झिडकारला. तेव्हा जंगबहादुराचाच खून करण्याचा कट तिने रचला. तो वेळींच उमगल्यामुळे सारे कटवाले पकडून जंगबहादुर तडक आपला रिसाला घेऊन राजवाड्यांत गेला व त्याने तशीच तेथूनच राणीची मोट आवळून काशीस हद्दपार केली! राणी आणि अर्थातच तिच्याबरोबर तिचा नेभळा नवरा राजा आणि दोन पुत्र असे सर्वच काशीस गेले. जंगबहादुराने थोरल्या राणीचा पुत्र सुरेंद्र याचेच राजाकडून रीजेंट स्थापल्याचें अज्ञापत्र घेतलें. हा प्रकार २३ नोव्हेंबर १८४६ सालीं झाला.

सर्व सत्ता आपल्या हातीं घेण्याचे सर्व कायदेशीर उपाय जंगबहादुराने अर्थातच मोठ्या काळजीपूर्वक योजले होते. त्याने राजाच्या लालमोहरेचें आज्ञापत्र मिळविलें. त्या योगें हद्दपार केलेल्या राजाराणीचेहि हुकूम त्याला बंधनकारक होत नव्हते. पण राणी किंवा राजा सुखासुखी आपला अधिकार कोठून गमावणार? त्या दोघांनी काशीस बसून पुन्हा जंगबहादुरास मारण्याचा कट रचिला. तोहि उघडकीस आला. तेव्हा राजाला दूर ठेवण्याने फितुराला अधिकच अवसर सांपडतो असें पाहून त्याने राजाला नेपाळांत आणून त्याच्याकडून राज्याचा बेदावा लिहून घेऊन त्यास नजरबंद करण्याचें ठरविलें व राजास नेपाळांत परत येण्याचें आमंत्रण दिलें. पण या वेळीं राजाहि आला तो कांही सैन्य जमवून जंगबहादुरावर स्वारी करूनच आला. हा सर्वच प्रकार पेशव्यांविरुद्ध सातारकर छत्रपतींनी केलेल्या बंडासारखाच होता; व त्याचा जो परिणाम झाला तोच येथेहि झाला. राजाच्या पेंढारी सैन्याची जंगबहादुराच्या सैन्याशीं गांठ पडतांच पहिल्याच धडकींत तें सैरावैरा होऊन गेलें. जंगबहादुराचा सेनापति 'जनकसिंग' याने राजास कैद केलें. जंगबहादुराने वरकरणी राजास मोठे इतमानाने वागविलें, परंतु त्याच्याकडून राज्य सुरेंद्रविक्रमास देववून नंतर राजास 'भटगांव' येथे कायमचें नजरबंद करून ठेविलें!!

यानंतर मात्र जंगबहादुराला थोडी स्वस्थता मिळाली. या वेळीं

इंग्रजांचें वर्चस्व हिंदुस्थानवर पक्कें बसलें होतें व त्यांचा दरारा नेपाळला पूर्वानुभवावरून प्रत्ययासहि आलेला होता. तेव्हां जंगबहादुराने फार धोरणीपणाने इंग्रजांशीं कायमचा स्नेह ठेवून त्यांचा रोष नेपाळला कधीहि बाधूं नये असेंच धोरण ठेवण्याचें ठरविलें. त्याप्रमाणे १८४८ सालीं इंग्रज आणि शीख यांत युद्ध होण्याचा प्रसंग उद्भवला तेव्हां जंगबहादुराने कंपनीस कळविलें की, "माझी सहा रेजिमेंटें घेऊन मी स्वतः तुमच्या बाजूने लढण्यास केव्हांहि सिद्ध आहे." तें इंग्रजांनी आभारपूर्वक नाकारलें, कारण त्यांना मनांतून भीति वाटली असावी की नेपाळने पूर्वीं शिखांशीं युद्ध केलेंच होतें व त्यांच्या मुलखावर नेपाळचा डोळा होताच. तेव्हां जय झाल्यास कदाचित् नेपाळकर, शिखांचा कांहीं मुलख तरी स्वतःकडे दाबून ठेवतील.

## जंगबहादुराची विलायतयात्रा

पुढे दोन वर्षांनी सर्व स्थिरस्थावर आहे असें पाहून जंगबहादुराने इंग्रजांची विलायत पाहून घेण्याची आपली दुर्दम्य आकांक्षा एकदाची पुरी केली. सारा जन्मभर इंग्रजलोकांची कीर्ति आणि कर्तृत्व तो ऐकत व अनुभवीत आला होताच. म्हणून हे इंग्रज आहेत तरी कसे हें त्यांच्या देशांत जाऊन समक्ष पाहण्याची त्याला आसोशी लागली होती. वास्तविक समुद्रप्रवास हें कर्मठ नेपाळांत मोठेंच पातक समजलें जाई; पण तें जंगबहादुराने बिलकुल जुमानलें नाहीं. यावरून त्याचा निश्चयी व व्यवहारी स्वभाव उत्तम दिसून येतो. १५ जानेवारी १८५० रोजीं आपले दोघे भाऊ, बारा कारभारी, चार आचारी व बावीस हुजरे व नोकर असा लवाजमा घेऊन तो निघाला. राज्यकारभार त्याने आपला बंधू जनरल बंबबहादुर याजवर सोपविला. हिंदुस्थानांतून सीलोनला गेला व तेथून गलबतांतून प्रवास करून तो २५ मे १८५० रोजीं सौदॅम्टनला पोहोचला. जंगबहादुराचे सोपस्कार इंग्रज सरकारने फारच केले. व्हिक्टोरिया राणीने त्याला आपल्या पुत्रवर्गांत बसवून सन्मान केला. ड्यूक ऑफ् वेलिंग्टननेहि त्याची भेट घेतली. जंगबहादुराने ब्रिटिशांचे सर्व लष्करी कारखाने, गोद्या, दारुगोळा, कोठारें मुद्दाम पाहिलीं.

कोळसा कसा काढतात हें प्रत्यक्ष पाहण्यासाठीं तो खाणीच्या तळाशीं स्वतः जाऊन आला. इंग्लंडहून परत येतांना फ्रान्स येथे गेला व नेपोलियनची समाधी पाहून लुई नेपोलियनची गांठ घेऊन पुढे २९ जानेवारी १८५१ रोजीं बरोबर एक वर्षानें तो खाटमांड्स परत आला. पण जंगबहाराचें जीवित म्हणजे संकटांनी सदा ग्रस्त! कारण तो समुद्र-प्रवासास गेला याचेंच धार्मिक स्तोम माजवून तो परततांच १० च दिवसांत त्याला ठार मारण्याचा कट झाला, आणि या वेळीं कटाचा सूत्रधार दुसरा तिसरा कोणी नसून खुद्द त्याचा भाऊच बदरीनरसिंग हा होता! पण याहि वेळीं बंबसिंगाने कटवाले लगेच पकडले. त्यांत बद्रीसिंग, जंगबहादुराचा जयबहादुर नांवाचा एक चुलत भाऊ आणि दोन सरदार उमगले. ते पकडून न्यायकोर्टानें त्यांना कोणास देहांताची तर कोणाला डोळे काढण्याची अशा शिक्षा फर्माविल्या. पण जंगबहादुराने मोठेंच औदार्य प्रकट केलें. त्याने कोर्टाच्या शिक्षांचा अंमल न करतां हे चारहि गुन्हेगार ब्रिटिशांच्या कैदेंत ठेवण्यासाठी अलाहाबादेस पाठवून दिले!!

## तिबेटशीं पुन्हा लढाई

१८५४ च्या मे मध्ये नेपाळचें पुन्हा तिबेटशीं भांडण सुरू झालें. ल्हासा येथे राहणाऱ्या नेपाळ्यांचा छळ केला जातो हें निमित्तकारण झालें. लढाई सुरू झाली; व ती दोन वर्षे चालली. उभयपक्षीं आतोनात नुकसानीहि झाली. अखेर तिबेट्यांना शरण यावें लागलें व त्यांनी तहाचें बोलणें लावलें. २४ मार्च १८५६ रोजीं खाटमांडू येथे तहावर सह्या झाल्या. लढाईत नेपाळने जिंकला तो मुलूख नेपाळने सोडून द्यावा, उलट दरसाल तिबेटने नेपाळला १०००० खंडणी द्यावी, नेपाळी लोकांना तिबेटांत व्यापार करण्यास पूर्ण मोकळीक असावी, नेपाळच्या कोठल्याहि जिनसांवर तिबेट हद्दींत दस्तुरी घेऊं नये व तिबेटी सरकारने आपल्या ल्हासा राजधानींत कायमचा एक नेपाळी प्रतिनिधि ठेवून घ्यावा अशीं तहांतील कलमें होतीं.

## पेशवा 'छत्रपती'च झाला

यानंतर १ ऑगस्ट १८५६ रोजीं जंगबहादुराने राज्यभाराचा कंटाळा

आल्यामुळे आपल्या जागीं बंबबहादुरास नेमून कर्मसंन्यास घेतला. याच वेळीं राजाने राजमुकुटहि जंगबहादुरास अर्पण केला. त्याला 'महाराजा' ही पदवी दिली ! हे सान्मान जंगबहादुराने नाकारले असें कोणी म्हणतात. हॅमिल्टन, जो त्या वेळीं खुद्द नेपाळांतच होता तो लिहितो की, हे सर्व सन्मान राजानेच जंगबहादुरास अर्पण केले. याखेरीज कोणास फाशी देणें, माफी देणें, युद्ध पुकारणें, तह करणें हेहि राजाचे सर्वाधिकार मिळाले व नेपाळचें प्रधानपद वंशपरंपरा करून देण्यांत आलें ! ! नेपाळांतील कायद्याप्रमाणे हें वंशपरंपरा प्रधानपद प्रथम सख्या भावास, नंतर चुलतभावास व नंतर त्याच अनुक्रमाने त्यांच्या मुलांस असें दिलें जातें. पण १८५७ च्या मेमध्ये बंबबहादुर मेल्यामुळे पुन्हा जंगबहादुराला नेपाळचीं राज्यसूत्रें हातीं घ्यावीं लागलीं.

## ५७ च्या बंडांत इंग्रजास मदत

याच सुमारास ५७ च्या बंडाचा भडका उडाला. ताबडतोब जंगबहादूराने ससैन्य मदतीस जाण्याची इच्छा दर्शविली. प्रथम ती इंग्रजांनी नाकारली, पण मागाहून घ्यावीच लागली. दिल्ली परत जिंकल्यावर लॉर्ड कॅनिंगने महाराजा जंगबहादुराला लखनौस सैन्य पाठविण्यास लिहिलें. तावडतोब ३००० सैन्य निघालें व रातवा करून लांब लांब मजला करीत तें त्रिशूळ-गंगेच्या खोऱ्यांतून आलें व बंडखोरांचीं दोन ठाणीं त्यांनी जिंकलीं व अयोध्येच्या मुलखांत शिरून चांदाशोहानपूर येथपर्यंत मजल गांठली. यामुळें लखनौवर जाणाऱ्या इंग्रज फौजेची बगल सुरक्षित झाली. नंतर स्वतः जंगबहादुर ८००० फौज घेऊन आला व त्याने ठाण्यामागून ठाणीं हिसकावून घेतलीं. जानेवारींत त्याने गोरखपूर जिंकलें तेव्हा अयोध्या या संस्थानांतील बंडखोरांचें पेकाटच मोडलें. नंतर दोन महिन्यांनी खुद्द लखनौच्या वेढ्यांत जंगबहादूर सामील होता. त्यानेच चतरमंझलि, मूर्तीमहाल व केसरबाग जिंकली व मुसाबागेची लढाई जिंकून लखनौ मुक्त केलें. पुढे बंडवाल्यांचा मोड होऊन हजारों सशस्त्र बंडवाल्यांच्या टोळ्या नेपाळ हद्दींत आश्रयास शिरल्या. सुमारे २३००० पर्यंत हे लोक असून त्यांपैकी ११००० सशस्त्र होते. जंग-

बहादूराने पायदळ व तोफखान्याच्या टोळ्या घेऊन त्या टोळ्यांना वेढलें व निःशस्त्र करून उधळून लाविलें. जंगबहादुराच्या या सर्व कामगिरीबद्दल ब्रिटिश सरकारने खूष होऊन पूर्वी १८१६ सालीं तराईचा जो मुलूख हिसकाऊन घेतला होता तो नेपाळला परत दिला. या बंडाच्या निमित्तानेच जंगबहादुराने नवीं नवीं गुरखा पायदळ पलटणें इंग्रजांसाठीं तयार करविलीं होतीं. तीच प्रथा येथून सर्रास पुढे चालू झाली. वास्तविक १८१५ सालीं इंग्रजांनी नेपाळांत आपल्या सैन्यासाठी गुरख्यांचीं तीन बटॅलियन्स उभारलीं होतीं पण त्या गुरखा शिपायांच्या कुटुंबकबिल्यांना नेपाळ सरकारने त्या वेळीं अतोनात छळलें होतें.

यानंतरच्या काळांत नेपाळांत जंगबहदुराने रस्ते-दुरुस्ती, टपाल-स्थापना, पीनलकोर्ट-स्थापना इ० सुधारणा केल्या. १८५९ सालीं ब्रिटिश सरकारने नाइट-ग्रँड-क्रास दिला व १८७२ सालीं चीनच्या बादशहानेहि त्याचा अत्युच्च सन्मान केला. १८७६ सालीं एड्वर्ड बादशहा युवराज म्हणून हिंदुस्थानास आला त्या वेळीं जंगबहादुराने शिकारीचा प्रचंड खेळ करून दाखविला. १८७७ च्या मार्चमध्ये तो वारला. कोणी म्हणतात तापाने तर कोणी म्हणतात वाघाच्या शिकारींत जखमा होऊन तो वारला. भागमतीच्या कांठीं पथ्थरघाटावर त्याचें देहावसान झालें.

## जंगबहादुरानंतर

१८५६ सालीं ठरविण्यांत आलेल्या वारसकायद्याप्रमाणे वास्तविक जंगबहादुराचा सर्वांत वडील भाऊ बद्रीनरसिंग यासच प्रधानपद मिळावयाचें; परंतु बद्रीनरसिंगाने जंगबहादुर विलायतेहून परत आल्यावर त्याला ठार मारण्याचा कट केला होता. सबब जंगबहादुराने त्याचा वारसाहक्क रद्द केला होता. म्हणून बद्रीनरसिंगाच्या खालचा भाऊ राणा उद्दिपसिंग यास प्रधानपद मिळालें. हा स्वभावाने आनंदी, उमदा, मौजा गडी होता; पण जंगबहादुराचा रुबाब किंवा कर्तृत्व त्याचे ठायीं बिलकूल नव्हतें. त्याला खुद्द जंगबहादुराच्या मुलाकडूनच फार त्रास झाला; परंतु 'धीरसमशेर' नांवाचा जंगबहादुराचा एक भाऊ मुख्य सेनापति होता, त्याने उद्दिपसिंगास फार धीर देऊन व साहाय्य करून जंगबहा-

दुराच्या मुलाचें कांहीच चालूं दिलें नाही. पण कांही दिवसांनंतर उद्दिपसिंगाविरुद्ध कारवाया सुरू झाल्याच. या वेळीं या कटांत राजा सुरेन्द्राची सून आणि थापा घराण्यांतील मातबरसिंगाचे वारस सामील होते. दरम्यान १८८१ सालीं राजा सुरेन्द्रविक्रम वारला. त्याने एकूण ३४ वर्षे गादी संभाळली. पण खरें बोलावयाचें म्हणजे तो बसत असे तेवढ्याच गादीची मालकी त्याच्याकडे होती असें म्हटलें तरी चालेल. नेपाळचें राजपद म्हणजे प्रधानाच्या मुठींतलें ! वाटेल त्या आज्ञापत्रावर शिक्का उठवून देणारें कळसुत्री बाहुलें इतकेंच त्याचें काम झालें होतें. सुरेन्द्रविक्रमाच्या मृत्यूनंतर पृथ्वीवीर विक्रमशहा (त्याचा नातू) गादीवर बसविण्यांत आला आणि त्यानंतर पुढल्याच सालीं उपर्युक्त कटवाल्यांनी नव्या राजासुद्धा राजघराण्यांतील एकूण एक माणूस व त्याचप्रमाणे जंगबहादुराच्या कुटुंबांतील एकूण एक माणूस ठार मारण्याचा धाडसी डाव रचला. या कटाचा सुगावा जंगबहादुराचा ज्येष्ठ पुत्र 'जगत्जंग' यास लागला होता; परंतु त्याने चोरावर मोर होऊन अखेरी साधण्याचा उलट डाव टाकला व तो गुप्तपणे नेपाळांतून पळून हिंदुस्थानच्या हद्दींत जाऊन राहिला. त्याची कल्पना अशी कीं, ठरल्याप्रमाणे कटाचा बार उडेल, राजघराणें व प्रधानघराणें यांतील सर्वच लोक मारले जातील व मग आपण आयतेच प्रकट होऊन विनायास सारें राजरोस रीतीने दाबून बसूं ! पण त्याच्या दुर्दैवाने कट उघडकीस आला व त्यांतील २१ मातबर कटवाल्यांची डोकीं मारण्यांत आलीं आणि जगत्जंगाच्या बहुतेक सर्व भावांचा कधीकाळीं निर्माण होणारा वारसाहक्कहि नष्ट करून टाकण्यांत आला.

## रक्तस्नात महाराजापद

यानंतर सेनापति धीरसमशेर अकस्मात वारला, म्हणून प्रधान उद्दिपसिंगाने आपला पुतण्या 'जगत्जंग' यास आश्वासन देऊन परत नेपाळांत बोलाविलें व त्याला आपणामागून वारस ठरविलें. तेव्हा धीरसमशेराचे भाऊ चवताळून उठले व २२ नोव्हेंबर १८८५ रोजीं ते उद्दिपसिंगाच्या वाड्यांत गेले व त्याचा त्यांनी सरळ खून पाडला. लगेच

तसाच जगत्जंग, त्याचा मुलगा युद्धप्रतापजंग यांचीहि त्यांनी तशीच वाट लाविली व राजवाड्यांत शिरून अल्पवयी राजा व त्याची आई बंदोबस्तांत घेऊन ते थूनीखेलच्या परेडग्राउंडांत गेले व त्यांनी तेथे सर्व सैन्यास असें जाहीर केलें की, " धीरसमशेराचा जेष्ठ पुत्र वीरसमशेर यालाच राजाने यापुढे प्रधानपद बहाल केलें आहे. त्याचा हुकूम मानावा."

अशा रीतीने प्रधानपद मिळविल्यावर वीरसमशेराने १६ वर्षे कारभार केला तो प्रजेच्या दृष्टीने मात्र फार सुखावह व कल्याणकारक ठरला. आरोग्यविषयक, शैक्षणिक वगैरे पुष्कळ सुधारणा त्याने केल्या व अनेक गांवीं तळीं, तडागें बांधून पाण्याची सुखसोय करून दिली. वीरसमशेराचीं हीं सोळा वर्षे म्हणजे अगदी निष्कंटकच गेलीं असा मात्र याचा अर्थ नव्हे. " दुरितैरपि कर्तुमात्मसात् प्रयतन्ते नृपसूनवो " या कालिदासोक्ती-प्रमाणे वारसदारांचे अघोरी उपाय कांहीं चालू राहिलेच. त्यांपैकी एक म्हणजे त्याचा भाऊ खड्गसमशेर जो सध्या सेनापति झाला होता व जो वीरसमशेरानंतर प्रधानपदावर यावयाचा होता त्यानेच केलेला कट उघडकीस आला. हा कट राजासकट प्रधानाला मारण्याचा होता. पण वीरसमशेरने क्रौर्य दाखविलें नाही. त्याने खड्गसमशेराला पाल्पा-नजिक एका डोंगरीवर स्थानबद्ध करून ठेविलें इतकेंच. आणि पुढे दोन वर्षांनी तर त्याला मुक्त करून पाल्प्याचा सुभेदारहि नेमलें. मात्र वीरसमशेराने राजाकडून पुन्हा प्रधानाच्या वारसाहक्काचें एक आज्ञापत्र काढविलें व त्यांत खड्गसमशेर आणि जंगबहादुराचे मुलगे व नातू यांचा वारसाहक्क नष्ट करून टाकला.

वीरसमशेरने तीन वेळा हिंदुस्थानला भेटी दिल्या. लॉर्ड कर्झनच्या वेळीं कांहीं मानपानावरून थोडा बखेडाहि एक वेळ निर्माण झाला होता. १९०१ सालीं वीरसमशेर वारला व खड्गसमशेरहून धाकटा त्याचा भाऊ देवसमशेर प्रधान झाला. याच्या कारकीर्दीतील विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्याने नेपाळांतील गुलामगिरी नष्ट करण्याचा प्रयत्न केला. स्वतःच्या अनेक गुलामांना त्याने सोडून दिलें. पण देवसमशेर इतर दृष्टींनी त्या प्रधानपदाला नालायक ठरल्यामुळे तीनच महिन्यांत त्याच्या भावाने त्याचा राजिनामा घेतला व त्याचा भाऊ चंद्रसमशेर याला

प्रधानपद दिल्याचें फर्मान राजाकडून काढलें गेलें. चंद्रसमशेराच्या नेमणुकीच्या राजपत्रांत प्रधानाचे अधिकार पुढीलप्रमाणें उल्लेखिलेले होतेः— ( १ ) देहान्ताची शिक्षा देणें ( २ ) एखाद्यास जातिबहिष्कृत करणें ( ३ ) जन्मभर कैद देणें ( ४ ) चीजवस्त जप्त करणें ( ५ ) हद्दपार करणें ( ६ ) सन्मानचिन्हें देणें व काढून घेणें ( ७ ) राज्याचा जामदारखाना व जवाहीरखाना यांची पूर्ण अखत्यारी वगैरे.

चंद्रसमशेर हा सर्व दृष्टींनीं उत्तमोत्तम ठरला. १८८३ सालीं त्यास कलकत्त्यास पाठविण्यांत आलें. तेथून तो मॅट्रिक्युलेशनची परीक्षा पास झाला. पुढे त्यास बापाच्या मृत्युमुळे शिक्षण सोडावें लागलें; परंतु शिक्षणाचा महिमा त्यास पूर्ण पटला होता. याच्याच कारकीर्दीत खाटमांडूस पाटणा युनिव्हर्सिटीस जोडलेलें कॉलेज निघालें. त्यानें १९२४ सालीं कायद्याने गुलामगिरी बंद केली; या आधीं १९२० सालीं अखेर सतीची चालहि बंद केली होती. ही चाल बंद करतांना मात्र त्याला फार जपावें लागलें, कारण नेपाळांत सतीची चाल फार रूढ होती. याने लष्कराची पुनर्घटना करून ते अद्ययावत् बनविलें. ऑफिसरांच्या परीक्षा घ्याव्यात, गुणानुरूपच बढाली बडतर्फी व्हावी, लष्करी नोकरीबद्दल नक्त पगार द्यावा, जहागीर किंवा वतन देऊं नये असें त्यानें केलें.

पहिल्या महायुद्धांत नेपाळने प्रथम १०००० सैन्य सर बाबरसमशेर सेनापतीच्या हाताखाली पाठविलें. पुढे चार गुरखा रेजिमेंटें घेऊन पद्मसमशेर वायव्यसरहद्द प्रांतांत गेला व तेजसमशेराची डेहराडून येथे नेमणूक झाली. १९१६ सालीं खूपच गुरखा सैन्य पाठविण्यांत आलें. वझिरीस्तानांत गुरखा सैन्याने १९१७ सालीं फारच पराक्रम केला. एकूण २००००० गुरखा सैन्य नेपाळने पुरविलें व त्यांपैकी २०००० ठार व जखमी झालें. याखेरीज मशीनगन्स, लष्करासाठी उबदार कांबळी, रेल्वेरस्त्यांसाठी रुळाखाली घालण्याचीं लांकडें, वेलदोडे व चहा अतोनात पुरविला. चंद्रसमशेर जगबहादुराप्रमाणेंच १९०८ सालीं इंग्लंडला गेला. त्याचाहि तसाच सन्मान इंग्रज सरकारने केला. तो २५ नोव्हेंबर १९२९ सालीं वारला. त्याने २८ वर्षे राज्य केलें. मृत्युसमयीं त्याचें वय ६७ वर्षांचें होतें.

त्यानंतर नेपाळांतील वारसाहक्काप्रमाणे भीमसमशेर गादीवर आला. हा भीमसमशेर यापूर्वी २८ वर्षे नेपाळचा मुख्य सेनापति व राज्यकारभारखात्याचा प्रमुख कारभारी असल्यामुळे त्याला कारभाराची उत्तम माहिती होती; पण वयस्कस्थितींत राज्यावर आला होता आणि तो पुढे तीनच वर्षांनी वारला. त्यामागून जोधसमशेर गादीवर आला. याने चंद्रसमशेराबरोबर युरोपादि प्रवास केला होता व प्रत्यक्ष राज्यकारभाराचेंही शिक्षण मिळविलें होतें. जोधसमशेर यांचे चिरंजीव कमांडरिंग चीफ बहादुरसमशेर यांची विलायतेंत नेपाळचे वकील म्हणून नेमणूक झाली. याखेरीज कमांडिंग जनरल सर बाबरसमशेर आहेत ते सर चंद्रसमशेरांचे द्वितीय पुत्र. परराष्ट्र खात्याचे जनरल सर केसरसमशेर, सर चंद्रांचे तृतीय पुत्र. ते परराष्ट्र खात्याचे डायरेक्टर जनरल आहेत. ते फार मोठे विद्याव्यासंगी व शिकारीहि आहेत.

सध्या महाराजा पद्मसमशेरजंग नेपाळच्या गादीवर आहेत म्हणजे पेशवेपदावर आहेत. परवाच्या दुसऱ्या महायुद्धांत नेपाळने दोस्तांना किती लष्करी मदत केली तें प्रसिद्धच आहे. व्हिक्टोरिया क्रॉस मिळविणारे सैनिक गुरखेच आहेत हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

नेपाळांत तत्त्वतः मुख्य राजा आहे पण तो नष्टांशच आहे. त्याची पदवी "महाराजाधिराज." खरा राजा तो पेशवा किंवा सेनापति. त्याची पदवी 'महाराजा' अशी आहे. तोच सर्वाधिकारी. त्याला सल्ला देण्यासाठी भारदारांचें म्हणजे सरदार लोकांचें एक सल्लागार कौन्सिल असतें. या पेशवा सेनापतीचा उल्लेख बोलींत नेपाळी लोक 'तीन सरकार' असा करतात तर राजाचा उल्लेख 'पांच सरकार.' याचा अर्थ असा—सेनापतीला तीन श्रीकारांचा अधिकार आहे तर राजाला पांच श्रीकारांचा आहे. हा तीन श्रीकारांचा मान तिबेटी लढाई व बंडाच्या वेळची मदत यासाठीं जंगबहादुराला प्रथम मिळाला होता. नेपाळचा राज्यकारभारः—निरनिराळे जिल्हे पाडलेले आहेत. तेथला अधिकारी मुलकी व लष्करी दोन्ही कामें पाहतो. हिंदुशास्त्राचा कायदा नेपाळांत चालतो. गोवधाला पूर्वी देहान्ताची शिक्षा होती. पण १९३१ सालीं भीमसमशेरांनी देहान्त शिक्षा कमी करून ती फक्त राजद्रोह किंवा

लष्करी गुन्हे यासाठीच ठेवली. हिंदुस्थान सरकारकडूनहि नेपाळला खंडणी मिळते. नेपाळांत प्रत्यक्ष कर नाहीं. एकंदर वसूल १॥ कोटि रुपये असावा. नेपाळ राजकीय दृष्ट्या संपूर्ण स्वतंत्र आहे. १९२३ सालीं ब्रिटनचा नेपाळशीं दोस्तीचा तह झाला. त्या तहान्वये नेपाळला बाहेरून वाटेल तितकीं शस्त्रास्त्रे, दारुगोळा व इतर माल ब्रिटिश हिंदुस्थानांतून नेण्याची परवानगी आहे.

सह्याद्रि फेब्रुआरी १९४७

★

— २७ —

# ॲँग्लो-अमेरिकनांची इराणांत रशियावर मात

## अमेरिकेची गुप्त मदत

५ नोव्हेंबरच्या केसरींत, इराणमध्यें अखेर ब्रिटिशांनीं बख्तीआरी व कशगाई टोळ्यांकडून बंडें उठवून घावम मुल्तानेच्या इराणी सरकारास भयप्रदर्शन करून त्याजवर आपला शह कसा बसविला व इराणांत वाढलेल्या रशियन वर्चस्वास कसा खो घातला, येथपर्यंत हकीकत दिली होती. त्यानंतर आता गेल्या दीड महिन्यांत पुष्कळच नव्या घडामोडी घडून आल्या आहेत व या क्षणास तरी ब्रिटनने इराणांत रशियाचा संपूर्ण पराभव केला व इराणी सरकार आपल्या पूर्ण लगामीं लावून घेतलें आहे असेंच दिसतें. तेव्हा त्या घडामोडींची माहिती संक्षेपानें करून घेतली पाहिजे.

ब्रिटिशांनीं बख्तीआरी व कशगाई टोळ्यांकडून दक्षिण इराणांतून बंडें उठवलीं. त्यांतील मर्म रशिया तेव्हाच उमगला. या बंडाळींत ब्रिटिशांचा हात संपूर्ण आहे व ब्रिटिशांना अमेरिकेचेंहि पाठबळ आहे हेंहि तो समजला. इराणी सरकारने, ' आमच्या प्रश्नांत अमेरिकेने लक्ष घालावें म्हणजे त्यांस सक्रिय मदत द्यावी ' अशी घोषणा केलीच होती व त्यापाठोपाठ चार नोव्हेंबर रोजीं इंटर नॅशनल बँक ऑफ रिकन्स्ट्रक्शन अँड डेव्हलपमेंटकडे इराणी सरकारानें २५ कोटि डॉलर्सचें म्हणजे ६ कोटि २५ लक्ष पौंडांचें कर्ज मागितल्याचेंहि अधिकृतपणें जाहीर झालें ! !

बख्तीआरी व कशगाई टोळ्यांना नुसतें चिथावूनच न देतां ब्रिटिशांनी आपल्या सर्व सेनासमुदायांतील अत्युत्कृष्ट असें जें चौथें लष्कर की ज्यांत गेल्या दुसऱ्या महायुद्धांत तावून सुलाखून लढाईच्या हरएक कामकाजास उतरलेल्या कजाखी पलटणी आहेत, तेंहि हिंदुस्थानांतून बसऱ्यास नेऊन त्यांच्या पाठपुराव्यास उभे केलें. सारांश, बंडाची आघाडी काशगाई, बख्तीआरी टोळ्यांनी सांभाळावी, त्यांचा पाठपुरावा व साहित्य ब्रिटिश लष्कराने करावें व पैशाचा पुरवठा अमेरिकेने करावा असें हें जबरदस्त कारस्थान उभें राहिलें आहे हें ओळखून तत्क्षणींच रशियाने परत अझरबैझान प्रांताकडूनच कोलांट उडी घेवऊन मात करण्याचा प्रयत्न सुरू केला.

## रशियाची चिथावणी

गेल्या जून महिन्यांत इराणी सरकार व अझरबैझान प्रांत च्यांत समझोता झाला होता व त्यावेळीं अझरबैझान हा इराणचाच एक अविभाज्य भाग आहे व अझरबैझानचें सैन्य हें मध्यवर्ती सरकारच्या हुकमतीखालीच राहील असेंहि उद्घोषित करण्यांत आलें होतें. त्यानंतर अझरबैझानचे पंतप्रधान त्या प्रांताच्या भावी दर्जाबद्दल कांही तपशिलाच्या वाटाघाटी करीत तेहेरान राजधानीस तळ देऊन राहिले होते. कशगाई बंड सुरू होतांच रशियाने अझरबैझानला चिथावणी दिली, त्याबरोबर त्याने एकदम पवित्रा बदलून इराणी सरकारशी केलेला तह मोडून टाकल्याचेंच कृतीने दाखवावयास सुरवात केली! गेल्या एप्रिलांत अझरबैझांनी लोकांनी अझरबैझान सरहद्दीच्या बाहेर असलेले झेझान नामक शहर बळकावलें होतें. तें जूनमध्ये तह झाल्यावर इराणी सरकाराला परत करावयाचें होतें; पण आता त्यांनी तें परत देत नाही म्हणून साफ सांगितलें. अशा रीतीने सल्ला बिघडतांच पुनः कम्युनिस्ट रशियन-छापाच्या टुडेह आदि क्रांतिकारक चळवळ्या पक्षांनीहि संकेत समजून एकदम बंडाळी सुरू केली. खेरीज तिकडे अझरबैझानचे सहोदर कुर्दीस्तानी टोळीवाले त्यांनीहि दंगा सुरू केला. ११ नोव्हेंबरच्या

सुमारास कुर्दी चळवळे आणि इराणचें सरकारी सैन्य यांत उघड लढाईला सुरुवात झाली. इसपहान येथे घावमच्या डेमोक्रॅटिक पक्षीयांत व टुडेह पक्षीयांत रस्त्यारस्त्यांतून चकमकी सुरू झाल्या. खुद्द तेहेरानांत लष्करी गव्हर्नराला जवळ जवळ मार्शल लॉच पुकारावा लागला. उत्तर इराणच्या कास्पियन समुद्रावरील पहेलवी बंदरांत आणि रष्ट या विमान तळाच्या आसपासच्या गांवीं लष्करी कायदा व कर्फ्यू जाहीर करावी लागली.

## निवडणुकीचें नाटक

ही बंडाळी अधिक भडकण्याचें आणखी एक कारण म्हणजे ६ डिसेंबर रोजीं इराणातील सर्व प्रांतांत व्हावयाच्या निवडणुका. इराणने यापूर्वी रशियाशी तोंडीं करार करून त्यास अझरबैझानांतील तेलखाणीचा परवाना देण्याचें कबूल केलें होतें. हा करार अर्थातच त्यावेळीं रशियाचा जोरा इराणी सरकारावर बसल्याने नाइलाजाने करावा लागला होता; पण त्यानंतर इंग्रज-अमेरिकनांचेंच इराणांत वर्चस्व झाल्यामुळे ते इराणी सरकारला अंतस्थ दहशत घालू लागले की, 'खबरदार! अझरबैझानमधील तेल रशियाला देशील तर!' तेव्हा इराणी पंतप्रधान घावम सुलताने याने शक्कल काढून रशियाला सांगितलें की, तुम्हाला 'आम्ही तोंडीं आश्वासनें कांही दिली तरी तीं इराणी मजलीसकडून म्हणजे पार्लमेंटाकडून मंजूर करून घेतल्याशिवाय कायदेशीर होतच नाहीत. तेव्हा आधी त्या निवडणुकी पार पडूं द्या.' त्यावर रशियाने लकडा लावला की तूर्त सर्वपक्षीय पुढाऱ्यांची एक परिषद बोलावून आमचा तेल परवाना मंजूर करून टाका. मग खुशाल सावकाश तुमच्या पार्लमेंटची मंजुरी घ्या.' पण घावम सुलताने यास तें बिलकुल पटेना. कारण अझरबैझान प्रांतच पुनः जिंकून आपल्या कब्जांत घ्यावा व रशियाच्या मागणीचें मूळच मुळांत उखडून टाकावें असें त्याने ठरविलें होतें आणि त्याला निवडणुकीचें निमित्तहि उत्तमच लाभलें. त्यांतच अँग्लो-अमेकनांनी भर दिल्यामुळे घावमने असे जाहीर केलें की, 'निवडणुकी धाकदपटशाने बिलकुल होतां कामा नयेत. टुडेह पक्षीय लोक उघड उघड दंगे करीत आहेत त्या अर्थी प्रत्येक मतकेंद्रांत इराणी लष्कराच्या

तुकड्या जाऊन आधीं ताबा घेतील व मग त्यांच्या आश्रयाखालीं कोणावरहि जबरदस्ती न होतां निवडणुकांचें मतदान पार पडेल. '

अशी व्यवस्था जाहीर करून इराणच्या इतर सर्व भागांत लष्कर पाठविल्याचा देखावा घावमने केला आणि त्याचबरोबर मोठ्या संभावित-पणे पण जबरदस्त फौज अझरबैझानकडेहि रवाना केली ! पण त्यांतला डाव रशियाने ओळखून अझरबैझानास प्रत्यक्ष प्रतिकार करण्यासच चिथावणी दिली. त्याबरोबर अझरबैझान सरकार आक्रोश करूं लागलें की "आमचा प्रांत स्वतंत्र आहे. इराणी सरकारशीं जून महिन्यांत कांही तात्पुरता तह झाला असला तरी तो पक्का झालेला नाही. आम्ही अझर-बैझानला इराणचाच भाग स्वतः समजत असलो तरी आम्ही स्वतंत्र आहों. वाटल्यास निवडणुका आम्ही इराणी सरकारने ठरविलेल्या तारखेस करूं; परंतु आमच्या अझरबैझानी सरकारच्या सैन्याच्या देखरेखीखाली !"

## अझरबैझानचा पराभव

पण इराणी सरकारने तें म्हणणें धुडकावून लावलें व मग प्रत्यक्ष युद्धांतीलच हालचाली सुरू झाल्या. इराणी सरकारी सैन्याने, गेल्या महायुद्धांत प्रचारांत आलेल्या म्हणजे विमानांतून पत्रकें टाकण्याच्या शाब्दिक लढाईपासून तो प्रत्यक्ष गांवें उध्वस्त करून सार्वत्रिक कत्तल करण्याच्या सर्व तंत्रांचा उपयोग केला. उलटपक्षी अझरबैझान सरकारनेहि बरीच धडपड केली. रशियाच्या साह्याचा डांगोरा पिटून त्याने लोकांना चेव आणला. सर्व नागरिकांना शस्त्रें वाटलीं. आपलें 'फदाई' खडें सैन्य बाहेर ओढून तें अझरबैझानच्या सरहद्दीबाहेर लढाई पडावी, म्हणून रांजीन येथपर्यंत वाढून नेलें. पण इतक्या दिमाखानंतर अझरबैझानच्या हातून शौर्य मात्र कांहीच घडलें नाही. इराणी सैन्याने झेंजान जिंकलें, रांजीन येथील अझरबैझानी सैन्याला परत लोटून त्याच्या मुलुखांत घातलें व जे कोणी इराणी सैन्यांतले माजी सैनिक किंवा अधिकारी अझरबैझा-नांत नोकरीस गेले असतील त्यांनी ताबडतोब विशिष्ट मुक्कामी इराणी सैन्याधिकाऱ्यांच्या हवाली व्हावें, नाहीं तर पुढे पकडले गेल्यास त्यांस

फितुऱ्याप्रमाणे ठार मारण्यांत येईल असें जाहीर करून इराणी लष्कर प्रत्यक्ष अझरबैझानांत घुसलें. ९ डिसेंबर रोजीं खामशेह प्रांतांत एक मोठी लढाई झाली. १० डिसेंबर रोजीं इराणी सरकारने गफानन कुकचें ठाणें जिंकलें व मिआनेच्या रोखाने कूच केलें. ११ रोजीं मिआने सर झालें आणि त्याचबरोबर तिकडे ताब्रीझ राजधानींत फितुरी होऊन ती एकदम १३ रोजीं इराणला शरण आल्याचें जाहीर झालें ! ! शहरांत डेमोक्रॅटांची सर्रास भीषण कत्तल करण्यांत आली. अझर बैजान डेमोक्रॅटिक पक्षाचे पुढारी जाफर पिशेवरी आदिकरून ५-२५ शिरोपस्थ मुत्सद्दी व लष्करी अधिकारी ताब्रीजमधील आपली बाडबिशाद गुंडाळून १०० लॉऱ्या भरून घेऊन रशियामध्ये प्राणपरित्राणार्थ पळून गेले. अझर बैझानच्या शरणागतीचा परिणाम शेजारच्या कुर्दी स्वतंत्र सरकारवरहि लगेच झाला ! १५ । १२ रोजीं नैऋत्य अझरबैझानांतील कुर्दांचें मिआन दुआब ठाणेंहि सर झालें व कुर्दी लोकांचा प्रमुख गाझी महंमद हा इराणी सेनापति ज. हुमायुनी यास शरण गेला व त्याने कुर्दिस्तान हा इराणचाच भाग आहे असें कबूल केलें ! !

अशा रीतीने अखेर अँग्लो–अमेरिकनांनी रशियावर पुरी मात तूर्त तरी केलेली दिसते. यावर रशियाचीं पावलें कशीं पडतात तें पाहात बसले पाहिजे. अमेरिका व रशिया यांच्यांत मध्यपूर्वेबाबत झगडा आहे, तो मुख्यतः तेथील तेलासाठी व त्यापैकींच इराणचे हे एक उपपुराण आहे.

केसरी, २८–१२–४६

✯

— २८ —

# मध्यपूर्वेतील तेलाचा प्रश्न

गेल्या अंकीं मध्यपूर्वेतील तेलाचें महत्त्व निर्दिष्ट केलें होतेंच. मध्यपूर्वेत तेल कोठे कोठे आहे व तें अँग्लो–अमेरिकनांनी कसें बळकावलें आहे, रशियाचाहि त्यावर डोळा असल्यामुळे अँग्लो–अमेरिकन्स व रशिया यांत लढाईचा पुढे–मागे संभव कसा निर्माण झाला आहे व त्यासाठी अँग्लो–अमेरिकनांनी काय बंदोबस्त केला आहे याचें थोडक्यांत दिग्दर्शन पुढे केलें आहे.

पहिलें व दुसरें महायुद्ध जिंकतांना मध्यपूर्वेतील तेलाचा फारच उपयोग झाला होता; व सांप्रत काळीं इतरत्र असलेल्या तेलखाणी अनुत्पादक किंवा भाकड होत चालल्यामुळे या मध्यपूर्वेतील तेलखाणींवर सगळीं बलवत्तर विजिगीषु राष्ट्रें गिधाडासारखीं येऊन पडत आहेत.

## अँग्लो–अमेरिकनांचा हिस्सा

साऱ्या जगांत मिळून जितकें तेल निघतें त्यांतला तिसरा हिस्सा तेल एकट्या मध्यपूर्वेत निघतें. हा तेलखाणींचा प्रदेश पर्शियन आखातानजिकच्या राष्ट्रांत आहे आणि तो अनेक गुंतागुंतीच्या करारनाम्यांनी आणि आंतराष्ट्रीय तहनाम्यांनी इंग्लंड, अमेरिका, डच, फ्रेंच वगैरेंनी सध्या वहिवाटीस घेतलेला आहे. मध्यपूर्वेत पैदा होणाऱ्या तेलापैकीं ४२ टक्के तेलाची मालकी अमेरिकन कंपन्यांनी मिळविली आहे. सौदी अरेबिया, इराक व शेखडम या ठिकाणीं त्यांची मालकी किंवा भागीदारी आहे. सौदी अरेबियांतील तेलाबाबत ते जवळजवळ मालकच आहेत.

इराकांतील तेलांत त्यांची कांही भागी आहे व पर्शियन गल्फवरील कुएटच्या शेखडममधील नवीन उजगारीस येणाऱ्या तेलखाणींतही त्यांनी निम्मा निम्मा हिस्सा मिळविला आहे.

उलटपक्षीं, अमेरिकेपेक्षा ब्रिटनचा हिस्सा आतांपर्यंत तरी अधिक आहे. अमेरिकेचा हिस्सा ४२ टक्के असला तर ब्रिटनचा ५० टक्के इतका आहे. इराणांतील अँग्लो-इराणियन ऑईल कंपनीची वहिवाट त्याजकडे असून दक्षिण इराणांतील खाणींतहि तेच मालक आहेत. खेरीज इराक कुएटमध्येहि त्यांचा हिस्सा आहे. मात्र यापुढे अमेरिकाच इंग्लंडवर सरशी करणार असाच ताज्या वार्तांवरून संभव निर्माण झाला आहे. २७ डिसेंबरची वार्ता अशी आहे कीं, अमेरिकन स्टँडर्ड ऑईल कंपनीने ब्रिटिशांच्या अँग्लो–इराणी तेल कंपनींत भागी मिळविली आहे व अँग्लो–इराणी तेल कंपनीने अमेरिकन स्टँडर्ड ऑईल कंपनीला २० वर्षेपर्यंत क्रूड ऑईल विकण्याचा करार कबूल केला आहे व आता दोनहि कंपन्या मिळून इराणच्या आखातापासून भूमध्य समुद्रापर्यंत तेलाचे नळ टाकणार आहेत. एकंदरींत मध्यपूर्वेतील तेलाची मुख्य मक्तेदारी अमेरिकाच छिनावून घेणार.

इंग्लंड-अमेरिकेनंतर जें ८ टक्के तेल शिल्लक राहातें त्याची मालकी डच व फ्रेंच यांकडे आहे. इराकमधील तेल काढण्याचा प्रयत्न चार राष्ट्रांची एक भागीदार कंपनी स्थापून सुरू आहे. तिच्यांत डच–फ्रेंच भांडवल गुंतलें आहे.

रशियाला त्याच्या सरहद्दीबाहेर मध्यपूर्वेत तेल मिळविण्याचा परवाना मिळवितां आलेला नाहीं. परंतु उत्तर इराणांत अझरबैझान प्रांतांत अत्यंत प्रचण्ड तेलसाठे असल्यामुळे व तो प्रदेश रशियाला अगदी जोडलेलाच असल्यामुळे, रशियाने तो अनेक कारस्थानें करून इराणपासून फोडून आपल्या वर्चस्वाखाली आणला होता. नुकताच तो त्याचा व्यूह सपशेल कोसळून अझरबैझान पर्यायाने अँग्लो–अमेरिकनांनीच गिळला.

## तेल-रक्षणासाठीं लष्करें

इराकांतील तेल त्रिपोली आणि हायफा बंदरांना नळाने पोहोंचविलें जातें. इराण व सौदी अरेबियांतील तेलासाठी नळरस्ता टाकलेला नाही.

तें टँकरनी न्यावें लागतें; पण आता अरेबियन अमेरिकन ऑईल कंपनीने भूमध्यसमुद्रापर्यंत नळरस्ता करण्याचीच योजना आंखलेली आहे. इराकांत निघणारें तेल अमेरिकेंत निघणाऱ्या तेलापेक्षां पुष्कळच कमी असलें, तरी भावी काळांत अमेरिकेच्या कमाल तेल टनसंख्येपेक्षाहि अधिक तेल तेथे निघण्याची शक्यता शास्त्रज्ञांना वाटत आहे.

हे तेलखाणींचे प्रदेश हातीं राखण्यासाठी तेथे लष्कराची पक्की तरतूद करणें भागच पडतें. इंग्लंडचेंच पहा:—इतके दिवस इजिप्तमध्ये ब्रिटनचा मुख्य लष्करी तळ होता पण तो त्यांना इजिप्तच्या भांडणामुळे काढून घ्यावा लागला; म्हणून त्यांनी पॅलेस्टीनमध्यें तो तळ बांधण्याची खटपट सुरू केली आहे. कदाचित् पॅलेस्टीनमधून सुद्धा उच्चाटन झाल्यास त्यांना मध्यपूर्वेत दुसऱ्या कोठे तरी लष्करी तळ स्थापावेच लागतील. कारण रशियाचाहि मध्यपूर्वेकडील तेलखाणींच्या प्रदेशावर नेहमीं डोळा आहे. इराकपासून तो एका दिवसाच्या मजलीवर आहे. त्याने उत्तर इराणांतल्या अझरबैझान व कुर्दिस्तान यांना फोडून आपल्या लगामी लावण्याचा प्रयत्न केला तो इतिहास ताजाच आहे. अरबांना तो सतत सहानुभूतीचा देखावा दाखवीत असतो.

सध्या अमेरिका व इंग्लंड हे रशियाविरुद्ध एक झालेले असल्यामुळे ते इराण, इराक, सौदी अरेबिया, इजिप्त, तुर्कस्तान, पॅलेस्टीन येथें रशियन कारस्थानांना प्रतिकारस्थानें रचून थोपवून धरीत आहेत.

## इराक व सौदी अरेबियांतील दक्षता

इराकांत मोसल व करकूक येथे ब्रिटिशांच्या तेलखाणी आहेत. तेथेहि नैऋत्य इराणांतील तेल टापूंतील संपाबरोबरच रशियन चिथावणीने संप झाले, पण ते मोडण्यांत आले. आता इराकी सरकारने राजाज्ञा काढून कम्युनिस्टांचें उच्चाटन करण्याचें काम राजरोसपणे जाहीर केलें आहे. मध्यपूर्वेतील इतर टापूंत सध्या सर्वत्र तोच उपक्रम सुरू आहे.

सौदी अरेबिया हा मध्यपूर्वेतील त्या मानाने सर्वांत मागासलेला प्रांत त्यामुळे तेथे कामगारांचे संप वगैरे भानगडी फारशा नाहीत. तथापि आगाऊ दक्षता म्हणून तेथील राजा इब्नसौद याजकरवी कोणत्याहि

तऱ्हेच्या कम्युनिस्ट चळवळीस बंदी करणारें फर्मान काढण्यांत आलें आहे. इब्नसौद हा कंगाल, कर्जबाजारी राजा. त्याला अमेरिकेने १० दशलक्ष डॉलर्स उसनवार दिले आहेत. त्या राष्ट्राची सारी उत्पत्ति म्हटली म्हणजे गव्हाचें उत्पन्न व मुसलमान यात्रांमुळे होणाऱ्या कराचें व व्यापाराचें उत्पन्न ! पण आधी ४ वर्षे सौदी अरेबियांत मोठा दुष्काळ पडला होता व पुढे लगेच पांच वर्षे लागोपाठ महायुद्धाचा वणवा लागला यामुळे या राष्ट्राची स्थिति अत्यंत नातवानीची झाली. सबब इब्नसौदेने अरेबियन-अमेरिकन ऑईल कंपनीकडून भावी काळांत स्वामित्वाबद्दलची जी रक्कम मिळावयाची तिच्यापोटीं आगाऊच मिळेल तेवढा पैका घेतला; पण तेवढ्यानेहि भागेना तेव्हा ब्रिटिश सरकारने त्याला ३५ दशलक्ष डॉलर्सचें कर्ज दिलें; आणि आता पुनः अमेरिकेने भावी काळांतील रॉयलटीपैकी बरीच मोठी रक्कम आगाऊच देण्याचें कबूल केलें आहे. यंदाच्या वर्षीच्या तेलावर इब्नसौदला दर पिपामागे २३ सेंट स्वामित्वादाखल देण्याचें ठरलें आहे. म्हणजे त्याला २० दशलक्ष डॉलर्स मिळावयाचे. त्यांपैकीच वर उल्लेखिलेली रक्कम अमेरिकेने दिली. या कर्जातूनच इब्नसौद तेलखाणीपासून 'रीआढ' राजधानीपर्यंत रेल्वे रस्ता सुरू करणार आहे व सडका, पाण्याची वगैरे सोयीहि करणार आहे.

ईजिप्तमध्येहि अँग्लो-अमेरिकनांनी त्या सरकारकरवी कम्युनिस्टांना पक्का पायबंद घातला आहे. तुर्कस्तानांत तर रशियाचा जळजळीत द्वेष ! व तो देश अँग्लो-अमेरिकनांचा दृढ स्नेही ! शिवाय गेल्या प्रधानमंडळाच्या निवडणुकींत रशियाविरोधी लोकांचेंच प्राबल्य झालें आहे. पॅलेस्टीनमध्ये अँग्लो-अमेरिकन भांडणामुळे रशियाला फितूर पेरण्यास व अरबांना चिथावणी देण्यास नामी संधि आहे. पण प्रचारकार्याखेरीज दुसरें कांही त्याला तूर्त करतां येत नाही. शिवाय अरब लोक आज आपल्या स्वार्थासाठी रशियाची मदत मागण्याचा दम अँग्लो-अमेरिकनांना देत असले तरी त्यांना रशियाशीं प्रत्यक्ष हातमिळणी करणें महादुष्कर आहे. आपल्या ज्यूविरोधी व स्वातंत्र्यप्राप्तीच्या मागणीला रशियाचा नैतिक पाठिंबा त्यांना मिळाला तर तेवढा पाहिजे आहे.

★ ३१-१२-४६

— २९ —

# रूसो-अमेरिकन वादांत कोरियाची गळचेपी

## कोरियांतील दुष्काळ

ता. २९ डिसेंबर रोजीं वॉशिंग्टनहून एक वार्ता प्रसिद्ध झाली आहे· तिचा आशय असा की, दक्षिण कोरियांत म्हणजे अमेरिकनव्याप्त कोरियांत अन्नधान्याचा दुष्काळ इतका पराकोटीला पोचला आहे की, अमेरिकन सरकारने वेळींच भरपूर मदत पोहोचविण्याची हालचाल केली नाही तर निभाव लागणार नाही ! दिवसेंदिवस अमेरिकेविषयी कोरियन प्रजेंत अत्यंत विद्वेषाची भावना वाढत असून ती आता ' जपान किंवा रशियाचा अंमल पुरवला; तोच अधिक सुसह्य होता, ' असें म्हणूं लागली आहे. दक्षिण कोरियांत अशी स्थिति प्राप्त होण्यास कारण म्हणजे रूसो–अमेरिकन संबंधांत पडलेली दुर्निवार तेढच होय. उत्तरेकडील जो निम्मा कोरिया रशियाच्या ताब्यांत आहे तिकडून रशियाने धान्य पाठविण्यास सक्तीने बंदी केली आहे. अमेरिकनव्याप्त दक्षिण भागांत नुसता लाकूड, कोळसाच होतो; त्याने पोट थोडेंच भागणार ?

रशिया व अमेरिका यांची ही जी तेढ पडली आहे तिचें मूळ थेट मॉस्को करारापर्यंत मागे जातें. २७ डिसेंबर १९४५ च्या मॉस्को करारांत पुढीलप्रमाणे कलमें ठरलीं होतीं. ( १ ) अमेरिकन व रशियन प्रतिनिधींचें एक कमिशन नेमावें. त्याने कोरियांतील डेमोक्रॅटिक पक्षीयांशीं वाटाघाटी करून सर्व कोरियासाठी म्हणून एक हंगामी कोरियन डेमो-

ॲटिक सरकार स्थापण्याची योजना आखावी. ( २ ) त्या कमिशनची ती योजना रशिया, चीन, ब्रिटन व अमेरिका या चौघांस आधी सादर करावी व त्यांची मान्यता मिळाल्यावरच, ती मंजूर समजण्यांत यावी. ( ३ ) व तशी ती मंजूर योजना घेऊन रशिया, चीन, ब्रिटन व अमेरिका यांनी एक चतुर्वर्गीय ट्रस्टशिप मंडळ स्थापावें, व त्या मंडळाने आपल्या देखरेखीखालीं पांच वर्षेपर्यंत हंगामी सरकारकडून कारभार पाहावा.

पण ही कागदी योजना प्रत्यक्ष अमलांत येऊंच शकली नाहीं; कारण रशिया व अमेरिका दोघेहि स्वार्थी आहेत. त्यांचा परस्परांवर बिलकुल विश्वास नाही. दोघांनाहि स्वतःसाठीच सारा कोरिया हवा आहे; पण तें तर अशक्य आहे. परस्परांनी परस्परांच्या मुलखांत प्रचारतंत्र व फितुरी पेरून आवाडाव केली या सबबीवर दोघांनीहि आपापल्या सरहद्दी बंद करून टाकून दक्षिण–उत्तर कोरियांतील दळणवळण अजिबात बंद पाडलें आहे, व जो तो आपापल्या मुलखांत मन मानेल तशी राज्यव्यवस्था स्थापून रगडून कारभार करीत आहे.

## स्वार्थी अमेरिका

उत्तर कोरियांत म्हणजे रशियाच्या ताब्यांतील कोरियांत खरी परिस्थिति काय आहे हे विश्वसनीय रीत्या कांहीच कळत नसलें तरी तिकडील परिस्थिति बरीच समाधानकारक आहे. रशियाने पुष्कळ प्रमाणांत होमरूलच कोरियनांना वहाल केले असून, कम्युनिस्ट बहुमत असलेल्या कार्यकारी कमिट्या राज्यकारभार उत्तम चालवीत आहेत, असें अमेरिकन वार्तावरूनच दिसतें. उलटपक्षीं अमेरिकनव्याप्त दक्षिण-कोरियांत अव्यवस्था, उपासमार, असंतोष, दंगे, दुष्काळ यांचेंच पीक आहे. महायुद्धकाळांत अमेरिकेने कोरियन लोकांना बंड करण्याला चिथावणी दिली. १९४३ च्या डिसेंबरांत कैरो डिक्लरेशनने कोरियाला यथावकाश स्वातंत्र्य देऊं असा जाहिरनामाहि काढला; फार काय अमेरिकेने १९४० सालीं ‘ चुंकिंग ’ येथे एक कोरिअन प्रोव्हिजनल गव्हर्मेण्टहि स्थापन करून ठेवलें होतें व चीनकडून त्याला पाठिंबाहि देवविला होता ! परंतु हीं

सर्व आश्वासने अमेरिकेने -उपेक्षा करून अखेर धुडकावूनच लाविलीं. कारण पुढे त्या प्रोव्हिजनल सरकारला चीनने पाठिंबा देण्याचें बंद केलें; आणि सॅन्फ्रॅन्सिस्को परिषदेंत त्याला आमंत्रणच गेलें नाही!! उलट १९४५ च्या सप्टेंबरांत रशियन आक्रमणाचें निमित्त दाखवून अमेरिकेने 'सेऊल' बंदर काबीज करून शिल्लक राहिलेला दक्षिण कोरिया ग्रासून टाकला. सबंध कोरिया नसेल तर नसो; परंतु जेवढा कोरियन भाग आपल्या ताब्यांत आलेला आहे त्याला तरी आपल्या नाममात्र देखरेखी-खाली स्वायत्तता अमेरिकेने द्यावी; पण "कोरियन लोक अद्याप स्वराज्याला पात्र नाहीत" असें ठरवून व 'रशियाचा दक्षिण कोरियावर डोळा आहे' असें बुजगावणें दाखवून अमेरिका कोरियाला पारतंत्र्यांतच खितपत ठेवण्याचा विचार करीत आहे. एक वर्षपर्यंत कोरिया ताब्यांत ठेवण्यासाठी अमेरिकेला ३२ कोटि डॉलर्स खर्च पडला आहे. तो खर्च शतपटींने कोरियन जनतेकडून पिळून घेतल्याखेरीज अमेरिका कोरियांतून हालण्याचा किंवा आपला ताबा ढिला करण्याचा बिलकुल संभव नाही.

## दंगे सुरू झाले

गेल्या ऑगस्ट—नोव्हेंबर महिन्यांत दक्षिण कोरियांत पुरांनी आणि कॉलऱ्याने हाहाकार उडविला. अन्नाची महर्गता कमालीची वाढली. उन्हाळ्यांत जें धान्य जमविण्यांत आलें होतें तें फारच कमी होते म्हणून अमेरिकेला जुलै महिन्यांत ३७ हजार टन अन्न-धान्य कोरियाला पुरवावें लागलें. औद्योगिक पुनरुज्जीवन करावें तर तेंहि कष्टाचें होत आहे; कारण कच्चा माल व मशिनरी नाही. दुष्काळामुळे आधीच बेफाम झालेल्या लोकांत आयताच कम्यूनिझम पसरत आहे व त्याला रशियन फितुऱ्यांकडून भरपूर साहाय्य मिळत आहे. ऑक्टोबरांत रेल्वे कामगारांनी संप पुकारला व सर्व गाड्या त्यांनी बंद पाडल्या. त्यांनी मजुरींत १०० टक्के वाढ मागितली. रशियन व्याप्त कोरियाप्रमाणे लेबर रिफॉर्म्स कराव्या असा त्यांचा आग्रह होता. आपल्या मागण्या मान्य न झाल्यास, पॉवर प्लॅंट्स् आदि सर्व उपयुक्त व गरजेच्या कारखान्यांतूनहि संप पुकारयाची त्यांनी धमकी दिली. अमेरिकन सरकारने स्वतःसाठी राखून ठेव-

लेलीं तांदूळ-कोठारें फोडून मजुरांना तो तांदूळ वाटावा; कारण आधी अमेरिकन सरकारने दक्षिण कोरियांत होता नव्हता तेवढा तांदूळ गोळा करून, जपानला व अमेरिकेला पाठवून दिला असाहि आरोप ते करूं लागले. आक्टोबरांत संपानंतर दंगेहि मोठमोठाले झाले. चार दंगलीं मिळून ५६ कोरियन पोलीस ठार झाले. ‘ टागू ’ या अमेरिकन विभागांत ६० पोलीस जखमी झाले तर १०० बेपत्ता झाले !! कँगसँग कुकुटो प्रांतांत तर मार्शल-लॉच पुकारावा लागला. कोरियन कम्युनिस्टांचें आणखीहि अमेरिकेवर आरोप चालूच आहेत की, “ अमेरिकनांनी अद्याप जुने जपानी अधिकारी आर्थिक घडी बसेतोंपर्यंत ठेवून घेतले आहेत ते कशाकरिता ? अमेरिकन सरकार, इनामदार आणि वतनदार लोकांनाच हातीं धरून राज्यकारभार करीत आहे ” वगैरे.

## रूसो-अमेरिकन रस्सीखेचींत कोरियाला फास

नोव्हेंबर महिन्यांत ‘ सीओल ’ येथे ४३ राजकीय पक्षांची सभा होऊन, दुतर्फी अंमल संपवून ट्रस्टीशिप वगैरे कांही न ठेवतां कोरियाला स्वातंत्र्य द्यावें असा ठराव करून, तो यूनोला पाठविण्यांत आला; पण कोरियाची फाळणी आणि दुतर्फी अंमल संपणें अशक्यच दिसतें. नोव्हेंबर महिन्यांत दक्षिण कोरियाचा अमेरिकन सेनापति ज. हॉज याने रशियाला दोन पत्रें लिहून दक्षिण व उत्तर विभाग एक करण्याची पुन्हा मागणी केली; परंतु रशियाने त्याला उत्तरच दिले नाही. ता. १ आक्टोबर रोजीं अमेरिकेचे ॲक्टिंग स्टेट सेक्रेटरी यांनी जाहीर केले की, “कोरियांतील परिस्थितीबाबत रूसो-अमेरिकन संयुक्त कमिशन स्थापण्यास अमेरिका आतुरच आहे; परंतु रशियाच आपला अम्मल उत्तर कोरियांत स्थापू इच्छितो तर आम्ही काय करावें ? आम्ही आमच्याकडून रशियाला विनविण्याची पराकाष्ठा केली. मात्र एक गोष्ट निश्चित की, दक्षिण व उत्तर कोरिया मिळून संयुक्त व स्वतंत्र कोरिया निर्माण झाल्याखेरीज कांही आम्ही कोरियांतून हालत नाही ! पण असा दम दिला तरी अखेर स्वतःचीच दामटी वळण्याचा प्रसंग अमेरिकेवर ओढवेल असे तज्ज्ञ अमेरिकन म्हणतात. ज. ए. व्ही. आरनोल्ड हे रूसो-अमेरिकन संयुक्त कमिशनवर

नेमले गेलेले अमेरिकेचे प्रमुख प्रतिनिधि. त्यांनी १२ आक्टोबर रोजीं स्वच्छच सांगितलें की, " दक्षिण व उत्तर कोरिया एका सरकारांत आल्याखेरीज व सर्व कोरियनांचे मिळून एक हंगामी सरकार स्थापन झाल्याखेरीज कोरियाची आर्थिक परिस्थिति सुधारणें शक्य नाही. म्हणून व्यापक, राजनैतिक भूमिका स्वीकारून अमेरिकेनेच स्वतःकडे कमीपणा घेऊन, रशियन वकिलाशीं बोलावे. या कामी अमेरिकेकडून जी दिरंगाई होईल तिचा फायदा रशियासच मिळेल. उत्तर कोरियांत रशिया आपल्या योजना पक्क्या करून टाकीत आहे. युरोपांत व्यापिलेल्या राष्ट्रांतून रशियाने जो प्रकार चालविला आहे, तोच त्यानें कोरियांतहि सुरू केला आहे." पण अद्याप तशा कांहीच हालचाली सुरू झालेल्या नाहीत व मांचूरियाचा निकाल लागल्याखेरीज कोरियाचा प्रश्नहि निकालांत निघेलसें दिसत नाही.

केसरी, ७-१-४७

☆

— ३० —

# अमेरिकेचाहि मांचूरियावर डोळा कां ?

## डायरेन बंदर

मांचूरियांतील ' डायरेन ' बंदर आंतरराष्ट्रीय वहिवाटीकरिता लवकर खुलें करून द्यावें अशी ६ जानेवारी रोजीं अमेरिकेने रशिया व चीन-कडे तातडीने मागणी केली. अशी मागणी करण्याचें कारण गेल्या डिसेंबरांत डायरेन बंदरांत एक अमेरिकन आरमारी गलबत तिथें अमेरिकन वार्ताहरांना घेऊन तेथे गेलें असतां रशियन लष्करी अधि-काऱ्यांनी त्या वार्ताहरांस उतरूं देण्यास नकार दिला. एवढेंच नव्हे तर वीस मिनिटांच्या आंत त्या अमेरिकन आरमारी गलबतासहि बंदर सोडून जाण्यास फर्माविलें होतें ! अमेरिकेनें रशिया व चीनला खलिता पाठविण्याचें कारण १९४५ च्या ऑगस्टमध्ये डायरेनबाबत चीन व रशियन सरकार यांत एक तह झाला होता. त्या तहान्वये सबंध डायरेन बंदरांवर चिनी राष्ट्रीय सरकारची हुकमत चालावी परंतु बंदराचा ½ भाग बऱ्याच लांब मुदतीने रशियनवाहिवाटीस द्यावा व बाकीचें बंदर आंतर-राष्ट्रीय वाहतुकीस मोकळें असावें, असें ठरलें होतें. पण या तहाचा अंमल इतर तहांप्रमाणेच प्रत्यक्ष घडून आलाच नाही. डायरेन हें मांचू-रियाचें मुख्य बंदर म्हणजे मुख ! आणि मांचूरियावर तर साऱ्याच गिधाडांची म्हणजे जपान, चीन, रशिया व अमेरिका यांची लोभी दृष्टि ! ! पूर्वी जपानने मांचूरिया बळकावूनच आपलें भाग्य उदयास आणलें. त्यानंतर दुसऱ्या महायुद्धाच्या अखेरीस अमेरिकेला दगा देऊन रशियाने मांचुरिया बळकावला ! आता अमेरिकेला तो चीनचें नांव पुढे

करून खावयाचा आहे व तत्संबंधीच्या अनेक कलागतींपैकीच ही डायरे-नची ताजी कलागत आहे. तेव्हा अशा वेळीं मांचूरियासाठी इतकी या लोकांची धडपड कां तें समजून घेणें इष्ट होय.

## खनिज धातूंचें कोठार

१६६४ मध्यें मांचूरियांतील फिरस्त्या जंगली धनगर जमातींनी त्यांच्यापेक्षाहि सुधारणेंत फार पुढे गेलेला असा चीन जिंकला. हे मांचू लोक धनगरच असल्यामुळे माचूरियांतील समृद्ध गवताळ कुरणांचा त्यांनी मुबलक उपयोग करून घेतला. परंतु त्यांना त्या तृणाच्छादित भूमीच्या उदरांत असलेल्या धातूंचा किंवा कोळशाचा उपयोग करण्याची कल्पना शिवली नाही. वास्तविक याच सुमारास कोरियन लोकांनी तेथे कोळशाच्या खाणी उकरण्याचा उपक्रम सुरू केलेला होता. परंतु मांचूंना कोरियन लोकांनी केलेल्या कार्याचें कांहीच महत्त्व वाटलें नाही. त्यांनी त्या खाणी सक्तीनें बंद करविल्या. त्यांनी चिनांत वाटेल तेवढ्या मुलुखगिऱ्या करून लूट व संपत्ति मिळविली; परंतु आपल्या भूगर्भांतील खनिज धातूंची संपत्ति उकरून काढून उद्योगधंदे किंवा कारखाने काढावेत ही कल्पनाच त्यांना शिवली नाहीं. मांचूरियातील अफाट खनिज संपत्ति उकरून काढून कामीं लावण्याचे प्रयत्न मांचू राजवटीनंतर रशियाने व त्यानंतर जपानने केले.

रशियाला आपल्या साम्राज्य—विस्ताराच्या दृष्टीने बर्फाने न गोठणारीं बंदरें अत्यावश्यक असल्याने तो मांचूरियांत उत्तरेकडून खाली घुसला. उलट जपान मांचूरियांत घुसण्याचें कारण त्याला वसाहतीसाठी मुलूख जरूर होता हें एक, आणि दुसरें त्याला त्याच्या आधुनिक कारखान्यांसाठी कच्चा माल हवा होता. मांचूरियांत वस्ती फारच तुरळक; कारण मांचू राजांनी तो सारा मुलूख शिकारीसाठी मुद्दाम राखून ठेवला होता. १९११ सालच्या बंडानंतर त्या मुलखांत वस्ती होऊं लागली. मुख्यत्वेकरून तेथे वस्ती करण्यास घुसलेल्या लोकांत चिन्यांचीच बहुसंख्या असली तरी जपान, कोरिया व सायबेरियांतूनहि लोक तेथे घुसलेले आहेत. सध्या मांचूरियाची एकूण लोकसंख्या ४३०००००० असावी.

मांचूरियाची लोकवस्ती इतकी आहे परंतु मांचूरियाचें महत्त्व त्याच्या उत्पादनक्षमतेवरूनच केवळ आधुनिक काळांत मोजलें जातें. याच उत्पादनक्षमतेमुळे इंग्लंड, अमेरिका, जर्मनी, रशिया, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, झेकोस्लाव्हाकिया हीं राष्ट्रें संपन्न व सामर्थ्यशील बनू शकलीं व याच खनिज उत्पादनाच्या जोरावर भावी काळांत हिंदुस्थान व चीन निःसंशय नशीब काढण्याचा संभव दिसतो.

## धान्य कोठार

मांचूरिया हा चीनचाच एक भाग होय. त्याचें भौगोलिक स्थानच असें आहे की, पूर्वआशियांतील घडामोडींत त्याला महत्त्व प्राप्त व्हावें. जगांतील निरनिराळ्या दळणवळण केंद्रांत किंवा नाक्यांच्या, तिठ्यांच्या जागांत मांचूरियाची गणना सहजच होते; आणि याचमुळें आतापर्यंत मांचूरियाबद्दल असंख्य लढायाहि झाल्या; किंबहुना त्याचें " Land of the Conflict " असेच आडनांव रूढ झालें आहे.

मांचूरियाचें क्षेत्रफळ ५०३०१३ इतकें चौरस मैल आहे. त्याच्या मध्यभागीं जो सुमारें ६०० मैल लांब व ४०० मैल रुंद असा प्रदेशाचा पट्टा आहे तो कमालीचा सुपीक आहे. तेथे गव्हाचें पीक उमाप काढता येण्यासारखें आहे शिवाय पूर्वापार राखीव अरण्य म्हणून तो वहितीस न आणला गेल्यामुळे तेथली जमीन पूर्ण सुपीक राहिलेली आहे. तसेंच आधुनिक ट्रॅक्टर्स लावून मैलो-मैल नांगरट करण्यासहि तो प्रदेश अनुकूल आहे. अलीकडे सोयाबिनचे प्रचंड उत्पन्न काढण्यांत आलें तें याच भूमींतून. सोयाबिनच्या लागवडीमुळेच रशिया व जपान यांमध्ये रेल्वेवाहतुकीबाबत पुन्हा स्नेहाचे करार झाले. तसेंच त्या उत्पन्नामुळेच जपान जर्मनीकडून खाणी–कारख्यांना लागणारी महाग यंत्रसामुग्री विकत घेऊं शकला व ती यंत्रसामुग्री एकदा हस्तगत झाल्यावर जपानने मांचूरियाच्या भूगर्भात खणती लावून विविध प्रकारची अपार खनिज संपत्ति वर काढली! सोयाबीनचा आणखीहि एका तऱ्हेने जपानने उपयोग करून घेतला तोहि सांगण्यासारखा आहे. कारखान्यांत सोयाबीनचें तेल गाळल्यानंतर जी पेंड शिल्लक राही तिचें उत्तम खत जपानने तयार केलें. या खताचा

एक स्वतंत्र व्यापारच जपानने मांचूरियांतून सुरू केला होता. अमेरिकन तज्ज्ञांच्या मतें हा मांचूरियन मध्यप्रदेश 'जगाचें धान्यकोठार' बनण्याइतका सुपीक आहे. तेथे नव्या नव्या प्रकारचीं कितीतरी धान्यें तयार करतां येऊं शकतील.

## कोळसा

मांचूरियाच्या भूमींतून निघणाऱ्या खनिज वस्तु म्हणजे—कोळसा, लोखंड, डोलोमाइट, मॅग्नेसाइट, ॲल्युमिनस शेल, ऑईलशेल, रासायनिक कच्चीं द्रव्यें, सोनें, रुपें, तांबें, शिसें, झिंक, टंगस्टिन वगैरे. आधुनिक औद्योगिक कारखान्यांत पहिला मान कोळसा व लोखंड या पदार्थांचा. हे दोन्हीहि पदार्थ विपुल प्रमाणांत काढतां येतात व ते मूलतः थोडें हिणकस असले तरी रासायनिक प्रक्रियेने उत्तम कार्यक्षम बनवितां येतात असें जपानने सिद्ध करून दाखविलें आहे.

कोळसा उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत सर्वत्र आहे म्हटलें तरी चालेल. कोळशाचे परमा कार्बोनीपोरस, ज्यूरॅसिक आणि इसोसीन एज अशा तीन भागांत कांहीं शास्त्रीय वर्गीकरण करतात. यापैकीं ज्यूरॅसिक कोळशाची समृद्धि मध्य मांचूरियांत आहे. पर्मो कार्बो कोळसा त्या मानाने कमी सांपडतो, परंतु तोच विशेष महत्त्वाचा व उपयोगी मानतात. इओसिन कोळसा जगांत इतरत्र सापडणाऱ्या कोळशासारखाच सामान्य कनिष्ठ प्रतीचा असला, तरी त्याचे थर इतके जाड जाड व विपुल मांचूरियन खाणींतून आहेत की, तो कोळसा खणून काढण्याला खणतीचा खर्च फारच स्वल्प येतो.

## फुशून खाणी

मुकडेननजीक 'फुशून' येथे सगळ्यांत मोठें कोळशाच्या खाणीचें केंद्र आहे. तेथे इओसीन कोळसा असलेलें क्षेत्र दहा ( १० ) मैल लांब व सव्वादोन ( २$\frac{१}{४}$ ) मैल रुंद आहे. या ठिकाणीं ६००।७०० वर्षांपूर्वी कोळसा काढण्याचें काम प्रथम सुरूं करण्यांत आलें होतें; परंतु मांचूंनी

तें काम बंद पाडलें. त्यानंतर अलीकडे १८९० च्या मुमारास पुनः रशियाने तो उपक्रम सुरू केला; व त्यानंतर जपानने मांचूरिया जिंकल्यावर पुनः तो अधिक वाढविला. येथील 'कुंचेंगझू' खाणींतून दर दिवशीं १५ हजार (१५००० ) टन कोळसा निघूं शकतो. मात्र कडक हिंवाळ्यामुळे वर्षांतील $\frac{2}{3}$ भागांत काम बंदच ठेवणें भाग पडतें. जपानी तज्ज्ञांच्या मतें 'फुशून' खाणींतून एक 'बिलीअन' टन इतका कोळसा निघण्यासारखा असून, अद्याप अवघा त्यापैकी १० टक्केच कोळसा निघाला असेल ! ! चिनी, रशियन व जपानी लोकांनी बारीक-सारीक किरकोळ कोळसाखाणी तर मांचूरियांतील विविध भागांत पुष्कळच काढल्या आहेत. फुशूनशीं स्पर्धा करण्यासारखा एक प्रयत्न मांचू कोल कंपनीने तेवढा केला. त्या कंपनीच्या खाणी चींचौ ऊर्फ चिन्ह्-सीच्या उत्तरेस ७५ मैलांवर पेकिंग–मुकडेन रेल्वेरस्त्यावर आहेत. १९३८ सालीं त्या कंपनीने १८,५०,००० लक्ष टन कोळसा काढला, तर १९४१ सालीं ५०,००,००० लक्ष टन काढला. 'पेईपाऊ' नांवाचें एक चिन्यांनी सुरू केलेलें खाणकाम आहे. तेथे २५,००,००,००० ( २५ कोटि ) टन कोळसा निघण्याची शक्यता आहे. म्हणजे ती खाण तितकीशी संपन्न नाही. परंतु त्यांतल्या कोळशाची जात कोकिंग ग्रेडची असल्यामुळे विशेष उपयुक्त व महत्त्वाची मानतात. हुलूटाहो बंदरानजीक ही खाण असल्यामुळे रेल्वेने फारच स्वल्प खर्चांत दर्यापार निर्गत करतां येते. 'अँटुंग' आणि 'मुकडेन' यांमधील रेल्वेफाट्यावर 'पेनशिहू' येथे एक खाण आहे. तेथून दरसाल १,०००,०० (एक लक्ष) ते २०,०००,०० ( २० लक्ष ) टनांपर्यंत कोळसा निघतो.

## युरेनियम

एकंदर मांचूरियांतून एकूण किती टन कोळसा निघूं शकेल, याचें गणित वेळोवेळीं तज्ज्ञ समित्यांनी केलेलें आहे. जपानने मांचूरियावर स्वारी करण्याच्या आधी नॅशनल जिऑलॉजिक सर्व्हे ऑफ चायनाने ३ बिलीयन टनचा हिशेब धरला होता. पुढे लिटन कमिशनने ४ बिलियनचा अंदाज काढला आणि आता जपानी तज्ज्ञांनी अधिक तपास करून

केलेल्या अंदाजाने ९ बिलिअन टन तरी कोळसा निघालाच पाहिजे, म्हणजे खुद्द जपानांत पैदा होणाऱ्या कोळशापेक्षा अधिक व बेल्जमच्यापेक्षा थोडा कमी इतका प्रचंड कोळसा मांचूरिया देऊं शकतो.

कोळशाच्या खालोखाल दुसरी मोटी उत्पत्ति लोखंडाची. 'अनशान' आणि 'पेनशिहू' येथे प्रचण्ड खाणी आहेत व त्यांतून ३० लक्ष टन पिग आयर्न निघूं शकेल. याखेरीज ॲटमबॉंबला अवश्य असलेली युरेनियम धातु अगणित प्रमाणांत मांचूरियांत असल्याची ताजी माहिती अमेरिकेने उजेडांत आणली आहे. अशा स्थितींत मांचूरिया दाबण्यासाठी रूसो-अमेरिकन लढा व्हावा हें सरळच आहे.

केसरी, १७-१-४७

— ३१ —

# तिसऱ्या महायुद्धाचा भडका कशानें उडेल ?

## इंग्लंडवर अमेरिकेची कुरघोडी

जगाचा प्रलय करणारें दुसरें महायुद्ध संपलें असें वाटत होतें; परंतु सध्यां शांतताप्रस्थापनेसाठीं बड्या चौघांची जी माथेफोड चालू आहे तीवरून इतकेंच स्पष्ट होत आहे कीं, दुसरें महायुद्ध संपलें म्हटलें तरी आतां त्याहून मोठ्या अशा महायुद्धाचीं बीजें दोस्तराष्ट्रांकडूनच पेरलीं जात आहेत. गेल्या दुसऱ्या महायुद्धांतील शत्रु म्हणजे जर्मन्स आणि त्यांविरुद्ध जे इंग्रज, रशियन्स व अमेरिकन्स त्यांच्यांत तेवढा बदल होऊन भावी तिसऱ्या युद्धांत रशियन्सविरुद्ध ॲंग्लो-अमेरिकन्स असा देखावा दिसणार. गेल्या महायुद्धांत सुरवातीस ब्रिटन हें पहिल्या दर्जाचें पुढाईत राष्ट्र म्हणून धुरा धारण करतांना दिसत होतें खरें, परंतु थोड्याच अवधींत त्याचा गर्वज्वर उतरला. त्याची प्रतिष्ठा, अब्रू व साधनसंपत्तिही संपुष्टांत आली आणि अखेर अमेरिकेनें त्याला पायांखालीं घालून त्याचें महत्त्व बळकाविलें आणि सध्यां तर अशी स्थिति आहे कीं, अमेरिका ही सर्वच बाबतींत इंग्लंडचा सावकार बनली आहे ! इंग्लंडचें सर्व साम्राज्यही अमेरिकेनें स्वतःकडे जवळजवळ गहाणच लावून घेतलें आहे. आणि सामान्य लौकिक व्यवहारांत गहाण लावून घेतलेली जिंदगी ज्याप्रमाणें अखेर सावकाराच्याच मालकीची बनलेली दिसते त्याचप्रमाणें येथेंही स्थिति झालेली आहे. ‘इंग्लंड हें निराळें राष्ट्र तरी यापुढें कशाला राहावें ! अमेरिकेच्या ५६ संस्थानांपैकीं एक म्हणून त्यानें अमेरि-

केंत सामील व्हावें ' अशी जाहीर चर्चा अमेरिकन सिनेटर्स करतांना दिसतात. इंग्लंडची वसाहत कॅनडा परवां नुकत्याच झालेल्या एका तहान्वयें अमेरिकेनें आपल्या पंखाखालीं घालण्याचा केलेला उपक्रमही ताजाच आहे. सांगण्याचा मुद्दा हाच कीं, यापुढें जें जें कांही इंग्लिश सत्तेचें द्योतक असें स्थान जगांत होतें तेथे तेथे आतां अमेरिकेची पाटी लावल्यासारखेंच आहे.

## रशियाला कोंडण्याचा अमेरिकन डाव

अर्थात् इंग्लंडचीच कामगिरी यापुढे अमेरिका करणार. फक्त निराळ्या नांवाखालीं. भावी काळांत आतां दोनच शक्ति उरल्या, एक रशिया व दुसरी अमेरिका आणि रशियाला सर्व बाजूंनी कोंडून टाकण्याचाच जगांतील सर्व आघाड्यांवर अमेरिकेचा प्रयत्न सुरू आहे. ॲटलँटिक महासागर आणि पॅसिफिकचा बराचसा भाग सर्वस्वीं अमेरिकेकडे निर्वेध आहे. जपान अमेरिकनांनीच जिंकला. तेव्हा तेथे रशियाची लुडबुड अमेरिका बिलकूल चालू देणार नाही. येऊन जाऊन रशियाने कोरिया आणि मांचूरिया हे पूर्वेकडील भूप्रदेश गेल्या महायुद्धाच्या अखेरीस बळकावले, तेवढे एक शल्य अमेरिकेस आहे. पण एरवी कोरिया–मांचूरियापासून तों पश्चिमेस तहत भूमध्यसमुद्रापर्यंत अमेरिकेने आपल्या स्नेही राष्ट्रांची संरक्षक बुरुजबंद सांखळीच उभी केली आहे हें नकाशा बघून पाहिलें असतां तेव्हाच दिसेल. चीन देश सध्या अमेरिकेच्याच पूर्ण वर्चस्वाखालीं असून त्याखालील तिबेट व नेपाळशीं अमेरिकेने नवे स्नेहसंबंध जोडले आहेत ! हिंदुस्थान, ब्रह्मदेश इत्यादि देश हे ब्रिटिशांचे म्हणून एक तऱ्हेने अमेरिकेच्याच मालकीचे आहेत ! नंतर पुन्हा डाव्या हातास अफगाणिस्तान, इराण व पलीकडे अरबी राष्ट्रांचा मोठा संघ—या सर्वांना कुबेराचा बाप बनलेल्या अमेरिकेने अपरंपार आर्थिक मदत करून आणि आपल्या विज्ञानशोधादिकांनी भारून टाकून आपल्या कच्छपीं लावून घेतलें आहे. अशा रीतीने सध्यां अमेरिका व रशिया यांच्या सरहद्दी एकमेकांस चिकटल्या असून त्यांची सर्व दिशांस रेटारेटी सुरू आहे व त्यांतूनच कोठल्या तरी एखाद्या ठिकाणी महायुद्धाचें तात्कालिक

निमित्तकारण म्हणून निर्माण होऊन पुन्हा युद्धाचा वणवा पेटेल. हा वणवा अगदीं नजीकच्या काळांतच पेटेल असें नसलें तरी उभयपक्षीं युद्धाची कडेकोट खंबिरी होऊन राहिली आहे यांत शंका नाही.

## तेलाचें महत्त्व संपणार नाहीं

युरोपपुरतें पाहिलें तर पुन्हा महायुद्ध पेटण्याला कारणांचा कांहीं तोटा नाहींच. तात्त्विक मुद्यावर म्हणजे धोरणांबाबत मतभेद होऊन युद्ध पेटावयाचें असेल तर नुसता जर्मनीचाच प्रश्न पुरे होईल. प्रत्यक्ष मुलुखाच्या वांटणीसंबंधांत किंवा अदलाबदलीसाठी तें पेटावयाचें असेल तर ट्रिेयेस्ट बंदर, ग्रीस देशांतील चालू यादवी इ. कारणे सहज पुरीं होतील. पण वरील दोन गोष्टींखेरीज आणखी एका गोष्टीमुळे तिसरें महायुद्ध भडकण्याचा संभव आहे. तें कारण म्हणजे तेल होय. फार काय, या तेलाच्या पायींच कल्पनेच्याहि आधीं एखाद वेळ भडका उडण्याचा धोका दिसतो. किंबहुना इराणांत आझरबैझान प्रांतांत त्याची सुरवातही झाली होती ! अॅटमशक्तीमुळे तिसऱ्या महायुद्धाचीं साधनें अजीबात बदलून जाणार असें म्हणतात. तें निर्णायक विजय मिळविण्याच्या दृष्टीने खरेंहि ठरेल; परंतु इतर साधनांचें महत्त्व अजीबात लोपलें जाणे शक्यच नाहीं. गेल्या दुसऱ्या महायुद्धांत आरमारी शक्तीपेक्षा हवाई शक्ति अधिक प्रभावी ठरली हें खरें असलें तरी आरमारानें कामगिरी केली तीही महत्त्वाचीच होती. त्याच दृष्टीने अॅटमबॉंब प्रभावी ठरला तरी विमानें, वाहनें, आरमार हीं ज्यावर चालतात त्या तेलाचें महत्त्व अगदीं कमी होणें अशक्य आहे. आणि म्हणूनच सध्या अमेरिका व रशिया यांची मध्यपूर्वेतील तेलखाणीप्रदेशावर वर्चस्व मिळवण्यासाठी झोंबी सुरू आहे. मध्यपूर्वेइतका प्रचंड तेलसांठा अन्यत्र नाही. इंग्लंडने गेल्या ४०–५० वर्षांत मोठ्या धोरणीपणाने तेथें आपला शह बसविला होता तो याचसाठी; परंतु आतां लेखाच्या सुरवातीस सांगितल्याप्रमाणे इंग्लंडला टोपी घालून अमेरिकेने सारी मध्यपूर्व या ना त्या उपायाने स्वतःच्या आहारीं आणली आहे. इराणच्या उत्तरेस आझरबैजान प्रांतांत अशाच प्रचंड उत्पादनाच्या तेलखाणी असल्यामुळे रशियाने इराणला फितवून किंवा त्यावर दडपण

आणून तो प्रांत गिळला होता. परंतु अमेरिकेने अखेर रशियावर मात करून आझरबैझानांतून रशियाला हुसकावून दिलें आहे व इराणवर तत्त्वत: स्वत:चा अंमल प्रस्थापित केला आहे.

## सौदी अरेबियाचें महत्त्व

अरबी राष्ट्रांपैकीं सीरिया, इराक, इराण येथे तेलखाणी स्थापून ब्रिटिशांनी अपरंपार तेल आजवर काढलेंच होतें; परंतु आतां सौदी अरेबियासारख्या आजवर वैराण समजल्या गेलेल्या प्रचंड वाळवटांतून तेलाचे समुद्रच निर्माण करण्याचें कार्य अमेरिकेने अंगीकारलें आहे. सौदी अरेबियांत आपल्या ज्ञानाच्या, पैशाच्या, विजिगीषु वृत्तीच्या बळा-वर अमेरिकेने काय चमत्कार करून दाखविला आहे तेवढा पाहिला असतां पुरें होईल.

अरब राष्ट्रगटांत सौदी अरेबिया हा सर्वांत प्रचंड देश—खंडप्राय. इजिप्त आणि सीरिआ यांचा सुधारलेल्या जगाशीं संबंध पूर्वीच आलेला आहे. इजिप्त हा आंतरराष्ट्रीय महत्त्वाचा देशच समजला जातो. लेव्हंट राष्ट्रांचाही युरोपशी सबंध अगदीं निगडित आहे. इराकचा युरोप, हिंदु-स्थान, इराण इत्यादिकांशी व्यापार व अन्य संबंधाने सतत घनिष्ठ संबंध आहे. तशी स्थिति यापूर्वी अरबस्तानची मात्र केव्हाच नव्हती. पण आतां त्याने एकदम सुधारणायुगांत उडी घातली आहे. ७ व्या शतकां-तून तो एकदम २० व्या शतकांत उडी मारून आला आहे. म्हणून जागतिक आंतरराष्ट्रीय घडामोडींत तो कोणता वांटा उचलतो त्याकडे सर्व जगाचे साहजिकच डोळे लागून राहिले आहेत.

इब्न सौद हा सौदी अरेबियाचा राजा. इब्न सौन्दने १९०१ साली आपलें बापाचें राज्य पुनरपि जिंकून मिळविलें. त्याच्या बापाला राज्या-वरून हांकून देण्यांत आलें होतें. त्यानंतर गेल्या ४५ वर्षांच्या कारकीर्दीत अरबस्तानांत हळूहळू पण प्रचण्ड स्थित्यंतर होत आलें आहे.

इब्न सौद यानें स्वत:पुरती एक गोष्ट पक्की करून टाकली आहे. ती म्हणजे आपल्या वंशाची राजपदावर पक्की स्थापना. तसेंच त्याने अंत-र्गत बंडाळीचा बीमोड करून सुधारणेला अनुकूल अशी शांततेची घडी

बसविली आहे. मुसलमानी धर्माचार फार कडक, सनातनी असून त्याचें परिपालन करावयाचें म्हटलें तर नव्या यांत्रिक युगांत पाड लागावयाचा नाही. या युगांत जुने आचारकाण्ड बदलून घेणेंच नाप्राप्त ! आणि अरबस्तानांत आतां हळूहळू तेंच होत असून नवविचाराचा नवा समाज नव्या पिढ्यांत निर्माण होत आहे.

## सौदी अरेबियाचे शेजाऱ्यांशी असलेले संबंध

सौदी अरेबियाच्या उत्तरेस असलेली राष्ट्रें म्हणजे इराक व ट्रान्सजॉर्डन. यांपैकीं इराक आणि सौदी अरेबिया यांची सरहद्द पक्की ठरवून प्रत्यक्ष गडदू म्हणजे हद्दीचे दगडही बसविले आहेत. ट्रॉन्सजॉर्डन व सौदी अरेबिया यांची सरहद्द ठरविण्यांत आलेली असली तरी ती पूर्ण पक्की नाही. कारण आकाबानजीकच्या सरहद्दीबाबत इब्न सौन्दनें अजून निर्णय घेतलेला नाहीं. त्याबद्दल तो वाद सांगतो. या दोन्ही राष्ट्रांचें शेजारी म्हणून, अंतस्थ कांहीसें वैरच आहे. सौदी अरेबियानें १९४१ सालीं रशीदअल्ली उर्फ अल्किलानी याला आश्रय दिला. हा अलकिलानी बगदादचा राहणारा. त्यानें जर्मनांच्या चिथावणीवरून इराकच्या राज्याविरूद्ध व दोस्तांविरुद्ध बंड उभारलें होतें. यामुळे इराकचें सौदी अरेबियाशी वैर वाढण्यास एक नवीन कारण झालेलें आहे. खेरीज ट्रान्सजॉर्डनमधील लोकांनीं गेल्या युद्धापूर्वी इब्न सौदविरुद्ध बंड उठविले होतें. यामुळे सौदी अरेबियाचें ट्रान्सजॉर्डनशी वैर आहे. सौदी अरेबियाच्या ईशान्येस छोटें कुएट नांवाचें राष्ट्र आहे. पण त्याच्याशीं मार्च १९४० च्या व्यापारी तहामुळे त्यांचें सख्य झालें आहे. नैर्ऋत्य कोपऱ्यांतील येमेनच्या सरहद्दीचा प्रश्न १९३४ च्या सौदी-येमेन लढाईत पक्का ठरला आहे व दोघांचा चांगला स्नेह आहे. दक्षिण व आग्नेय मुलूख केवळ डेझर्टचा म्हणजे वाळवंटाचाच असल्यामुळे आज त्यांत हद्द घालण्याचा प्रश्नच निघालेला नाही. पुढेंमागें त्या वाळवंटांत तेल-खाणी लागल्या तर मात्र तो प्रश्न उद्भवेल. इंग्लंड व अमेरिकेशी सौदी अरेबियाचे संबध आतांपर्यंत सलोख्याचे आहेत. परंतु पॅलेस्टाइनमधील अरब-ज्यू वादामुळे ते किती बिघडतील तें मात्र सांगतां येत नाही. इतर अरब राष्ट्रांबरोबर

सौदी अरेबियाहि ज्यूंशी किंवा त्यांच्या पक्षपात्यांशी लढेल असेल असेंच वाटतें. ट्रान्सजॉर्डन अरब लीजनच्या सैन्यांत सौदी अरेबियनांनी आपली भरती करून घेतली आहे.

## कर्ज देऊन घरांत घुसली

इब्न सौदच्या कारकीर्दीच्या सुरवातीस त्याच्या राज्याचें उत्पन्न म्हटलें म्हणजे मुख्यतः जकातीचें व शेतीभातीचें. १९१४–१८ चे दरम्यान पहिल्या महायुद्धकाळांत ग्रेटब्रिटनकडून त्याला थोडी खंडणी मिळाली. पुढे १९२६ सालीं त्याने 'हशिमाईट' चें राज्य जिंकून घेतलें व तो हेजाजचाहि राजा बनला, आणि तेव्हापासून मक्केला जाणाऱ्या यात्रेकरूंचे करहि त्याला घेण्याचा हक्क प्राप्त होऊन त्याच्या उत्पनांत बरीच भर पडली. हा कर १ कोटी ८० लक्ष 'रिआल' इतका वाढला. एक 'रिआल' म्हणजे जवळजवळ १॥ शिलिंग; म्हणजे इब्न सौदच्या सर्व उत्पन्नांत मुख्य मोठें उत्पन्न म्हणजे हेंच. या उत्पन्नाखेरीज कस्टम ड्यूटीचें सुमारें २० लक्ष रिआल उत्पन्न होई. राज्यविस्ताराच्या मानानें इब्न सौदचें हें एकूण उत्पन्न इतकें थोडें होतें की, हिंदुस्थानांतून शस्त्रांची आयात करण्यास व वायरलेस टेलिग्रॅफसाठी म्हणून त्यास निराळी कर्जेंच काढावीं लागत. १९३२ सालीं २ लक्ष १९ हजार पौंड कर्ज इब्न सौदला होतें. अखेर १९३३ सालीं जागतिकदृष्ट्या व त्याच्या राष्ट्राच्याही दृष्टीने केवळ क्रांतिकारक अशी त्याने एक गोष्ट केली ती म्हणजे आपल्या राज्यांत अमेरिकेला तेल काढण्याचा परवाना दिला ही हाय. हा करार पूर्वी कॅलिफोर्निआ अरेबियन ऑईल कंपनी नांवाने काम करीत असलेल्या "दी अरेबियन-अमेरिकन ऑइल कंपनी" नांव घेतलेल्या दिलावेअरच्या एका कंपनीशी केला. करार ६० वर्षें मुदतीचा असून इब्न सौदच्या राज्यांतील पूर्वभागापैकी सुमारें २५०,००० स्क्वेअर मैलांच्या टापूंत तेल काढण्यासंबंधींचा होता. यानंतर पुन्हा कांही वर्षांनी तेल-टापूची मर्यादा दक्षिणउत्तरेकडे वाढवून देण्यांत आली. वर सांगितलेल्या अरेबियन ऑइल कंपनींत कॅलिफोर्निआची Standard Oil Company व टेक्सॅस कार्पोरेशन या दोघांची समान भागी आहे. या तेल काढण्याच्या

हक्काबद्दल इब्न सौदला दर टन तेलामागें ४ शिलिंग स्वामित्वादाखल देण्याचा करार आहे व सध्यां दरसाल ६ लक्ष टन तेल निघतें. पूर्व किनाऱ्यानजीक 'बेहरिन' बेटासमोर तेलाची फारच मोठी जिवंत खाण सांपडलेली आहे. रासतानूरा बंदरापासून पांच मैलांवर तेल शुद्ध करण्याची रिफायनरी स्थापण्यांत आली असून तेथे दरसाल २५ लक्ष टन तेल शुद्ध केलें जातें. या कृत्यांत जें क्रूड ऑइल निर्माण होतें तें दरसाल १ लक्ष २० हजार टन भरतें; व नंतर जो गाळ शिल्लक राहतो तो बेहरिन येथील बेहरिन पेट्रोलियम कंपनीच्या रिफायनरींत नेला जातो. सध्यां एकूण जितकें तेल दरसाल निष्पन्न होतें त्याच्या दसपट तरी अधिक तेल काढण्याची शक्यता अरेबियन ऑइल कंपनीला वाटत असून त्याच खात्रीवर अमेरिकन सरकारने २६ कोटी ५० लक्ष डॉलर्स खर्च करून भूमध्य समुद्रापर्यंत २२०० मैल लांबीचे तेलनळ टाकण्याचें काम योजिलें आहे. अमेरिकन सरकारला दरसाल ६० लक्ष टन तेल सौदी अरेबियात आपण काढूंच काढूं असा विश्वास वाटतो म्हणून एवढा खटाटोप !

## तेलाच्या पाण्याने अरेबियांत सुधारणेची बाग़शाई उठली

या तेलखाणीच्या उपक्रमापासून सौदी अरेबियाचें सर्वच दृष्टींनी स्थित्यंतर सुरू झालें. आतां तेथे विमानें घोंघावत असतात. वाळवंटांतून रस्ते पाडण्यांत आले आहेत. आर्टिशियन विहिरी खणण्यांत आल्या आहेत व हजारों अडाणी अरबी लोक कारखान्यांतून, यंत्रशाळांतून नवीं कसबें शिकत आहेत. कंपनीने आपल्या मजुरांसाठी शाळा घातल्या आहेत. अद्ययावत् साधनांचे दवाखाने व हॉस्पिटल्स उठविलीं आहेत. नव्या तऱ्हेचे इमले उठविले आहेत. फार काय, पोशाख-पेहरावही आतां विलायतीच आले आहेत !

तेलखाणीसाठी परवाना दिल्यानंतर इब्न सौदने निरनिराळ्या खनिज धातूंसाठी खाणीं काढण्याचेही परवाने देण्यास सुरवात केली. १९३४ सालीं बहामांत रजिस्टर केलेल्या सौदी अरेबिया मायनिंग सिंडिकेटला कांही विशिष्ट टापूंत सर्व तऱ्हेचे धातु काढण्याचा परवाना दिला. हें क्षेत्र महद-अल-दहाबचें. हें जिद्दाच्या उत्तरेस २५० मैलांवर आहे. जिद्दा

हें तांबड्या समुद्रावरील मक्केचें बंदर. उपरिनिर्दिष्ट कंपनीने सुरवातीस एका जुन्या ओस पडलेल्या खाणींतच सुरवात करून २ लक्ष ५० हजार टन ओअर काढलें व नंतर अधिक खोल खणावयास सुरवात केली. त्यांचा अदमास ४ लक्ष २० हजार टन ओअर निघेल असा होता. ही सर्व धातुमय माती काढून अमेरिकेंत शुद्धीसाठी पाठवीत. या उद्योगांत दरसाल ३३,००० औंस सोनें मिळे. आतां तर त्या खाणींतून दररोज ३५० टन धातुमिश्रित माती निघण्याची अपेक्षा तज्ज्ञ करतात. वरील खाणींतून नुसतें सोनेंच सांपडत नाहीं तर रूपें, तांबे, शिसें व जस्त या धातुहि सांपडतात. सौदी अरेबियाच्या उत्तर, मध्य व नैॠत्य भागांत खनिज धातूंच्या जुन्या खाणी पुष्कळच आहेत. गेल्या शतकांतील सर रिचर्ड बर्टन, एडवर्ड ग्लेसर, जे. हॅलेव्ही आणि चार्लस डोटी वगैरे अनेक तज्ज्ञ प्रवाशांनी या खाणींचा मुद्दाम उल्लेख केला होताच ! ! त्या शोधून उकरण्याचा सपाटा सुरू झाला असून खेडूतपेशांतील शेतकरीही रोज नव्या नव्या खाणींचीं ठिकाणें अमेरिकनांना दाखवीतच आहेत. सारांश, या पुरातन वैराण वाळवंटांत पश्चिमेकडील अद्ययावत् विसावें शतकच प्रफुल्ल होत आहे.

## " प्रयत्नें वाळूचे कण रगडितां तेलहि गळे "

१९४६ च्या उन्हाळ्यांत सौदी अरेबियन सरकारने वॉशिंग्टनकडे एक्स्पोर्ट-इंपोर्ट बँकेकडून पुन्हा अद्ययावत् सुधारणा करण्यासाठी कर्ज मागितलें आहे; व बँकेनेहि २ कोटी डॉलर्सचें कर्ज कबूल केलें आहे. हा पैसा शेती व रस्ते दुरुस्तीसाठी इब्न सौद खर्च करणार आहे. इब्न सौदला स्फूर्ति होऊन " प्रयत्नें वाळूचे कण रगडितां तेलहि गळे " ही उक्ति त्याच्या राज्यांत चालू झालेल्या तेल-खाणींनी अक्षरशः खरी ठरली. अरबस्तानच्या वाळवंटाच्या अनंत महासागरांतील वाळूचा प्रत्येक कण म्हणजे तेलाचा एकेक थेंबच ठरत आहे ! ! वैराण वाळवंटांत तेलाच्या व सोन्या-रुप्याच्या खाणी काढण्याचा अपूर्व चमत्कार तेथें सिद्ध झाला त्याचप्रमाणे दुसराहि एक अपूर्व चमत्कार घडत आहे; तो म्हणजे त्या वालुकामय प्रदेशांतच शेतमळे यशस्वी करून दाखविण्याचा. १९४२

मध्यें अमेरिकेच्या ॲग्रिकल्चरल मिशनने सौदी अरेबियाची बारकाईनें पहाणी केली असून सौदी सरकारला त्याने आपला रिपोर्ट दिला आहे. वाळवंटांत ओॲसिसच्या सांखळ्या आंतून कशा जोडल्या आहेत इत्यादि संशोधन त्यांत असून सौदी अरेबिया कृषिसंपन्न करण्याची ग्वाही दिली आहे. गहूं आणि भात मुबलक पिकविण्याची शक्यता असून फळें, लोकर, मेंढ्या, उंटाचे केस यांचें उत्पादन कमालीचें वाढवून तें परदेशांत किफायतशीर रीतीनें निर्गत करतां येईल असें दर्शविलें आहे. याखेरीज आजपर्यंत सौदी समुद्रकिनाऱ्यांतील मासेमारीच्या उत्पन्नाकडे लक्ष देण्यांत आलें नव्हतें. तीहि कशी उत्पन्नाची बाब होईल हेंहि सिद्ध करण्यांत आलें आहे. सध्यां सौदी अरेबियांत जितकी जमीन लागवडीखालीं आहे त्यापेक्षा ५०,००० एकर नवी जमीन वहितीसाठी नव्या साधनांनी उपयोगांत आणण्याची शक्यता आहे. तेवढे झालें की सौदी अरेबिया अन्नापुरता स्वावलंबी होतो. अशा रीतीनें सौदी अरेबिया पुष्ट करून अमेरिका त्याला आपल्या गोठ्यांत नेऊन बांधणार !

वाङ्मय-शोभा मे १९४७

★

— ३२ —

# 'स्वतंत्र' हिंदुस्थान व नेपाळ यांच्या नव्या भूमिका कोणत्या ?

स्वतंत्र आणि स्वायत्त अशा राष्ट्रांना आपल्या शेजारच्या राष्ट्रांतील घडामोडींवर आणि हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवणे भागच असतें. कारण देशादेशांच्या राजकारणांत शेजाऱ्याला मनोमन आपला शत्रु म्हणूनच समजावें असा एक रूढ संकेत आहे. कौटिल्यादि जुन्या राजनीति-ग्रंथांत तर आपल्या शेजाऱ्यास 'गुप्त शत्रु' असें मानून त्याच्या पलीकडील राजा किंवा राज्य असेल त्याशीं नेहमीं सलोखा ठेवण्याचा प्रयत्न करावा असा दण्डकहि सांगितलेला आढळतो. याचें कारण अर्थात् हेंच की, राजकारणांत खरा विश्वास, खरा स्नेह किंवा खरी निर्लोभता यांना स्थानच नाही. शेजारीं शेजारीं असणारीं राष्ट्रें संधि सांपडतांच आपापले शेजारी म्हणविणाऱ्या राष्ट्रांवर केव्हा हात टाकतील याचा नेम नसतो. जगाच्या आतांपर्यंतच्या इतिहासांत हा प्रकार सर्वत्र सनातनच असल्यामुळे आपल्या शेजारच्या किंवा सरहद्दीवरच्या राष्ट्रांकडे नेहमीं डोळ्यांत तेल घालून नजर ठेवणे स्वतंत्र व स्वयंशासित राष्ट्रांना भाग पडतें.

वास्तविक नेपाळ काय, भूतान काय, हीं आपल्या हिंदुस्थानच्या सरहद्दीशी एकजीव झालेलीं राष्ट्रें. तथापि गेल्या शंभर-सवाशें वर्षांत आपणांपैकी सुशिक्षित म्हणविणाऱ्यांनाहि त्याचा कांही पत्तामुद्दासुद्धा असण्याचें कारण नव्हतें. 'नॅशनल जिऑग्रॅफिक' मासिकांत एखाद्या पाश्चात्याने नेपाळसंबंधी सचित्र प्रवासवर्णन लिहिलेलें आढळलें म्हणजे तें त्याच अंकांतील उत्तर ध्रुवाकडील प्रदेशवर्णनासारखेंच त्रयस्थदृष्टीने

आम्हीं वाचावें इतकेंच ! कंपनी सरकारच्या इंग्रज वीरांच्या बहादुरीनें नटलेला " मराठ्यांचा इतिहास " आपण शाळा-कॉलेजांत असतांना वाचणार. त्यांत कोठे चार-दोन ओळींत कंपनी सरकारच्या नेपाळ किंवा ब्रह्मदेशावरील स्वाऱ्यांचा उल्लेख आलेला असला तरच तो तेवढा आपणांस आठवला तर आठवणार. तुम्ही साहित्यिक किंवा रसिक कवि असाल तरच कदाचित् केशवसुतांच्या " नेपाळेश्वर भाललग्न चिखला कस्तूरिका मानितीं, " या चरणाशीं तुमची गांठ पडून तुम्ही नेपाळला कधीं अडखळला असला तर असाल ! नाही म्हणावयास धार्मिक बुद्धीने यात्रा करणारे भाविक हिंदु यात्रेकरू कोणी असतात त्यांना तेवढा नेपाळचा प्रत्यक्ष परिचय झालेला असतो. परंतु त्यांची दृष्टि केवळ भाविक असल्यामुळे त्यांच्या डोळ्यांला ढापणें बसलेलीं ! राजकारण, भौगोलिक ज्ञान, सामाजिक माहिती इत्यादिकांबाबत त्यांच्याजवळून इतर कसलीच अपेक्षा करतां येत नाही. सारांश, सांगण्याचा मुद्दा हा की, नेपाळ देश हिंदुस्थानला इतका निकटसमीपवर्ती असतांहि त्याचें ज्ञान आपणांस कांहींच नसतें. आणि याचें मुख्य कारण हेंच की, गेलीं शंभर-दीडशें वर्षे हिंदुस्थान परतंत्र असल्यामुळे त्याला नेपाळविषयीं कांही ज्ञान करून घेण्याची आवश्यकताच भासली नाही. हिंदुस्थानचे राजे इंग्रज होते म्हणून नेपाळवर नजर ठेवण्याच्या किंवा त्यासंबंधी बारीक-सारीक वित्तंबातमी काढण्याच्या किंवा त्याच्याशी स्नेहसंबंधादि आचार-विचार राखण्याच्या सर्व कर्तव्यांचा पत्कर इंग्रजांनीच घेतलेला होता.

पण इंग्रज नव्हते अशा काळी म्हणजे खुद्द पेशवाईत आपण स्वतंत्र राष्ट्र होतें त्यावेळी, हिंदुस्थानचा नेपाळशीं किती दाट संबंध होता हें नीट लक्षांत घेतलें म्हणजे मात्र आश्चर्य वाटणार नाही. आज ज्याप्रमाणे इंग्रजांनी सर्व हिंदुस्थानांत ' एकछत्री ' अंमल केलेला आहे तसाच जवळजवळ पेशव्यांनीहि केला होता, व आजच्याप्रमाणेच एका बाजूस काश्मीर आणि नेपाळ हींच पेशव्यांच्या राज्याची एक सरहद्द होती. सध्या प्रवासाचीं व दळणवळणाचीं साधनें इतकीं सुलभ झालीं आहेत की, सांगता सोय नाही. पुण्याहून तीन दिवसात नेपाळ गांठतां येतें. पेशवाईच्या काळीं वाहतुकीचे हमरस्ते नव्हते, मध्यंतरी निरनिराळ्या

सत्तांच्या वसाहती व यांत्रिक जलद वाहनांची कसलीच सोय नाही. रेल्वे नाही, पूल नाहीत, खडीचे रस्ते नाहींत, कांही नाही. तरीहि पुण्याहून १००० मैल दूर असलेल्या नेपाळ सरकारशीं पुणें-दरबाराचा सतत डाकेवरून किंवा जासूद-जोड्यांकरवीं पत्रव्यवहाराचा शिलशिला असे, परस्परांच्या वकिलाती परस्परांकडे येत जात व मराठे आणि गुरखे राजकारणप्रसंगीं परस्परांचे लष्करी सहाय्यहि आपापल्या शत्रूंविरुद्ध घेत.

सातान्यास ' गेंडा माळ ' नांवाचें आजहि एक लोकप्रसिद्ध असें ठिकाण आहे. या माळावरच थोरले शाहुछत्रपति शिकारखान्यांतील आपला आवडता गेंडा बांधीत असत. हा गेंडा त्यांना नेपाळच्या राजांनीच नजर म्हणून पाठविला होता. सन १७८३–८४ सालीं पेशव्यांनी लज्जाशंकर वकील नेपाळकर राजे रणसिंग यांजकडे पाठविल्याचा उल्लेख सवाई माधवराव पेशव्यांच्या रोजनिशींत सांपडतो. त्याचप्रमाणे १७९६–९७ सालीं नेपाळ-राजाकडून दुसऱ्या बाजीरावाला नजर आल्याचा उल्लेख दुसरे बाजीराव रोजनिशींत सांपडतो. " जमा जामदारखाना कमाविसभेट राजश्री बाबासाहेब यांसी, बाबत रणबहादर राजे नेपाळकर यांनीं पाठविले ते पट्टू भस्मी. सणगे दोन. "

अलीकडे प्रसिद्ध झालेले पेशवे दप्तराचे भाग व रेसिडेन्सी रेकॉर्ड्सचे भाग यांत उध्धृत केलेल्या समकालीन अनेक पत्रांतून तत्कालीन पेशव्यांच्या वा शिंद्यांच्या बातमीदारांनी नेपाळांतील राजकीय हालचालींची व गुरखे आणि इंग्रज यांच्यांत झालेल्या लढायांची बातमी दिलेली आढळते. उदा., १८१७ च्या मल्हारराव होळकरांच्या लष्करांतील एका बातमीदाराच्या पत्रांत असा उल्लेख आहे, " गोरखे याचा मुलुक इंग्रजांनीं कांहीं घेतला ( होता ) तो गोरखे यांणी लढाई करून माघारा घेतला अशी वंदता आहे. " ११ डिसेंबर १८१८ च्या पत्रांत बातमीदार बळवंतराव बापुजी ' ऐकीव बातमी ' लिहितो, " गोरखांचे राज्याची लढाई जाहाली होती म्हणोन सांगत होते. " याआधीं ४-५ वर्षे म्हणजे १८१४ सालीं तर कृष्णाजी नाईक गायकवाड नांवाचा विश्वासू बातमीदार दुसऱ्या बाजीरावानें त्रिंबकजी डेंगळ्यामार्फत उत्तर हिंदुस्थानांत शिंद्यांच्या लष्करांत ठेवलेला होता, त्याच्या प्रत्येक पत्रांत

नेपाळच्या माहितीचें एकेक कलम अवश्यमेव तपशीलवार लिहिलेलें आढळतें. उदा.—१३–१२–१८१४ चें पत्र. " इंग्रजांची व गोरख्यांची लढाई आणीख जाली म्हणोन बोलवा आहे. रामपुरानजीक कोणी अखंतर लुधानेवाला आहे. ( हा ॲक्टरलोनी या इंग्रजी नांवाचा अपभ्रंश ) त्याचे पलटण पहाडांत चढून गेलें. ते गढीतील लोकांस समजतांच चढाई करून आले. वरून तोफा, खालून पावचे लोक होऊन मधे पलटण मारले. एका कर्णेलाचे डोके कापून नेले. एक कर्णेल जखमी झाला. लोक भारी फार पडून सिकस्त पावले. ( पराभूत झाले ) यासुद्धां तीन लढाया लढत शिकस्त इंग्रजांकडील जाली. "

१५ डिसेंबरच्या पत्रांतील उतारा, " इंग्रजांचे व गोरखीयांचे तिसरे लढाईंत किंकरजनांस ( हें एका इंग्रज सेनापतीचें नांव. कॉक्रेज. ) ८ जखमा जाल्या. ७–८ शे तेलंगा व गोरा मारिला. इंग्रजी नवी पलटणें आणीक ठेवीत आहेत. चौदा ठिकाणीं लढाईचा इरादा लागला आहे." २२ डिसेंबरच्या पत्रांतील तपशीलवार माहिती पहा. " लोणी आस्तर ( Ochter Lony ) याणे पहाडास टाकी लावून मार्ग केला, तो गोरख्यांनीं करूं दिला. पुढें तोंडावर कांहीं लोक पाठवून लढाईचा प्रसंग घालून ( इंग्रजास पाठीवर घेऊन ) पुढें पल काढिला. लोणी आस्तर व चार पलटणे चढून गेली. तेव्हा झाडींतून सभोवते गोरखे जमले. तरवार चालऊन चारी पलटनापैकीं दोन हाजार लोक मारिला. १४ साहेब ठार केले ! लोणी आस्तर व जखमी बाकीचे लोक पळून तोफा सोडून गेले ! जर्णेल याणे दिल्लीचे वगैरे वकील भेटीस गेले होते त्यास दिल्लीस खालीं वाटे लाविले, सांगितले कीं ' मागाहून मटकनसाहेब आलीयावर तुम्हांस वस्त्रे देतील ' आणि आपण स्वतः मुरादाबादेहून कूच करून कासी, रुद्रपूर गोरख्याचे आहे तिकडे गेले. कासीपूर पहाडाखाली मैदानांत आहे, रुद्रपूर पहाडांत आहे. " ७ जानेवारी १८१५ च्या पत्रांतील, इंग्रज-गुरख्यांच्या लढाईची व गुरख्यांनी डेहराडून व नाहान हीं इंग्रजांनी जिंकलेलीं दोन्हीं ठाणीं परत जिंकून घेतल्याची माहिती पहा. " इंग्रजांनी गोरखी याजकडील देहेरा ( डेहराडून ) व न्हाण ( नहान ) दोन जागा घेतल्या त्याजवर गोरखेयाची फौज कालसीहून

न्हाणचे शहरांत इंग्रज आले होते ते मारीत बाहेर काढून पलविले. देहे-यास होते त्यांणीं (इंग्रजांनीं) गोरखी याची जागा पाडून निघोन गेले. हरिद्वाराकडे पलटणें व तोफा जान्हार'' त्यानंतर तीन दिवसांनीं लिहिलेल्या पत्रांत म्हणजे १० जानेवारीच्या पत्रांत पुढील उल्लेख आहे. ''इंग्रजाणे. गोरख्याकडील संस्थान न्हाणची जागा घेऊन राज्याचे माहालाशी लढत होते. गोरख्याकडील सुभा कालशीहून आला. त्याणे लढाई घेऊन इंग्रेज शहेरांतून मारीत पाहाडाखालीं मैदानांत दोन कोस तलवार करीत नेले. शेरसाहेब याजला सोला सतरा जखमा होऊन रणाचे ठायीं राहिला. त्यास फिकरजनसाहेब टाकून पलाला. फिकरंजनसाहेबास जखमा जाल्या. साहा कोसावर जाऊन येक बिलटण उभे करून रात्रीं मुकाम केला.'' त्यांनंतर पुन्हा ७ दिवसांनंतरचे वृत्त असे, ''न्हाणची लढाई इंग्रेजाची फत्ते जाली होती ते गोरख्यांनी मारून संस्थान त्याणी आपले घेतले. ते लढाईत १४ साहेब धरून नेले. दोन थोर माणूस होते ते सुटावयाकरितां ५-९ लक्ष रुपये देऊ लागले. ते न घेता दोघास गोरख्यांनी गळी दिल्हे म्हणोन बोलवा आहे.''

इंग्रजांविरुद्ध शिंद्यांना आपल्याशीं मिळवून घेण्याचा नेपाळकर राजांचा कसा प्रयत्न चालला होता हेंहि दुसऱ्या एका पत्रांत कृष्णाजी गायकवाड लिहितो. ''गोरख्याकडील पत्रे हरघडी येतात (की) पांच चार लढाई इंग्रजाची मारली (परंतु) तुम्हाकडून उपराला जाला नाहीं. हल्ली त्याकडे (इंग्रजाकडे) तुमचा मुलूख आहे त्याचा बंदोबस्त तुम्ही करावा (इंग्रजाशी लढाई पुकारून तो मुलूख परत जिंकावा) नाहींतर इंग्रजास मारून आमची फत्ते जालियावर तुम्ही मुलकाचा इरादा करून पहाल तर देन्हार नाहीं.तुम्हां आम्हांस खलस पडेल.''

ही १८१४-१५ सालची गोष्ट. यानंतर पेशवाई जाण्याच्या वेळीं तर शिंदे, होळकर आणि बाजीराव सर्वांचीच नेपाळ सरकाराशी इंग्रजांविरुद्ध उठण्याविषयी कारस्थानें चालू होती. १८१७ मध्यें पुढील स्पष्ट उल्लेख आढळतो. " In july Jenkins from Nagpur reported secret meetings between Appasaheb, Sindhia's Vakitl

and the Vakil from Poona, and similar news of secret interviews began to reach the English resident from the camps of Sindhia, Holkar and Mirkhan. In Sept. two persons named Golab and Paramananda were arrested on suspicion at Bithur, when it was discovered that they were crrying Sindhia's seals and some letters adressed to influencial people in Nepal, concealed in the pages of a book." याबाबत अधिक तपशीलवार विश्वसनीय माहिती तत्कालीन कंपनी सरकारचा गव्हर्नर-जनरल व कमांडर-इन्-चीफ मार्किस ऑफ हेस्टिंग्ज यानें आपल्या खाजगी रोजनिशींत लिहून ठेवलेली सांपडते. ५ ऑक्टोबर १८१७ च्या नोंदींत तो लिहितो, "आज एक चमत्कारिक फितूर उघडकीस आला. आमच्या पोलिस शिपायांनी तरीवर संशयावरून दोघा जणांना अटक केली. त्या इसमाजवळ एक उंची पोथी होती. ती इतकी बहुमोल होती की, ती असल्या भिकारड्या भिक्षुकाजवळ येणें शक्यच नाही. त्यांनी ती चोरलेली असावी असा संशय येऊनच त्यांना अटक केली. पुढे झाडे घेतले तेव्हा त्यांच्या पागोट्यांत शिंद्यांच्या शिक्याचे मेणावर उठविलेले ठसे सांपडले! अर्थात् संशय बळावला. अधिक चौकशींत त्याच्या पोथीचें पानन्पान् उलगडून तपासण्यांत आलें. तेव्हा पोथीच्या वेष्टनाच्या पुष्टिपत्रांत अनेक फितुरांचीं पत्रें आढळलीं यांपैकी दोन शिंद्यांचीं, एक नेपाळराजाला व दुसरें त्याचा कारभारी भीमसेन याला लिहिलेलीं आहेत. पत्रावर शिंद्यांचें खास दस्तुरहि आहे. दुसरीं दोन पत्रें शिंद्यांचा मेहुणा हिंदुराव घाटगे यानें लिहिलेलीं असून तीं भीमसेन व त्याचे बंधु यांना लिहिलेली आहेत. बाकीचीं सर्व पत्रें शिंद्यांच्या दरबारीं नेपाळकराचा जो मुत्सद्दी गुप्तपणे ठेवलेला आहे त्यानें लिहिलेलीं आहेत व तीं भीमसेन आणि नेपाळांतील दुसरे ३–४ मातबर सरदारांस लिहिलेलीं असून त्यांत पुढील मजकूर आहे. "शिंद्यांचा इंग्रजावर मोठ्या सैन्यानिशीं स्वारी करून जाण्याचा विचार आतां पक्का ठरला. करितां तुम्ही तिकडून बेलाशक इंग्रजावर चालून यावे."

ही १८१८ सालापर्यंतची म्हणजे पेशवाई बुडेपर्यंतची हकिगत झाली. त्यानंतर दुसऱ्या बाजीरावास उत्तर हिंदुस्थानांत ८ लक्षांचें पेन्शन देऊन ब्रम्हावर्त येथे जन्मभर नजरकैदेंत ठेवण्यांत आलें, पण तेथेहि अनेक वेळा नेपाळकरांशी फितूर खेळविल्याचा आरोप त्याच्यावर येतच होता. व तें स्वाभाविकहि होय. कारण नेपाळ हें येवढेच हिंदु संस्थान स्वतंत्र राहिलेलें होतें. व कधीं काळीं आपल्या मुक्ततेला उपयोग झाला तर तो नेपाळराज्याचाच होईल अशी तत्कालीन बंदिवान् झालेल्या किंवा हतप्रभ झालेल्या मराठी संस्थानिकांना आशा वाटत होती. ती आशा साधारहि होती हें तत्कालीन इंग्रज लष्करी अधिकाऱ्यांनी व मुत्सद्यांनी आपल्या वर्तनाने सिद्धहि करून दिलेलें आहे. १८३९ सालीं पुढील प्रकार घडला. श्रीनिवासराव नामक ब्राह्मणाने लखनौचा रेसिडेंट कॉलफील्ड याची मुद्दाम मुलाजमत मागितली. त्या भेटींत त्याने पुढील जबानी दिली. " मी हैदराबादेस असतां बाजीरावाचे दोन गुप्त दूत मला भेटले. व त्यांनी तुला दरमहा २५० रुपयांची कानपूर येथे नोकरी देतों असें सांगून मला ब्रह्मावर्तास आणलें. तेथे बाजीराव पेशव्यांशी माझें बोलणें झालें त्यांत माहिती कळली की, दिवाण रामचंद्रपंत कारस्थान शिजवीत आहे. पुढे मी १ वर्षभर बिठुरास किंवा ब्रह्मावर्तास राहिलों. मग मला सांगण्यांत आलें की, " तूं कलकत्त्यास सीक्रेट ॲन्ड पोलिटिकल डिपार्टमेंटचा सेक्रेटरी मॅकनॅटन याला भेट व बिठूरहून मॅनसनची बदली करव. " तेव्हा मी आणि दोघे दुसरे इसम तिकडे निघालों. माझा पगार दरमहा रु. ३०० करण्यांत आला. या कामासाठी लाख दोन लाख रुपयांपर्यंत खर्च करण्याचीहि परवानगी व साहित्य करून देण्यांत आलें. मी मॅकनॅटला भेटलों परंतु काम साध्य झालें नाही. बाजीराव पेशव्याकडून पाठपुरावा व्हावा तोहि झाला नाहीं. म्हणून अखेर मी कलकत्त्याहून काशीस गेलों. तेथे ३ महिने राहून पुन्हा पेशव्यांच्या बोलावण्यांवरून ब्रह्मावर्तास आलों. त्या वेळी बाजीरावाने तूं माझा म्हणजे पेशव्याचा वकील म्हणून नेपाळांत गुप्तपणे जा म्हणून कामगिरी सांगितली व बरोबर परशुराम सावकार देऊं केला. पेशव्यांची नेपाळराजाशी व ब्रह्मदेशच्या राजाशी या वेळी बोलणीं सुरु होतीं की, तुम्हांस दोन कोट रुपये देतों.

तुम्ही कंपनी सरकारशी लढाई सुरू करा. मग मी नेपाळांत गुप्तपणे गेलों व राजगुरु रघुनाथरावाची भेट घेतली. नेपाळच्या महाराजाशीहि माझी मुलाखत झाली. त्या वेळी महाराजांनीहि असें सांगितलें की, आमची चाळीस रेजिमेंट सज्ज असून चिनी सरकारची कुमकहि आम्हांस मिळेल. नंतर देऊं केलेल्या रकमेबाबत बोलणे निघालें तेव्हा परशुराम सावकाराने खातरजमा केली की, ऐवज पेशवे बनारसला पाठवितील व तेथून नेपाळ सरकारला पोंचविण्याची तजवीज होईल. यानंतर परशुराम सावकार एकटाच पुढे ब्रह्मदेशास गेला. हा कट उघडकीस आल्यामुळे त्याचें फळ असें कांहीच मिळालें नाही. उलट बाजीरावाची नजरकैद अधिक सक्त झाली. मुद्दा येवढाच की, नेपाळचें सूत्र पेशवाई गेल्यानंतरहि मराठ्यांनी हातांत गच्च धरून ठेवलें होतें. फार काय ५७ सालच्या बंडाचेहि वेळी नेपाळकरांना चिथावण्याचे पुन्हा प्रयत्न झाले, परंतु एकंदर रागरंग पाहून नेपाळकरांनी बंडांत सामील न होतां उलट इंग्रजांसच सक्रिय मदत केली व स्वतःच्या राष्ट्राचा फायदा इंग्रजांकडून नवा मुलूख मिळवून करून घेतला. नेपाळ स्वतंत्र संस्थान किंवा राष्ट्र असल्यामुळे त्याचें करणें बिलकुल आक्षेपार्ह म्हणतां येत नाही. उलटपक्षी बंडानंतर नानासाहेबांस व पेशव्यांच्या परिवारास नेपाळ सरकारनें आपल्या राज्यांत राहूं दिलें, इंग्रजांच्या हवाली केलें नाही, त्यांचा चांगला परामर्शच घेतला, ही गोष्ट कृतज्ञतापूर्वक लक्षांत ठेवली पाहिजे. निव्वळ राजनीतीच्या दृष्टीने पाहिलें असतां पेशवे घराण्यांतील पुरुषांचा हुकमी एक्का आपल्या हातांत ठेवणे नेपाळकरांना इष्ट वाटलें नसेल कशावरून? पुरंदरच्या तहानंतर इंग्रज ' राघोबाला आमच्या मुलखांत कैदेंत ठेवा ' असा आग्रह धरीत होते. कारण त्यांना पुढेमागे मराठ्यांच्या मुलखांत त्या राघोबाचें नाव पुढे करून उपद्व्याप करण्याची सवड होती. तशीच दृष्टि पेशव्यांचे पुरुष आपल्या हातीं ठेवण्यांत नेपाळकरांची असण्याचाहि दृढ संभव आहे.

असा हा पूर्वोतिहास आहे. मध्यंतरींच्या १०० वर्षांच्या काळांत पारतंत्र्यामुळे हिंदुस्थानला नेपाळची स्मृति झाली नाही. परंतु पुढील साली हिंदुस्थानचा स्वतंत्र स्वयंशासित राष्ट्र म्हणून पुन्हा जन्म होणार

आहे असें निश्चित ठरलें आहे त्यामुळे आतांपासूनच स्वतंत्र राष्ट्राने करावयाची जी पहिली गोष्ट की, आपापले विश्वासाचे वकील शेजारच्या हितसंबंधी राष्ट्रास पाठवून त्यांशी स्नेहबंधन करावयाचें व तिकडील वित्तंबातमी राखावयाची त्या कामाला सध्यांच्या कॉंग्रेस प्रमुख सरकारनें सुरवातहि केलेली आहे. हिंदुस्थान हा जसा पारतंत्र्यांतून सध्यां एकदम स्वातंत्र्यांत प्रवेश करीत आहे ती स्थिति निराळ्या अर्थाने त्याचा शेजारी जो नेपाळ त्याचीही आहे. म्हणजे नेपाळ स्वतंत्र नव्हता असें नाही, परंतु त्याला जागतिक लष्करी व्यवस्थेंत मानाचें स्थान नव्हते. फक्त इंग्रज लष्कराला वाटेल तेवढे कजाखी लढवय्ये गुरखे शिपायी पुरविणारें इंग्रजांचें चिमुकलें दोस्त राष्ट्र इतकीच त्याची आख्या होती. परंतु दुसऱ्या महायुद्धाने त्याला आतां एकदम मानाच्या पहिल्या रांकेंत आणून बसविलें आहे. हिंदुस्थानच्या अवाढव्य खंडप्राय विस्तारामुळे पॅसिफिक-वर स्वामित्व निर्वेध ठेवूं इच्छिणाऱ्या अमेरिकेला हिंदुस्थानचें जसें कमालीचें महत्त्व वाटतें तितकेंच चीनशी शीवशेजार असलेल्या नेपाळ चेंहि वाटूं लागलें आहे. गेल्या दुसऱ्या महायुद्धांत चीनला पुरवठा कर-ण्याचे पूर्वेकडील सर्व मार्ग जपान्यांनी कब्जांत घेऊन बंद केले तेव्हा अमेरिकेला नेपाळ–तिबेटांतूनच नवा मार्ग काढून चीनला साहित्य-सामुग्री पुरवावी लागली आणि तेव्हाच अमेरिकेने दूरदृष्टीने नेपाळ–तिबेटशी प्रथमच स्नेहाचे संबंध जोडले. तत्पूर्वी नेपाळ–तिबेटशीं फक्त एकट्या इंग्रजांचाच तेवढा संबंध येई. परंतु दुसऱ्या महायुद्धांत इंग्लंडचें स्थान अमेरिकेने जिंकलें. अर्थात् तिकडल्या राजकारणाचीं सूत्रें अमे-रिकनांच्याच हातीं गेलीं. दुसरें महायुद्ध अमेरिकेने जिंकून दाखविलें हें पाहून नेपाळनेहि दूरदर्शीपणाने अमेरिकेशी स्नेहसंबंध मुद्दाम अमेरिकेंस वकिलांत पाठवून जोडले व तें आतां इतके दृढतर झाले आहेत कीं, विचारतां सोय नाही. अमेरिकेने ज्याप्रमाणे अरेबियन राष्ट्रें, ग्रीस, तुर्कस्तान, अफगाणिस्तान, इराण यांना अमूप पैसा व यांत्रिक, कृषिक, शैक्षणिक असे हरतऱ्हेचें तज्ज्ञहि पुरविण्याचें तह केले त्याचप्रमाणे नेपाळशीहि तह केला आहे. त्याचा परिणाम निश्चित ५–१० वर्षांत हाच होणार की, हें नेपाळी राष्ट्र इतर अद्ययावत् राष्ट्रांच्या तोडीला

येऊन बसेल. आजपर्यंत नेपाळ ही नुसती लढाऊ शिपायांची विलायत इतकाच प्रकार मानला जाई. तशी स्थिति यापुढे उरणार नाही. त्या संबंधांत पुष्कळ लिहिण्यासारखें आहे.

स्वतंत्र होणाऱ्या हिंदुस्थानने खरा शहाणपणा दाखवून नेपाळशी अत्यंत दृढ स्नेहाचें कायमचें बंधन निर्माण केलें पाहिजे. पूर्वी सर्व हिंदुस्थानांत इंग्रज प्रबळ झाले हें पाहून इंग्रजांशी कधींहि वैरभाव ठेवावयाचा नाही तर उलट त्यांना सतत सक्रिय मदत करावयाची असें आपल्या राजनीतीचें कायमचें कलम नेपाळने ठरवून टाकलें होतें. पुढील काळांत हिंदुस्थान इंग्रजांसारखाच कर्तबगार, शहाणा व बलिष्ठ राहिला तर नेपाळ सरकारहि तेंच धोरण हिंदुस्थानशी ठेवील. परंतु जर का हिंदुस्थानांत त्याला बेकी, बजबजपुरी आढळली तर नेपाळ हटकून हिंदुस्थानवर स्वारी करील हें निश्चित समजावें. तें स्वतंत्र, जिवंत, विजिगीषु राष्ट्र असून त्याने ऐतिहासिक काळी चीन, तिबेट व हिंदुस्थानवरहि स्वाऱ्या केलेल्या आहेत व गेल्या १०० वर्षांत गुरखा शिपायांनी जगाचा इतिहास बनविणाऱ्या सर्व जिवंत लढायांत भाग घेऊन लष्करी तंत्राचाहि परिचय करून घेतलेला आहे. अशा राष्ट्राला पाय पसरण्यास मोठीच अडचण भासत आहे. त्याला समुद्रकिनाऱ्याचें बंदर नाही व त्याच्या सरहद्दीभोंवतीं हिंदुस्थानचा मुलूख पसरलेला असल्यामुळे कोठलाहि माल आणण्यास स्वतंत्र मोकळी वाट नाही. फार काय इंग्रजांशी नेपाळने जे तह केले त्यांतील प्रमुख कलम हें आहे की, नेपाळ सरकारला दारूगोळा–युद्धसामुग्री हिंदुस्थान सरकारच्या मुलखांतून वाटेल तेवढी अनिर्बंधपणे नेण्यास सवलत असली पाहिजे. इंग्रज सरकार व नेपाळ सरकार यांची घनिष्ट मैत्री टिकल्यामुळे वरील करारांत बाधा निर्माण झाला नाही. परंतु एकंदरींत नेपाळचें नाकच या रीतीने परक्यांच्या हातीं जातें आणि म्हणूनच स्वतःचें समुद्रकिनाऱ्यावरचें बंदर नेपाळला हवें असणार. अफगाणिस्तानाची स्थिति नेपाळसारखीच असल्यामुळे त्याला कराची बंदरापर्यंत पाय पसरण्याची असोशी आहे. आज अफगाणिस्तान अमेरिकेचें स्नेही राष्ट्र झाल्यामुळें अमेरिका त्याची सोय पाहूं इच्छिणारच. पाकिस्तान होऊन सिंध–बलुचिस्तान पाकि-

स्तानांत गेलें तर अफगाणिस्तानचा मार्ग सुलभ होईल. उद्यां हिंदुस्थान स्वतंत्र झाल्यावर नेपाळची ही मागणी नक्की पुढे येईल व ती पुरी न झाल्यास नेपाळ बंगाल प्रांतापर्यंत स्वारी करून एखादें बंदर मिळवील.

हिंदुस्थानांत पाकिस्तान निर्माण झाल्यास तें नेपाळ राष्ट्रालाही धोक्याचें आहे. कारण बलुचिस्तान, सिंध, पंजाब, संयुक्त प्रांत, बंगाल, आसाम येथपर्यंत पूर्व–पश्चिम असा मुसलमानी प्रांतांचा तट पसरणार व मग अखिल हिंदु हिंदुस्थानापासून नेपाळ अगदीं अलग पडणार व मग तें चिमुकलें राष्ट्र खाऊन टाकण्यास मुसलमान कदापिहि सोडणार नाहीत. आज काश्मीरचा राजा हिंदु असला तरी तेथील बहुसंख्य प्रजा मुसलमानच आहे. तेव्हा पाकिस्तान अवतरतांच काश्मीर दाबण्याचा मुसलमान प्रयत्न करतील हें सूर्यप्रकाशाइतकेंच स्वच्छ आहे. संयुक्त प्रांतांवर मुसलमानांचें आक्रमण सुरू होण्याची भीति बोलली जात आहे. किंबहुना 'बंगाल फोडून मागतां होय? तर संयुक्त प्रांतांतील मुसलमानांसही तो प्रांत तोडून पाहिजे, अशा उघड धमक्या दिल्या जात आहेत. बंगाल तर मुसलमानमय करण्याचें कंकणच मुसलमानांनी बांधल्यामुळे बंगालची फाळणी मागण्याचा हट्ट हिंदूंना धरावा लागत आहे. बंगाललगतचा आसाम हिंदुबहुसंख्येचा असें असतां त्याच्या कांहीं भागावर आपला हक्क मुसलमान सांगत असून प्रत्यक्ष त्याचा कबजाही त्यांनी घेण्यास सुरवात केलेली आहे. अशा स्थितींत नेपाळलाही पुढे स्वतःवर कोसळणारें अरिष्ट स्वच्छ दिसतच असलें पाहिजे आणि म्हणूनच नेपाळने परवां आसामांत बळजबरीने घुसलेल्या मुसलमानांना सक्तीने काढून लावण्याला संमति दर्शविली आहे. बंगालला नेपाळचा सध्यां किती आधार वाटतो व त्याला नेपाळकडून किती सहाय्य होत आहे याचा ताजा उत्कृष्ट पुरावा म्हणजे आतां शुद्धीवर आलेल्या बंगाल प्रांतिक कॉं. कमिटीच्या लोकांनीच गुरख्यांच्या सहाय्याबद्दल एका जाहीर पत्रकाद्वारें आभार मानले आहेत! बंगाल्यांतील हिंदूंच्या मूलभूत हक्कावर जो समूळ घाला पडणार त्या वेळी नेपाळी लोकच बंगाली हिंदूंचे त्राते होणार आहेत, हें ओळखून सोशालिस्टांनी 'नेपाळांत निष्कारण संपांची धावणी करून नेपाळ सरकारचें मत कलुषित करण्याचें पातक करूं नका' असे आग्रहानें त्यांनी विनविलें आहे.

अशा एकंदर परिस्थितींत इंग्रज जातांच स्वसंरक्षणाच्या नांवाखालीं नेपाळने एकदम खालीं उतरून बंगाल, बहार स्वतःच्या कबजांत घेण्याचा प्रयत्न केला तर त्यांत अनपेक्षित किंवा अस्वाभाविक असें खरोखरीच कांहीं वाटण्याचें कारण नाहीं. किंबहुना रशियाने तसें परवा १२ मे रोजीं मास्को रेडिओवरून जाहीरपणे उच्चारूनहि दाखविलें आहे. रशियन प्रवक्ता म्हणतो, 'सबंध गंगेच्या खोऱ्यावर नेपाळमधून वर्चस्व प्रस्थापित करतां येईल. अमेरिकेने इंग्लंडला बाजूस सारून नेपाळशीं नवीन स्नेहाचे संबंध जोडले यांत अमेरिकेचा कावा असून तिलाच संपूर्ण हिंदुस्थानवर वर्चस्व बसवावयाचें आहे. अमेरिकन परराष्ट्र-मंत्र्यांनी ३० एप्रिलच्या भाषणांतही असे उद्गार काढले होते कीं, " नेपाळबरोबर अमेरिकेने जोडलेल्या राजनैतिक संबंधांचें स्वरूप अखिल भारतीय भूमिकेला धरूनच आहे " ते सूचक होय. रशिया तर्क करतो त्याप्रमाणे वस्तुस्थिति असेलहि. अमेरिकेच्या पाठिंब्याच्या आधारावर नेपाळने बंगाल-बहारवर स्वारी केली तर हिंदूंना मात्र ती इष्टापत्तिच वाटली पाहिजे. कारण धर्म, संस्कृति, रक्तसंबंध सगळ्याच दृष्टीने नेपाळ हिंदूंशीं एकजीव नाहीं काय? हिंदुधर्माचें कडक पालन नेपाळांत जितक्या कडक रीतीने होतें तितकें इतरत्र हिंदुस्थानांतही होत नसेल. परवां परवांपर्यंत गोहत्येस नेपाळांत देहांताची शिक्षा दिली जात होती. नेपाळांत हिंदु धर्मशास्त्रप्रमाणेच अंमल चालतो. हिंदुमात्राला वद्य असलेले चारी धामांपैकीं प्रसिद्ध असें पशुपताचें क्षेत्र नेपाळांतच असून पशुपतिनाथ ही तर नेपाळ सरकारची कुलदेवता आहे. नेपाळी गुरखे हे अस्सल रजपूतवंशीय असून त्यांच्या मुधोळकर, घोरपडे, ग्वाल्हेरकर शिंदे यांशीं सोयरिका झाल्या आहेत. व प्रत्यक्ष सातारकर छत्रपतींशींही सोयरिकीबद्दल बोलणीं झालीं होतीं. नेपाळच्या पशुपतिमंदिराला अस्सल दक्षिणी ब्राह्मणच पुजारी लागतो, ही आणखी एक विशेष गोष्ट लक्षांत ठेवावी. मग नेपाळने बंगाल-बहारवर आक्रमण केलेंच तर त्यांत सद्यस्थितींत खेद करण्यासारखें तरी काय आहे? आज नेहरूंचें सरकार नेपाळ सरकारकडे हिंदुस्थान सरकारच्या सैन्यांत गुरखा सैनिकांची भरती करण्याचा करार करण्यास धडपडत आहेच.

तेव्हा नजिकच्या भविष्य काळांत नेपाळला कसें महत्त्व येणार याचें हें असे चित्र दिसतें आणि तें पाहिलें म्हणजे स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या अचूक दूरदृष्टीचे व चिवट प्रचाराचें सादर कौतुक वाटतें यांत शंका नाही. १९१४ सालीं अंदमान बेटाबावत सावरकरांनी जें भविष्य वर्तविलें तें तंतोतंत खरें ठरलें व अंदमानचें लष्करी महत्त्व आता प्रतिनिविष्ट काँग्रेसवाल्यांनाही पटलें आहे. तीच स्थिति नेपाळबाबतही अवतरत आहे. हिंदूंचें एकटें एक स्वतंत्र राष्ट्र म्हणून सावरकरांनी अभिमानाने त्याचा गौरव चालविला व नेपाळचें राजकीय महत्त्व लोकांच्या मनावर बिंबविण्याची एकही संधि त्यांनी कधीं गमावली नाही. पण तो काळच असा होता की, गांधीप्रणीत लोकविलक्षण ध्येयाने व राजकारणाने लोकांची सारासारविवेक बुद्धिच ग्रस्त झाली. सावरकरांनी नेपाळनरेश म्हणून नेपाळ-राजाचा सादर उल्लेख केला की मठ्ठड व मस्तवाल काँग्रेसजनांनी दांत विचकून ' गोपाळ गुरेश ' म्हणोन त्याचें विडंबन करावें किंवा स्वतंत्र हिंदु राज्य म्हणून नेपाळचा निर्देश केला की कुठलें गल्ली-कुच्चींतलें नेपाळ? म्हणोन त्यांनी उपहास करावा. परंतु आतां काळच त्या निर्बुद्ध काँग्रेसचा सव्याज सूड घेत नाही काय?

वाङ्मयशोभा जून १९४७

☆

— ३३ —

# चर्चिल यांची ' युरोपियन फेडरेशनची ' चळवळ

दुसरें महायुद्ध सुरू असतांनाच युरोपांतील कांही मुत्सद्दी आणि लेखक पश्चिम युरोपांतील राष्ट्रांचा गट स्थापून किंवा त्यांचें एक फेडरेशन बनवून त्यांच्यांत एकी व एकसूत्रता निर्माण करण्याची भाषा बोलूं लागले होते. महायुद्धाच्या समाप्तीनंतर चर्चिल यांनी ती कल्पना पुन्हा उचलून धरली आहे व ते तिचा नेटाने पुरस्कार व प्रचार करीत आहेत. फ्रेंचांचें पुढारी ब्लम् यांनाहि ती कल्पना मानवली असून त्यांचा तिला पाठिंबा आहे. मात्र पश्चिम युरोपांतील राष्ट्रसंघ अशा नांवाने प्रचार झाल्यास रशियादि राष्ट्रें आताच बिचकून बिथरतील, म्हणून त्या योजनेला ' पश्चिम युरोपांतील राष्ट्रकुटुंबांचें संमेलन ' असें पायघोळ सोज्वळ नांव द्यावें असा पर्याय त्यांनी सुचविला आहे इतकेंच. या कल्पनेची सध्या इतकी प्रगति झालेली आहे की, गेल्या जानेवारींत लंडनमध्ये एक संयुक्त युरोप कमिटीहि चर्चिल यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झाली असून तींत लॉर्ड एमरी, लॉर्ड व्हान्सटार्ट, या सारखे इरसाल कॉन्झरव्हेटिव्ह पुढारी, रेव्हरंड एलिस, नॉटिंगहॅमचे बिशप वगैरे धर्माधिकारी, लॉर्ड लेटनसारखे लिबरल पक्षीय व कांही मजूर पक्षीय लोक यांचाहि समावेश झालेला आहे. चर्चिलसारख्या कट्ट्या साम्राज्यवादी मुरब्बी मुत्सद्याने टाकलेल्या या संयुक्त युरोपाच्या डावांत खोटे शकुनी फासे असलेच पाहिजेत; वरकरणी परोपकाराचा देखावा, परंतु आत स्वार्थी हेतू असलाच पाहिजे, असा संशय साहजिकच येतो

व तो संशय येणें अस्वाभाविकहि कसें नाही याचाच थोडा प्रपंच पुढे केला आहे.

## कल्पना जुनीच

युरोपियन राष्ट्रांचें एक सं. फेडरेशन किंवा राष्ट्र बनविण्याची कल्पना चर्चिल यांची नवी नाही. या कल्पनेचा पुरस्कार व कांहीसा प्रचारहि गेल्या दोन अडीशे वर्षांत प्रसंगानुसार झालेला आढळतो. त्याची कर्मकथा शिळ्या इतिहासांतील कंटाळवाणी म्हणून सोडून देऊं. फक्त गेल्या पंचवीस तीस वर्षांपासूनचाच ताजा गतेइतिहास पाहिला तरी पुरे. त्यावरून पहिल्या महायुद्धकाळापासूनच या संयुक्त युरोपाच्या कल्पनेने मुत्सद्यांच्या मनांत घर केलें होतें यांत शंका वाटत नाही. १९२२ सालीं काऊंट काऊडेन होव्ह या ऑस्ट्रियन मुत्सद्याने ' पॅन युरोप 'च्या कल्पनेचा बराच प्रचार केला होता परंतु या प्रश्नावरील बोलणीं व चर्चा मुत्सद्या मुत्सद्यांत खासगी रीतीने किंवा वर्तमापत्रांतून होती; अधिकृत सरकारी किंवा दरबारी बोलण्याचें स्वरूप त्याला कधींच लाभलें नाही. शिवाय बऱ्याच राष्ट्रांतील मुत्सद्यांना ती कल्पना तितकीशी पटली नव्हती, म्हणून अखेर ती तशीच बारगळली. काऊंट काऊडेन होव्ह याच्या या कल्पनेच्या प्रचारार्थ केलेल्या भाषणांत व लिखाणांत रशियाविरुद्ध इतर युरोपचें संघटन करण्याचाच आदेश ध्वनित होता, ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे.

काऊंट काऊडेन होव्हची कल्पना १९२२ सालीं जागच्या जागीं जिरली, परंतु त्यानंतर सात वर्षांनी ती पुनः लीग ऑफ नेशन्समध्ये अंकुरित झाली. नऊ सप्टेंबर १९२९ च्या लीग ऑफ नेशन्सच्या १० व्या अधिवेशनांत फ्रान्सतर्फे ब्रिआंड यांनी युरोपियन फेडरेशनची कल्पना काढली व पुढे १९३१ च्या मे महिन्यांत त्याबद्दलचा मेमोरॅंडमहि २७ राष्ट्रांकडे पाठविण्यांत आला होता. फ्रान्सचें म्हणणें असें होतें की, " युरोपचे शतशः तुकडे पडून तो विभागला आहे व निर्बल झाला आहे. करता प्रथम निरनिराळ्या राष्ट्रांनी एकजूट केली पाहिजे व त्यासाठी सर्वसामान्य धोरण दाखविणारा असा स्नेहाचा तह आपापसांत केला पाहिजे

व युरोपच्या एकीकरणाचें ध्येय उचलून धरिलें पाहिजे. या कामासाठी एक कायमची युरोपियन पोलिटिकल समिति व एक युरोपियन कॉन्फरन्स स्थापावी व प्रत्यक्ष कामास सुरवात करावी.''

## पोटांतील स्वार्थ

फ्रान्सने या कामीं असा पुढाकार घेण्यांत त्याचा आंतून पुष्कळसा स्वार्थीच हेतु होता. राजकीय प्रभावरोबरच आर्थिक प्रश्नांच्याहि गांठी उलगडून घ्याव्या असाहि फ्रान्सचा डाव. त्याच्या योजनेप्रमाणे जे युरोपियन फेडरल युनियन स्थापलें जावयाचें होतें, ते लीग ऑफ नेशनच्या कक्षेबाहेर असावें आणि स्वतः दिलेल्या आदेशांचा अंमल करण्याइतके अधिकार त्याला असावेत असें फ्रान्सचें म्हणणें होतें. पण हा सर्व खटाटोप फ्रान्सला कशासाठी हवा होता तर पश्चिम युरोपवर आपलें राजकीय व आर्थिक वर्चस्व स्थापण्यासाठीच आणि तें अबाधित रहावें यासाठी. एकीकडे रशिया अडवून धरावयाचा व दुसरीकडे युरोपांतील राजकारणांत किंवा अर्थकारणांत अमेरिकेचा पगडा बसत चालला होता त्याला प्रतिरोध करावयाचा.

फ्रान्सच्या या योजनेला फिनलंड, इस्टोनिया, लटव्हिया, लिथुआनिया पोलंड, रुमानिया, बल्गेरिया, युगोस्लाव्हिया, झेकोस्लाव्हाकिया इतक्या राष्ट्रांनी समती दिली, म्हणजे इतक्या राष्ट्रांनी फ्रान्सचें नेतृत्व कबूल केलें व रशियाविरुद्ध एकी करण्यास तीं तयार झाली. फ्रान्सची योजना तडीस गेली तर युरोपांतील आपलें पुढारीपण डळमळणार ही इंग्लंडला भीति पडली, म्हणून त्यावेळच्या मजुर सरकारने फ्रान्सला नकार दिला व मोठ्या संभावितपणे "अशा तऱ्हेचे स्वतंत्र 'युरोपियन' युनियन स्थापण्याने युरोपांतील राष्ट्रांत एकी होण्याऐवजी बेकीच वाढण्याची भीति आहे व तसें तर होण्यास आम्हांस नको आहे; म्हणून १६ जुलै १९३० रोजीं इंग्लंडने त्याप्रमाणे कळवून टाकलें.

जर्मनीला या योजनेबद्दल विशेष उत्सुकता नव्हतीच, इटालीचा उघड विरोध होता व तो त्यानें केलाहि. शिवाय दुसऱ्याहि बऱ्याच राष्ट्रांना अशी उघड शंका भेडसावूं लागली की, जर का आपण एकदा या

फ्रेंच योजनेंत गुंतलों म्हणजे सुईमागून दोरा या न्यायाने आपल्या राष्ट्रांचे गळे फ्रान्सच्या आर्थिक पाशात आवळले जाणार; सारांश युरोपांतील प्रमुख सरकारे फ्रेंच योजनेला आडवी गेलीं. खेरीज युरोपांतील जनतेनेहि या योजनांविरुद्ध मोठा गिल्ला आरंभिला. त्यांनी असा प्रचार सुरू केला की, फ्रान्सची योजना म्हणजे रशिया व अमेरिका या दोघांविरुद्ध केलेली गटबाजी असून त्यामुळे दुसऱ्या महायुद्धाचें संकट पुनः युरोपवर नाहक कोसळेल अखेर अपेक्षेप्रमाणे फ्रान्सची ही योजना थबकली, रेंगाळली व लवकरच स्मृतिशेष झाली. राजनीति कशी कुटील असते याचें एक मौजेचें प्रत्यंतर या प्रकारणीं नमूद आहे. त्याचा मात्र निर्देश करण्यासारखा आहे.

## रशियाचें खवचट उत्तर

फ्रान्सच्या योजनेंतील युरोपियन फेडरेनचा हेतुच रशियाविरोधी असतांना रशियालाहि फ्रान्सने संभावितासारखें वाटाघाटी करण्यास निमंत्रण पाठविलें होतें ! पण रशियाला ही दरबारी पद्धत माहिती नव्हती असें थोडेंच. त्याने आमंत्रण स्वीकारलें. परंतु त्याबरोबर असें खवचट व मर्मभेदक पत्र पाठविलें की, विचारतां सोय नाही. त्याने लिहिलें, "अहो, तुमच्या या 'युरोपियन फेडरल युनियन'वर लीग ऑफ नेशन्सच्या सभासदांपैकीच लोक निवडण्याची तुमची अट आहे ! शिवाय युरोपांत यादवी का माजते याबद्दल तुमच्याप्रमाणेंच आमच्यांहि कांही ठाम समजुती आहेतच. तुम्ही नांव घेणार 'पॅन युरोपियन समिति' असें, परंतु तेथे आपल्या बगलबच्च्या राष्ट्रांचें मंडळ स्थापून विरुद्धगटांतील राष्ट्रांना सभासद करून घेण्या न घेण्याचा अधिकार बजावणार. तुमच्या बगलबच्चांची लायकी आणि प्रतिष्ठा तरी केवढी ? स्वित्झर्लंड केवढें प्रचंड राष्ट्र आहे ? त्यांचें क्षेत्रफळ युरोपच्या क्षेत्रफळाच्या शेंकडा ·४ दुसरा नॉर्वे त्याचेंहि क्षेत्रफळ युरोपच्या तुलनेंत शेंकडा ३·१ येवढें अगडबंब भरतें आणि असल्या दीडवितीच्या राष्ट्रानी म्हणे रशियाला दाखल करून घ्यावयाचें की नाही याची चर्चा करावयाची ! नुसत्या युरोपातीलच रशियाचा विस्तार बघितला तर युरोपच्या क्षेत्रफळाच्या

शेंकडा४५ टक्के इतका भरतो; म्हणजे फ्रान्स, बेल्जम, रुमानिया, युगोस्लाव्हिया, स्वित्झर्लंड, स्पेन, हॉलंड, स्वीडन, डेन्मार्क आणि नॉर्वे या सगळ्या राष्ट्रांच्या क्षेत्रफळाची बेरीज करून पुनः त्याची दुप्पट करावी तेव्हा त्यांची रशियाशीं बरोबरी होईल. पाऊण एक युरोप ज्या रशियाने व्यापला त्याला तुमच्या योजनेंत कितपत स्थान आहे तें तुम्हीच पहा. "

फ्रान्सच्या योजनेनंतर हिटलर, त्यानंतर फ्रँको व त्यानंतर आता चर्चिल यांनी युरोपियन फेडरेशनची कल्पना पुनः पुनः दामटली त्याची माहिती पुढील लेखांकांत देऊं.

केसरी, ६–६–४७

★

— ३४ —

# ' पश्चिम युरोपियन राष्ट्रांचें फेडरेशन '

## उत्तरार्ध

गेल्या लेखांकांत फ्रान्सने पुढाकार घेऊन तयार केलेल्या ' युरोपियन युनियनची ' वासलात कशी लागली तें सांगितलें. आता त्यानंतर जर्मनी व स्पेन यांनी पुनः त्याच योजनेचा कसा पुरस्कार केला होता, याचें दिग्दर्शन करूं.

## हिटलरचा हेतू

दुसऱ्या महायुद्धाच्या आधी हिटलरचा उदय झाल्यापासूनच त्याने युरोपाच्या एकीकरणाच्या प्रश्नाला तेजी आणली. हिटलरची योजनाहि फ्रान्सच्या धर्तीवरच होती आणि स्वराष्ट्राचा स्वार्थ हीच अर्थात त्याच्या पोटांतील खरी कळ होती. फ्रान्सला ज्याप्रमाणें पश्चिम युरोपियन गट स्थापून त्यांत स्वतःकडे सर्व वरिष्ठपणा मिळवावयाचा होता तसाच हिटलरलाहि हवा होता. सर्व युरोपियन राष्ट्रांचा पुढारी जर्मनी बनवावयाचा तर आधीं कांहीतरी पांच-दहा राष्ट्रें एकत्र करून त्यांची मोट आवळणें जरूर व तशी मोट आवळल्यानंतर त्यांच्या संरक्षणाची हमी घेणेंहि जरूर. ही जोखीम हिटलरने स्वीकारली. ब्रिटन हें वास्तविक युरोपांतील नव्हेच अमेरिका तर त्याहून परकी, परंतु त्या दोघांची आवाडाव युरोपियन राजकारणांत मनस्वी चाललेली; त्याचें जर्मनीला वैषम्य; उलटपक्षीं रशियाचाहि जर्मनीला विद्वेष. पश्चिम युरोपावर वर्चस्व बसविण्याची रशिया पिढ्यानपिढ्यापासून खटपट करून राहिलेला व त्याला पश्चिम

युरोपने नेहमी विरोध केलेला अर्थात इंग्लंड अमेरिकेचें पश्चिम युरोपला जेवढे वावडें तितकेंच रशियाचेंहि. म्हणून हिटलरने वरील दोघांविषयींहि पक्की द्वेषभावनाच मनांतून बाळगली, वंशविशुद्धत्वाचें स्तोम माजविलें व ' जर्मन भाषा बोलणाऱ्यांची राष्ट्रें ' याहि प्रचाराचा पाऊस पाडला. हिटलरचा हेतु प्रथम पूर्व सरहद्दीवरील शत्रु जो रशिया त्याला रेटून ती बाजू निर्वेध करावी असा होता. परंतु दुर्दैवाने रशिया आधी ब्रिटन अमेरिकेशींच लढण्याची त्याला पाळी आली. तो सारा इतिहास ताजाच आहे. महायुद्धांत हिटलरची महत्त्वाकांक्षा आणि हिटलरचें जर्मन राष्ट्र यांचा नायनाट झाला.

## फ्रँकोचें राजकारण

अशा रीतीने संयुक्त युरोपचें सूत्र पुनः एकदा जमिनीवर गळून पडल्यासारखें झालें तथापि तें जर्मनीच्या हातून गळतांच स्पेनने हातांत घेतलेंच. ज्या जर्मनी व इटलीच्या गळ्याशीं जनरल फ्रँकोने आपला गळा बांधला होता, त्या दोघांचाहि पराजय निश्चित होणार अशीं चिन्हें दिसूं लागतांच त्याने आपली मान आसडून सोडवून घेतली व इंग्लंडशींच मैत्री जोडून त्याच्यामार्फत तरी रशियाविरुद्ध पश्चिम युरोपांतील राष्ट्रांचा एकादा गट किंवा संघ उभा करतां येतो की नाही याचा अदमास घेण्यास सुरवात केली. चर्चिल हेच त्या वेळचे इंग्लंडचे मुख्य प्रधान होते व रशियाविषयीं त्यांच्या मनांत हिटलर इतकीच द्वेषभावना; परंतु तो काळच असा होता की, त्यांना जाहीरपणें फ्रँकोच्या कल्पनेला संमति किंवा पुष्टिबळ देतां येऊं नये. इंग्लंडांत त्या वेळीं संयुक्त कारभारी मंडळ चालू असून त्यांत मजुरपक्षहि प्रामुख्याने सहभागी होता व त्या पक्षाची फ्रँको योजनेला मनाने संमतीहि होती. फार काय हॅरॉल्ड लास्कीसारख्यांनीहि वैयक्तिकरीत्या आपलें मत जाहीर केलें होतें की, ब्रिटन, फ्रान्स, बेल्जम, हॉलंड, नॉर्वे व डेन्मार्क या तरी राष्ट्रांची आर्थिक दृष्ट्याच काय परंतु इतर सर्वच क्षेत्रांत पक्की एकजूट असावी, अशी आमची दृढ भावना आहे. तथापि मजूरपक्षालाहि अधिकृतपणें त्या योजनेला उचलून धरणें शक्य झालें नाही.

## चर्चिलचा डाव

यानंतर महायुद्ध संपलें व चर्चिलपक्षाचा पराभव होऊन ते कार्य-निवृत्त झाले. अर्थात् स्वतःच्या आवडत्या मताचा बिनदिक्कत वाटेल तसा प्रचार करण्यास ते मोकळे झाले. १९४६ च्या मार्चांत फुल्टन येथील भाषणांत त्यांनी रशियावर उघड निकराचा हल्ला चढविला व रशियाविरुद्ध गट स्थापण्याची अत्यंतिक जरूरी व्यंजित केली. परंतु त्या-वेळीं रशियाकडून प्रत्युत्तराची इतकी जोरांत चपराक बसली की, चर्चिल यांना सारवासारव करणें भाग पडलें व आपल्या भाषणाचा लोकांनी भलताच अर्थ घेतला अशी त्यांना संपादणी करावी लागली. त्या भाषणांतून " इंग्लंड व अमेरिका ही एकाच रक्ताचीं एका भाषेचीं आहेत किंबहुना पिढ्यानपिढ्यांपासून ती एका कुटुंबांतीलच आहेत. काय वाटेल तें झालें तरी इंग्लंड अमेरिकेची एकी अभेद्य टिकली पाहिजे, नव्हे तशी भवितव्यताहि आहे व हाच माझा वार्धक्यांतील अखेरचा संदेश आहे " असें चर्चिल यांनी म्हटलें होतें. त्याला स्टॅलिनने लगेच प्रत्युत्तर दिलें की, " चर्चिल यांना ब्रिटन व अमेरिकेंतीलहि बऱ्याच धेंडांचा पाठिंबा उघड दिसतो. हिटलर आणि त्याची प्रभावळ तशीच चर्चिल आणि त्याची ही प्रभावळ. यांत फरक नाही. वंशविशुद्धत्वाचें स्तोम माजवून हिटलरने युद्धाची खाई पेटविली व जर्मन भाषा बोल-णाऱ्यांचें राष्ट्र अशी घोषणा त्यानें चालविली होती. आता इंग्लिश भाषा बोलणाऱ्यांचें राष्ट्र ही चर्चिलची घोषणाहि तशीच असून इंग्लिश बोलणाऱ्या राष्ट्रांनी इतर राष्ट्रांवर वर्चस्व गाजवावें हीच आसुरी आकांक्षा यांत दिसते. "

## संयुक्त युरोपची घोषणा

तथापि पुनः सहा महिने झाले नाहीत तोंच पुनः सप्टेंबरांत झुरिच विद्यापीठांत चर्चिल यांनी जाहीर भाषण केलें. त्यांत युरोपचें तारण करण्यास संयुक्त युरोपची संघटना उभारणें एवढाच एकमेव उपाय आहे असें त्यांनी बजावलें.

चर्चिल यांनी, या कामीं फ्रान्स व जर्मनी या दोघांनीं पुढाकार घ्यावा असें सांगितलें. मात्र जर्मनी म्हणजे रशियाने व्यापलेल्या मुलखा-खेरीज ब्रिटिश, अमेरिकन व फ्रेंच सैन्याने जो जर्मनीचा मुलूख व्यापला आहे तो ! पश्चिम युरोपियन राष्ट्रांच्या या एकीकरणाच्या ' परोपकारी ' कृत्यांत ब्रिटन काय भाग उचलणार याची चर्चिल यांनी कांहीच वाच्यता करूं नये हें त्यांच्या मुत्सद्दीपणास शोभेसेंच आहे. परंतु या गटस्थापनेंत अखेर इंग्लंडला पुनः युरोपांतील राजकारणांत कसेंहि करून वरचढ बनविण्याचाच त्यांचा अंतस्थ हेतु आहे व ' तटस्थः स्वानर्थान् घट-यतिच मौनं च भजते ' हा त्यांचा कावा आहे.

चर्चिल यांनी युरोपच्या संयुक्तराष्ट्रकुटुंबांत कोणकोण राष्ट्रें घ्याव-याचीं याचा अद्याप उच्चार टाळला आहे; तथापि त्यांच्या अनुयायांनी जो प्रचार चालविला आहे, त्यावरून या कुटुंबांत किंवा संघांत फ्रान्स, इटली, ऑस्ट्रिया, जर्मनी, स्पेन, पोर्तुगाल, डेन्मार्क, हॉलंड, स्वित्झर्लंड व स्कँडिनेव्हियन राष्ट्रें यांचाच समावेश होणार. म्हणजे रशिया व त्यांचे शेजारी किंवा त्यांच्या छापेखाली गेलेले फिनलंड, पोलंड, रुमेनिया, हंगेरी, रशियनव्याप्त जर्मनी, बल्गेरिया, युगोस्लाव्हिया व झेकोस्लाव्हा-किया यांना खड्यासारखें वगळण्यांत येणार आहे.

## निम्म्या युरोपचा गट

युरोपांत रशियन राष्ट्राचा जो प्रदेश आहे त्यांत त्याची आठ सोव्हिएट रिपब्लिक्स आहेत. व त्यांची लोकसंख्या १३ कोटि आहे. खेरीज फिनलंड, पोलंड वगैरे जीं त्याचीं स्नेही राष्ट्रें वर सांगितलीं त्यांची लोकसंख्या जवळपास ९ कोटी आहे. म्हणजे एकूण २२ कोटि लोकसंख्या झाली. अर्थात् यावरून चर्चिल यांचा डाव निम्मा युरोप उभा फोडून दुसऱ्या रशियाप्रमुख अशा निम्म्या युरोपशीं झुंझविण्याचाच दिसतो. आज चर्चिल या पश्चिम गटाचे पुढारीपण मोठा उदारपणाचा आव आणून जर्मनी फ्रान्सकडे ढकलीत असलें तरी अखेर तें पुढारीपण ब्रिटनच्याच गळ्यांत बेमालूम येऊन पडणार, अशीच त्यांची निष्ठा आहे. जर्मनींतील जर्मन नॅशनल डेमोक्रॅटिक पक्षाचा पुढारी तर आता-

पासूनच म्हणत आहे की, ‘ पश्चिम युरोपियन राष्ट्रांच्या संघटनेस आमचा जर्मनी अनुकूल असून या कामीं चर्चिल यांनीच पुढाईत व्हावें हीच आमची तीव्र इच्छा; कारण इतका वकूब दुसऱ्या कोणाच्याहि अंगीं नाही. ’ चर्चिल यांना संयुक्त युरोपच्या संघामार्फत राजकीय आर्थिक व लष्करीदृष्ट्या एकात्मता साधावयाची आहे, कस्टमचे अडथळे उडवून टाकून ब्रिटिश व्यापारासाठीं दिल्लीदरवाजे पाडून द्यावयाचे आहेत, कॉन्झरव्हेटिव्ह प्रमुखांच्याच हातीं सत्ता द्यावयाची आहे व रशियाचा बंदोबस्त झाल्यानंतर अमेरिकेलाहि सपशेल उलथून पाडावयाचें आहे, असाच या संयुक्त युरोप संघटनेचा ज्ञाते लोक अर्थ करतात ! ते एकच मुद्याचा प्रश्न विचारतात की, ‘ युनो ’ने जर सार्वराष्ट्रीय भानगडी मिटविण्याचा मक्ता घेतला आहे तर हा ‘ युनायटेड युरोपचा ’ उपद्व्याप करण्याची चर्चिल यांना जरूरच काय ?

केसरी, १३–६–४७

★

— ३५ —

# पूर्व युरोपियन गट स्थापण्यासाठी रशियाची चढाई

## रशियाची प्रतिचढाई

मॉस्को परिषदेचा बोजवारा उडाल्यानंतर अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री मार्शल हे तणतणत स्वदेशास परत गेले व तेव्हापासून रशियाला गोंजारण्याचें धोरण अमेरिकेने स्पष्टपणें सोडून दिलें. येवढेंच नव्हे तर रशियाविरोधी जें जें कार्य उघडपणे करतां येण्यासारखें आहे तें करावयाचेंच अशी वृत्ति तिने धरली आणि त्यासाठी मध्यपूर्वेतील राष्ट्रांना अपरंपार लष्करी साहित्य देण्याचें बिलहि पास करून घेतलें. कांही कांही जबाबदार अमेरिकन अधिकारी तर असेंहि उघड बोलून दाखवूं लागले आहेत की, ' ठीक आहे, रशिया समजुतीवर येत नसेल तर आम्ही आमच्या ताब्यांतील जर्मनीशींच निराळा तह करू. ' चर्चिल यांनी दूरदर्शीपणाने पश्चिम युरोपांतील, राष्ट्रांचा रशियाविरोधी गट स्थापण्याच्या कल्पनेचीं बीजें पेरून ठेवलींच होतीं व त्याला पाणी घालून त्याचा वृक्ष करून तो अमेरिकाच वाढवील, संरक्षण करील असेंहि ते सांगत होते. आणि आता खरोखरच तशी स्थिति प्राप्त झाली आहे. कारण अमेरिकेनेच पुढाकार घेऊन पश्चिम युरोपांतील राष्ट्रांची रशियाविरोधी जूट खडी करण्यास सध्या सुरुवात केली आहे.

उलटपक्षी मॉस्को परिषदेंतील अमेरिकनांची पालटलेली नवली पाहून रशियानेहि उघडपणे आपला पूर्वगट आवळून बळकट करण्याचें ठरविलें

आहे; तसेच दार्दानेलिसचा प्रश्न, अझरबैझानचा प्रश्न, ट्रिएस्टचा प्रश्न वगैरे जुने वादविषय त्याने पुन्हा फुंकर घालून चेतविले आहेत. रशियाच्या ताब्यांतील युरोपच्या पूर्वेकडील गटांत निम्मा जर्मनी, त्यालगतचा पोलंड, त्याखालीं झेकोस्लाव्हाकिया, त्याखाली हंगेरी, व त्याखाली युगोस्लाव्हिया, रूमानिया इत्यादिकांचा समावेश होतो. म्हणजे या राष्ट्रांवर अद्याप रशियाचाच वरचष्मा बसूं शकेल. मॉस्को परिषदेनंतर रशिया आपलें बाल्कन फेडरेशन स्थापण्याच्या उद्योगास निकडीने लागला आहे.

त्याचीच नांदी म्हणजे सध्या हंगेरींत झालेली राज्यक्रांति होय. हंगेरीचें हें प्रकरण इतकें चिघळलें आहे की, रशियाला अल्टिमेटम् देण्याची भाषा अमेरिका करूं लागली आहे. तेव्हा हंगेरींतील स्थिति काय होती व रशियाने तेथे असा काय बिघाड केला की ज्याने अमेरिकेचें पित्त भडकलें, त्याची माहिती करून घेतली पाहिजे.

## दोस्तांची रशियावर मात

महायुद्ध समाप्तीनंतरच्या प्राथमिक काळांत हंगेरींतील जनमत अँग्लो-अमेरिकन पक्षपातीच होतें. १९४५ च्या नोव्हेंबरांत हंगेरियन पार्लमेंटच्या युद्धोत्तरकाळांतील पहिल्या निवडणुका झाल्या त्यावरूनहि तेंच स्पष्ट झालें; कारण त्या निवडणुकांत हंगेरींतील रशियन पक्षपाती कम्युनिस्ट व सोशॅलिस्ट उमेदवारांना फारच कमी मतें पडलीं. एकूण मतदानापैकी अवघीं शें. १७ टक्के मतें कम्युनिस्टांना व शें. १३ टक्के मतें सोशॅलिस्टांना पडलीं. अर्थात् त्यांना प्रधान-मंडळांत जागा फारशी मिळूं शकली नाहीं. बहुमतवाला पक्ष स्मॉल होल्डरांचा. तोच प्रचंड बहुमताने निवडून आलेला. तेव्हा प्रधान, उपप्रधान वगैरे प्रमुख दरक त्याच पक्षांतील लोकांना मिळाले व ४ फेब्रुवारी १९४६ रोजीं एम. नागी यांची रिपब्लिकचा पंतप्रधान म्हणून नेमणूक झाली. कम्युनिस्टविरोधी सरकार हंगेरींत आपणास स्थापन करतां आलें या आनंदांत अँग्लो-अमेरिकन्स मनांत गाजरें खाऊं लागले व हंगेरीला वाटेल तितकी मदत देऊन ऑस्ट्रिया व हंगेरी हे दोन्ही देश रशियाच्या छापेंतून संपूर्णपणे

सोडविण्याच्या अंतस्थ योजना त्यांनी आंखूनहि टाकल्या. परंतु रशियाचा हिसका त्यांना कळला नाही. अँग्लो–अमेरिकन्स पुतना मावशीप्रमाणे हंगेरीला आपल्या कुशींत आवळण्याचा प्रयत्न करीत होते, तसाच रशियानेंहि प्रयत्न चालविला होताच. या कामीं रशियाला अँग्लो–अमेरिकनापेक्षा एक गोष्ट जास्त अनुकूल होती. ती म्हणजे हंगेरींत रशियन सैन्य ठेवण्याचा हक्क. आणि याचाच फायदा त्याने घेतला. डाव्या अंगास ऑस्ट्रिया, त्याच्या पूर्वेस हंगेरी व त्याच्या पूर्वेस रशियाचा प्रदेश आहे. ऑस्ट्रियाचा पूर्वेकडील निम्मा भाग सध्या रशियन सैन्याच्या ताब्यांत आहे, व डावा अर्धा भाग अँग्लो अमेरिकनादि सैन्यांच्या ताब्यांत आहे. ऑस्ट्रियाचा तह दोस्त राष्ट्रांच्या बैठकींत उलगडेल तेव्हा तेथून हीं परकीं सैन्यें हलणार. तो तह अजून होतच नाही ! आणि ऑस्ट्रियांत रशियन सैन्य असावयाचें तर रशिया व ऑस्ट्रियामधील हंगेरींत रशियाचें सैन्य ठेवणें आवश्यकच व म्हणून पूर्वीच दोस्तांनी ऑस्ट्रियाचा तह होईपर्यंत रशियाला हंगेरींत सैन्य ठेवण्याचा हक्क बहाल केलेला आहे.

## रशियाचे डाव

कम्युनिस्टविरोधी हंगेरियन रिपब्लिक स्थापन तर झालें. त्याचा कारभारहि सुरू झाला. परंतु सुरवातीसच हंगेरीला रशियाचे पाय धरावे लागले. कारण हंगेरीला लागणाऱ्या अत्यावश्यक वस्तु रशियाशीं व्यापारी तह केल्याखेरीज प्राप्त होणें शक्य नव्हतें. त्या तहांत असें ठरलें की, रशियाने कच्चा माल हंगेरीच्या कारखान्यांत पाठवावा व तेथे त्याचा पक्का माल बनवून तो रशियांत परत पाठवावा. यामुळे थोड्या थोड्या तरी आवश्यक वस्तु हंगेरींतील लोकांना मिळणें शक्य झालें. हंगेरींतील जुने जर्मन मालकीचे कारखाने होते ते जेते म्हणून रशियाने सहज उचलून नेले असते व पॉटसडॅम कराराप्रमाणे हंगेरीपासून घ्यावयाची नुकसानभरपाई सर्व रशियालाच मिळावी असें ठरलेलें आहे. परंतु तसें न करतां हंगेरियन व रशियन अशा संयुक्त स्वामित्वाखाली व देखरेखीखाली ते चालविण्यास रशियाने हंगेरीकडून कबूल करवून घेतलें. म्हणजे प्रथम

अशा रीतीने रशियाने गुप्तपणे हंगेरीच्या पायांत फास तर टाकून ठेवला. हा प्रकार अमेरिकनादि दोस्तांना झोंबला. पण करतात काय ? तेव्हां त्यांनीहि आस्ते आस्ते कम्युनिस्टविरोधी रिपब्लिकमार्फत कारस्थानें खेळविण्यास सुरुवात केली. "तुम्ही आतां स्वतंत्र आहांत, मग हें परकी रशियन सैन्य आपल्या देशांत ढवळाढवळ करण्यास तुम्ही कसें राहूं देतां बरें ? तुम्हांस आज उघडपणे रशियाविरुद्ध कांहीं करतां येत नसेल तर गुप्त संघटना स्थापा ! रशियन सैन्यांवर हल्ले करा, त्यांना सतावून सोडा, रोमन कॅथॉलिक कलजीं लोकांना धर्मोपदेशाच्या नांवाखालीं रशियनविरोधी प्रचार करण्यास सांगा." असा नानातऱ्हेचा कानमंत्र देण्यास त्यांनीं सुरुवात केली. फार काय परदेशांतूनहि गुप्त मदत पाठवूं असें आश्वासन दिलें. यामुळे त्या नव्या हंगेरियन सरकारला उगाचच जोर चढला व त्याने मार्च महिन्यांत स्मॉल होल्डर पार्टीमधून पार्लमेंटच्या एकोणिस सभासदांना काढून टाकले ! या लोकांनी कम्युनिस्टांशीं बरोबा केला, तडजोड केली, असा त्यांच्यावर आरोप ठेवण्यांत आला ! तेव्हा त्या लोकांनीहि तोच मुहूर्त समजून ३१ मार्च रोजीं झालाडॲग म्हणजे स्वातंत्र्यवादी नांवाचा सरकारविरोधी पक्ष स्थापन केला आणि येथपासूनच रशियाने आपल्या सैन्याच्या जोरावर प्रत्यक्ष ढवळाढवळ करण्यास सुरुवात केली !

## आतां रशियाने मात केली !

३० मार्च रोजीं रशियन सैन्याने ब्यूडापेस्टमधील न्यूज एजन्सीची मुख्य कचेरी, ब्रॉडकास्टिंग सर्व्हिसेस व पोस्ट आणि तारखातें यांचा कबजा घेतला; व कडक नियंत्रण चालू करून हंगेरींतील आपली दडपशाही बाहेर फुटूं नये अशी तजवीज करून टाकली. याच सुमारास हंगेरियन मंत्रिमंडळांत बदल करण्यास भाग पाडून त्याने सॉलनिओसी या कट्ट्या कम्युनिस्टाला हंगेरीचें संरक्षणखातें देवऊन टाकलें ! नंतर लगेच पुढील महिन्यांत पंतप्रधान नागी याला मास्कोला बोलावून घेऊन सपाटून दम भरला. नागी हा मनांतून कम्युनिस्टविरोधी; परंतु त्याला उघडपणे रशियाविरुद्ध जाण्याची छाती होईना. येथून पुढील दोन-चार महिन्यांत

रशियाने आपलें कारस्थान पुरें शिजविलें व रशियन जनरल स्वारीडॉन्ह याने प्रधानमंडळास खलित्यावर खलिते पाठविण्यास सुरुवात केली की रोमन कॅथॉलिक वर्गाचें आधी निष्ठुर पारिपत्य करा. हेच लोक हंगेरींतील आमच्या रशियन सैन्यावर हल्ले करण्यास जनतेस चिथावीत असतात. तसेंच यांची कॅथॉलिक यूथ नांवाची तरुण संघटना आहे ती तावडतोब बंद करवा. विरोधी, विसंवादी लिहिणाऱ्या वर्तमानपत्रांना मुसक्या घाला; आणि तुमच्या हंगेरियन सरकारच्या साऱ्या अधिकारी वर्गातच फितुरी माजलेली दिसते, करिता ते लोक हुडकून काढून त्यांना शिक्षा ठोठावा. एवढें करूनच रशिया थांबला नाही तर पोलिसखातें व न्याय-खातें हीं दोन्ही त्याने कम्युनिस्टपक्षीय मंत्र्यांनाच देवविलीं !

दरम्यान चार पांच महिन्यांच्या अवधींत स्मॉल होल्डर पक्षाच्या पुढाऱ्यांनीं रशियाच्या हस्तक्षेपाला कंटाळून ॲंग्लो-अमेरिकनांच्या चिथावणीने रशियाविरोधी कट गुप्तपणे रचण्यास सुरुवात केली. त्याला हंगेरीच्या नजीकच ऑस्ट्रियांत ब्रिटिश सैन्य होतें त्याची अर्थात् मदत झाली. या कटांत स्मॉल होल्डर पक्षाचे अनेक सभासद होते. त्यांनी ऑस्ट्रियांतील ब्रिटिशव्यांत प्रदेशांत वरीच हंगेरियन वस्ती आहे तेथें लष्करी संघटनाहि उभारविली. या कटाचा पत्ता रशियाने लगोलग लावला व हंगेरियन सरकाराकडून अनेक बडे लष्करी अधिकारी, पार्ले-मेंटचे सभासद व प्रत्यक्ष मंत्रीहि पकडले. एकूण १३१ लोक पकडले. नंतर स्मॉल होल्डर पक्षाला दमदाटी करून त्यांच्या २५ डेप्युटीजना काढून टाकविलें. त्याचा निषेध म्हणून आणखी पांच सभासदांनी पार्लमेंटांतील आपल्या जागांचा राजिनामा दिला; पण रशियाला व हंगेरींतील कम्यु-निस्ट पक्षाला ती दुधांत साखरच झाली. कारण पार्ममेंटांतील स्मॉल होल्डर पक्षाचे हुकमी बहुमत त्यायोगे तीस मतांनी एकदम घटलें ! !

## हंगेरी कम्युनिस्ट झाला

यानंतर मात्र ॲंग्लो-अमेरिकन दोस्तांनी रशियाविरुद्ध उघड तक्रारी सुरू केल्या. रशिया हा हंगेरीच्या कारभारांत ढवळाढवळ करतो हें स्पष्ट झालें आहे करिता अलाइड कंट्रोल कमिशन नेमून त्रि-वर्गाकडे यांच्या

चौकशीचें काम सोपवावें अशी त्यांनी मागणी केली. पण रशियाने ती धुडकावून लावली. दरम्यान वेलाकोव्हॅक्स या स्मॉल होल्डर पक्षाच्या जनरल सेक्रटरीला रशियन सैन्यावर हल्ला करण्याकरितां क्रांतिकारक पथक निर्माण केल्याच्या आरोपावरून गिरफदार करण्यांत आले. त्यावर पुन: अमेरिकेने चौकशीची मागणी केली, पण रशियाने जाब दिला की, अहो तो हरामखोरच स्वत: गुन्हा कबूल करीत आहे तेव्हा चौकशीची जरूरच नाही मुळी ! यानंतर एप्रिलच्या सोळा तारखेस जनरल व्हीरस व आणखी दोघेजण यांना एकदम फांशीच्याच शिक्षा सांगण्यांत आल्या. अशा रीतीने रशियाने हंगेरीवर आपलें वर्चस्व बसवून टाकलें व प्रधानपंत नागी यालाहि राष्ट्रद्रोहाचा आरोप घालून पकडून मारण्याचा डाव टाकला; पण वेळींच सावध होऊन नागी परदेशांत पळून गेल्यामुळेच केवळ तो फसला.

आता रशियाने हंगेरींत आपल्या मनासारखें कम्युनिस्ट मंत्र्यांचें सरकार स्थापलें आहे. या एकंदर प्रकारामुळे अँग्लो-अमेरिकनांत मोठा क्षोभ झालेला असून कदाचित् यांतूनच रूसो अमेरिकनांचा उघड सामना होतो की काय अशी भीति लोकांस पडली आहे. पण अमेरिकेनेच निर्माण केलेला कोलदांडा रशिया अमेरिकेला घालील. कारण, युनोंत ही तक्रार अमेरिकेला आधी मांडावी लागणार. तें कालावधीचेंच काम; शिवाय तेथे रशिया नमणार नाही हें दिसतच आहे. ‘ रशिया यूनो सोडून गेला तरी चालेल, त्याला अमेरिकेने शिक्षा करावीच करावी ’ असें सेनेटर जेम्स ईस्टलंडसारखे लोक उघड प्रतिपादूं लागले आहेत. रशिया यूनो सोडून गेला तर कदाचित् प्रत्यक्ष युद्धावर बेतेल एरवी नाही.

केसरी, २४-६-४७

★

— ३६ —

# पॅलेस्टाइनमधील ज्यू क्रांतिकारकांचे अत्याचार

ज्यू क्रांतिकारकांनी अद्यापही अविरतपणे जे अत्याचार सुरू ठेवले आहेत ते पाहून मन खरोखरीच चकित झाल्याशिवाय राहत नाही. ज्यू देशभक्तांची पॅलेस्टाइनविषयींची एकांत भक्ति अधिक, त्यांचें संघटन-कौशल्य अधिक की त्यांची चिकाटी अधिक, असाच प्रश्न त्यांनी चालविलेल्या पराक्रमांकडे पाहून पडतो. पॅलेस्टाईनमध्यें आज संपूर्ण लष्करी कायदा जारी आहे ! व तेथील प्रत्येक ज्यूचें घर म्हणजे शब्दशः तुरुंगाची एकेक कोठडीच बनविण्यांत आली आहे. प्रत्यक्ष युद्धच सुरू झालें आहे असें धरून ब्रिटिशांनी पॅलेस्टाइनमध्यें असलेले सर्व बिगर-लष्करी प्रजाजन ( पुरुष, स्त्रिया व मुलें ) सक्तीने काढून ब्रिटनमध्यें परत लावून दिले आहेत ! म्हणजे आतां पॅलेस्टाइनमध्यें जो जो ब्रिटिश मनुष्य आहे तो तो प्रत्येक सशस्त्र सैनिक शिपाईच आहे. सुमारें १ लक्ष ब्रिटिश सैन्य आज पॅलेस्टाइनमध्यें असून त्याच्या भोंवतालचा दर्याकिनाराही ब्रिटिश आरमाराने व्यापला आहे. खेरीज वैमानिक काफिले व पॅराट्रुपपथकें ब्रिटिशांच्या मदतीस सज्ज आहेत. असें असतांही रोज एकेक नवा प्राणघातक अत्याचार किंवा चमत्कार ज्यू क्रांतिकारक करून दाखवितात व ब्रिटिशांचे बळी घेऊं शकतात हें पाहून अचंबाच न वाटावा तर काय ? चालू सालांतील पांच महिन्यांच्या कालखंडा-वर ओझरती नजर फिरविली तरी सुद्धां ज्यू क्रांतिकारकांचे अत्याचार रक्तबीज राक्षसांच्या रक्ताच्या प्रत्येक थेंबागणिक नव्या उत्पन्न होणाऱ्या राक्षसांप्रमाणे वाढतच आहेत असेंच दिसून येईल.

## अत्याचारांच्या आवृत्त्या

ता. २ जानेवारी रोजीं ज्यू क्रांतिकारकांनी तेल अव्हीव्ह या ब्रिटिशांच्या लष्करी मुख्य कचेरीवरच हल्ला चढविला, व एका ब्रिटिश ऑफिसरचा बळी घेतला. हैफा व हाडेरा याही गांवीं त्यांनी त्याच दिवशीं अत्याचार करून सुरुंगाने ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या गाड्या उडवून दिल्या व लोक मारले. १२ रोजीं हैफा येथे पुन्हा एका पोलिस कचेरीवर बॉंब टाकण्यांत आले; त्यांत ४ पोलिस ठार झाले. दुसरे दिवशीं एका अरबाला एका ज्यू मुलीवर अत्याचार केल्याच्या आरोपांतून ब्रिटिश कोर्टाने दोषमुक्त करून सोडून दिलें त्याबरोबर ज्यू क्रांतिकारकांनी लगेच त्या अरबाला कोर्टांतूनच पळवून नेलें व खच्ची करून टाकलें. २६ जानेवारी रोजीं जेरुसलेममधून एका ब्रिटिश व्यापाऱ्याला असेंच अज्ञात स्थळीं पळविण्यात आले ! २७ रोजीं तर एक फारच मोठा चमत्कार क्रांतिकारकांनी केला. तेल अव्हीव्ह येथील डिस्ट्रिक्ट कोर्टांतील जज्ज विंडहॅम कोर्ट भरवून बसला असतां कोर्टावरच क्रांतिकारांनी चाल केली व जज्जसाहेबांची मोट आवळून त्यांना पळवून नेलें. हा प्रकार ग्रूनर नामक एका क्रांतिकारकाला ब्रिटिश कोर्टाने फांशीची सजा दिली होती त्याच्या बदल्यासाठी होता.

ग्रूनर हा एक हंगेरियन ज्यू अवघ्या ३२ वर्षांचा जवान. ज्यू क्रांतिकारकांच्या गळ्यांतील ताईतच. गेल्या महायुद्धांत ब्रिटिश लष्करांत ५॥ वर्षेपर्यंत त्याने नोकरीही बजावली होती आणि गेल्या फेब्रुवारी महिन्यांत तो अटकेत असतांनाच ब्रिटिश लष्करी खात्याकडून त्याचा हक्काचा १२० पौंड बोनसही त्याला पोंचविण्यांत आला होता ! पण ग्रूनर याने लगेच आपलें तुइल करून ती सारी रक्कम ' इरगुन झावीलेउमीस ' बहाल करून टाकली. १९४६ च्या एप्रिलमध्यें तेल अव्हीव्ह शहरानजीक रामाटगन पोलिस चौकीवर क्रांतिकारांनी छापा घातला. तेथल्या दंगलींत तो घायाळ पडलेला ब्रिटिशांना आढळला. ब्रिटिशांचे म्हणणें असें की ग्रूनर व त्याच्या साथीदारांनीच पुढाकार घेऊन हा हल्ला केलेला होता. ग्रूनरवर ब्रिटिशांनी खटला भरला, पण ग्रूनरने बचाव करण्याचें साफ

नाकारलें. तो म्हणे, " पॅलेस्टाइन सरकारच्या ब्रिटिश कोर्टाला माझा इन्साफ करण्याचा हक्कच मुळीं नाहीं. कारण आमच्या स्वतंत्र ज्यू पॅलेस्टाइन सरकारनें ब्रिटनशीं प्रत्यक्ष युद्धच पुकारलेलें आहे. अर्थात् मी पाडाव होऊन सांपडलों तरी युद्धकैदीच आहे, सामान्य गुन्हेगार नव्हे. युद्धकैद्यासारखीच वागणूक मला मिळाली पाहिजे." याचा थोडासा अनुकूल परिणाम झाला तो असा कीं, ग्रूनरला ता. २८ रोजीं फांशीं द्यावयाचें ब्रिटिश कोर्टानें ठरविलें होतें तें थोडें लांबणीवर टाकण्यांत आलें.

## बर्क्ले बँक उडविली

मध्यंतरीं सुमारें महिनाभर क्रांतिकारकांच्या उत्पातांना खंड पडला होता. पण २८ फेब्रुवारी रोजीं त्यांनी पुन्हा मोठा उत्पात केला. त्या दिवशीं त्यांनी बर्क्ले बँकेची इमारतच उडवून दिली व लगोलग १ मार्च रोजीं जेरुसलेममधील ब्रिटिश लष्करी अधिकाऱ्यांच्या क्लबांत बाँब फेंकला. ४ मार्च रोजीं तीन अत्याचार झाले. हैफामध्यें टॅक्स असेसमेंट बिल्डिंग बाँबनें उडाली, व हाडेराजवळील ब्रिटिश छावणीवर बंदुका-गरनाळांचा मारा करण्यांत आला. ता. १८-४ रोजीं पॅलेस्टाइनचा डायमंड सेंटर जो उत्तर नाथान्याचा भाग तेथे साध्या वेषानें तिघे क्रांतिकारक घुसले. त्यांनी तेथला संत्री गोळी घालून जागच्या जागीं ठार मारला व बाँब फेकून कचेरीही जमीनदोस्त केली. याच वेळीं जाफामध्येंही पॅलेस्टाइन अरब यूथची कचेरी उध्वस्त करण्यांत आली. तसेंच नाथानिसा येथील एका लष्करी छावणीवर १५ सशस्त्र क्रांतिकारकांनी हल्ला चढवून एक ब्रिटिश सैनिक ठार मारला. ता. १९ रोजींही पॅलेस्टाइनमध्यें सर्वत्र बरेच स्फोट झाले, व पुढील आठवड्यांत तेल अव्हीव्हनजीक सारोनाजवळील पोलिस कचेरीच सुरुंगानें उडविण्यांत आली. त्यांत अनेक ब्रिटिश ऑफिसरांच्या चिंधड्या झाल्या. ब्रिटिश व्यापाऱ्यांना व अधिकाऱ्यांना पळविण्याचा सपाटा सुरूच होता.

आतां ब्रिटननें पॅलेस्टाइनवरील आपलें मँडेट फेंकून देण्याचें कबूल केलें व यूनोनेही खास पॅलेस्टाइन चोकशीसमिति नवी नेमली म्हणून तरी ज्यू क्रांतिकारक थोडी सबुरी करतील अशी आशा ब्रिटिशांना उत्पन्न

झाली, पण ती निष्फळच ठरली. कारण पुन्हा जूनपासून नवे अत्याचार सुरू झाले आहेत. परवां चालू जून महिन्याच्या सुरवातीसच जेरुसलेम शहरांतील अरब वस्तींत ज्यू क्रांतिकारकांनी बॉंबस्फोट केले, हैफानजीक मालगाड्या पाडल्या व इराक पेट्रोलियम कंपनीचे तेलनळही दोन ठिकाणी फोडून टाकले.

## पॅरॅश्यूटनें ज्यू उतरले

पण निव्वळ बॉंब टाकणे, लोक पळवून नेणे, आगी लावणे, छापे घालणे, वेळेनुसार प्रत्यक्ष लढाईप्रमाणे समोरासमोर गाडून उभे राहून झुंजणे येवढयानेच क्रांतिकारकांच्या प्रतिकाराच्या युक्त्या संपलेल्या नाहीत. ज्यू हे स्वभावतःच अत्यंत बुद्धिवान्, कल्पक लोक असून गेल्या दुसऱ्या महायुद्धांत त्यांतील लक्षावधि लोकांनी दोस्तांच्या बाजूने रणांगणावर लढून, अद्ययावत् शस्त्रास्त्रांचा व डावपेचांचा प्रत्यक्ष अनुभव घेतलेला आहे. यामुळे ब्रिटिशांनी केवढाही परीघ पॅलेस्टाईनला घातला तरी, किंवा पॅलेस्टाइनभोंवतालचे समुद्रसुद्धां त्यांनी बंद केले असले तरी त्यावरही सवाई तोड क्रांतिकारक काढीतच आहेत. गेल्या मे महिन्यांतच अनेक बेकायदा ज्यू विमानांतून पॅराशूटने पॅलेस्टाइनमध्यें उतरविण्यांत आल्याचें जाहीर झालें आहे. म्हणजे खुष्कीनें किंवा समुद्रमार्गे आम्हांस येऊं देत नाही, तर आकाशमार्गें आम्ही आलोंच आलों, असें या ज्यू क्रांतिकारकांनी ब्रिटिश सत्तेपुढें नाकच खाजविलें म्हणावयाचें.

ब्रिटिश फौजा आणि ब्रिटिश आरमाराचा जागता पहारा यांना धाब्यावर बसवून युरोपांतील हजारों निर्वासित ज्यू बेकायदा गलबतां-तून पॅलेस्टाइनमध्यें नेऊन उतरविण्याचा क्रांतिकारकांचा उपक्रमहि सतत सुरू असून त्याचा इतका उपद्रव होत आहे की, ब्रिटनला फ्रान्स, इटली इत्यादि राष्ट्रांना सुचविणें भाग पडलें कीं, "अहो, तुमच्याच देशांतील बंदरांतून हे ज्यू लोक पॅलेस्टाइनला निघतात हें तुम्हांस कसें कळत नाही? कृपा करा व आमच्यासाठी तरी निदान आपापल्या बंदरांवर कडेकोट पहारे ठेवून ज्यूंचीं गलबतें तेथून सुटणार नाहीत अशी काळजी घ्या."

युरोपांत आंतर-युरोपियन ज्यू संघटना असून ती कोठून तरी जहाज खरेदी करते, त्यांचीं नवीं नांवें ठेवतें व त्यांतून निरनिराळ्या देशांतील ज्यूंना चोरीछपीने ब्रिटिश आरमाराचे चौक्यापहारे चुकवीत पॅलेस्टाइनला आणून सोडते. युरोपांत इतकी अन्नान्न स्थिति झाली आहे की, ज्या त्या देशाला हे ज्यू आपल्या देशांतून बाहेर पडतील तर बरें असेंच वाटत आहे. साऱ्या निर्वासित ज्यूंना दोस्त राष्ट्रांत ठिकठिकाणी कँप करून ठेवण्यांत आलें आहे. त्यांचा खाणावळ खर्च दोस्तांनाच पडतो. यामुळे ज्यूंची ब्याद काढून देण्याला तीं राष्ट्रें साहजिकच उत्सुक आहेत. ज्यूंनाहि तेथल्या हालांत भूक भूक करीत मरण्यापेक्षा पॅलेस्टाइनला आपलें नवें राष्ट्रच स्थापन झाल्यासारखें आहे तेथे जाऊन तरी पडूं असें वाटतें. पॅलेस्टाइनला गेल्यावर सध्यां ब्रिटिश कैद करतील, पण पोटास तरी त्यांना घालावेंच लागेल. व आज ना उद्यां ज्यूंना पॅलेस्टाइन मिळणारच, तेव्हा तरी आपलें नष्टचर्य संपेलच अशी त्यांना खात्री वाटते. यामुळे साऱ्या युरोपियन बंदरांतून चोरीने पॅलेस्टाइनकडे बेकायदा ज्यू जहाजें सारखीं भरभरून येतच असतात. गेल्या सालच्या नोव्हेंबरच्या शेवटच्या आठवड्यांत ( १९४१ ) ज्यूंना घेऊन एक गलबत आलें. त्यावरील लोकांना परस्पर सायप्रस बेटांत बंदिखान्यांत न पाठवितां आधीं त्यांची हेबिअस कार्पसखाली कोर्टांत चौकशी करावी असा नवाच कायदेशीर ओरडा पॅलेस्टाइनमधील ज्यू लोकांनी केला.

## बेकायदा ज्यू गलबतें

यानंतर लागोपाठ २६ नोव्हेंबर रोजीं 'लेचिंटा' नांवाचें दुसरें एक गलबत भरून आलें. त्यावर ३३५० बेकायदा ज्यू होते. त्यावरील ज्यूंना सक्तीने सायप्रसला रवाना करण्यासाठी उतरवून घेतांना ज्यूंनी अतोनात प्रतिकार केला. ह्या दंगलींत ३० ब्रि. सोजीर जखमी झाले व २ ज्यू ठार झाले ! हें मोठेंच प्रकरण झालें व हायफांत सर्वत्र हरताळ पुकारण्यांत आला तेव्हा दुसऱ्या दिवशीं ब्रिटिशांनी 'लेचिंटा' वरील उतारू ३ निरनिराळ्या गलबतांत कोंबून किनारा सोडून ती बोट भर दर्यांत नेऊन उभी केली. कारण बंदरांत फारच मोठा दंगा

होण्याची भीति त्यांना वाटली. 'इर्गुन झावी' व 'स्टर्नगॅगनें तेल-अव्हीव्हमध्यें भिंतींना जाहिराती लावून 'लेचिटा' वरील ज्यूंना साय-प्रसला पाठविलें तर भयंकर सूड घेऊ अशी धमकी दिली. पण ब्रिटिशांहि हट्टालाच पेटले. पॅलेस्टाइन सुप्रीम कोर्टानें बेकायदा ज्यूंना हद्दपार करण्याचा अधिकार हायकमिशनरला आहेच आहे असा निकाल २९-११ रोजीं दिला.

पुन्हा डिसेंबरांत ७९२ बेकायदा ज्यू घेऊन एक बोट आली, पण तिला सीरीना बेटाजवळ अपघात होऊन ती रुतली व ब्रिटिशांच्या हातीं पडली. त्यानंतर फेब्रुआरी महिन्यांत, ३५० ज्यू घेऊन 'हाइम' गलबत येत होतें तें ब्रिटिशांनी हैफास पकडून आणलें. यानंतर पुन्हा एप्रिलांत 'थिओडर हेलझल' गलबत २००० ज्यू घेऊन आलें, पण तेंहि ब्रिटिशांनी हैफानजीक पकडलें.

## स्फोटक पत्रें

युरोपांत असलेल्या गुप्त ज्यू संघटना स्वस्थ बसलेल्या नाहीत. या उद्योगाखेरीज त्यांचे इतरहि उत्पात चालू असतात. त्यांच्या करामतीचा नवा धाडसी नमुना म्हणजे इंग्लंडांत त्यांनी चर्चिल, मॉंटगॉमरी, ॲटली, ॲंथनी ईडन इत्यादि 'बदमाषांना' पाठविलेलीं स्फोटक पत्रें! या पत्रांतून एक नवीच रासायनिक स्फोटक पूड घालण्यांत येते. ती पाकिटांत बंद असेपर्यंत अगदीं अंगाऱ्याच्या चिमटीसारखी निरुपद्रवी असते, परंतु मालकानें पत्र फोडलें की बाहेरच्या हवेचा स्पर्श होऊन एकदम त्या अंगाऱ्याचा अंगार बनतो, स्फोट होतो व माणसाच्या चिंधड्या चिंधड्या होऊन जातात. अशीं हीं पत्रें आतांपर्यंत बड्या बड्या २४ ब्रिटिश मुत्सद्यांना आलीं, परंतु 'स्कॉटलंड यार्ड 'च्या दक्षतेमुळे तीं पत्रें मालकांच्या हातीं जाण्याच्या आधींच शांत करण्यांत आलीं. सर्वांत आश्चर्य हें की, ज्यू क्रांतिकारक उघड उघड स्वतःचें नांवगांव पत्ता सांगून आपली जबाबदारी कबूल करतात, एवढेंच नव्हे तर फुशारकीही मारतात. वर सांगितलेलीं स्फोटक पत्रें आमीकाम नांवाच्या ज्यू क्रांतिकारकानें तयार केलीं. पहिलें पत्र त्यानें खुद्द जॉर्ज बादशहालाच

पाठविलें होतें. हा गृहस्थ नुकताच पॅरिसहून इटलीस आला आहे व अमेरिकन पासपोर्ट मिळवून तो पॅलेस्टाइनला जाणार आहे! तो सरळच सांगतो, " अहो, या युक्त्या फसल्या तर दुसऱ्या. लंडन कलोनिअल ऑफिसांत व रोम येथील ब्रिटिश वकिलातींत आम्ही 'टाईम बॉंब' ठेवून पाहिले. त्यांतले कांही उडालेहि. पण ती युक्ति ब्रिटिश पोलिसांना माहीत झाल्यावर ही स्फोटक पत्रांची युक्ति आम्ही काढली आणि आतां हीहि फसली तर दुसरी काढूं. पण या ब्रिटिश बदमाषांचा कांटा काढल्या शिवाय राहणार नाही. "

## अमेरिका ज्यू क्रांतिकारकांची पाठीराखी

सबंध पॅलेस्टाइनभर कडक लष्करी कायदा जारी असतां, झडत्यांची व शिक्षांचीं सत्रें सुरूं असतां त्या टीचभर देशांत इतके अत्याचार व ते यशस्वी करण्याची धमक ज्यू क्रांतिकारक कशी बाळगतात हा सकृद्-दर्शनीं चमत्कारच वाटतो. क्रांतिकारकांना ब्रिटिशांच्या लष्कराच्या तोडीस तोड अशीं प्राणघातक सुधारलेलीं शस्त्रें व अस्त्रें हवीं. त्याचप्रमाणे गुप्त संघटनेचें राज्ययंत्र टिकण्यास व त्या राज्यांतील प्रजा चेतवण्यास पैसाहि मुबलक हवा. आणि या दोन्ही गोष्टी अमेरिकेकडूनच ज्यूंना फारच प्रचंड प्रमाणावर मिळत आहेत. व म्हणूनच पॅलेस्टाइनमधील क्रांतिकारकांचे अत्याचार दाबावेत तितके अधिक फोफावत चालले ाहेत. अमेरिकेमध्यें सध्यां तर ब्रिटिशांविरुद्ध या पॅलेस्टाइनप्रकरणीं ानतेचें मन पूर्ण कलुषित झालेलें आहे. तेथील हरएक वृत्तपत्र ब्रिटिश ुलुमाच्या बातम्या अधिक भडक करूनच छापतें. सामान्य जनमत तर असेंच ालें आहे की, महायुद्धाआधीं जर्मनींत हिटलरने ज्यूंचें सर्वसत्र केलें ांसेंच पुन्हा पॅलेस्टाइनमध्यें हे दुष्ट ब्रिटिश करीत आहेत! ज्यू क्रांति-कारकांच्या कमी नव्हेत तर सोळा प्रचंड संघटना असून त्या तेथें उजळ माथ्यानें काम करीत आहेत. त्या संस्था ब्रिटिशविरोधी प्रचाराचा सारखा पाऊस पाडीत असतात. अमेरिकेंतील या प्रचारकांचा पॅले-स्टाइनमधील क्रांतिकारक संघटनांशी आंतून एकहात व दळणवळण आहे. किंबहुना पॅलेस्टाइनमधील इरगुन्झावीलेऊमी व स्टर्नगॅंग या

संस्थांच्या विश्वव्यापी प्रचारासाठी अमेरिकेंत या वरील संस्थांचीं जणुं ब्रॉडकास्ट स्टेशनेच उभारलीं आहेत. अमेरिकेंतील हे लोक निरनिराळ्या समित्यांच्या नांवांखाली उद्योग करून अगणित निधि जमवितात, जहाजेंच्या जहाजेंसुद्धा विकत घेतात व युरोपांतून बेकायदा ज्यूंची पार्सलें करून पॅलेस्टाइनमध्ये पाठवितात. पॅलेस्टाइनमधील क्रांतिकारकांना जखमांचीं औषधें आणि उपकरणे रणांगणावरील हॉस्पिटलसारखीं पुरवितात; येवढेच नव्हे, तर क्रांतिकारकांच्या सर्वच्या सर्व कुटुंबांना तहाह्यात पोसतात. अमेरिकेंतील या ज्यू चळवळ्यांचा मुख्य पुढारी पीटर बर्गसन् नांवाचा युक्राईनमध्ये जन्मलेला एक तरुण गृहस्थ आहे. त्याने तर आतां अमेरिकेंत ज्यूंचें प्रत्यक्ष निर्वासित सरकारच स्थापण्याची चळवळ चालवली आहे. ब्रिटिश मालावर वहिष्कार घालण्याचा प्रचार तर फारच जोरांत आहे.

प्रत्यक्ष क्रांतिकारकांचा हात नाही अशाहि ज्यू संस्था अमेरिकेंत पुष्कळच आहेत व त्याहि आपापल्यापरी खंडोगणती पैका उभारून आपल्या भाईबंदांच्या दुःखनिवारणासाठी झटत आहेत. यंदा तशा संस्थांनी मिळून चार कोटी पंचवीस लक्ष पौंडांचा निधि उभारण्याचा संकल्प सोडला आहे व ते तो गांधींच्या कस्तुरबानिधीच्या अवधींच्या आंत सहज उभारून दाखवतील याविषयी कोणासच शंका वाटत नाही. अमेरिकेंत नुकतीच एक कॉन्फरन्स ऑफ हिब्रू लिबरेशन म्हणजे हिब्रू स्वातंत्र्य परिषद भरविण्यांत आली होती. तींत अमेरिकन सिनेटर्स, कॉंग्रेसमेन, जजेस, प्रोफेसर्स, क्लर्जीज अशा विविध शाखांतील वड्या लोकांनी सक्रिय भाग घेतला. या लोकांचा प्रत्यक्ष ज्यू क्रांतिकारक अत्याचारांना सक्रिय पाठिंबा नाही हें खरें, परंतु सहानुभूति मात्र शंभर टक्के आहेच. म्हणून त्या सर्वांनी असें उघडपणें प्रतिपादिलें की, आपण पॅलेस्टाईनमधील ज्यू प्रतिकारकांना शस्त्रें पुरवूं नयेत, मात्र तद्व्यतिरिक्त हरएक साहित्य अवश्य पुरवावेंच पुरवावें.

## ज्यूंना हात ब्रिटनला लाथ

अमेरिकेंत सार्वत्रिक लोकमत असेंच आहे की, यूनोकडे पॅलेस्टाइनचा प्रश्न सोडवून निभाव लागणार नाही. अमेरिकेने प्रत्यक्ष जातीने पुढाकार घेऊन पक्षपाताचा वा स्वार्थाचा आरोप सोसूनही या पॅलेस्टाइन-प्रश्नाचा ज्यूंच्या बाजूनेच निकाल लावला पाहिजे. अमेरिकन सरकारला उघडपणे असें धोरण जाहीर करणे शक्य नाही. परंतु तिचा ज्यू पक्षपात अगदीं जगजाहीर आहे. गेल्या फेब्रुवारींत ब्रिटिश पार्लमेंटांत बेव्हिन यांनी पॅलेस्टाइनमधील ब्रिटिश धोरणाचा फजीतवाडा कसा उडाला याचें हृदयद्रावक वर्णन करतांना अमेरिकेवर ज्यूपक्षपाताचा उघड उघड आरोप केला. त्याला लगेच अमेरिकन सरकारतर्फे ट्रुमन यांनी पत्रक काढून उत्तरही दिलें. त्यांतील शेवटचें वाक्य पूर्ण सूचक होतें. व त्यावरून इंग्लंडलाहि गुंडाळून ठेवून अमेरिका ज्यूंच्याच बाजूने भांडेल हेंच प्रकट झालें. तें वाक्य असें होतें. " America's interest in Palestine is of long and continuous standing. it is a deep abiding interest sharde by our people withont regard to their political affiliations " या उद्गारावरून इंग्लंडने कितीही लगट केली, तरी अमेरिका ज्यूंचा कैवार घेणार व इंग्लंडच्या प्रार्थना धाब्यावर बसविणार हें उघड झालें आहे. त्याचें दुसरें ताजें प्रत्यंतर असें. परवां अमेरिकन पत्रांत, अमेरिकन लीग फॉर फ्री पॅलेस्टाइनतर्फे तेथील ज्यू पुढाऱ्याने पुढीलप्रमाणे जाहिरात राजरोस छापली. त्यांत असें स्वच्छ म्हटलें होतें, " तुमच्या मायदेशाचा म्हणजे पॅलेस्टाइनचा ब्रिटिशांनीच विश्वासघात केला आहे व त्यांनी आतां त्यांचा छळ मांडला आहे. करतां त्यांच्यावर अत्याचार करणे हें प्रत्येक ज्यूचें पवित्र कर्तव्य होय. तुम्ही ब्रिटिश दारूगोळ्यांचें कोठार उडवून द्या. तुरुंग फोडा, आगगाड्या पाडा, त्यांच्या बँका लुटा किंवा त्यांवर बॉम्ब टाका किंवा गोळ्या चालवा. हीं सर्व पुण्य कृत्येंच आहेत. असें कृत्य घडतें तो प्रत्येक दिवस अमेरिकेंतील ज्यूंना सणासारखा सुदिन वाटतो. " या जाहिरातीविरुद्ध ब्रिटिश सरकारने अमेरिकन सरकारकडे लगेच मोठा त्रागा करून दाद मागितली व हा विषारी प्रचार तुमच्या एका दोस्तांविरुद्ध तुम्ही उघड्या

डोळ्याने कसा सहन करतां म्हणून खूप छेडलें. परंतु आतां . जवळजवळ १ महिन्यानंतर ट्रुमन यांनी पॅलेस्टाइनमधील ज्यूंनीं उगाच अत्याचार करूं नयेत असें वैयक्तिक मत प्रगट करण्याखेरीज दुसरें कांहीं केलें नाहीं ! ही अधिकारापन्न अमेरिकन राष्ट्रीय पक्षाची वृत्ति तर विरोधी पक्षाची त्याच्या सवाई असल्यास आश्चर्य नाहीं. हेन्री वॅलेस यांनी ज्यू अत्याचारांचें समर्थन पुढीलप्रमाणे केलें.ते म्हणाले(२५-४-४७ पॅरिस येथे) "अत्याचाराखेरीज जग जागें होत नाहीं त्याला काय करणार ! मूळ बाल्फोर डिक्लरेशनप्रमाणे पॅले-स्टाइनमध्ये स्वतंत्र ज्यू राष्ट्राची स्थापना ब्रिटनने केली पाहिजे. निकट पूर्वेतील नैसर्गिक संपत्तीचा पूर्ण उपयोग करून पॅलेस्टाइनमध्ये ज्यूंची नवी भरती करून त्यांना पोसलें पाहिजे व अमेरिकेने तीन वर्षेपर्यंत युरो-पांतून येणाऱ्या ज्यूंवरची बंदी सरसकट काढून टाकली पाहिजे."

वाङ्मयशोभा जुलै १९४७

☆

— ३७ —

# आफ्रिकेंतील फ्रेंच साम्राज्याला लागलेलें ग्रहण

## मोरोक्को अल्जिरिया व ट्यूनिशिया

उत्तर व वायव्य आफ्रिकेंत फ्रेंचांचें साम्राज्य अद्याप बरेंच मोठें शिल्लक उरलें आहे. त्यांत मोरोक्को, अल्जिरिया व ट्यूनिशीया यांचा समावेश होतो. फ्रेंच साम्राज्यशाहीविरुद्ध त्यांचे सारेच मांडलीक भाग सध्या बंड करून उठले आहेत. इंडोचायनांत व मादागास्कर बेटांत फ्रेंचाविरुद्ध उघड बंडें चालू आहेत. त्यांतच आता उत्तर आफ्रिकेंतील बंडाचीहि भर पडणार आहे.

फ्रान्सनेहि या भावी बंडाचा वीमोड करण्यासाठी जय्यत लष्करी तयारी सुरू केली आहे. मोरोक्को, आल्जिरिया, ट्यूनिशिया या प्रांतांत आतापर्यंत थोडथोडें फ्रेंच सैन्य होतें; पण आता जर्मनी आस्ट्रियांतूनहि असलेलें फ्रेंच सैन्य आगगाड्या भरभरून तिकडे रवाना होत आहे. नवें २ लक्ष २० हजार फ्रेंच जवान सक्तीने सैन्यभरती करण्यांत आले असून त्यांना गेल्या १५ मे पासून शिक्षण देण्यास सुरुवात झाली. त्यांची रवानगी आफ्रिकेंतच व्हावयाची आहे. फ्रेंच पंत प्रधानाने डाकार कासाब्लॅंकाला नुकत्याच भेटी दिल्या व अब्दुल करीम नामक अरब पुढाऱ्याने प्रकट होऊन इजिप्तचा उघड आसरा घेतला या गोष्टीहि सूचक आहेत.

## कम्यूनिस्ट फ्रेंचांचा पाठिंबा

मोरोक्को, अल्जिअर्स, ट्यूनिशिया इत्यादिकांना आता फ्रेंच अंमल

झुगारून देऊन स्वतंत्र स्वायत्त व्हावेसें वाटत आहे व तें कालाच्या ओघास धरूनच आहे. पण तसें मान्य करावें तर फ्रेंच राष्ट्राचें साम्राज्यच बहुतेक संपुष्टांत येतें, म्हणून फ्रेंच सरकार इंग्रजांप्रमाणेच सुधारणा-दानाची आमिषें दाखवून त्यांना थोपविण्याचा प्रयत्न करीत आहे. परंतु तीं राष्ट्रें आतां बधत नाहीत. फ्रान्समधील कम्युनिस्ट पक्ष पूर्ण सरकार-विरोधी असून त्यानें वरील अरब राष्ट्रांना स्वातंत्र्य व स्वायत्तता दिलीच पाहिजे असा नेटाचा आग्रह धरला आहे. खुद्द फ्रेंच कारभारी मंडळांतच असा फितूर असल्यामुळे अखेर पॅरिस सरकारने त्या कम्युनिस्ट मंत्र्यांनाच डिच्चू दिला असून उत्तर आफ्रिका आपण सोडावयास बिलकूल तयार नाही,' असें आव्हानच दिलें आहे. वास्तविक आतापर्यंत फ्रेंच कारभारी मंडळ कम्युनिस्टांच्या पुष्टिबळावरच स्थिर झालेलें होतें, पण आता त्यांच्यावरच मात झाल्यामुळे तेंहि खवळून गेले आहेत व त्यांनी देशभर सार्वत्रिक संपाचा धुमाकूळ उसळून दिला आहे. त्याचा प्रधान मंडळावर कितपत परिणाम होतो तें लवकरच कळेल. असो.

## फ्रान्सने धरलेलें आमिष

फ्रान्सने टयूनिशिया, अल्जिरिया, मोरोक्को याना ' स्वायत्तता देतो. वाटेल त्या सुधारणा करून देतो, पण फ्रेंच साम्राज्यांतून तुम्ही फुटून जाऊं नका ' असें प्रतिपादन चालविलें आहे. मोरोक्को आणि टयूनि-शिया हे दोन प्रांत फ्रान्सच्या प्रोटेक्टोरेटस आहेत, वसाहती नाहीत. म्हणजे वसाहतीपेक्षाहि त्या अधिक प्रमाणांत फ्रान्सच्या गुलाम आहेत. त्यांना फ्रान्सचें सांगणें असें की, ' फ्रान्सच्या अध्यक्षतेखाली फ्रेंच साम्रा-ज्यांतील राष्ट्रांचें एक फेडरेशन स्थापूं या. त्यांत तुम्ही सामील व्हा. म्हणजे नाममात्र आमच्या साम्राज्यांतील म्हणविलेंत तरी स्वतंत्र व स्वायत्तच असल्यासारखें व्हाल. ' पण मोरोक्का व टयूनिशिया येथील जनतेला तें बिलकूल पसंत नाही. एक काळ असा होता की मोरोक्कोच्या सुलतानाला फ्रेंच अभिमानाने उत्सवमूर्तीसारखे मिरवीत, पण आता तोच सुलतान उघडपणे फ्रेंचांची गुलामगिरी तोडून टाकून अरबलीगमध्ये समाविष्ट होऊं इच्छितो ! टयूनिशियांतहि फ्रेंचांनी वसविलेला सध्याचा

बे किंवा सुलतानं हा बिलकूल लोकप्रिय नाही. खरा ट्यूनिशियन जनतेचा पुढारी पूर्वीचाच बे आहे. त्याला महायुद्धकाळांत जर्मनीशीं तो फितूर झाला म्हणून काढून टाकण्यांत आले व पॅरिसला नेऊन स्थानबद्ध करण्यांत आलें आहे. त्याची मागणी फ्रेंच वर्चस्व झुगारण्याचीच आहे.

## अल्जिरियाचा दावा

मोरोक्को, ट्यूनिशियानंतर अल्जिरिया. हा फारच प्रचंड प्रांत आहे, पण फ्रेंच वसाहतवाल्यांनी पूर्वापार आपले पाय तेथे पक्के रोवले आहेत. अल्जिरियाची तद्देशीय लोकसंख्या ७० लक्ष आहे पण ७॥ लक्ष उपरे फ्रेंच वसाहतवाले तेथे स्थाइक झालेले आहेत! आल्जिरियाच्या बंदरकिनाऱ्याचे जिल्हे तर संपूर्णपणे फ्रेंचांनी आपल्या कडक नियंत्रणाखाली ठेवलेले असून ते प्रत्यक्ष फ्रान्सच्या जिल्ह्यासारखेच समजण्यांत येतात. अल्जिरियाची मागणी अशी आहे की, अल्जिरियाचें स्वतंत्र सरकार हवें. अरबी हीच अल्जिरियाची राष्ट्रभाषा हवी व अल्जिरियन पार्लमेंटांत अल्जिरियनांचेंच कायमचें हुकमी बहुमत कायद्यानेच हवें. फ्रेंच वसाहतवाल्यांना नाममात्र थोडेबहुत प्रतिनिधित्व दिलें म्हणजे पुरें आहे. अल्जिरिया आमचा आहे. आम्ही बहुसंख्य आहों.

उलट फ्रेंच सरकार म्हणतें–तुमचे लोक अशिक्षित व अडाणी आहेत. त्यांतले जे सुशिक्षित असतील त्यांना तेवढे आम्ही फ्रेंचमनइतके संपूर्ण नागरिकत्वाचे हक्क बहाल करूं! फ्रेंच असेंब्लींत आल्जिरियाचे ३० प्रतिनिधी घेऊं. मात्र आमचे फ्रेंच वसाहतवाले हे आता आल्जिरियनच झालेले आहेत तेव्हा त्यांतहि विभागणी अशी की, त्या ३० पैकी १५ हे फ्रेंच वसाहतवाले असतील! ७० लक्ष आल्जिरियन लोकांना व अवघ्या ७ लक्ष फ्रेंच वसाहतवाल्यांना सारख्याच प्रमाणांत प्रतिनिधित्व! तीस कोटि हिंदूंना आणि अवघ्या ९ कोटि मुसलमानांना पॅरिटी देण्याची शक्कल काढणाऱ्या इंग्रजांकडून तर ही शक्कल फ्रेंच शिकले नसतील? अथवा शिकावयास कशास हवें? साऱ्या साम्राज्यवाद्यांच्या शकला अशा एकाच सांच्याच्या निर्माण व्हावयाच्या हें ठरलेलेंच आहे.

## अरबलीगशीं एकी

दुसऱ्या महायुद्धांत जें स्थित्यंतर झालेलें आहे, त्यांतच वरील तीन अरब राष्ट्रांना झालेल्या स्वातंत्र्याच्या स्फूर्तीचें बीज आहे. हीं राष्ट्रें पूर्वी एकमेकांशीं सलोख्याने नसत; परंतु आता त्यांना हें पटलें आहे की, युरोपियन लोकांना उचलून फेकून द्यावयाचें तर आधी आपसांतील बेकी टाकून सर्वांनी एककट्टा होऊन एक मोठा संघ स्थापला पाहिजे, तरच आपला निभाव लागेल व म्हणून आता हीं राष्ट्रें अरब लीगमध्ये समाविष्ट झालीं आहेत. सीरिया आणि लेबॅनॉन यांनी फ्रेंच अंमल झुगारून दिला त्याच वेळीं या तिघांनीहि इकडे दंगल केली असती तर त्यांचें साधतेंहि. पण ती त्या वेळीं एक विचाराने वागत नव्हतीं, व सवत्या सुभ्याने आपापल्या स्वातंत्र्याकरिता अलग अलग फ्रान्सशीं झगडत होतीं यामुळे त्याचा कांहीं उपयोग झाला नाही. सध्या मात्र त्यांना शहाणपण सुचलें आहे. प्रथम ट्युनिशियाने पुढाकार घेतला व त्याने सीरिया लेबॅनॉनशी सूत्र जोडलें व त्यांच्याच शिकवणीवरून आता अल्जिरिया, ट्यूनिशिया व मोरोक्को येथील कार्यकर्ते नुकतेच कैरो येथे एकत्र येऊन भेटले. त्यांचीं खलबतें झालीं व आता तिघांनीहि अरब लीगमध्ये सामील व्हावे व आपला झगडा चालवून स्वातंत्र्य संपादावें असें ठरलें आहे.

## परिस्थितीचा प्रभाव

महायुद्धकाळांत सतत चार पांच वर्षेपर्यंत या जुनाट त्रुद्रुक, मागासलेल्या, गंजलेल्या लोकांचा अद्ययावत् युरोपियन व अमेरिकन संस्कृतीशीं संघर्ष व साहचर्य झालें यामुळे लोखंडाला परीस लावावा तशी स्थिति होऊन गेली आहे. त्या लोकांत आता सर्व नव्या आकांक्षा व महत्त्वाकांक्षा उदित झाल्या आहेत. यांच्याच देशांत उतरून तेथून दोस्तांनी युरोपवर स्वारी केल्यामुळे हे देश सर्व सुधारलेल्या साधनसामुग्रीने सज्ज झाले. मोरोक्को अल्जिअर्समध्ये सर्वत्र रस्ते व रेल्वे पडल्या ! नवे हवाई तळ निर्माण झाले. बंदराच्या दुरुस्त्या झाल्या. त्या साऱ्या सुधारणा आयत्याच दोस्त लष्करें निघून गेल्यावर सुसज्ज स्थितींत त्यांच्या ताब्यांत

आल्या. अल्जिरिया व मोरोक्को येथे प्रत्यक्ष लढाई पडलीच नाही म्हणून या सर्व सुधारणा अपूट अभंग राहिल्या. ट्यूनिशियांत तसें झालें नाही. तेथे घनचक्कर लढाया झाल्या, म्हणून तो प्रांत सर्व उध्वस्त झाला; तरीहि गेल्या २ वर्षांत तेथेहि सर्व नव्या सुधारणा व सोयी अद्ययावत् होत आल्या आहेत.

## अरब राष्ट्रांची सुबत्ता

शिवाय इतर दृष्टींनी म्हणजे व्यापारादिकामुळे या तीन राष्ट्रांना भावी काळांत स्वतंत्र झाल्यावर दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहण्याची फारशी गरज राहणार नाहीसें वाटतें. हें तीन्ही देश धान्योत्पादनाच्या दृष्टीने सपन्न आहेत. सामान्यतः २७ लक्ष टन गहूं व ३८ लक्ष टन बार्ली उत्तर आफ्रिकेंत पिकते. अमेरिकेच्या लोकसंख्येच्या मानाने जितका जादा गहूं अमेरिकेंत निघतो, त्याहिपेक्षा अधिक प्रमाणांत गहू उत्तर आफ्रिकेंत पिकतो व यंदा उत्तर आफ्रिका या गव्हाचाच परदेशाशीं फार मोठ्या प्रमाणावर व्यापार करणार आहे असें प्रसिद्ध झालें आहे! आल्जिरियांतील दारूहि परदेशी फार खपते. खताला लागणारी फास्पेटस तर उ. आफ्रिकेइतक्या मुबलक प्रमाणांत कोठेंच निष्पन्न होत नाही! नुसत्या ट्यूनिशियांतून गतवर्षी १६४५७६३ टन फॉस्पेटस् निर्गत केलें म्हणजे त्याचा जगांत जवळ जवळ पहिला क्रमांक लागला.

## अमेरिकेचा कावा

मोरोक्को आल्जिरिया ट्यूनिशिया यांना फ्रान्सचा विटूप वाटतो, व दुसऱ्या महायुद्धापासून अमेरिकेचे कर्तृत्व पाहून ते दिपले आहेत. अमेरिकन लोकांसारखे सर्वांत सपन्न व कर्तृत्ववान लोक कोणीच नाहीत अशी त्यांची खात्री झाली आहे व अमेरिकेकडून हस्तक्षेप करवून फ्रेंचांचें जूं झुगारून देण्याची त्यांची खटपट सुरू आहे. अमेरिकेला तर काय ही सोन्यासारखी पर्वणी. आपण होऊन हीं सावजें आपल्या जाळयांत येतात तर तिने त्यांना नादीं न लावले तरच आश्चर्य. इकडे फ्रेंचानाहि अमेरिकेवर विश्वास ठेवावा लागतो तर इकडे अरबांना तर ते त्रातेच झाले

आहेत. दोघांकडूनहि विश्वास संपादून शेवटीं दोघांनाहि दाबून टाकून वायव्य व उत्तर आफ्रिका अमेरिका राजरोस दावणार हेंच पुढील भविष्य आहे. अमेरिकेचा दुदिल कारभार कसा आहे पाहा. आरबांना दाबून टाकण्यासाठी चाललेल्या तयारींत उत्तर आफ्रिकेंत सर्व रेल्वे साहित्य, वीज साहित्य फ्रान्स अमेरिकेंतूनच विकत घेत आहे! उलटपक्षीं फ्रान्स-विरुद्ध होणाऱ्या अरबांच्या तक्रारींनाहि अमेरिकाच प्रोत्साहन देत आहे! भावी काळांत लवकरच अल्जिरिया मोरोक्को व ट्युनिशिया हीं राष्ट्रें फ्रान्सविरुद्ध उघड बंड पुकारणार, युद्ध जाहीर करणार हें स्पष्ट आहे आणि त्या वेळीं दोघांत सलोखा करून देण्याचें काम मध्यस्थ म्हणून अखेर अमेरिकेकडेच येणार हें निश्चित दिसतें. त्या वेळीं अमेरिका या दोन्ही माकडांचा खवा स्वतःच कसा मटकावील तें जगास दिसणारच आहे.

केसरी, ८–७–४७

*

## – ३८ –

# 'यूनो' अयशस्वी होणार ?

### अद्वैतांतून द्वैत निघालें

नरवा 'मार्शल योजने'चा विचार करण्यासाठी बोलावलेल्या पॅरिस-परिषदेंत अँग्लो–अमेरिकनांना धमकी देऊन मोलोटोव्ह रशियाला परत निघून गेला. तेव्हापासून इंग्लंड-अमेरिका व रशिया दोघांनीहि शिष्टाचाराच्या दांभिकपणाचा दरबारी बुरखा उघड फाडून टाकला असून, ते दोन्ही पक्ष आव्हानपूर्वक आपापले गट आवळून उभे राहण्यास उद्युक्त झाले आहेत; म्हणजे असें की, अमेरिकन-पुरस्कृत युरोपच्या पुनर्घटनेंत रशिया न आला तरी त्याला वगळून, किंबहुना विरोधूनहि, युरोपियन राष्ट्रांचा गट करण्याची योजना तशीच पुढे चालवून तडीस नेण्याचा अँग्लो–अमेरिकनांनी चंग बांधला आहे, तर उलटपक्षीं रशियानेंहि आपले खरें स्वरूप प्रकट केलें आहे. त्याने हंगेरी, बल्गेरिया, रुमानिया येथे एकाएकी धरपकडीचीं सत्रें सुरू केलीं व कम्युनिस्ट विरोधी म्हणून जे जे कोणी पक्ष टुरटुर करीत होते त्यांची गठडी वळली व लष्करशाहीच्या जोरावर त्या त्या राष्ट्रांचीं सरकारें आपल्या बगलबच्चा हस्तकांनी गजबजून सोडलीं! आतां पूर्वी ठरल्याप्रमाणे शत्रुपक्षीय राष्ट्रांच्या तहाला मंजुरी मिळण्याचा अधिकृत विधि झालाच तर–तो विधि पार पडणें हें सध्याच्या परिस्थितींत कठीणच दिसतें–नऊ महिन्यांच्या अवधींत रशियाला या राष्ट्रांतून आपलीं सैन्यें काढून घ्यावीं लागणार. पण तशीं तीं काढून घ्यावी लागलीं, तरी वरीलप्रमाणे व्यवस्था

करून रशिया निश्चिंत झाला आहे. याहि खेरीज झेकोस्लोव्हाकियासारखीं राष्ट्रें वोटचेपीं आहेत असा जो भ्रम ॲंग्लो–अमेरिकनांना झाला होता तोहि कसा व्यर्थ होता हें प्रत्ययास आणून देण्यास त्याने सुरुवात केली आहे !

## पूर्वयुरोप पाठमोरा झाला

झेकोस्लोव्हाकियाने अखेरच्या क्षणीं स्वीकारलेलें निमंत्रण नाकारलें, येवढेंच नव्हे तर रशियाशींच एक नवा महत्त्वाचा व्यापारी करार केल्याचें जाहीर केलें ! ॲंग्लो-अमेरिकनांच्या निमंत्रणाला आता हंगेरी, पोलंड, फिन्लंड, रुमेनिया, युगोस्लाव्हिया, बल्गेरिया, अल्बानिया, झेकोस्लोव्हाकिया या आठ राष्ट्रांनी चक्क नकार दिला आहे. झेकोस्लोव्हाकियाबाबत ॲंग्लो-अमेरिकनांना मोठीच आशा वाटत होती. पोलंडप्रमाणेच झेकोस्लोव्हाकियालाहि अमेरिकन मदतीची आशा व अपेक्षा होती ही गोष्ट खोटी नाहीं; पोलंडने तर एक पंचवार्षिक कार्यक्रमच आखला होता व त्यासाठी सर्वस्वी अमेरिकन शास्त्रज्ञांचा सल्ला घेण्याचें त्याने ठरविलें होतें. व माजी प्रे. रूझवेल्ट यांचे खास अर्थसल्लागार रॉबर्ट नॅथान याना तसें आमंत्रणहि धाडलें होतें, परंतु रशियाने कान पिळतांच त्या दोघांनीहि 'क्षमस्व' म्हणून ॲंग्लो-अमेरिकनांकडे मुकाट्याने पाठ फिरविली ! स्वीडनने रशियाशीं एक महत्त्वाचा व्यापारी करार यापूर्वीच केलेला आहे, तरी त्याने पश्चिम गटांत सामील होण्याची खुषी दर्शविण्याचें धाडस केलें; परंतु त्यालाहि आता रशियाने आंतून अशी कांही समज दिली आहे की, तो ॲंग्लो–अमेरिकनांच्या कटांत रहाणे यापुढे बिलकूल संभवनीय दिसत नाही. मग स्कॅंडिनेव्हिअन गटाने मार्शल-योजनेंत संघरूपाने सामील होण्याचें ठरविल्याबाबत कितीहि वार्ता उठोत !

## ग्रीस, इराण, तुर्कस्तान

ही पूर्व युरोपपुरती हकिकत झाली; पण युरोपांत अन्यत्र ॲंग्लो-अमेरिकनांच्या व रशियन संघर्षाच्या नाजूक मर्माच्या दुसऱ्या अनेक जागा आहेतच आणि तेथेहि रशियाने अडवणूक सुरू केली आहे. त्याने जुने वाद पुनः चेतविले आहेत. किंवा कांहीं नवेहि उपस्थित केले आहेत. भूमध्य समुद्रांत येनकेन प्रकारेण शिरण्याचा रशियाचा

अंतिम हेतु किंवा साम्राज्यशाही महत्त्वाकांक्षा आहे हें सुप्रसिद्ध आहे. त्या समुद्रांत शिरण्याचीं द्वारें दोन – १ तुर्कस्थानची दार्दानेल्सची खाडी व दुसरा ग्रीस देश. या दोन्ही ठिकाणीं आता रशियाने पुनः जोराचें दडपण आणलें आहे. भूमध्य समुद्रांत घुसणें हें रशियाचें धोरण म्हणजे स्ट्रॅटेजी म्हटली तर त्यासाठी सोईस पडेल तशी ग्रीस किंवा तुर्कस्तानकडे चढाई, घालमेल करणें या त्याच्या टॅक्टिक्स म्हणजे कावेदावे होत. उलट पक्षी अँग्लो-अमेरिकनांना या रशियन धोरणाची पक्की जाणीव असल्यामुळे रशियाला तेथे बिलकूल हात शिरू द्यावयाचाच नाही, असें त्यांनी ठरविलें आहे. अमेरिकेने जणूं कांही स्वतःवरच आक्रमण झालें आहे अशा अभिनिवेशाने हरतऱ्हेची लष्करी व दर्याई मदत तुर्कस्तानला व ग्रीसला दिली आहे. इराणचा आझरबैझान प्रांत अँग्लो-अमेरिकनांनी रशियावर मात करून कांही दिवसापूर्वी त्याच्या छापेंतून मुक्त केला होता; पण अलीकडच्या वार्तावरून रशियाने पुनः सैन्याची व फितुरी लोकांची कुमक पाठवून अझरबैझानला उठावणी दिली आहे व कुर्दी टोळ्यांकडून पुनरपि तेथे बंडें सुरू केली आहेत. पॅलेस्टाइनच्या प्रश्नांत वास्तविक रशियाचा संबंध पोचत नाही. परंतु तेथेहि रशियाने हात सरकवून अँग्लो-अमेरिकनांच्या कारभारांत घुसून खेळखंडोबा करण्याची इर्षा धरली आहे. ट्रिएस्टप्रमाणे पॅलेस्टाइनचा कारभार आंतरराष्ट्रीय 'ट्रस्टीशिप'खाली म्हणजे कारभारी मंडळाकडे यावा असा रशियाचा डाव; कारण तसें झालें म्हणजे त्यालांहि हक्काने त्या कारभारी मंडळांत जागा मिळते ! फ्रान्समध्ये आपल्या कम्यूनिस्ट हस्तकांकरवीं रशियाने किती उच्छाद मांडला आहे, हें सध्या फ्रान्समध्ये सुरू असलेल्या मोठमोठ्या संपांच्या सत्रावरून उघडच दिसत आहे.

## पॅसिफिकमध्यहि बांधा घातला

पण येवढ्यानेच सपलें नाही. आशियांत व पॅसिफिकमध्येहि रशिया एकदम उलटला आहे. चीन, कोरिया प्रकरणीं व पॅसिफिकमधील जपानी तहसंबंधांत रशियाने अमेरिकेस पक्का शह दिला आहे. कोरिया-बाबत पहिल्यापासूनच अडवणूक करून रशियाने अमेरिकेस रंजीस आणलें होते. शेवटीं बरेंच नमतें घेऊन अमेरिकेने पुनरपि कोरियन कमिशनचें

काम रशियाला बरोबर घेऊन सुरू केलें, तिकडे—पॅरिस परिषदेचा बोज-वारा उडतांच रशियाने कोरियन कमिशच्या कामांत बांधा घालून तें पूर्ण खोळंबून टाकलें आहे. रशियाला व्हेटोचा अधिकार आहे. त्याचाच त्याने पुन्हा अवलंब केला असून कोरियांतील हंगामी सरकार स्थापनेच्या वाटाघाटीत अमुक अमुक पक्षाला बोलावतांच कामा नये, असा त्याचा आग्रह ! मांचूरिया तर अद्याप रशिया सोडीतच नाही. डायरन व पोर्ट आर्थर हीं बंदरें देत नाही; उलट कोरियांतून शिकविलेलें कम्यूनिस्ट सैन्य आणून चिनी सरकारी फौजांवर तो घालीत आहे; येवढेच नव्हे तर औटर मंगोलियाकडूनहि त्याला लष्करी मदत पुरवून त्याने चीनच्या सिंक्यांग प्रांतावर स्वारी करविली.

## जपानी तह खोळंबला

जर्मनी व इतर राष्ट्रांशीं अखेरचे पक्के तह रशिया जसे बनू देत नाही तसेंच तो पॅसिफिकमध्ये जपानशींहि घडूं देत नाही. जपानी तहांत बांधा घातल्याशिवाय रशिया राहणार नाही हें ओळखून अमेरिकेने आता असें ठरविलें आहे की, ‘ फार ईस्ट कमिशन ’च्या सगळ्याच सभासद राष्ट्रांनी मिळून जपानी तहाचा कच्चा खर्डा तयार करावा व मग जपानविरुद्ध जीं जीं राष्ट्रें लढलीं त्या सर्वांची मिळून एक परिषद बोलावून तेथे तो मंजूर करवून घ्यावा. वास्तविक आतापर्यंतच्या वहि-वाटीप्रमाणे वड्या चौकडीच्या परराष्ट्र-मंत्र्यांनीं तहाचा मसुदा करावयाचा; परंतु रशियाला डावलण्यासाठी अमेरिकेने ही युक्ति काढली आहे व आम्ही लहानसहान राष्ट्रांनाही बरोबरीने विचारांत घेऊनच प्रकरणें उलगडींत आहों असा दावा सांगण्यास सुरुवात केली आहे. परंतु रशिया अमेरिकेच्या योजनेला विरोध करणार हे स्पष्ट आहे; युरोप-प्रमाणे या बाजूस पाठपुरावा करण्यास रशियाला पित्ते मिळणार नाहीत, तरीहि तो आपलें म्हणणें सोडणार नाही व युरोपप्रमाणेच पूर्वेसहि कायमचे दोन गट पडलेले दिसतील !

## ॲटम बाँबचा वाद

‘ यूनोच्या सिक्युरिटी कौन्सिल ’ने ‘ डिस्‌आर्मेमेंट कमिशन ’ नेमलें, त्यांतहि रशियाने सध्या एकदम खीळ घातली आहे व त्याने असें बजावलें

आहे कीं, 'जर रशियाच्या मागण्या अमान्य करण्यांत आल्या तर यूनोच्या निःशस्त्रीकरणाच्या साऱ्याच योजनांना सुरुंग लागलेला दिसेल, सांभाळा.' जर निःशस्त्रीकरण कमिशनच्या अमेरिकेने केलेल्या सूचना सिक्यूरिटी कौन्सिलने स्वीकारल्या तर रशिया 'व्हेटो'चें अस्त्र तरी उपसणार किंवा परिषदेच्या कामांतून तो निवृत्त तरी होणार ! तसें झाले म्हणजे शांतताप्रस्थापनेचे अमेरिकेचे मनोरथ व्यर्थच होणार. रशिया म्हणतो सर्वच निःशस्त्रीकरणाच्या प्रश्नांत ॲटम बॉंबचाहि समावेश झालाच पाहिजे. निःशस्त्रीकरणाच्या यादींतून ॲटम बॉम्ब वगळण्याने खरें निःशस्त्रीकरण होणारच नाहीं. अमेरिकेने ॲटम बॉम्बचें गुपित स्वतःजवळ दडवून ठेवलें आहे व तयार केलेल्या ॲटम बॉम्बचा सांठाहि लपवून ठेवला आहे. ॲटम बॉंबची युक्ति हस्तगत करण्याचे वैध व अवैध नाना उपाय रशियाने करून पाहिलेच होते. उलटपक्षीं स्वतःवर कोणाचें आक्रमण होऊ नये म्हणून अमेरिका ॲटम बॉम्बच्या या गुपिताला जपत आहे. रशियन शास्त्रज्ञानी ॲटम बॉम्बचें गुपित हस्तगत केलें आहे. रशियाने आता ॲटम बॉम्बच काय पण सवाई ॲटम बॉम्बस् निर्मिले आहेत. अमुक ठिकाणीं ॲटम बॉम्बला लागणाऱ्या युरेनियम धातूच्या खाणी रशियन शास्त्रज्ञांनी नव्या शोधून काढल्या अशा अनेक वार्ता अलीकडे प्रसिद्ध झाल्या आहेत. त्या खोट्या तरी असल्या पाहिजेत किंवा खऱ्या तरी असल्या पाहिजेत. खोट्या असतील तर त्या रशियाने पिकाविण्याचें कारण इतकेंच की, अमेरिकेने समजावें की आपलें गुह्य रशियाने जाणलें ! तेव्हा ॲटमबॉंबची युक्ति स्वतःजवळ दाबून ठेवण्यांत यापुढे अर्थ नाही. आता निःशस्त्रीकरणाच्या यादींत आपले ॲटम बॉम्सहि मोडीस निघू देत. उलटपक्षीं रशियाने अमेरिकेप्रमाणे ॲटम बॉम्बपरिणतींत यश मिळविलें असेल तर ॲटम बॉम्स निःशस्त्रीकरणाच्या यादींत घालण्याचा आग्रह रशिया धरतो त्यांत त्याचा हेतु कुटिलच असला पाहिजे. म्हणजे रशियाचे ॲटम बॉम्ब त्याचे त्याच्याजवळ अपूट, अभंग राहतील आणि अमेरिकेचे मात्र होते नव्हते ते मोडीस निघतील. म्हणजे अमेरिका कमजोर बनून शेवटीं ॲटम बॉम्बचें नारायणास्त्र रशियाच्याच हातीं राहील ! !

याबाबत रशियाची खरी वस्तुस्थिति काय आहे ती कळतच नाही. त्याच्या चिरेबंद तटबंदींतून पश्चिम युरोपांत ज्या काय खऱ्याखोट्या बातम्या पाझरणार त्यांवरच लोकांना तर्ककुतर्कांची मदार ठेवावी लागते. परवा २० जुलै रोजीं म्यूनिक येथे डॉ. हॅम्स बोमका या अणुतज्ज्ञानें पुन्हा असा गौप्यस्फोट केला आहे की, रशियाला अणुबॉम्बची सर्व कृति मिळालेली असून आजच त्याच्याजवळ खंडोगणति ॲटमबॉम्ब तयार आहेत ! आणि म्हणूनच रशियाविरोधी लोकांचा आग्रह आहे की, काय वाटेल तें झालें तरी ॲटम बॉंबचा समावेश निःशस्त्रीकरणाच्या यादींत होऊं नये. चर्चिलसारखे इरसाल मुत्सद्दी आहेत त्यांनी अमेरिकेला उघड उघड सल्ला दिला आहे की, ॲटम बॉंबचें भूत रशियाच्यापुढे नाचवून शत्रू राष्ट्रांशीं होणारे सगळे तह ॲंग्लो-अमेरिकनांशीं सलोखा ठेवून करणें रशियाला भाग पाडावें. वास्तविक सगळ्या साधनांत ॲटम बॉंबचें अस्त्र हेंच सामुदायिक संहरांत निश्चित अग्रेसर आहे, असें गेल्या महायुद्धांत साऱ्या जगाने डोळ्याने पाहिलें असतां, त्या अस्त्राचा नाश व्हावा ही रशियाची मागणी योग्य नाही हें कसें ? परंतु अमेरिका व रशिया यांच्यांतच परस्परांविषयीं तीव्र अविश्वास असल्यामुळे ॲटम बॉंब नष्ट होण्याची गोष्ट बोलावयासच नको.

एकंदरींत स्थूल भविष्य हेंच दिसूं लागलें आहे की, लीग ऑफ नेशन्सच्यापेक्षाहि 'यूनो'चा अधिक बोजवारा उडणार. रशिया व त्याचे पक्षपाती यांचा स्वतंत्र गट बनणार, 'वनवर्ल्ड'चें स्वप्न भंगणार व अद्वैत स्थापण्याच्या उपद्व्यापांत रोकडें द्वैत जगाच्या पदरांत पडणार ! ! एका बोगद्याच्या तोंडांतून घामघूम झालेली आगगाडी बाहेर पडते न पडते तों तिला दुसऱ्या बोगद्यांत शिरावें लागणार. महायुद्धाच्या एका काळ्याकुट्ट ढगांतून जग हळूहळू कसेंबसें बाहेर पडलें व क्षणभर त्याच्या मुखावर प्रसन्नता विलसूं लागली न लागली तोंच दुसऱ्या ढगाच्या छायेने याचें मुख मलिन होत चाललेलें स्पष्ट दिसत आहे.

केसरी, २२–७–४७

★

— ३९ —

# इराणांतील अझरबैजान पुन्हा पेटलें !

सध्या जगांतील हरएक राजनैतिक व लष्करी आघाडीवर रूसो-अमेरिकन्स तोंडा पेटवून उभे राहिल्यासारखे दिसत आहेत. प्रत्यक्ष युद्धाच्या हालचाली सुरू होण्यासारख्या संभाव्य जागा म्हटल्या म्हणजे ग्रीस, तुर्कस्तान, इराण हे युरोपांतील प्रदेश, आणि मांचुरिया-कोरिया हे आशियांतील किंवा पूर्वेकडील प्रदेश होत. यांपैकीं प्रत्येक ठिकाणीं रूसो-अमेरिकन संघर्ष किती व कसा निकरास आला आहे तें पहाण्यासारखें आहे. सध्या पुन्हा इराण आघाडी चेतली आहे. इराणांतील आझरबैझान प्रांतामुळे जें भांडण सुरू झालें होतें तें अँग्लो-अमेरिकनांनी रशियावर मात केल्यामुळे मध्यंतरीं थांबल्यासारखें वाटलें. पण तें आता दुप्पट चिघळणारसें दिसतें. रशियाने इराण सरकारमागे लावलेला नेट आणि त्याला तोड म्हणून अमेरिकन सरकारने इराणला जाहीरपणे दिलेलें आश्वासन हीं दोन्ही शांततेला अपशकुनासारखींच भासतात ! दरम्यान एक गोष्ट मात्र घडून आली आहे, तीहि लक्षांत ठेवली पाहिजे. यापूर्वीं इराणला सर्व साहित्याची व सल्लामसलतीची मदत इंग्लंडच पुढाकार घेऊन करीत होतें. परंतु मध्यपूर्वेच्या राजकारणांतील सर्वच शाखांतून अमेरिकेपुढे शरणागति पत्करण्याचें व तिचे मांडलिक म्हणून रावण्याचें इंग्लंडनें ठरवलें असल्याने आता इराणांत सारें वर्चस्व अमेरिकेचेंच झालें आहे. प्रचंड कर्जे व रणसाहित्य अमेरिकेनें इराणला पुरविलें असून रशियाशीं लढण्याचाच प्रसंग आला तर आम्ही आमची

सारी शक्ति वेचून प्रथम इराणांतच लढूं असा अमेरिकन वकिलाने रशियाला नुकताच दमहि भरला आहे.

सध्या कोणत्या मुद्यावर इराणांत रूसो–अमेरिकन तेढ आली आहे तें कळण्यासाठी गेल्या पांच–सहा महिन्यांतील इराणांत घडलेल्या घटनांची संक्षेपाने तरी माहिती लक्षांत घेतली पाहिजे. १९४६ च्या फेब्रुवारींत इराणचा पंतप्रधान घावम हा मॉस्कोला गेला होता. त्यावेळीं त्याने रशियाला उत्तर इराणांत तेलखाणीच्या सवलती देण्याचें कबूल केलें होतें. त्या सवलती सर्वस्वी रशियाला अनुकूल असून त्यायोगे त्या उद्योगांत इराणच रशियाचा भाडेकरू बनणार होता. पण त्यावेळीं इराणवर रशियाचा जबरदस्त शह बसलेला असल्यामुळे पंतप्रधान घावमला रशियाच्या अटी कबूल करण्याखेरीज गत्यंतर नव्हतें; परंतु एक पळवाट होती. त्या त्यांच्या कराराला इराणी पार्लमेंटाची मान्यता मिळणें आवश्यक होतें ! पण दरम्यान मजलिसची म्हणजे पार्लमेंटाची दोन वर्षांची मुदत भरल्यामुळे तिचें विसर्जन करण्यांत आलें होतें. पार्लमेंटची मुदत वाढवून घेण्याच्या कारवाया टुडेह पक्षीयांनी साऱ्या हाणून पाडल्या. इराणी पार्लमेंटच्या चौदाव्या अधिवेशनांत असा कायदाच पास झाला होता की परकीयांचीं सैन्यें इराणांत असेपर्यंत पार्लमेंटच्या निवडणुका करू नयेत. यामुळे पार्लमेंटचें चौदावें अधिवेशन बरखास्त झालें तरी नव्या निवडणुका करतां येईनात. शिवाय पंतप्रधान घावमलाहि त्या व्हावयास नको होत्या, कारण इराणांतील तेल रशियाला देण्यास तो मनापासूनच तयार नव्हता. केवळ त्यावेळीं कोंडींत सपांडल्यामुळे त्याने रशियाशी करार केला होता.

शिवाय घावमला दुसऱ्याहि एका कायदेशीर अडचणीचा आधार सांपडत होता. २ डिसेंबर १९४४ रोजीं इराणी पार्लमेंटांत असा ठराव पास झाला होता की, इराणने कोणाहि राष्ट्राशीं अगर कंपनीशीं तेलाबाबत कांहीहि करार करू नयेत. असा करार प्रधान किंवा अन्य कोणी करण्याचा प्रयत्न करील तर त्याला ताबडतोब पदच्युत करून तीन तें आठ वर्षेपर्यंत अंधारकोठडी दाखवावी ! ! अशा रीतीने घावम रशियाला

चाळवण्या दाखवूं लागला. पण रशियाहि स्वस्थ बसला नाही. त्याने पुनः आझरबैझानांत बंडें उठवण्यास सुरुवात केलीं व दुसरीकडून केलेला तेलाचा करार पुरा करून द्या म्हणून टुमणें लावलें. तेव्हा अखेर इराण अमेरिकेला शरण गेला. गेल्या जून महिन्याच्या विसाव्या तारखेस अमेरिकेने २५ दशलक्ष डालर्सचें कर्ज इराणला दिलें व त्या पैशांतून अमेरिकेचेंच रणसाहित्य इराणी सैन्याकरिता विकत घेण्याची अट त्यावर लादली गेली. म्हणजे पर्यायाने अमेरिकेने रशियाशीं लढण्याकरिता इराणला अद्ययावत् शस्त्रास्त्रसामुग्री पुरवली आहे. शिवाय अमेरिकन सरकारची सल्लागार मिशनें इराण सरकारने स्वीकारलीं आहेत ती निराळींच. याचा अर्थ असा की, हिटलरच्या आज्ञेनुसार गेल्या दुसऱ्या महायुद्धांत इटली जसा वर्तू लागला होता तसाच आता इराण अमेरिकेच्या हुकुमाप्रमाणे वागणार आहे; आणि याचे ताजें प्रत्यंतरहि येत आहे. कारण जें इराणी सरकार रशियाला दबून व नमून होतें व त्याला नाखूष करण्याचें टाळीत होतें तेंच रशियाला धटाईच्या गोष्टी सांगण्याइतकें धीट बनलें आहे ! गेल्या जून महिन्यांत इराणनेच रशियाला खडसावलें की, युद्धकाळांत तुम्ही इराणकडून ५० लक्ष पौंड कर्ज घेतलें आहेत त्याची तावडतोब फेड करा पाहूं.

पण रशियाहि कांही कच्च्या गुरूचा चेला नाही. त्याने आपलें बळ अजमावलेलें आहे. म्हणूनच तो हरएक आघाडीवर अमेरिकेला चीं चीं करावयास लावीत आहे. त्याने पुन्हा २८ ऑगस्ट रोजीं इराणी सरकारला निकडीचा खलिता सादर केला असून तेलाबाबत केलेला करार पुरा करून द्या अशी मागणी केली आहे व आझरबैझानांत पुन्हा प्रचंड राज्यक्रांतीची दहशत उभी केली आहे. उलटपक्षी इराणी सरकारने उत्तर इराणांत दडपशाही सुरू करून हजारो लोक पकडले आहेत. परदेशांत राहून आलेल्या प्रत्येक मनुष्यास अटक होत आहे. हजारो आर्मेनियन लोकांना त्यांच्या इच्छेविरुद्ध रशियांत जाण्यास बंदी केली आहे. रशियाने ९७००० आर्मेनियन लोकांना चिथावणी दिल्यामुळे ते आम्ही रशियाचे आहोंत, रशियांत जाणार, असें म्हणू लागले होते ! ! एकंदरींत इराणांत भांडण इतकें विकोपास गेलें आहे की, तेथेच तिसऱ्या महा-

युद्धाची ठिणगी पडते की काय असें भय निर्माण झालें आहे. ताज्या वार्ताप्रमाणे इराणी सरहद्दीवर दोहो अंगांस रूसो–अमेरिकन सैन्यें सज्ज झालीं आहेत. व त्याच वेळीं इराणी पार्लमेंटांत घावमने तेल करारार्चे बिलहि सादर करण्याचें ठरविलें आहे. प्रत्यक्ष काय घडतें तें लवकरच कळेल.

केसरी, १६–९–४७

☆

— ४० —

# राष्ट्रसंघाच्या 'हुजुरातीं'तील कागदी घोडे

## लोणारी व परीट

जुन्या लीग ऑफ नेशन्सचें, साऱ्या जगाला पालाण घालण्याचें अघटित काम, सध्याच्या यूनोने उचललें आहे. त्याच्या घटनेंत शेकडो निर्बंध समाविष्ट आहेत. इतके की त्यांचा बोध घटनातज्ज्ञाखेरीज किंवा कायदेपंडितांखेरीज सामान्य लोकांना होऊं शकत नाही. त्यांना समण्यासारखी व पटण्यासारखी एकच ढोबळ गोष्ट त्यांत आहे ती ही की, 'यूनोची म्हणजे संयुक्त राष्ट्रसंघाची जी सिक्युरिटी कौन्सिल नांवाची सर्वांत महत्त्वाची व खरी कार्यकारिणी शाखा आहे, तिच्या हातीं मोठी थोरली फौज रहावयाची असून ती जगांत कोणीहि आक्रमक राष्ट्राने कोणावरहि अन्याय्य आक्रमण केलें, तर त्याचा निःपात करणार!' कल्पना फार आकर्षक आहे! कल्पना काढणाऱ्या राष्ट्रांचा मेळावाहि प्रचंड आहे! परंतु प्रत्यक्षांत तिचा अमल होण्याची शक्यता मात्र नष्टांशच होत आहे, असेंच यूनोंतील यादवी आणि खेळखंडोबा पाहून म्हटलें तर शोभण्यासारखें आहे.

सिक्युरिटी कौन्सिलच्या या संकल्पित सैन्याचा आतांपर्यंतचा इतिहास पहा म्हणजे झालें! असें सैन्य तावडतोब स्थापन करण्यांत यावें असा आदेश यूनोने दिल्याला दीड वर्ष होऊन गेलें तरी यूनोंतील त्या बाबतच्या वाटाघाटीच अद्याप संपत नाहीत; आणि त्याही वाटाघाटी अगदी प्राथमिक स्वरूपाच्याच आहेत! याचें स्पष्ट कारण येवढेंच की

परस्परांवर बिलकुल विश्वास नसलेले रशिया व अमेरिका हे दोन देश तें सैन्य उभें करणार ! इसापनीतींतल्या लोणारी आणि परीट यांच्या मैत्रीचाच तो प्रकार आहे; म्हणजे एक कपडे मळ काढून धुण्याचा प्रयत्न करणार तर दुसरा कोळशाच्या खरीने ते लगेच काळेकुट्ट करणार! यांपैकी लोणारी कोण व परीट कोण हे ठरविणे कठीण आहे. तथापि रशिया व अमेरिका, दोघेहि आपापल्या परीने दुसऱ्याला लोणारी म्हणजे कोळशाचा व्यापारी ठरवीत आहेत येवढे खरे !

## मूळ सूचना रशियाची

यूनोच्या या संरक्षक सैन्याच्या प्रश्नाची चर्चा प्रथम डंबार्टन ओक्स येथे झाली. त्यावेळीं मिलिटरी सब-कमिटीवरील रशियाची प्रतिनिधी सोबोलेव्ह हा होता. त्यानेच असा ठराव मांडला होता की 'एक आंतरराष्ट्रीय स्वरूपाचें बलिष्ठ सैन्य उभें करावें, त्या सैन्यावर संपूर्ण हुकमत सिक्युरिटी कौन्सिलची रहावी; त्या सैन्याची भरती निरनिराळ्या राष्ट्रांकडून झाली तरी त्यापुढे त्या त्या राष्ट्राचा यत्किंचितही हितसंबंध त्या सैनिकांशी राहूं नये. म्हणजे त्यांतील प्रत्येक सैनिकाने यूनोलाच एकनिष्ठ किंवा राजनिष्ठ राहिले पाहिजे. त्या सैन्याची लागलागवड, साहित्य-सामान, नेबाद-नालबंदी, रोजमुरे-मुशाहिरे इत्यादिकांचा सारा खर्च सिक्युरिटी कौन्सिलने करावा. सैन्याच्या जोडीस भरभक्कम हवाई दलहि असावें व त्याची केव्हाहि हुकमी मदत मिळावी; यासाठी मध्य युरोपांत कोठेतरी त्याचा तळ नेमावा.'

रशियाच्या या सूचनेला अँग्लो-अमेरिकनांकडूनच विरोध झाला. कोणाहि आक्रमकाचा रणकंडू शमन करण्याइतपत जबरदस्त फौज यूनोच्या सिक्युरिटी कौन्सिलच्या हाती हवी याबद्दल त्यांचा मतभेद नव्हता. परंतु त्या फौजेंत दाखल केल्या जाणाऱ्या आपापल्या पथकांचें 'राष्ट्रीयत्व' गमावण्यास त्यांचा विरोध. शिवाय सिक्युरिटी कौन्सिलच्या हाताखाली कायमची खडी फौज "निरंतर" रहावी हेंहि त्यांना मनांतून आवडेना. कारण त्यायोगे राजकीय स्वरूपाच्या व इतर अनेक तांत्रिक भानगडी सतत निर्माण होत रहातील अशी त्यांची भीति. तेव्हा तीं

म्हणू लागलीं की ' सिक्युरिटी कौन्सिलला सैन्य हवें येवढेंच ना ? प्रत्येक राष्ट्राजवळ त्याचें त्याचें सैन्य असतेंच. त्यांतील कांही निवडक पथकें सिक्युरिटी कौन्सिलला जरूर लागेल तेव्हा पुरविण्याचें अभिवचन प्रत्येक राष्ट्राकडून लेखी घ्यावे म्हणजे झालें ! ' रशियाला अँग्लो-अमेरिकनांच्या पोटांतील कावा उमगला. तथापि तेव्हा त्याने त्यांच्या सूचना मान्य केल्या. शिवाय त्याने या नव्या सैन्यासाठी लागणारी हवाई पथकें ताबडतोब उभी करावींत अशी हि मागणी सुरू केली.

## मिलिटरी स्टाफ कमिशनच्या सूचना

होता होता वरकरणी तरी सर्वानुमते असें ठरलें की अमेरिकेने व इंग्लंडने नाक्यानाक्यावर हवाई व नाविक पथकें जय्यत करावी व रशियाने भौमी किंवा खुष्कीवरील बहुतेक फौजेची जबाबदारी स्वीकारावी. यूनोचीं जीं सभासद राष्ट्रें या सैन्यांत भाग घेणार किंवा त्याला मदत करणार त्यांना काय सवलती असाव्यात यावरहि पुष्कळ माथेफोड झाली. शेवटीं सर्वानुमते ती योजना यूनोचार्टरच्या सातव्या विभागांत कायदे-शीररीत्या ग्रथित करण्यांत आली; त्या अन्वये एक मिलिटरी स्टाफ कमिटी नेमण्यांत येऊन तिने शक्य तितक्या लवकर सैन्ययोजना अस्ति-त्वांत आणावी असें ठरलें. १९४६ च्या फेब्रुवारींत त्या कमिटीची बैठक झाली. तेव्हा अँग्लो-अमेरिकनांनी आपली योजना पक्कया मसुद्याच्या रूपाने पुढे आणली. ती अशी होती. सुरवातीची तरतूद बड्या पांचांनी करावी. नाविक व हवाई पथकें बव्हंशीं अमेरिकनांचीं असावीं, खुष्की-वरील सैन्याची भरती बाकीच्या तिघांनी करावी. ह्या सैन्याच्या जरूरीप्रमाणे नाविक, हवाई किंवा लष्करी तळ हवाली करणें हा देखील या सैन्य-उभारणीच्या साहित्यांतील मोठा भाग असें समजण्यांत यावें व सर्व शाखा मिळून सैन्याची संख्या आठ लक्ष असावी.

अँग्लो-अमेरिकनांकडून ही पक्की योजना दाखल झाल्यानंतर मात्र रशियाने कालहरणाचें धोरण स्वीकारलें. प्रथम त्याने आमची योजना तयार होत आहे म्हणून वेळ खाल्ला आणि नंतर तो सांगू लागला की या योजनेंत अंतर्भूत असलेल्या तत्त्वावरच आधी एकमत झालेलें नाही,

तेव्हा तपशिलाची वाटाघाट व्यर्थ होय व एक वर्षपर्यंत हा तत्त्वाचाच वाद सुरू राहिला. तेव्हा सिक्युरिटी कौन्सिलने शेवटीं रागाने ३० एप्रिल १९४७ पर्यंत कमिटीने आपला रिपोर्ट सादर केलाच पाहिजे असें बजावलें. तो रिपोर्ट त्याप्रमाणे दाखलहि झाला व त्यावरच पुन्हा आता वादरण सुरू झालें आहे व रशिया व्हेटोचा धाक घालूं लागला आहे.

रिपोर्टांत सुमारे पंचवीस बाबींवर बव्हंशीं एकमत आहे. सैन्याचा हेतु, उभारणी कशांतून करावी, त्याची जय्यत तयारी कशी राखावी, हुकमत कोणाकडे कशी रहावी, त्या पथकांचा उपयोग कशा प्रकारे करून घेण्यांत यावा वगैरे त्या बाबी होत. पण याखेरीज दुसऱ्या सोळा बाबी आहेत, त्यांना रशियाचा विरोध आहे. त्यांपैकी तीन विशेषच महत्त्वाच्या आहेत. त्या म्हटल्या म्हणजे ( १ ) 'सवलती', ( २ ) सैन्य पथकांचे तळ ठेवण्याच्या नेहमीच्या जागा, ( ३ ) जीं जीं राष्ट्रें सैन्य–पथकें पुरवणार त्यांचे परस्पर सापेक्ष प्रमाण. फॅसिलिटी म्हणजे सवलती; याबाबत कमिटींतील बहुमताचे म्हणणे असें की यूनोच्या या सैन्याला सभासद--राष्ट्राने आपल्या प्रदेशांतून वाट दिली पाहिजे व शक्य ते तळहि दिले पाहिजेत. यावर रशियाचे म्हणणे असें की 'फॅसिलिटी'मध्ये तळांचा समावेश होत नाहीं. शिवाय त्या त्या राष्ट्रांनी सवलतींचा करारनामा लिहून देतांना कोणच्या प्रकारचें साहित्य देऊं, कोणच्या प्रकारच्या सवलती बहाल करूं व आपल्या हद्दींतून वाट देण्याबाबत कोणता हक्क बहाल करूं ह्याचा स्पष्ट निर्देश केला पाहिजे. जरूर पडेल तेव्हा वाट देण्याबाबत पुनः नवा करारनामाहि केला पाहिजे. 'सवलती'मध्ये रशिया तळ देण्याचे कलम वगळतो याचा अर्थ बाहेरून सैन्य, आरमार किंवा विमान येऊं देण्यास तो तयार नाहीं असाच जवळजवळ होतो ! ! शिवाय प्रत्यक्ष प्रसंग उभा राहिल्यानंतर त्यावेळीं नवा करार करूनै तळाच्या किंवा वाट मिळविण्यासंबंधी सवलती मागणें या गोष्टी उघडच अव्यवहार्य आहेत." सैन्य-पथकांच्या नेहमींच्या छावण्याबाबतही तीच स्थिती. कमिटींतील बहुसंख्य सभासदांचे म्हणणें असें की, ज्यावेळीं हीं पथकें सिक्युरिटी कौन्सिलच्या कामावर रुजू नसतील त्यावेळीं त्यांनी त्यांना कायदेशीररीत्या

जेथे जेथे राहतां येऊं शकेल त्या त्या जागी किंवा समुद्रांत त्यांनी राहण्यास हरकत नाही. पण रशिया म्हणतो ' तसें नाही. फक्त दुसऱ्या महायुद्धांतील शत्रुराष्ट्रांच्या मुलुखांत जीं या यूनो--सैन्याचीं पथकें असतील त्यानाच तेवढी ही सवलत असावी. एरवीं ज्या त्या राष्ट्राने आपापल्या सरहद्दीआंतच त्यांना ठेऊन घेतले पाहिजे. ' पण असें झालें तर लढाईच्या हंगामांत कामाच्या जागीं तीं तीं पथकें जलदीने कशीं नेतां येणार ? सर्वांत मतभेदाची मोठी तिसरी बाब म्हणजे कोणी कसलें व किती सैन्य पुरवावें ? रशियाचे म्हणणें असें आहे की, प्रत्येक राष्ट्राने दुसऱ्याइतकेंच फक्त सैन्य पुरवावें. पण यामुळे काय होईल की, तें सैन्य अगदीच कमकुवत राहील. फ्रान्सने नुकतेंच जाहीर केलें की, आम्हीं फक्त १५००० शिपाई पुरवूं. अर्थात् इतर कोणालाहि त्यापेक्षां अधिक संखेने सैन्य पाठवितां येणार नाही; व चीन, फ्रान्स हें एकहि गलबत किंवा एकहि विमान पाठवूं शकत नाहीत म्हणजे इतर कोणालाच विमाने व गलबतें पाठवतां येणार नाहीत. एकंदरींत रशियाच्या योजनेप्रमाणे यूनोच्या झेंड्याखाली साऱ्या जगाचें दमन करणारी जी प्रचंड फौज अस्तित्वांत येईल तींत अवघी बड्या पाचांचीं पांच पलटणेच तेवढी असतील; अर्थात् ती पंचभेळ खिचडीच होणार ! व त्या सैन्याला कोठल्याहि तऱ्हेचें आरमाराचें किंवा हवाई दलाचें कसलेहि पाठबळ मिळणार नाही.

म्हणजे अमेरिकेने सुरू केलेल्या जागतिक शांततासंस्थापनेच्या आगडंबब कार्याची रशियाने केवळ टिंगल व टवाळी सुरू केली आहे असेंच या हकीकतीवरून स्पष्ट दिसतें.

केसरी, १९-९-४७

[library stamp with handwritten number ६८३०]

REFBK-0006830